




# माणूस

मे १९६८








वर्ष तिसरे : अंक बारावा : संपादक : श्री. ग. माजगावकर : मे १९६४

## स्वरूपदर्शन


**मुखपृष्ठ**

कुसुमाग्रज

**मुखपृष्ठकथा**

शब्दांच्या दुनियेतील बावनकशी व्यक्ती ... अच्युत शिरवाडकर

क्रांतीचे स्तोत्रकार कुसुमाग्रज ... चंद्रशेखर मराठे

**कथा**

शिकार ... बाळ निम्बवडेकर

सूड ... श्री. भा. श्रोत्री

**चालू कादंबरी**

हरी नारायण : प्रा. भीमराव कुलकर्णी

**समीक्षा**

अष्टग्रहीतील नववा

थंडीचे दिवस

घास भरवायला हवा

**नाट्य, चित्रपट-परीक्षण**

वऱ्हाडी मान्सं : सुधीर दामले

पाठलाग : महेश

**क्रीडा-विहार**

...... प्रभाकर गुजराथी

**काव्य**

स्मरण ... ह. शि. खरात

चार अभंग ... प्रसन्नकुमार पाटील

एक पक्षी ... प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी, एम्. ए.

दोन अभंग ... कृष्णमाधव देशमुख

जागर ... ललित सोनोने

त्रागा ... मा. गो. काटकर


किंमत एक रुपया : वार्षिक वर्गणी आठ रुपये

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतातच असे नाही.

सर्व हक्क सुरक्षित

# शिव्या आणि ओव्या

वाचकांच्या पत्रव्यवहाराचे सदर 'माणूस'मध्ये नियमितपणे देता येत नाही. सवडीप्रमाणे महत्त्वाची व वेगळी वाटणारी पत्रे मधूनमधून देण्याचा परिपाठ आहे. तिसऱ्या वर्षांचा हा शेवटचा अंक. त्यानिमित्त प्रश्नोत्तरांचा हा या वर्षाचा शेवटचा हप्ता.

—संपादक

स. न. १५-४-६३

आपण अगत्यपूर्वक व आठवणीने "माणूस"चा नमुना अंक पाठविलात याबद्दल मन पूर्वक आभार. मासिकातील "हीच का आमची तीर्थक्षेत्रे?" हा प्रा. दा. सी. देसाई याचा लेख वाचला. लेख वाचून अक्षरश: अस्वस्थ झालो. सरकारी कारभारातील धोकादायक उलाढाल उघड करून सांगितल्याबद्दल लेखकाचे व संपादकांचे अभिनंदन.

बहुधा जून १९६३ पासून म्हणजे आपल्या मासिकाच्या तिसऱ्या वर्षाच्या आरंभी मी वर्गणीदार होईन असे म्हणतो.

**शरद गणेश जोशी**
मुं. २९

[आपल्यासारख्या वाचकांनी अंकातील मजकुरासबंधी आस्थापूर्वक काही मतप्रदर्शन केले तर आमची वाटचाल अधिक सुकर होईल, आपल्या पत्रातील पूर्वार्ध उत्तेजनक व उत्तरार्ध उत्साहदायक वाटला. सं.]

स. न. १-५-६३

'माणूस'च्या मेचा अंक अप्रतिम काढला आहात. सावरकरांचे आत्मकथन परिणामकारक उतरले आहे. आजच्या काळात त्यांच्या कार्याविषयी लोकांचे गैरसमज दूर व्हावेत.

सौ. स्नेहलता दसनूरकर याची गोष्टही चांगली आहे. माझ्या दृष्टीने हीच त्यांची पहिली चांगली गोष्ट वाचली.

**के. वा. भोळे**
'स्वरवंदना' पुणे ४

[सामान्य वाचकाप्रमाणे आपल्यासारख्या रसिकवराची मानही हलली हे बघून विशेषच आनंद झाला. 'माणूस'च्या सावरकर अंकासंबंधी असंख्य पत्रे आली, परंतु आपल्यासारख्यांच्या पत्रामुळे अंगी थोडे मास आले. सं.]

स. न. ३१-१०-६३

आपण कृपा करून 'माणूस'चा एक दिवाळी अंक पुढील पत्त्यावर माझ्या बंधूच्या नावे पाठवावा. अंकाची किंमत व पोस्टेज माझ्या कथेच्या मानधनातून वजा करावे.

**सौ. स्नेहलता दसनूरकर**

[आपली कथा दिवाळी अंकात असतानाही आपण अधिक लागणाऱ्या अंकाचे मूल्य देऊ करावेत याबद्दल आभारी आहोत. या गोष्टीचे आम्हाला एवढे कौतुक का वाटते हे मात्र आम्ही सांगत नाही! उगाच रागाची वृद्धी नको. स.]

स. न. २७-११-६३

चेक मिळाला; आभारी आहे. परंतु श्री. माजगावकरानी या लेखाबद्दल मोबदला पाठवला होता—असे मला वाटते—माझ्या नीटसे लक्षात नाही. पण जरा चौकशी करावी. आता आलेला चेक मी दुसऱ्या कथेचा (डिसेंबरचा) मोबदला म्हणून स्वीकारीत आहे. तेव्हा दुसऱ्या कथेचा मोबदला कृपा करून पाठवू नये.

**सौ. वसुधा पाटील**
गोरेगाव

[आपण हिशोबातली चूक नजरेस आणून दिलीत याबद्दल आभारी आहोत. सौ दसनूरकरांचे पत्र वर दिले आहेच. स्त्री-लेखिकांच्या बाबतीत तरी मासिकाच्या संपादकाला तक्रार करायला जागा आहे असे वाटत नाही स.]

स. न. ६-१२-६३

विनायक—पुरवणीविषयी तुम्हाला सविस्तर लिहायचे तसेच राहून गेले. ते आता थोडक्यात लिहितो.

दिवाळी अंकातील आणि नंतरच्या अंकातील विनायकरावाविषयीचे बहुतेक सर्व लिखाण मी वाचवून घेतले. सर्व परिचित मंडळीच्याकडून लेख लिहून घेण्याची आणि ते सजवून मांडण्याची शिकस्त तुम्ही केली आहे.

अशा प्रकारच्या लिखाणात पुनरुक्ती अपरिहार्य असते. त्याला कोणाचाच इलाज नाही. अनेक लेखातून स्मृतीचे अगर रसग्रहणांचे सुवर्णकण विखुरले आहेत. ते वेचून विनायकाच्या कलेची मनोमय प्रतिमा सजाण रसिकाला आपल्या डोळ्यापुढे उभी करता येईल. मात्र काही लिखाणात कळत न कळत चुकीची विधाने आली आहेत. काही लेख औपचारिक झाले आहेत. त्याला संपादक काही करू शकत नाहीत. तुम्ही मंडळींनी कसोशीने आपले कर्तव्य पार पाडले आहे.

**वि. स. खांडेकर**
कोल्हापूर

[विनायक अंकाची जबाबदारी आम्ही मुख्यत: तुमच्याच आशीर्वादाने उचलली. अर्थातच आपल्या 'पावती'मुळे श्रमपरिहार झाला आहे स.]

माननीय 'माणूस', ४१९ नारायण पेठ, पुणे २
याचे हुजुरास

ता. ९-१२-६३

विषय :—मी दिलेल्या दोन कविता व एक लेख प्रसिद्ध होणेबाबत

अर्जदार :—रामदास लक्ष्मण केदारे वि. शि. प्रा. ट्रे. कॉ. नांदगाव, जिल्हा नाशिक

माचा सविनय ऐसाजे की आपणाकडे एक लहान मुलगी आपल्या मावाला कशाकशाच्या उपमा देऊन कशी जोजावीत असते व निजविण्याचा प्रयत्न करते, यावर एक कविता आणि मी पाहिलेली बोरीवली येथील बागेचा महिमा यावर एक अशा दोन कविता व खरा गुरू कोण हा लेख आपणाकडे पाठवीत आहे. तरी आपण त्याची

तपासणी करून प्रकाशित कराल अशी आशा बाळगतो. तुमच्या ' माणूस ' मासिकातील सूचना मी वाचल्या. त्या मला मान्य आहेत. सर्वस्व आपल्याच स्वाधीन आहे. हा लेख जर निवडला गेला नाही तर साभार परत करणे ही विनती. मी डबल पाकिट पाठविले आहे. असो. आपला नवीन नवीन कवी होऊ इच्छिणारा.

रामदास ल. केदारे.

विद्यार्थी शिक्षक, प्रा. ट्रे. कॉ. नादगाव; जिल्हा नाशिक.

[ आपला अर्ज आम्हास आवडला म्हणून तो दप्तरी दाखल न करता प्रसिद्ध करीत आहोत. स. ]

स. न. वि. २०।१२।६३

आपण मला पाठवलेला ' माणूस 'चा डिसेबरचा अक एकाने पळवला. पिंपुटकरांवरील लेखाने आमच्या महापालिकेत बरीच गम्मत उडवून दिली. तरी आपण मला त्या अंकाची आणखी एक प्रत पाठवा.

अभ्यासू

[ अक पळवला तरी हरकत नाही. आमचा अक वाचकाला आता पळवावासा वाटला हे वाचून आनद झाला.–सं. ]

स. न. ८।१।६४

' माणूस 'च्या जानेवारी अंकात ' मरवा ' वरील माझे समीक्षण आपण प्रसिद्ध केले आहे. माझ्याकडे अक आला आहे. पण अकाच्या बाधणीत ४८ ते ५७ पृष्ठे घालायचे राहून गेले आहे. दुर्दैवाने माझी matter त्यातच आहे तरी कृपया दुसरा अक पाठवावा ही विनंती.

बाळ निम्बवडेकर

गारगोटी

[ बाइडरने जर आमच्या अंकाचे जादा संपादन सुरू केले तर आफतच आहे ! चौकशी केल्यावर अशी बांधणी केलेले फारसे अक नाहीत असे कळले. असे ' एप्रिल फूल ' विशेषाक यापुढे काढू नका असे त्यास बजावले आहे.–स. ]

स. न. २१।१।६४

मी आपल्या मासिकाचा नियमित वाचक आहे. दर्जेदार साहित्य हेच आपले वैशिष्टय असल्यामुळे जाणकार रसिकाच्या आवडीस आपले मासिक निश्चित उतरले आहे. परतु मासिकाची सजावट ही अत्यावश्यक आहे असे मला वाटते म्हणून सोबत कवितेवर छापण्यासाठी चित्र पाठवीत आहे. शक्य असल्यास स्वीकार व्हावा. कळावे.

नागेश सुखसे

सोलापूर

आपण पाठविलेली सजावट एप्रिल ६४ अकापासून आम्ही वापरली आहे. अंकाच्या सजावटीबाबत सूचना असल्यास अवश्य कळवा सहकार्याबद्दल आभारी आहोत–सं. ]

स. न. २१।१।६४

तुमचे पत्र व ' माणूस 'चा मे ६२ चा अंक हे आजच पोचले. कामातून वेळ काढून इतका जुना अक शोधून पाठवल्याबद्दल आभार!

तुमचा जानेवारीचा अक अतिशय आवडला. त्यातले "रुधिरी स्वप्न बुडाले " आणि " यु-टू गॅरी पॉवर्स " सबधाचा १५ ते २० पानाचा लेख अविस्मरणीय आहे. " रुधिरी स्वप्न बुडाले " हा लेख वाचताना प्रत्यक्ष सगळे समोर घडत आहे असे वाटले, असे लिहिले तर त्यात कुठलीही अतिशयोक्ती होणार नाही. महात्मा केनेडीवर


भरपूर कॅल्शियमयुक्त

बिटको

ग्राइप

नेहमी दिल्याने

लहान मुले सशक्त बांधेसूद

व गुटगुटीत होतात.

अत्यंत लोकप्रिय

बिटको

काळी टूथ पावडर

नेहमी वापरल्याने

दात मोत्यासारखे स्वच्छ

व चकचकीत होतात.

बिटको केमिकल इन्डस्ट्रीज, नाशिक रोड

सिद्ध झालेल्या अनेक लेखांमध्ये त्याचे एक वेगळे वैशिष्टय राहील. मला हे दोन्ही लेख इतके आवडले की आमच्या सहकार-वाचनालयातून मी तो अंक विकत घेतला आहे. हे दोन्ही लेख तुमच्या अभावी लेखणीतून उतरले होते का ?

सुधाकर जोशी
पो. मुंब्रा

[ पॉवर्सच्या कथेचे लेखक श्री. वसू मगत याचे नाव आम्ही लेखाबरोबर दिलेच आहे अंकात प्रसिद्ध होणारे निनावी साहित्य हे कचेरीत संपादित होते. त्याचे श्रेय-अश्रेय हे सर्व संपादक मंडळाचे असते. स ]

३ । २ । ६४

स. न.

आपणाला प्रत्यक्ष भेटून गेल्यानंतर ठरल्याप्रमाणे मी आज सकाळी आपणाकडे माझी ' तू आहेस ' ही कादंबरी व पाच कथा (वेगळा, बोलकी, अनुभूती, पाठमोरी, प्रेझेंट) आणून दिल्या. मी आलो असताना आपल्याकडे गर्दी पुष्कळ होती. त्यामुळे आपणाशी बोलणे शक्य झाले नाही. आणि म्हणून हे पत्र पाठवीत आहे. ' तू माझा आहेस. ' अनेक प्रसंगाची गुंतागुंत करता ती कादंबरी मी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रेमाचे त्रिकोण नाहीत, विस्मयकारक प्रसंग नाहीत. तरीही एखादा साधा विषय किती आकर्षकपणे मांडता येतो हे मला दाखवायचे आहे. त्यातला श्रीधर आजच्या सुशिक्षितात पुष्कळ असा आढळणार आहे. पुष्पाही तशीच आहे. ' पाणी काठीनं तोडता येत नाही. ' या गावठी म्हणी प्रमाणे आहे लग्नाचे. लग्नगाठ एकदा बसली की बसली. हा विचार त्यात प्रामुख्याने मी कायम ठेवला आहे.

आता काही ठिकाणी त्यात आपल्या मासिकाला किंचित अवघड वाटणारा शृंगार आहे. तथापि तो एकमेकावर निःसीम प्रेम करणाऱ्या पति-पत्नीमधील आहे म्हणून तो तितकासा अपचनीय ठरू नये. तथापि त्यावर आपणाला चर्चा करता येईल. जाता जाता एका मोठ्या व्यक्तीने त्याविषयी मला लिहिले आहे... " त्यात मुक्त शृंगार आहे. पण सात्विक ओढ आहे, ती चिरंतनाची मिठी आहे, ती एकरूपतेची... इत्यादि. " असो. कादंबरीचा मुख्य विषय आपणाला पसंत असला तर मग इतर अंगावर आपणाला चर्चा करता येईल. आता लिहितो कथाविषयी—

**वेगळा** – कुमारी माताचा प्रश्न आहे तो पण वेगळ्या प्रकारे हाताळलेला आहे. प्रेमभंग, धिक्कार, संकटे इत्यादि प्रकारचा नेहमीचा मसाला आता वाचकाना जुना वाटतो म्हणून तो निराळ्या प्रकाराने मी रंगविला आहे.

**अनुभूती**–मरणासारखी माणसाला घाबरविणारी दुसरी गोष्ट नाही. तथापि ती गोष्टही—इतकी गंभीर गोष्टही एखाद्या साध्या गोष्टीमुळे कधी कधी सुखावह होते आणि माणसाचे मन...धैर्यवान व्हायला मदत....

**बोलकी** – प्रत्यक्षात दिसणारी व्यक्ती दिसते तशी नसते. नेहमी दिसणारी, बोलणारी व्यक्ती जेव्हा एखाद्यावर विश्वास टाकून बोलू लागते तेव्हा....या कथेचा शेवट वैशिष्टयपूर्ण आहे. शेवटी ही ' बोलकी ' वाचकाना गप्प करील अशी मला उमेद वाटते.

**पाठमोरी** – मनाच्या तीन अवस्था. एखाद्या व्यक्तीला प्रथम पाहताक्षणी बनलेले मन, नंतर त्याच व्यक्तीविषयीचे बनलेले मत आणि नंतर त्या व्यक्तीविषयी ताकावर येणाऱ्या लोण्यासारखे ठाम बनलेले मत किती वेगवेगळे असू शकते ही कथा एका मोठ्या मासिकाने दुर्बोध म्हणून सांगितले आहे.

**प्रेझेंट** – एक वेगळ्या प्रकारचे प्रेझेंट देऊन नवोदित " युगुलाला मुक्त सोडलेले आहे. त्यात एक प्रकारचा नवीन विषय आणि विनोदी स्वरूपाचा म्हणून ती कथा वाचकाना आवडावयास हरकत नाही.

असो आपणाला जर माझ्या कथेतील मुख्य सुप्त भाग आवडला तर त्यातले आपणाला न आवडलेले बारकावे चर्चेनंतर दूर करता येतील.

मला ज्या ठिकाणी वाटले त्या ठिकाणी ' चर्चा ' असे बारीक अक्षरात समासात मी लिहिले आहे.

प्रथम आपण वाचून पाहा. नंतर त्यावर संस्करण व त्याचे संकलन करणे आपणास अवघड नाही.

आपला आता जास्त वेळ घेत नाही. निर्णय शक्यतो लवकर कळवाल अशी आशा बाळगतो आणि तसदीबद्दल क्षमा चाहतो. कळावे, पत्रोत्तर यावे

प्रभाकर वामन गोरे
८६८. सदा. पेठ पुणे. २

[ तुमच्या साहित्याची वाचकाना थोडक्यात ओळख होईल म्हणून आपले पत्रच प्रसिद्ध करीत आहोत.

तुमचे नंतर रागावून लिहिलेले दुसरे पत्र मात्र आम्ही छापणार नाही.–स. ]

स. न. १० । ३ । ६४

आपले डिसेंबर, जानेवारी, आणि फेब्रुवारी मासिकाचे (माणूस) अंक मिळाले. फेब्रुवारी मासिकातील शेवटच्या पानावरील ब्लॉकसहित वार्ता वाचून मला, तद्वतच आमच्या डोंबिवलीतील मित्रांना फारच आनंद झाला. ' नवशक्ति 'तील माझे मित्र सहसंपादक बंडोपंत गोखले यानी माझे साहित्य वाचून अभिनंदन केले. तुम्ही वार्ता उत्कृष्टपणे संकलित करता असे मला त्या दिवशी बंडोपंत गोखले म्हणाले. तद्वतच डोंबिवलीचे प्रसिद्ध मराठी कथालेखक श्री. शं. ना. नवरे हे माझ्या चांगल्याच परिचयाचे आहेत. त्यांना आपला ' माणूस ' फारच आवडल्याचे दिसते.

एम्. एम्. सुरतकर
डोंबिवली (ईस्ट) ठाणे

[ अहो सुरतकर श्री. बंडोपंत गोखले यानी तुमचे, नेमके कुणाचे अभिनंदन केले ? तुम्ही म्हणजे तुम्ही की आम्ही ? कुणी का असेना–! श्री. गोखले व श्री. नवरे आमच्याही थोडे ओळखीचे आहेत. सहसा कुणाविषयी वाईट बोलण्याची सवय नाही त्याना ! त्याची मते कळवल्याबद्दल तुमचे आभार.–स. ]

स. न. २२।३।६४

आजच आपला 'माणूस'चा मार्च ६४ चा अंक वाचला. काहीतरी नवीन वाचावयास मिळेल अशी अपेक्षा होती, पण ती एकदर अंकावरून सफल न झाल्यासारखी वाटली.

' क्लिओपात्रा 'चे परीक्षण जे आपण पहिल्या प्रथम मांडण्याचा दावा करून दिले आहे. ते फोल ठरतेच. यापूर्वीच एक महिना आधी मी ते दैनिक ' मराठा 'त वाचलेय. तेव्हा कंपनीने निश्चित आपली

फसवणूक केलीय. परीक्षण मात्र चित्रांमुळे उठावदार झाले आहे.

आतापर्यंत सत्य आणि काहीसे नावीन्यपूर्ण अशा घटनांवर आधारित दीर्घ कथा आपण ' माणूस 'मध्ये दिल्या आणि तीच परंपरा आपण चालवाल अशी अपेक्षा होती. परंतु ' आहुती ' ही कादंबरी देऊन आपण ती भग्न करीत आहात. कादंबरी कोठेही पुस्तकरूपाने वाचावयास मिळेल तेव्हा मासिकात आपण तिला का स्थान देता हे समजत नाही. पूर्वीसारखेच श्री. शास्त्रींसारखे लेखक हाताशी धरून निरनिराळी नावीन्यपूर्ण व सत्य घटनेवर आधारित व मराठी माणसाला जी अज्ञात आहेत अशी पुस्तके द्यावीत. वरील गोष्टीचा विचार होईल अशी अपेक्षा आहे.

**भ. ग. पाठक**
अहमदनगर

[ ' क्लिओपात्रा 'चे परीक्षण आम्ही दिलेले नाही. आम्ही फक्त कथा सांगितली. 20 Century Fox ने पुरवलेल्या चित्रांच्या आधारे. ' आहुती ' ही कादंबरी आपणांला आवडली नाही असे दिसते. शंका मात्र अशी येते कादंबरी वाचणेच आपल्याला आवडत नसावे. असो. मार्च अंकाबाबत आपण सडेतोडपणे मत कळवले याबद्दल आपले आभार मानतो–सं. ]

३१-३-६४

स. न.

आताच आपला एप्रिल अंक हाती आला. या अंकाची कल्पकता, सजावट, छपाई व भरपूर जाहिराती यांमुळें मन प्रसन्न झाले. आपण अभिरुची आणि वैशिष्ट्ये आबाद राखून आपल्या उद्दिष्टांशी एकनिष्ठ आहात, याबद्दल हार्दिक अभिनंदन करतो. दिवसेंदिवस आपली उन्नती होत जावो, ही मनोमन इच्छा.

**बापू वाटवे**
संपादक कथालक्ष्मी पुणें ४

[ आपल्यासारख्यांच्या सदिच्छेमुळेच अजून आम्ही नाबाद राहिलो आहोत. लोभ असू द्यावा. ]

३१-३-६४

स. न.

आपला माणूसचा एप्रिलचा अंक पाहिला. आपण आपल्या अंकात स. प. महाविद्यालयाच्या कबड्डी संघाची जी माहिती छापली आहे, त्याबद्दल मी आमच्या संघाच्या वतीने आपली मनःपूर्वक आभारी आहे.

मला एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. ती म्हणजे माझ्या निवडीबद्दल आपण जसे माझे अभिनंदन केलेत त्याचप्रमाणे पुण्यातील माझ्या खेळाडू भगिनी– विद्या आपटे ( स. प. ), सौ. वसुधा पुरोहित, कु. चंपा भोसले व सौ. जयश्री घुले, यांचीही महाराष्ट्रातून निवड झालेली आहे. याचा मी मुद्दाम नामनिर्देश केला होता. पण प्रत्यक्षात तसा उल्लेख मला आढळला नाही. तरी आपणांस शक्य असल्यास आपण पुढील अंकी याचा विचार करावा ही नम्र विनंती.

**लीला फडके**, पुणें २.

[ ज्या भगिनींचा उल्लेख ' एप्रिल ' अंकात आला नाही त्यांचा नामोल्लेख आपण केलाच आहे. या सर्व भगिनींचें आम्ही निवडीबद्दल व खेळातील प्राविण्याबद्दल अभिनंदन करतो. झालेला अनुल्लेख खेळाडूपणे या भगिनी स्वीकारतील याची खात्री वाटते. कळावे.] ● ●


लोणच्याचा तयार मसाला



कैऱ्या किंवा लिंबें यांच्या फोडी, मीठ व बेडेकर लोणच्याचा तयार मसाला एकत्र नीट कालवावा व बरणींत भरावा. नंतर तेलाची फोडणी थंड करून वर ओतावी म्हणजे आपणहि अप्रतिम 'बेडेकर' लोणचें बनवूं शकाल.

**माहितीपत्रकाची मागणी करा**

*ठाकुरद्वार, दादर, फोर्ट व परेल तसेंच पेरू गेट, पुणें व म. गांधी रोड, नाशिक या दुकानांत मिळेल.*

बेडेकर
मसालेवाले
मुगभाट, मुंबई-४



कवी कुसुमाग्रजांना आम्ही घरी सर्वजण तात्या म्हणतो. दिनांक २७ फेब्रुवारीला तात्यांची साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याचे जाहीर झाल्यावर आमचे घर आनंदाने भरून गेले. तात्यांना आधीच अभिनंदनाची तार रवाना झाली होती. योगायोग असा की त्याच दिवशी त्यांचा ५२ वा वाढदिवस होता. वाढदिवसाच्या दिवशीही आनंदाची बातमी आल्यामुळे सर्वांचा आनंद शतगुणित झाला. १९३० पासून तात्यांनी साहित्य-सेवेस सुरुवात केली. चौतीस वर्षांच्या अखंड सेवेनंतर साहित्य-प्रेमी रसिकांनी हे बहुमानाचे पद त्यांना बहाल केले. होते. साहित्य-संमेलनाचे अध्यक्षपद म्हणजे मराठी साहित्यिकाचा वाङ्मयप्रेमी रसिकांनी केलेला सर्वांत मोठा बहुमान असे म्हणायला हरकत नाही. त्यासाठी तात्या पात्र होतेच. परंतु या पदासाठी निवडणुकीचे दिव्य असल्याने ते त्यातून कसे पार पडतात याचीच थोडीशी काळजी वाटत होती. कारण त्यांच्या विशिष्ट मनोवृत्तीला निवडणुकीच्या तंत्राचे, धामधुमीचे आणि धकाधकीचे वावडे आहे. पण तो प्रश्नच निर्माण झाला नाही. त्यांची बिनविरोध निवड झाल्यामुळे त्याच्या यशाला अधिक उज्वलता प्राप्त झाली. एका मोठ्या तपस्येची साहित्यरसिकांनी कदर केली. खरोखरच तात्यांनी साहित्याची उपासना एकाद्या तपस्व्याप्रमाणे केली आहे.

**एकच तारा समोर आणि पायतळी अंगार**
**होता पायतळी अंगार ।**

अशी ही साधना आहे.

### चाकोरीबाहेरचे जीवन


ध्येयाची इतकी प्रखर उपासना फक्त क्रांन्तिकारकाकडूनच होते असे नाही. तर ध्येयाचा ' एकच तारा ' समोर ठेवून त्याच्यापाठीमागे ध्येयवेड्या मनाने धावणाऱ्या कलावन्ताकडूनही ती होत असते. कोवळ्या आणि तरुण वयातच तात्यांनी साहित्य-सेवेचे ध्येय निश्चित केले. त्या कालात एकादे ध्येय मनापुढे ठेवून ते साकार करण्यासाठी सर्वस्व वाहणे ही गोष्ट फार अवघड होती. सर्वसाधारण माणसे सरळ चाकोरीचा मार्ग पत्करीत असत. सर्वांनी तोच धोपट मार्ग धरावा असा त्यांचा आग्रह असे. एकादा ध्येयवादी तरुण हा मार्ग सोडून अन्य मार्गाने जाऊ लागला तर तो त्यांच्या उपहासाचा

: कवी :

कुसुमाग्रज. . .

# शब्दांच्या दुनियेतील

## गजाननाने निवडलेला गणपती



आमच्या त्या छोट्या गावाचे नाव पिंपळगाव. नाशिकपासून सुमारे वीस मैलांवर हे गाव आग्रा रोडवर वसलेले आहे. मी सांगतो त्या काळात या गावाची वस्ती जेमतेम दोन अडीच हजारांची असेल. परंतु गावाला वळसा घालून जाणारी नदी तुटक स्वभावाची आणि गावातील लोकांवर सतत रागावलेली अशी वाटायची दरडीच्या तळाशी आणि जुनाट झाडांच्या सावल्यांत झाकळलेले तिचे दोन डोह तर फारच उग्र आणि भीतदायक होते. डोक्यावर काळे घोंगडे घेऊन बसलेले साक्षात् बागुलबुवाच ! या डोहांपासच्या झाडावर भुतेखेते राहात होती, पाण्यात साप होते आणि भोवताली वेड्यावाकड्या आख्यायिका होत्या. या स्थानाभोवती पसरलेल्या भीतीची कधी दुरून, तर कधी जवळ जाऊन आस्वाद घेताना गंमत वाटायची आणि स्वतःच्या शूरत्वाचाही थोडाफार प्रत्यय यायचा.

एक दिवस एक अभूतपूर्व वार्ता गावात येऊन थडकली. नाशिक शहरी वास्तव्य करणारे श्रीमत् श्रीशंकराचार्य हे आमच्या गावी येणार आणि दोन दिवस आमच्या येथे मुक्काम करणार ही ती बातमी होती !

अखेरीस तो सोनियाचा दिवस उजाडला. शंकराचार्य पालखीत बसून नाशिक ते पिंपळगाव हा वीस मैलांचा प्रवास करणार होते. सूर्योदयाच्या सुमारास गावातील दीडदोनशे प्रतिष्ठित लोक श्रींचे स्वागत करण्यासाठी गावाच्या शिवेकडे वाटचाल करू लागले. मीही भल्या पहाटे स्नान केले, ठेवणीतले कपडे घातले, डोक्यावर जरीची टोपी चढविली आणि मित्रांच्या मेळाव्यात सामील झालो.

शिवेजवळ असलेल्या एका ओहळापाशी आम्ही थांबलो नऊच्या सुमारास समोरच्या दिशेने एक छोटासा मेळावा भगवी निशाणे फडकावीत येत असलेला आम्हांला दिसू लागला. अल्पावकाशात श्रींची पालखी ओहळाजवळ येऊन ठेपली. शिंगांच्या ललकाऱ्यांनी, झांज-नगाऱ्यांच्या आवाजाने आणि श्रींच्या जयजयकाराने त्या निःशब्द रानाचे, आकाशाचे आणि आमचेही अंतःकरण थरथरून गेले भोयांनी पालखी खाली ठेवली आणि पालखीतून श्रीमत् जगत्गुरू श्रीशंकराचार्य यांची स्वारी बाहेर आली !

मंत्रांच्या घोषात श्रींची पाद्यपूजा झाली आणि नंतर नमस्काराचे सत्र सुरू झाले. माझ्या वडलांनी मला जवळ बोलावले. तोंडात बोट घालायचे नाही, जीभ बाहेर काढायची नाही, मनगट नाकाजवळ न्यायचे नाही, टोपी वाकडी होऊ द्यायची नाही

: लेखक :

अच्युत शिरवाडकर

# बावनकशी व्यक्ती

## ~~~~~~ बालपणीची एक रम्य स्मृती ~~~~~~

वगैरे पूर्वसूचना ध्यानात ठेवून, घाबरत घाबरत मी पुढे झालो आणि श्रींच्या पायांवर डोके ठेवले ! डोके किती वेळ पायांवर ठेवायचे याची निश्चित कल्पना नव्हती. वडिलांनी बहुधा माझी ही अडचण ओळखली आणि खांद्याला धरून उठविले.

पाहुणे संन्यासी असूनही आमच्या घराला लग्नघराची शोभा आली होती ! दोन तीन दिवसांच्या मुक्कामात श्रींचे माझ्या वडिलावर खूपच प्रेम बसले.

धामधुमीत मुक्कामाचा शेवटचा दिवस उगवला. त्या दिवशी श्रींनी आमच्या घरांतील सर्व पुरुषांना आणि मुलांनाही मंत्र दिले. त्यानंतर श्रींनी देवपूजा केली. हा कार्यक्रम एकान्तात आणि सुमारे दीड तास चालत असे पूजा आटोपल्यावर प्रसादासाठी म्हणून घरांतील सर्व माणसांना, बायका-मुलांना, पाहुण्यांना बोलावण्यात आले. घरात असलेली यच्चयावत् माणसे जमा झाली, एकेकजण देवाला आणि श्रींना नमस्कार करून तीर्थप्रसाद घेत होता आणि बाजूला जाऊन उभा राहात होता. माझी पाळी आली. मीही पुढे जाऊन प्रसाद घेतला आणि माघारी वळलो. तेवढ्यात श्रींच्या मनांत काय आले कोणास ठाऊक, त्यांनी मला हाक मारली आणि परत जवळ येण्यास सांगितले. मी जवळ गेल्यावर ते म्हणाले, " हे पाहा, या देव्हाऱ्यातून तुला हवी ती देवाची मूर्ती तू निवडून घे. अगदी कोणतीही. मात्र त्या देवाची नेहमी पूजा केली पाहिजे. चल–उचलून घे कोणतीही मूर्ती ! " मी ते शब्द ऐकून भांबावून गेलो. एकदा वडीलधाऱ्या मंडळीकडे पाहिले आणि नंतर देव्हाऱ्याकडे दृष्टिक्षेप केला. देव्हारा अनेक खणांचा होता आणि सारे खण देवांनी खच्चून भरलेले होते तेहतीस कोटी देवांची वार्ता कानांवर होती, पण इतके देव एकत्र पाहण्याचा तो पहिलाच प्रसंग होता ! त्या देवांच्या जगातही वर्णभेद होते. काही सोन्याचे होते, काही पाचूमाणकांनी मढवलेले होते. चांदीचे अनेक होते. आणि काही तांब्या-पितळेचेही होते. मी स्तब्ध उभा राहिलेला पाहून शंकराचार्यांनी पुन्हा एकदा मला तीच आज्ञा केली आणि पुढे येण्यास फर्मावले. आता गत्यंतरच नव्हते. मागून लोटलेल्या मेणाच्या पुतळ्यासारखा मी पुढे गेलो. देव्हाऱ्याजवळ जाऊन उभा राहिलो. भोवतालचा सर्व जमाव मोठ्या कुतूहलाने पाहात होता. सारेजण निःशब्द झाले होते मी मोठा धीर करून हात उचलला, देव्हाऱ्यात घातला आणि एक सामान्य, छोटा ओबडधोबड पितळेचा गणपती बाहेर काढला ! सभोवार साचलेली शांतता एकदम तडकली. हसण्या-बोलण्याचा आणि थट्टामस्करीचा कल्लोळ उसळला. मी गणपती घेतला आणि दिवाणखान्याबाहेर धूम ठोकली. घरात गेल्यावर पाहुणेमंडळी चेष्टा करू लागली : " इतका कसा रे बेअक्कल तू ! मूर्ती घ्यायला सांगितली तर सोन्याची तरी घ्यायची ! निदान चांदीची तरी—" पितळेचा देव मी का उचलला हे मला तेव्हा आणि पुढेही कधी कळले नाही ! शंकराचार्यांसारख्या संन्याशाला बुडवू नये अथवा परद्रव्याची हाव धरू नये असा सात्त्विक आणि उदात्त हेतू माझ्या त्या वृत्तीत अर्थात् मुळीच नव्हता. संभवनीय एकच आहे की, सोने आणि पितळ यांच्यांतील तफावत माझ्या नजरेला उमगली नाही ! कारण अद्यापही त्या संबंधात गोंधळ होऊं शकतो. *कुसुमाग्रज*

विषय बने. याच कालात आणि तारुण्याच्या उंबरठ्यावर असतानाच तात्यांनी मृगजळाप्रमाणे भासणाऱ्या एका ध्येयाची साधना, करण्याचे ठरविले.

### पिंपळगावचे दिवस

*तात्याचा जन्म २७ फेब्रुवारी १९१२ ला* पुण्यात झाला. त्याचे बालपण नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव या गावी गेले. त्याचे प्राथमिक शिक्षणही तेथेच झाले. आमचे वडील पिंपळगावला वकील होते. पिंपळगावाहून ५ मैल अंतरावर शिरवाड नावाचे एक खेडेगाव आहे. ते आमचे गाव. त्या गावाच्या नावावरूनच शिरवाडकर हे आडनाव आमच्या आजोबानी धारण केले. आमच्या घराण्यात आमचे आजोबा, नागेश गणेश शिरवाडकर हे प्रथम मॅट्रिकपर्यंत शिकले आणि शिक्षणखात्यात नोकरी करून 'डेप्युटी' झाले. शिरवाडपासूनचे जवळचे मोठे गाव म्हणजे पिंपळगाव. ते गाव तालुक्याचे ठिकाण नसूनही तेथे कोर्ट होते. म्हणून आजोबांनी आमच्या वडिलाना पुण्यास शिकायला ठेवून वकील केले. वकिलीची परीक्षा पास झाल्यावर वडिलानी पिंपळगावला येऊन वकिलीला सुरवात केली. कुसुमाग्रजाचे मूळ नाव गजानन असे ठेवले होते आणि आमच्या घरातील वडीलधारी माणसे आताआतापर्यंत त्याना गजानन म्हणूनच सबोधीत असत. परतु अगदी लहानपणी आमच्या माऊबदातच त्याना दत्तक दिले. त्यामुळे त्याना 'विष्णु' हे नवीन नाव मिळाले. आणि गजानन रंगनाथ शिरवाडकर या ऐवजी ते विष्णु वामन शिरवाडकर झाले.

पिंपळगाव–शिरवाड हा परिसर मोठा सुपीक आणि रम्य आहे. शिरवाड हे गाव पानाच्या मळ्यासाठी तर पिंपळगाव हे द्राक्षासाठी प्रसिद्ध आहे. जवळूनच सह्याद्रीच्या डोंगराची एक भव्य आणि मनोहर रांग जाते. त्यात सप्तशृंग, मार्कंडेय, धोडप वगैरे अतिशय भव्य डोंगर आहेत. त्यात वणीच्या सप्तशृंग गडाचे आकर्षण तर इकडील लोकांस विशेषच आहे. वणीच्या जहागिरदार देशपांड्याकडे आमच्या आत्याला दिले होते. त्यामुळे आम्ही सर्वजण लहानपणी सुटीचे दिवस वणीला म्हणजे सप्तशृंगाच्या पायथ्याशी घालवीत असू. या डोंगरावर देवीचे स्थान असून त्याला सात शृंग म्हणजे शिखरे आहेत.

निसर्गाने या डोंगरावर वरदहस्त ठेवल्यामुळे सृष्टिसौंदर्यही बहारीचे आहे. तात्या लहानपणी वणीला नित्य जात असत त्या रम्य आणि भव्योदात्त परिसराची स्मृती अजूनही त्यांच्या मनात रेंगाळत आहे. आपल्या 'जान्हवी' कादंबरीच्या कथेसाठी त्यांनी आपल्या याच आवडत्या प्रदेशाचा पार्श्वभूमीसारखा उपयोग केला आहे.

### नाशिकच्या परिसरात

हायस्कूलच्या शिक्षणासाठी तात्या नतर नाशिकला आले. नाशिकच्या न्यू इग्लिश स्कूल आणि नाशिक हायस्कूलमधून त्याचे माध्यमिक शिक्षण झाले. याच वेळी नाशिकला आर्ट्स् कॉलेज निघाल्यामुळे कॉलेजचे शिक्षणही नाशिकच्या कॉलेजमधूनच झाले. काव्यलेखनाचे अतिशय आकर्षण असल्यामुळे शालेय आणि विश्वविद्यालयीन शिक्षणाकडे त्याचे फारसे लक्ष नव्हते. आर्ट्स् कॉलेजचा घोपट मार्ग स्वीकारण्यापेक्षा त्यानी डॉक्टर वगैरे होऊन एकादा चागला व्यवसाय करावा आणि आपल्या हुशारीचे चीज करावे अशी वडिलाची फार इच्छा होती. एकदा सारी तयारी करून डॉक्टर होण्यासाठी ते पुण्याच्या मार्गावर निघालेही होते. परंतु आपण आपल्या मनाविरुद्ध हा मार्ग स्वीकारीत आहोत या विचाराने ते अस्वस्थ झाले. आणि डॉक्टर होण्याचा विचार त्यानी कायमचा सोडून दिला. सरकारी नोकरीच्या तर ते वाऱ्यालाही उभे राहिले नाहीत.

### आमचे वडील

पुढील मार्ग अतिशय बिकट होता, खडतर होता. यश केवळ एकाद्या मृगजलासारखे होते. हाती काही लागले नाही तर सबंध आयुष्याचा विनाश होण्याचाही समव होता. पण त्याची ध्येयनिष्ठा अत्यत प्रखर होती ध्येय गाठण्यासाठी उग्र तपस्या करण्याची धमक आणि आत्मविश्वासही त्याच्या ठिकाणी होता. मला वाटते, त्याच्या साहित्यातून ध्येयनिष्ठेची जी प्रखरता दिसून येते ती त्याच्या मनाची प्रतिबिंबित चित्रेच होत. त्याना घरातून तसा फारसा विरोध नव्हता. मात्र वडिलाची अशी फार इच्छा होती की त्यांनी निदान एकादी चागली सरकारी नोकरी धरावी, जीवनाचा सुकर मार्ग पत्करावा आणि मोठ्या कुटुंबाला हातभार लावावा. पण त्याचबरोबर तात्याचे साहित्याकडे झुकणारे मनही ते चांगले ओळखून होते. त्यामुळे वडील स्वत.ची व्यथा आपल्याजवळ ठेवून मुलाचे कौतुक करीत असत आणि चारचौघात आपला मुलगा किती उत्तम कविता रचतो हे मोठ्या अभिमानाने सागत असत. वडील नाणावलेले वकील होते आणि त्याचे शिक्षण लोकमान्य टिळकाच्या कालात पुण्यासारख्या शहरी झाले होते. त्या वेळच्या सर्व सामाजिक आणि राजकीय चळवळीचे त्यांनी चिंतन केले होते. शिवाजी, लोकमान्य टिळक, महात्मा गाधी याच्या मोठ्या तसबिरी जशा त्याच्या दिवाणखान्यात दिमाखाने लावलेल्या होत्या तशा त्याच्या मनोमदिरातही हीच मुख्य दैवते होती. टिळक-आगरकराचे विचार, हरिभाऊ आपटयांचे हृदयस्पर्शी पुरोगामी लेखन आणि केशवसुत–गोविंदाग्रजाचे क्रांतिकारक काव्य यावर वैचारिक दृष्टया पोसलेल्या पिढीचे ते एक प्रतिनिधी होते. काव्याला ओहोटी लागली असे मानण्याचे कारण नाही. कारण 'जीवनलहरी' सारखी उत्तम काव्ये मराठीत निर्माण होत आहेत, असे सुप्रसिद्ध कवि कै. माधव ज्युलियन यानी कोठेतरी काढलेले उद्‌गार जेव्हा वडिलानी ऐकले तेव्हा आपल्या मुलाला मिळत असलेल्या यशाबद्दल त्यांना अभिमान वाटला आणि त्याचे हृदय भरून आले. पुढे मागे आपला मुलगा साहित्यक्षेत्रात चागले नाव काढील अशी त्यांना खात्री वाटू लागली.

१९३५ ते ४० पर्यंतचा काल अतिशय आर्थिक मदीचा काल होता. कित्येक कुटुंबाना त्याची विलक्षण झळ लागली. यावेळी आम्ही सर्व भावंडे शिकत होतो. वडील आपल्या थकलेल्या शक्तीने त्या बिकट परिस्थितीस एकाकी तोड देत होते. तात्याचे शिक्षण पूर्ण झाल्यामुळे आपल्याला त्याच्याकडून आधार मिळावा अशी त्याची फार इच्छा होती. पण त्याकरिता त्याना आपल्या इच्छित ध्येयापासून विचलित व्हावे लागेल ही जाणीव वडिलाना अस्वस्थ करीत होती. त्यामुळे तात्यानी जो मार्ग ठरविला होता त्या मार्गापासून त्याना दूर करण्याचा वडिलानी कधीही प्रयत्न केला नाही. तात्यांनी साहित्याच्या क्षेत्रात उज्ज्वल यश मिळवावे आणि आपण ते आपल्या डोळयानी पाहावे हेच त्याचे स्वप्न होते. परतु दुर्दैव येवढेच की कुसुमाग्रजाचे खरे यश त्याना पाहावयाला मिळाले नाही. कुसुमाग्रजांना खरी कीर्ती मिळाली 'विशाखे' नतरच 'क्रान्तीचा जयजयकार' या क्रांति-गीताने ते सर्व महाराष्ट्राच्या परिचयाचे झाले. त्यांच्या उत्तुंग प्रतिभेची आणि कल्पनेच्या भरारीची खरी कल्पना रसिकाना 'विशाखे' नतरच आली. परतु त्याआधीच वडिलाचे निधन झाले. दुःखित मनाने तात्याना अपूर्व यश मिळालेला हा आपला पहिला काव्यसग्रह आपल्या पित्याच्या आणि मातेच्या स्मृतीस त्यानी अर्पण केला

### भिक्षुकांची सिनेमा कंपनी !

१९३३ साली 'जीवनलहरी' प्रसिद्ध झाले. आणि १९४२ ला 'विशाखा' प्रकाशात आले. या मध्यतरीच्या कालातील तात्याचे जीवन अतिशय खडतर आणि बिकट होते. अनेक व्यक्तिगत आणि कौटुंबिक समस्या त्याच्या पुढे उभ्या होत्या. वादळात सापडलेली नौका जशी कुठेही हेलकावे खात जावी तशी त्याच्या आयुष्याची गत झाली होती. लेखनाचे आणि साहित्याचे विलक्षण आकर्षण असल्यामुळे त्याला अनुरूप असा व्यवसाय शोधून काढण्यासाठी त्यांची धडपड चालू होती. नाशिकला याच वेळी तेथील काही भिक्षुक मडळीनी एक सिनेमा कपनी स्थापन केली. कै. दादासाहेब फाळके हे नाशिकचेच. त्यानी आपले सर्व मूकपट नाशिकलाच तयार केले होते. त्यांच्या हाताखाली तत्रज्ञाचा एक ताफा तयार झाला होता. तेव्हा सर्व तत्रज्ञ तयार असल्यामुळे सिनेमा कंपनी काढणे फारसे अवघड गेले नाही. तात्या या सिनेमा कपनीत 'नट' आणि 'कथालेखक' म्हणून शिरले. नवीन स्थापन झालेल्या या 'गोदावरी सिनेटोन'ने 'सती सुलोचना' नावाचा चित्रपट काढण्याचे ठरविले. या चित्रपटाची मराठी कथा तात्यानी तयार केली आणि त्यांतील लक्ष्मणाची भूमिकाही त्यानीच वठवली.

### हलवायाचे हिंदी

या सिनेमाच्या 'कथे'ची एक मजेदार गोष्ट ते नेहमी सागतात. मराठी चित्रपटकथा लिहून झाल्यानतर त्याचे हिंदीकरण करायचे होते. त्यासाठी नाशिकात सापडलेल्या एका हिंदी माणसाची नेमणूक झाली. पण काही भागाचे हिंदीकरण त्यालाही जमेना. शेवटी दोघे कथालेखक उठले आणि जुन्या

नाशिकात वास्तव्य केलेल्या एका हलवायाकडे गेले. त्याकाळी हलवायाखेरीज हिंदी भाषेचा तज्ञ नाशिकात दुसरा कोण मिळणार ? मिठाई तयार करण्यात हा हलवाई दंग झाला होता. त्याला वाटले की आपल्या मिठाईला गिऱ्हाईक आले. पण हे लोक भलतेच काम घेऊन आल्याचे कळल्यावर त्याची निराशा झाली. कढईतले दूध झाऱ्याने आटवीतच त्याने मराठी कथेच्या हिंदीकरणाला हातमार लावला.

चित्रपटव्यवसायाचा फारसा अनुभव कुणालाच नसल्यामुळे या चित्रपटाचा चांगलाच विनोद झाला. मुंबईत हा चित्रपट अवघ्या एका आठवड्यातच उडाला. त्याच्यातील इन्द्रजित आणि लक्ष्मणाचे युद्ध तर फारच बहारदार होते ! याच वेळी उत्तर आफ्रिकेत इटली-ॲबीसीनिया यांचे युद्ध चालू होते. त्यांत ॲबीसीनियन नीग्रोंचा दणदणीत पराभव होत होता. मुंबईच्या 'चित्रा' साप्ताहिकाने विनोदाने म्हटले होते की 'सती सुलोचनामधील युद्ध ॲबीसीनियातील निग्रोंना एकदा दाखवावे म्हणजे त्या बिचाऱ्यांना युद्धाचे तंत्र तरी कळेल !' चित्रपटात खूप नुकसान आल्यामुळे मालकांना कंपनी गुंडाळणे भाग पडले. पण तात्यांना सिनेमाव्यवसायाचे मात्र विलक्षण आकर्षण निर्माण झाले. कथालेखक आणि दिग्दर्शक म्हणून या व्यवसायात आपण पुष्कळ यशस्वीपणे कार्य करू शकू अशी त्यांना उमेद वाटत होती. या वेड्या आशेने ते मुंबईत आले आणि हिंदी सिनेमासृष्टीत प्रवेश मिळविण्यासाठी धडपड करू लागले. त्यांच्या धडपडीला थोडे यश लाभून एका हिंदी सिनेमा कंपनीत त्यांना सहदिग्दर्शकाची नोकरी मिळालीही ! पण तेथील भयंकर प्रकार पाहून ते बावरून गेले. तेथील एका दिग्दर्शकाने त्यांना मोठा मोलाचा उपदेश केला. तात्या बी. ए. असूनही या धंद्यात आल्याचे समजल्यावर त्याला अतिशय आश्चर्य वाटले आणि त्याने सांगितले, 'हा व्यवसाय तुमच्यासारख्या सुशिक्षित आणि सोज्वळ माणसांकरिता नाही. शहाणे व्हा आणि या धंद्याच्या वाऱ्यालाही उभे राहू नका.' तात्यांची चित्रपटव्यवसायातील ही इतिश्रीच म्हणायला हरकत नाही.

### वृत्तपत्रसृष्टीच्या नाभित

यानंतर तात्या वृत्तपत्रव्यवसायाकडे वळले.

## स्वप्नभंग हेच कुसुमाग्रजांचे स्वप्न...!

### स्वप्नाची समाप्ती



स्नेहहीन ज्योतीपरी
मंद होई शुक्रतारा,
काळ्या मेघखंडास त्या
किनारती निळ्या धारा

काढ सखे, गळ्यांतील
तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलीकडे
उभे दिवसाचे दूत !

ध्येय, प्रेम, आशा यांची
होतसे का कधी पूर्ती !
वेड्यापरी पूजतो या
आम्ही भंगणाऱ्या मूर्ती !

होते म्हणू स्वप्न एक
एक रात्र पाहिलेले

होते म्हणू वेड एक
एक रात्र राहिलेले !

काढ सखे गळ्यातील
तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलीकडे
उभे दिवसाचे दूत.

वृत्तपत्रव्यवसाय हाच आपल्या मनोभूमिकेशी सर्वस्वी जुळणारा असा व्यवसाय आहे, अशी त्यांनी आपल्या मनाशी खूण-गाठ बांधली. त्यामुळे अतिशय अल्प मोबदला मिळत असूनही हाच व्यवसाय त्यांनी पत्करला. वृत्तपत्राच्या जगातील त्यांची पहिली उमेदवारी झाली ना. भि. परुळेकरांच्या 'स्वराज्या'त ! नानासाहेब परुळेकरांच्या संपादन आणि व्यवस्थापनकौशल्याबद्दल त्यांना आदर आहे. संपादकीय व्यवसायाचे प्राथमिक धडे त्यांनी 'स्वराज्या'तच घेतले. त्यानंतर मुंबई सोडून ते पुण्यास आले. दैनिक 'प्रभात'मध्ये ते सहसंपादक म्हणून काम करू लागले. दैनिक 'प्रभात'च्या कचेरीतील वातावरण त्यांना फार आवडले. संपादक कोठारींची शिस्त मोठी करडी होती. पण त्याचबरोबर ते सर्वांशी अतिशय आपुलकीने वागत असत. तात्यांच्या लेखनकौशल्यावर व विशेषतः त्यांच्या शांत आणि कष्टाळू स्वभावावर ते फार खूष होते. तात्यांसाठी 'शलाका' नावाचे साप्ताहिकही काढून देण्याचा त्यांचा विचार होता. एक-दोन अंक निघालेही होते; पण पैशाच्या अभावी ती योजना तशीच बारगळली.

### रामरगाड्यात वाचलेले कविमन

वृत्तपत्राच्या व्यवसायाबद्दल बाहेरच्या माणसाला फार आकर्षण वाटते. पण प्रत्यक्ष काम करणाऱ्या माणसाला मात्र त्या व्यवसायातील यातना जाणवतात. इतर व्यवसायांच्या मानाने या व्यवसायात आर्थिक लाभ तर फार कमी. त्या कालात तर अवघ्या तीस चाळीस रुपये मासिक पगारावर काम करावे लागे. एका नियतकालिकात तर तात्यांना खूप मजेदार अनुभव आला. मालक आपल्या नियतकालिकासाठी वाटेल त्या मोबदल्यावर जाहिराती स्वीकारीत असत. एका खानावळीचे मालक जाहिरातीच्या मोबदल्यात जेवायचे पास वृत्तपत्राला देत आणि मालक तेच पास आपल्या संपादक आणि सहसंपादकांना पगाराच्या पोटी वाटीत असत. वृत्तपत्रव्यवसायाला वेळेचे बंधन नाही. रात्री-अपरात्रीही कामाचे चक्र सदैव चालू असते. लेखनाचे आकर्षण प्रुफे तपासता तपासता पार नाहीसे होते.

मजकूर मिळविण्यासाठी आणि कॉलम भरण्यासाठी सारखी धावपळ करावी लागते. पुष्कळसे ललित लेखक या व्यवसायाकडे वळल्यावर त्यांच्यांतील 'लालित्य' वृत्तपत्रीय व्यवसायाच्या धगीने पार करपून गेल्याची अनेक उदाहरणे आहेत. तात्यानी मात्र या व्यवसायात अनेक वर्षे काम करूनही आपली काव्यवृत्ती सदैव जिवत ठेवली. या दैनिकात काम करीत असतानाच त्यानी त्याचे सुप्रसिद्ध क्रान्तिगीत 'क्रान्तीचा जयजयकार' हे रचले. १९३९ सालातील ती कथा आहे. सर्व देश स्वातत्र्य मिळविण्याच्या ईर्षेने अक्षरश: पेटला होता. देशातील तरुण पिढी स्वातत्र्यदेवतेच्या चरणी आपले सर्वस्व अर्पण करण्यासाठी अगदी उत्सुक झाली होती. वातावरण तापले होते आणि निखारा फुलावा तसे ते आता धगधगू लागले होते. याच सुमारास बंगालमधील डमडमच्या तुरुगातील राजबद्यांनी आमरण उपोषण जाहीर केले. एका रात्री टेली प्रिंटरवरून आलेली ही बातमी भाषांतरित करून तात्यानी हातावेगळी केली. पण त्या बातमीने ते अतिशय अस्वस्थ झाले. त्या छोट्या बातमीने त्याच्या प्रतिभेला आव्हान मिळाले आणि त्यातूनच या अमर गीताची निर्मिती झाली. उभ्या महाराष्ट्राला या गीताने त्या वेळी स्फूर्ती दिली. वाचनालयाच्या भितीपासून ते तुरुगाच्या कोठडीपर्यंत त्याचे निनाद जाऊन पोहोचले.

## उत्स्फूर्त सत्कार

वृत्तपत्राच्या या धकाधकीच्या जीवनात वैयक्तिकदृष्ट्या एखादा सुवर्णक्षणही अनुभवायला मिळतो. तात्यानी असाच एक सुवर्णक्षण आपल्या 'अविस्मरणीय' या लघुनिबधात टिपला आहे. त्यावरून त्याच्या मनाचा मागोवा फार चागल्या प्रकारे घेता येईल. हा सुवर्णक्षण म्हणजे त्याच्या सत्काराचा प्रसग आहे. एरव्ही सत्काराविषयी अतिशय कटाळा असलेल्या तात्यानी या सत्काराचे मात्र फार बहारीने वर्णन केले आहे. दैनिक सोडून जाताना त्यानी प्रेसमध्ये जाऊन तेथील कामगारबधूचा निरोप घेतला. पण तेथील करडया शिस्तीमुळे त्याच्याशी कुणी बोलू शकले नाही. एका कामगाराने त्यांच्या घराचा पत्ता तेवढा विचारून ठेवला. सायकाळी त्याची हाक ऐकल्यावर तात्यांनी आपल्या खोलीचा दरवाजा जेव्हा उघडला तेव्हा उंबऱ्याजवळ आठ-दहा जणानी गर्दी केली होती. आणि क्षणात 'छापखान्याच्या जगातील तैमूरलंग आणि नादीरशहा म्हणून ज्याना मी म्हणत होतो, त्यानी माझ्या छोटयाशा खोलीचा कबजा घेतला, कोपरा न् कोपरा व्यापला.' पुढचे काही क्षण नि शब्दतेतच गेले आणि अखेरीस 'त्याच्या पुढाऱ्याने एका पिशवीतून एक नारळ काढला, एक पेढयाचा पुडा काढला, हार काढला, गुच्छ काढला आणि नतर तोडातून शब्दही काढले. या पहिल्या शब्दाचीच जणू सर्वजण वाट पाहात होते. ते बाहेर येताच सर्व जण बोलू लागले. त्यांनी केलेल्या माझ्या सत्काराचा आणि मी केलेल्या त्यांच्या स्वागताचा समारभ पुढे पार पडला आणि नतर ते निघून गेले. हसत आणि थट्टाविनोद करीत मी त्याचा निरोप घेतला. पण नंतर खोलीच्या एकांतात माझे अंत.करण आनदाने, कृतज्ञतेने, अनेक अबोध भावनानी भारावून गेले. लोकांच्या चांगुलपणाचे आणि माझ्या समाधानाचे ओझे घटकाभर मला अगदी असह्य झाले.'

## मुंबईतील मुशाफिरी

दैनिक प्रभात १९३९ ला सोडून तात्या मुबईला आले. कै. खं. सा. दौण्डकर 'सारथी' नावाचे साप्ताहिक सुरू करीत होते. या साप्ताहिकाची सपादकीय जबाबदारी त्याना एकाद्या उमद्या, तरुण आणि चतुरस्र लेखकावर सोपवावयाची होती. तात्यांची त्यानी मुद्दाम त्याकरिता निवड केली. 'सारथी' साप्ताहिक आपल्या वैशिष्टयाने अजूनही लोकाच्या लक्षात आहे. पण दुर्दैवाने ते अल्पायुषी ठरले. पुन्हा तात्याच्यापुढे प्रश्न उभा राहिला. वृत्तपत्रव्यवसायात ते आपले सर्वस्व पणाला लावून काम करीत होते. आपल्या व्यक्तिगत आणि कौटुबिक सुखांचाही विचार त्यानी कधी केला नाही. कमालीचे अल्पवेतन मिळत असल्यामुळे विकट आर्थिक परिस्थितीलाही त्यांना तोड द्यावे लागत होते. परंतु लेखनव्यवसायावरील निष्ठा त्यातूनही त्याना तारून नेत होती. आणि त्या निष्ठेच्या समाधानाच्या जोरावर व्यक्तिमनाला उदास आणि निरुत्साही करणाऱ्या परिस्थितीवर ते मात करीत होते. त्यानंतर 'धनुर्धारी' साप्ताहिकात सहसंपादक म्हणून ते काम करू लागले. श्री. प्रभाकर पाध्ये त्यावेळी 'धनुर्धारी'चे मुख्य संपादक होते. श्री. पाध्ये आणि शिरवाडकर याचे संबंध अतिशय जिव्हाळयाचे झाले. श्री. पाध्ये याच्यासंबंधीचा आदर तात्यानी 'आहे आणि नाही' या लघुनिबधसग्रहाच्या अर्पणपत्रिकेत फार कुशलतेने शब्दरूप केला आहे. श्री. प्रभाकर पाध्ये याना त्यानी म्हटले आहे, 'त्रिभुवन रोडवरील संपादकीय गुहेत एक वाघ राहतो अशी अफवा ऐकली होती. पण प्रत्यक्ष तेथे गेल्यावर विशुद्ध, निष्कपट व स्नेहशील अशा 'माणूसपणा'चे दर्शन मला झाले. सध्या आतरराष्ट्रीय शतपावली करणाऱ्या या दुर्मिळ माणसास, म्हणजे तुम्हालाच हे मलेबुरे पुस्तक अर्पण करीत आहे.' 'धनुर्धारी'त काम करीत असता तात्यांनी आपले लेखन-सामर्थ्य चागलेच प्रत्ययाला आणून दिले. मराठीतील एक श्रेष्ठ कवी म्हणून ते ओळखले जाऊ लागले होतेच; पण जितक्या समर्थपणे ते काव्य लिहू शकतात तितक्याच समर्थपणे वृत्तपत्रीय लेखन, लघुनिबध आणि ललितनिबध लिहू शकतात याची खात्री सर्वांना वाटू लागली. या कालातील त्यांनी लिहिलेले काही ललित निबंध त्याच्या 'आहे आणि नाही' या सग्रहात सग्रहित केले आहेत. 'धनुर्धारी'प्रमाणे आचार्य अत्रे याच्या 'नवयुग'मध्येही ते नियमितपणे लिहीत असत. आचार्य अत्र्यांनाही त्याच्या लेखनकौशल्याने मोहिनी घातली होती. 'मराठा' काढल्यावर त्यातील संपादकीय जबाबदारी स्वीकारण्यासाठी शिरवाडकराना खास निमत्रण होते.

## भालेरावांचा सहवास

'धनुर्धारी'त काम करीत असतानाच साहित्य-सघाचे कै. डॉ. भालेराव याच्याशी त्याचा परिचय झाला. परिचयाचे रूपातर दाट स्नेहामध्ये झाले. डॉक्टरानी स्वत:ला सपूर्णपणे नाट्य-सेवेला वाहून घेतले होते. सुरवातीच्या काळात चागल्या नवीन नाटककाराच्या ते शोधात असत. डॉक्टरानी तात्याना नाट्यलेखन करण्यास प्रोत्साहन दिले. तसे पाहिले तर नाट्यलेखनाचे आकर्षण तात्याना पहिल्यापासून होते. त्याच्या पहिल्या उमेदीच्या काळात मराठी नाटकाची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. नाट्य-व्यवसाय सपूर्णपणे बुडाला होता. त्यामुळे इच्छा असूनही या कालात कुणाही साहित्यिकाला नाट्यलेखन करणे अवघड होते. त्यांनी प्रत्यक्ष नाट्यलेखन यापूर्वी केलेले नसले तरी त्यांच्या

तर लेखनातून नाट्यगुण प्रत्ययास येत असत. शिरवाडकर उत्तम प्रकारे नाट्यलेखन करू शकतील अशी खात्री वाटल्यामुळेच डॉक्टर मालेरावांनी त्यांच्याकडून ऑस्कर वाइल्डच्या 'Ideal Husband'चे मराठी रुपांतर करून घेतलें. 'दूरचे दिवे' हे तात्याचे पहिलें नाटक साहित्यसघाने १९४६ च्या नाट्य-महोत्सवात प्रथम रगभूमीवर आणलें. सुदैवाने ते कमालीचे यशस्वी ठरले आणि त्याच्या प्रतिभेला एक नवीन दालन खुले झाले.

**नको ती मुंबई !**

१९३६ पासून नाशिक सोडले आणि जवळ जवळ दहा वर्षे तात्यानी मुबई-पुण्यास वृत्तपत्र-व्यवसायात चौफेर मुशाफिरी केली. त्यांच्या लेखनाला प्रगल्मता आली आणि अनुमवाचे विश्व खूपच विस्तारले. पण हे जीवन अतिशय कष्टाचे, धावपळीचे आणि आर्थिक दृष्टया कमी लाभाचे होते.

**कधि न थांबलो विश्रान्तीस्तव**
**पाहिले न मागे**

अशी त्याची परिस्थिती झाली होती. मुबईच्या जीवनाला तर ते फारच कटाळले होते. त्याचा त्यांना उबग आला होता. नाशिकच्या शांत आणि घरगुती वातावरणाची त्याना ओढ लागली होती. त्यांचे मन म्हणत होते—

**हेलावे भवती सागर येथ अफाट**
**तीरावर श्रीमान् इमारतींचा थाट**
**परि स्मरतो आणिक करतो व्याकुल केव्हा**
**तो नदीकिनारा आणि भंगला घाट.**

मित्रमडळीचा विरोध असूनही मुबई सोडण्याचा त्यानी निर्णय घेतला. आणि १९४४ साली ते नाशिकला आले. त्याच साली त्याचा विवाह झाला. जीवनाला एक प्रकारे स्थैर्य आले. कै. रमाकात वेलदे याच्या सहकार्याने त्यांनी नाशिकला 'स्वराज्य' साप्ताहिक सुरू केले. अर्थात हे साप्ताहिक फार दिवस चालले नाही. त्यानंतर आजतागायत कुठेही नोकरी न करता तात्यांनी लेखन, हाच व्यवसाय पत्करला. गेल्या आठ वर्षात त्यानी नाट्य, काव्य, कादंबरी, लघुनिबध, लघुकथा या वाङमयप्रकारात आपल्या वैशिष्ट्याने फार मोलाची भर घातली आहे. त्यांचे लेखन अगदी विपुल नसले तरी कमीही म्हणता येणार नाही. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की त्यातील वाङमयीन मूल्ये थोडीही कमी झालेली नाहीत. वयाची पन्नास वर्षे ओलाडली तरी 'वर्षाचे तट पेटुनि उठले' सारखी अत्यत समर्थ काव्ये ते लिहू शकतात. व 'तिमिरातुनी तेजाकडे' या राणी लक्ष्मीबाईंच्या जीवनावरील नाटकाचे लेखन अतिशय प्रमावीपणाने करू शकतात.

**नाशिकचे लोकहितवादी मंडळ**

नाशिकच्या वास्तव्यात लेखनकार्याबरोबर तेथील सास्कृतिक कार्यातही त्यानी मोठा वाटा उचलला आहे. त्यांच्याच प्रेरणेने नाशिकला लोकहितवादी मंडळाची स्थापना झाली. गेल्या दहा वर्षांत लोकहितवादी मंडळाने नाशिकात कला, वाङमय, आणि सास्कृतिक क्षेत्रात त्याच्या नेतृत्वाखाली फार मोलाचे कार्य केले आहे. शिरवाडकर हीच या कार्याची प्रेरक शक्ती आहेत. नाशिकच्या सर्व सार्वजनिक सस्थाशी त्याचे सबंध आहेत. कार्यकर्त्यांची एक मोठी फौज त्यानी निर्माण

# बाजीरावाच्या धर्माचं नांव....

[सातारा येथील छत्रपतीच्या राजवाड्यातील एक महाल — मसलतखाना. श्रीपतराव प्रतिनिधी, सुमत, सरलष्कर हैबतराव चिटणीस, मुतालीक पुरंदरे व स्वत: शाहुमहाराज ह्यामध्ये बोलणी चालू असता बाजीराव प्रवेश करतात. आणि काही काळानतर]

**बाजीराव :** राहत्या घराचे उंबरठे ज्याना ओलांडायचे नाहीत त्यांनी कर्मकांडाचे, धर्माचे देव्हारे सुखेनैव माजवावेत ! बाजीरावाच्या धर्माचं नाव मराठा आहे, बाजीरावाच्या जातीचं नांव मराठा आहे ! प्रतिनिधी, शिवाजीमहाराजांनी केवळ एक राज्य स्थापन केलं नाही तर एक नवा धर्मही स्थापन केला. या जातिभेदातीत धर्माचा महाराष्ट्रानं स्वीकार केला म्हणूनच परस्थांच्या जुलमी राजवटीवर तो प्रहार करू शकतो.

**सुमंत :** या अकारण प्रहार करण्याच्या पद्धतीलाच आम्ही मस्तीचं राजकारण म्हणतो !

**बाजीराव :** आपण ज्याला मस्तीचं राजकारण म्हणता त्याला आम्ही मराठ्यांचं राजकारण म्हणतो ! वेशीवर शत्रू आला म्हणजे पिवळी वस्त्रं परिधान करून जोहार करण्यासाठी बाहेर पडायचं, या राजस्तानी राजकारणानंच भारताची आजवर हानी केली आहे. शत्रूला स्वतःच्या दाराशी नव्हे तर त्याच्या राहत्या घरांतच पादाक्रांत केला पाहिजे. मराठ्याचं राजकारण आज महाराष्ट्राच्या सरहद्दीबाहेर चालतं ते याच धोरणानं !

**प्रतिनिधी :** हे शब्द फार श्रुतिरंजक आहेत ! परंतु या धोरणामुळंच उत्तरदक्षिणेतील सर्व राजसत्ता आज छत्रपतीच्या विरुद्ध एकवटू लागल्या आहेत. माळव्यातील मोगल सुभेदाराशी समजुतीनं वाटाघाटी केल्या असत्या तर ते प्रकरण इतकं विकोपाला गेलं असतं काय ?

**बाजीराव :** कोठलंही प्रकरण विकोपाला जाण्याची धास्ती आजवर बाजीरावानं बाळगलेली नाही ! शब्दाला उत्तर शब्दानं देतां येतं, पण समशेरीला उत्तर समशेरीनंच द्यायला पाहिजे ! वाटाघाटीचा वृद्ध मार्ग मृतप्राय झाल्यावर माळव्यात चिमाजी अप्पानं तलवार उपसली आहे !

*दुसरा पेशवा*
[अंक पहिला, प्रवेश पहिल्यातून]

केली आहे. साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदी तात्याची निवड झाल्याचे जाहीर झाल्याबरोबर नाशिकात त्यांच्याबद्दलच्या प्रेमाला अगदी उधाण आले आणि सत्काराविषयी अनाकर्षण असलेल्या तात्यांना नाशिककरानी सत्कारात बुडवून टाकले. १९३०–३१ पासून देवदत्त नारायण टिळकांच्या बालबोध मेळाव्यात काव्यलेखनास सुरुवात करून आता मराठी साहित्य-समेलनाच्या अध्यक्षपदाची माळ गळ्यात पडेपर्यंतचा तात्याचा हा वाङ्मयीन प्रवास पाहिलेली अनेक माणसे आजही नाशिकात आहेत. ही अतिशय सुखदायक आणि आनंदाची घटना पाहून त्यांच्या डोळ्यात आनदाश्रू उभे राहिले नसते तरच नवल !

**स्थितप्रज्ञ तात्या !**

तात्याचा स्वभाव अत्यंत शांत आणि समाधानी आहे. क्रोध आणि शोक या भावनानी सहसा ते वाहवून जात नाहीत. त्या भावना मनाला जिंकू शकणार नाहीत असे विलक्षण मानसिक सामर्थ्य त्यांनी मिळविले आहे त्याच्या आयुष्यात अशा अनेक घटना घडल्या आहेत की ज्या वेळी दु खाने माणसाची कबर खचावी. पण तात्यानी आपल्या मनावर आणि शरिरावर त्याचा परिणाम होऊ दिला नाही. त्यापुढे आपले मन झुकविले नाही. त्यांची शात वृत्ती अशाही परिस्थितीत आपल्या मनाचा तोल सांभाळते. कधी कधी त्यांच्या या शात वृत्तीचे कमालीचे आश्चर्य वाटते. एकदा एक गृहस्थ त्यांना नवीनच भेटायला आले होते. तात्याची क्राति-गीते वाचून त्याच्या स्वभावाबद्दल त्याची भलतीच कल्पना झाली होती. हा कवी म्हणजे त्याच्या काव्याप्रमाणेच अगदी जळजळीत स्वभावाचा आणि भडक शब्दांचा वर्षाव करणारा असेल अशी त्याची समजूत होती. परतु तात्याचा शात, शालीन आणि अबोल स्वभाव पाहून तो अगदी आश्चर्यचकित झाला. हे आश्चर्य अनेकाच्या वाट्याला येते. तात्या कधी आपल्या वाङ्मयाच्या श्रेष्ठतेबद्दल किंवा स्वत:च्या थोरवीबद्दल बोलणार नाहीत. कोणी त्यावर बोलू लागला तर तो विषय कौशल्याने टाळतील. खरे पाहिले असता त्यांनी खूप यश सपादन केले आहे. अगदी कुणालाही हवेसे वाटावे, त्याबद्दल लोभ धरावा असे ते यश आहे. पण त्याबद्दल

# सरहद्दीबाहेरील सर्व राष्ट्रांना

[ शनिवारवाड्यामधील मस्तानीचा महाल. वेळ दुपारची. महालात बाजीराव आणि मस्तानी ही दोघे असून बाजीराव प्रक्षुब्ध मन:स्थितीत आहे ]

**बाजीराव :** मस्तानी जवळ नसल्यावर पराक्रम कुठचा आणि......जीवन तरी कुठचं !

**मस्तानी :** (उठते) असं भलतंसलतं मी बोलू देणार नाही ! पेशव्यांचं जीवन इतकं स्वस्त नाही की एका क्षुल्लक कंचनीसाठी ते बरबाद व्हावं !

**बाजीराव :** नाही, मस्तानी, ही कल्पनाही मला सहन होत नाही ! माझ्या शिरावरील साऱ्या जबाबदाऱ्या मी झुगारून देईन. मस्तकावरील मोठेपणाचा मुकुट कस्पटासारखा फेकून देईन, पण मस्तानीला मी माझ्यापासून कधीही दूर करणार नाही !

**मस्तानी :** नादीरशहासारखा शत्रु हिंदुस्थानच्या छातीवर नाचत असताना हे शब्द माझ्या कानालासुद्धा प्रिय वाटणार नाहीत ! आपल्याशिवाय त्या दैत्याचं गर्वहरण कोण करू शकणार ?

**बाजीराव :** (उठून अस्वस्थपणाने फेऱ्या घालू लागतो) गर्वहरण ! होय, नादीरशहाचं गर्वहरण करण्याची माझी महत्त्वाकांक्षा होती आणि अद्यापही आहे ! त्या दीडलाख दुराण्यांना काबूलच्या पलीकडे गुरांप्रमाणं पिटाळून, सरहद्दीबाहेरील सर्व राष्ट्रांना मला कळवायचं आहे, बजवायच आहे, की हिंदुस्थान काही परकी सांडांना चरण्यासाठी राखून ठेवलेलं कुरण नव्हे; लुटारूंच्या वस्तीसाठी मुक्तद्वार ठेवलेली धर्मशाळा नव्हे ! एक शतक जातं न जातं तोच कोणीही समशेर परजीत यावं आणि आमच्या मुर्दाड मस्तकांवर पाय रोवून आमच्या रक्ताचे घोट घ्यावे, ही स्वकीयांची आणि परकीयाची समजूत मला नष्ट करायची आहे. नादीरशहाचा पाडाव म्हणजे केवळ एका शत्रूचा पाडाव करणं नाही; आजपर्यंत मिळविलेल्या विजयांसारखा केवळ एक विजय संपादन करणं नाही. देशाबाहेरच्या दरोडेखोरांना दिला जाणारा तो एक वस्तुपाठ आहे ! आपण मुसलमान मुलुखाचा नाश करतो म्हणून मराठे दक्षिणेच्या माजघरातून बाहेर येणार नाहीत अशी नादीरशहाची कल्पना असेल तर ती मला खोटी ठरवावयाची आहे. परकीय शत्रू समोर उभा राहीपर्यंत आम्ही परस्परांशी शत्रुत्व करू, संग्राम करू. पण परकीयाचं पाऊल देशात पडताच आमच्यातील भेदभाव नष्ट होतील, दोन मनगटांचं एक मनगट होईल ! मुसलमानांचं संरक्षण करण्याकरिता सह्याद्रीचे छावे उत्तरेच्या मैदानाकडे धावत जातात हे मला दाखवायचं आहे. आणि. ...आणि आमचा बंधुभाव, झुगारून आमचा स्नेहाचा, संरक्षणाचा हात नाकारून दिल्लीचे मुसलमान जर परकीयांशी संगनमत करू लागले तर तेथील मोंगल बादशाही मी उलथून टाकीन आणि दिल्लीत मराठ्यांचं, शाहूमहाराजांचं सार्वभौम सिंहासन प्रस्थापित करीन !......करीन ! (हताशपणे कोचावर बसतो.) आठ वर्षांपूर्वी हे अहंकारी क्रियापद बाजीरावाच्या तोंडी शोभत

# मला कळवायचं आहे...

होते ! पण आज–आज माझा आत्मविश्वास खचू लागला आहे, सतत पेटत राहि-लेल्या मनातील महत्त्वाकांक्षा राखेत विलीन होऊ लागल्या आहेत !



**मस्तानी** : महाराज, या आठ वर्षांतील प्रत्येक वर्षानं आपल्याला विजयाचा नजराणाच आणून दिलेला आहे. येणारं संवत्सर गेलेल्या संवत्सराच्याच पोटी जन्माला येतं. (कोचामागे उभी राहून त्याच्या केसांतून हात फिरवते.) माझा विश्वास आहे की पुढील काळही वेगळा नसणार, आपल्या साऱ्या महत्त्वाकांक्षा पुऱ्या होणार !

**बाजीराव** : कुणास ठाऊक ! कुठल्या तरी गाढ, उदासवाण्या, काळसर सावल्या माझ्या जीवनावर पडू लागल्या आहेत. पसरू लागल्या आहेत.

*दुसरा पेशवा*
**अंक तिसरा, प्रवेश तिसऱ्यातून**

त्यांनी कधीच दुरभिमान धरला नाही. त्या यशाने त्यांच्या निगर्वी वृत्तीला धक्का पोहोचला नाही. त्या यशाला हाताशी धरून त्यांनी कधी प्रसिद्धीचा हव्यास धरला नाही. त्याचमुळे कुसुमाग्रजांचे वाङमय सर्वांच्या खूप परिचयाचे असूनही कुसुमाग्रज ही व्यक्ती मात्र फारशी कुणालाच माहित नाही.

**येईन म्हणतात–येतीलच असे नाही !**

बोलावलेल्या ठिकाणी वेळेवर न जाण्यात किंवा अजिबात न जाण्यात तात्यांची ख्याती आहे. मला वाटते त्यांच्या वरील स्वभाव-धर्माचाच तो भाग असावा. व्याख्याने, सत्कार, काव्यगायने इत्यादि गोष्टींचे त्यांना अजि-बात आकर्षण नाही. त्यामुळे अशा गोष्टी सहसा ते टाळतात. काही वेळेला केवळ भिडे-खातर अशा समारंभाचे आमंत्रण ते स्वीकार-तात, पण मनापासून इच्छा नसल्यामुळे ते त्या समारंभाला जातील असे नेमके सांगता येत नाही. शेवटपर्यंत निश्चित निर्णय घेतला जात नसल्यामुळे काही वेळा त्यांना खूप धावपळ करावी लागते. परवा जळगाव कॉलेजच्या समारंभाची अशीच गम्मत झाली. नाशिकहून निघायला त्यांना नेहमीप्रमाणे उशीर झाला. एस्. टी. मनमाडजवळ आल्या-वर त्यांची खात्री झाली की आपण आता वेळेवर पोहोचत नाही. त्यांनी आपली अडचण एस्. टी च्या ड्रायव्हरला सांगितली. त्यांनी मनमाडला तात्यांना एक टॅक्सी गाठून दिली. त्या स्पेशल टॅक्सीने त्यांनी जळगाव गाठले. तात्या येत नाहीत म्हणून कार्यकर्ते अगदी निराश झाले होते आणि गाड्या पाहून थकले होते. इतक्यात कॉलेजच्यासमोर तात्यांची टॅक्सी उभी राहिली. तात्या आले यावर कोणा-चाही विश्वास बसेना. पण त्याबरोबर तात्यांना पाहून त्यांना खूप आनंदही वाटला. तात्या हे सार्वजनिक समारंभाच्या बाबतीतच असे वागतात असे नाही तर कधी कौटुंबिक समा-रंभाच्या बाबतीतही त्यांच्या त्या सवयीला आम्हांला चांगलेच तोंड द्यावे लागते. तात्या अशा समारंभांना आले नाहीत किंवा वेळेवर आले नाहीत तर तो समारंभ आम्हा सर्वांना अतिशय नीरस वाटतो. त्या समारंभापेक्षा सर्वांचे डोळे तात्यांच्या वाटेकडे लागलेले असतात. कारण त्यांच्याशिवाय समारंभ फार अपुरा वाटतो. मागच्या वर्षी मी माझ्याकडे

# धुक्याचा आणि धुंदीचा प्रदेश......

काव्याचा साक्षात्कार पहिल्या पर्वात फार बलवत्तर असतो. माणसाला तो उन्मनी अवस्थेत नेऊन सोडतो. त्यावेळी कवी आपल्यापुरता हा महोत्सव साजरा करीत असतो. काव्यमयतेचे रंगीबेरंगी धुके सभोवार तरंगू लागते आणि वस्तुस्थितीच्या रूपरेषा अस्पष्ट होऊ लागतात. या धुक्याचा आणि धुंदीचा अनुभव घेणे हीच एका परीची काव्यसाधना. विकासासाठी आसुसलेले रोपटे, आकाशातून कोसळणारा मुसळधार पाऊस अधीरतेने आपल्या अंगावर घेत असते. या उद्योगात ते वाकते, फडफडते आणि तडकतेसुद्धा ! तरीही त्याची अधीरता संपत नाही. पानापानावर पिकणाऱ्या हिरव्यागर्द रोमांचातून ती प्रकट होत असते, आणखी-आणखी म्हणून पुटपुटत असते.

प्रारंभकाळी कवीची अवस्थाही अशीच असते. चोहोकडून येणारे लिखित-अलिखित काव्याचे स्रोत तो आपल्या अंगावर घेत असतो. आपल्या व्यक्तित्वात जिरविण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यातूनच त्याच्या कविप्रकृतीचा विकास हलके हलके होत जातो. रोपट्याचे झाड होते; सारी रोपटी सारखी दिसतात. पण झाडांना मात्र स्वतःचे विशिष्ट आकार, विशिष्ट रूप, विशिष्ट गुणधर्म प्राप्त होतात. काही झाडे कातलेल्या कुंजासारखी डौलदार दिसतात; काही डोलकाठीसारखी सरळ उंच जातात; काही तंबूसारखी विशाल व प्रशस्त होतात; काही रुक्ष, काही भेसूर, तर कित्येक खुरटलेली दिसतात. ही विशिष्टता प्राप्त झाली म्हणजे साधना, निदान साधनेची पहिली अवस्था संपते. या धुंदीच्या आणि धुक्याच्या प्रदेशातून मलाही अर्थात् वाटचाल करावी लागली. मागे वळून पाहिले तर धूसर पट्टा तेवढा क्षितिजावर तरंगताना दिसतो. त्यातील सर्व तपशीलाची नोंद करणे प्रायः अशक्य आहे.

—कुसुमाग्रज

---

सत्यनारायणाची पूजा केली होती. तात्यांना सोयीची वाटेल अशी तारीखही निश्चित केली होती. तात्या आता येतील मग येतील अशा आशेने आम्ही सबंध दिवस घालवला. सगळा समारंभ संपला, लोक घरोघर परतले. थकून भागून आम्ही सर्वजण बसलो होतो. शेवटी तात्या आलेच नाहीत, म्हणून निराशेचे उद्गार निघत होते. इतक्यात तात्यांची टॅक्सी दाराशी थांबली. आनंदाने सर्व घर भरून गेले. त्यांच्यावर प्रश्नांची फैर झडली. पण नेहमीच्या प्रेमळ, आणि विनोदी वृत्तीने त्यांचा त्यांनी समाचार घेतला.


**शब्दांनी मग काबिज केले**

तात्यांचा वाङ्मयीन प्रवास थांबलेला नाही किंवा अध्यक्षपदी निवड झाली म्हणून त्याची इतिश्रीही होणार नाही. त्यांचा हा प्रवास अखंडपणे चालू राहणार आहे. 'विशाखा' काव्यसंग्रहात त्यांनी जे आपल्या काव्याबद्दल म्हटले आहे ते त्यांच्या वाङ्मयीन प्रवासाबद्दलही सत्य आहे. 'ही जीवन-सरिता काही वेळा खळखळते तर कधी ती अडखळल्यासारखी वाटते. काही वेळा बुंद वेगाने ती फेसाळत जाते तर कधी ती सुकल्यासारखी वाटते. परंतु एक गोष्ट मात्र निश्चित, की ती अखंडपणे समुद्राची वाट शोधीत आहे.'

त्यांच्या या त्रोटक जीवनकथेवरून हे आढळून येईल की, आपले सर्व जीवन त्यांनी निष्ठेने आणि जाणीवपूर्वक साहित्य-सेवेला समर्पित केले आहे. या निष्ठेपासून मनाला विचलित करणारे सारे मोह त्यांनी एकाद्या तपस्व्याप्रमाणे टाळले आहेत. मग तो मोह कीर्तीचा असो, प्रीतीचा असो किंवा संपत्तीचा असो. मला वाटते, त्यांच्या साहित्यिक जीवनाचे हे महत्त्वाचे सूत्र आहे. त्यामुळेच त्यांचा स्वभाव अतिशय शांत, समाधानी आणि धीरोदात्त झाला आहे. 'शब्द' हाच त्यांच्या जीवनातला खरा परमेश्वर आहे, 'शब्द' हीच त्यांच्या सुखदुःखाची ठेव आहे, 'शब्द' हेच त्यांचे जीवन झाले आहे त्यांच्याच शब्दांत या लेखाची सांगता करायची झाली तर या सुंदर चार ओळींनीच ती करता येईल—

**मी शब्दांच्या घालित बसतो अमाप राशी**
**सुखदुःखांतहि धावत जातो शब्दांपाशी**
**शब्दच झाले मालक आता सर्व जिण्याचे**
**जनावराने काबिज केला हा दरवेशी !**

• • •



# क्रांतीचे स्तोत्रकार कुसुमाग्रज



चन्द्रशेखर मराठे

मराठी भाषा जाणणाऱ्या प्रत्येकास परिचित असलेले असे जे थोडे कवी आहेत त्यांत कवी कुसुमाग्रज यांचा समावेश होतो. काव्यातील तथाकथित नवतेचा अजिबात स्पर्श न झालेल्या या कवीने नवीनतेला सातत्याने आवाहिले आहे. किंबहुना कुसुमाग्रज म्हणजे क्रांतीचे–नव्याचे स्तोत्रकार असा त्यांचा सार्थ लौकिक आहे.

मराठी साहित्यात काही वर्षांपूर्वी अवतरलेल्या नवकाव्याने इतर काय साध्य केले असेल ते असो, पण एकूण काव्य या प्रकाराबद्दलच सामान्य रसिकाच्या मनात एक प्रकारचा धसका व उबग या नवकाव्यामुळे निर्माण झाला. रसिकाची ही प्रतिक्रिया एवढी तीव्र होती की नवेजुने सर्वच काव्य काही काळ वाचकापासून वंचित झाले. मर्ढेकरांच्या कवितेपासून किंवा त्यांच्या कवितेमुळे मराठीत नवकाव्य सुरू झाले असे म्हणण्याचा प्रघात आहे. त्यांचे काव्य कशामुळे 'नव' ठरले हे पाहता त्यांच्यानंतरचे काव्य खरोखरी नव होते किंवा काय याची शंका येते. मर्ढेकरांचे काव्य दुर्बोध आहे ही त्यांच्या काव्यातील नवता नव्हे; त्यांच्या प्रतिमा विक्षिप्त वा मिश्र असत ही त्याच्या काव्यातील नवता नव्हे. **त्यांचे काव्य 'नव' ठरण्याचे कारण असे की त्यांनी काव्यात समावेशक तार्किकता आणली. किंबहुना असे म्हणता येईल की या तार्किकतेच्या साहाय्याने त्यांना जीवनाचे जे दर्शन घडले ते वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी काव्याचा आश्रय घेतला. त्यांचे विचार काव्याच्या माध्यमातून व्यक्त होणे हे अपरिहार्य नव्हते.**

ही समावेशक तार्किकता पेलण्याचे सामर्थ्य केवळ मर्ढेकरांच्याच प्रतिमेत होते. मर्ढेकर ज्या तात्त्विक उंचीवर जाऊ शकले त्या उंचीवरच काव्याला ही तार्किकता मानवते. त्या उंचीच्या अलीकडे राहून (किंवा नाइलाजाने रहावे लागूनही) तार्किकतेची कसरत करू पाहण्याने काव्यात तथाकथित सापेक्ष नवता आली. पण काव्याचा सौंदर्याशी काही संबंध उरला नाही. एवढेच काय पण सामान्य मानवी जीवनाशीही काव्याचा काही संबंध उरला नाही. या नवतेने काव्याचे मानवतेशी असलेले नाते अडाणीपणाने तोडले–आणि जरूर नसताना काव्य दुर्बोधपणाचा आणि त्रयस्थपणाचा बोजा वागवू लागले. न झेपणाऱ्या व (काव्यास) आवश्यक नसलेल्या मर्ढेकरी तार्किकतेच्या मागे धावून काव्याच्या हाती काही लागले नाही. प्रथम आपणांस सर्व कळते अशा अभिनिवेशाने निघालेले नवकाव्य आपणास काय कळले हेही कळत नाही या आत्मघातकी भूमिकेत कैद झाले. तार्किकतेची एवढी अतार्किक किंमत पाहिली की मोठा अचंबा वाटू लागतो.

## नवता आणि नवीनता

काव्याची स्वाभाविक उंची ज्यांना कविसुलभ सहजतेने गवसली आणि त्या उंचीवर जेवढी तार्किकता आवश्यक होती तेवढीच ज्यांनी पत्करली अशा काही थोड्या कलावंतांपैकी कवी कुसुमाग्रज होत. विशेषतः तार्किकता ही जीवनाच्या मूलभूत प्रेरणेपैकी नसून त्यास अनुषंगिक अशा मूल्यांपैकी एक आहे हे कुसुमाग्रजांनी ओळखले. त्यामुळे त्यांच्या काव्यात नवीनता दिसते पण 'नवता' दिसत नाही. या त्यांच्या स्वाभाविक भूमिकेमुळे त्यांच्या काव्यास आवश्यक ती मर्यादा लाभते आणि त्या मर्यादेत राहून काव्यास आवश्यक अशी उत्कटता प्राप्त होते. उत्कटता हा त्यांच्या काव्याचा विशेष होय. प्रेम, भक्ती, आवेश, तिरस्कार, सहानुभूती इत्यादि अनेक भावनांस त्यांच्या काव्यात पराकाष्ठेची उत्कटता लाभते व त्यांचे जे जीवितविषयक तत्त्वज्ञान आहे ते वाचकांस सहजपणे समजते व काही अंशी पटून जाते.

कवितेच्या संदर्भात हे फारच महत्त्वाचे आहे. कवितेच्या माध्यमात कलावंत व रसिक यांचा थेट (डायरेक्ट) संबंध असतो. इतर साहित्यप्रकाराप्रमाणे त्यात पात्रांची, घटनांची वा परिस्थितीची मध्यस्थी नसते. कादंबरी, नाटक व कथा यांत लेखकास जे सांगावयाचे आहे ते वाचकांस पटले नाही–किंबहुना पूर्णपणे जाणवले नाही तरी त्या प्रकारास एक प्रकारची जी विश्वासक्षमता (क्रेडिबिलिटी) असते ती कवितेत नसते. त्यामुळे कवीचे विचार किती नवीन, महत्त्वाचे व प्रगल्भ आहेत यावर कवितेचा परिणाम संपूर्णपणे अवलंबून नसतो. विचार कसेही असले तरी उत्कट असणे हे काव्याच्या दृष्टीने अतिशय अपरिहार्य असते. कुसुमाग्रजांच्या काव्यातील

उत्कटता महत्त्वाची ठरते ती यामुळेच.

**दैवी उत्कटता**

काही मूलभूत गृहीताच्या संदर्भात जीवनातील सुसंगतीचे–विसंगतीचे, शुभाचे-अशुभाचे आणि सुखदुःखाचे उत्कट दर्शन घडविणे हे काव्याचे कार्य कुसुमाग्रजांचे काव्य अव्वलपणे करते. जुन्या अहितकारक मूल्यांबद्दल चीड, क्रांतीचा जयघोष, समतेचे आवाहन, चलनाधिष्ठित समाजातील अपरिहार्य विसंगती, एकादी नितळ सौंदर्यशाली अनुभूती याचे दर्शन कुसुमाग्रजाच्या प्रतिभेच्या उत्कटपणाचा स्पर्श झाला की प्रत्ययकारी वाटते. उत्कटपणाचा हा स्पर्श जेव्हा होतो तेव्हा कविता काव्यस्वरूप पावते. समता व क्रांती यांच्याबद्दल कमालीचे आकर्षण निर्माण करण्याची किमया करण्यात कुसुमाग्रजाना त्यांच्या भाषेचे फार मोठे साहाय्य झाले आहे. त्याची भाषा अतिशय थेट, पैलूदार आणि बोलकी आहे कोणत्याही विचारास उत्कटता देण्याचे कार्य ती धार लावण्याच्या सहाणेप्रमाणे करते. पण स्वतः कुसुमाग्रज भावेच्या लालित्यात रस घेताना दिसत नाहीत. विचाराना अनुकूल अशी भाषा अपरिहार्यपणे कशी बनते ह्याचे उदाहरण म्हणजे त्यांची कविता होय.

त्यांच्या काव्यातील उत्कटतेमुळें त्यांच्या काव्यातील तार्किकता मर्यादित राहिली की तार्किकता मर्यादित राहिल्यामुळे त्यांच्या काव्यास उत्कटता प्राप्त झाली हे ठरविणे मोठे कठीण आहे. ते काही असले तरी पदोपदी जाणवणाऱ्या विचाराना व भावनांना त्यानी अक्षरशः दैवी उत्कटता दिली हे खरे आहे. देशभक्ती, समतेची आवश्यकता, सौंदर्यासक्ती या भावना सर्वांसच काही प्रमाणात जाणवतात. पण त्या इतक्या प्रकर्षाने जाणवत नाहीत. भावनाच्या प्रकर्षावर त्याचे अस्तित्व अवलबून असते असे मानसशास्त्र सागते. कुसुमाग्रजानी या भावनाचा खरेपणा वाढविला हे त्यांच्या काव्याचे सर्वात मोठे कार्य होय. विशेषतः देशभक्तीची भावना आत्यतिक प्रकर्षाला नेऊन तिला धर्मकल्पनेचे ओज आणि तेज कुसुमाग्रजांनी दिले. 'गर्जा जयजयकार' ही एकच कविता त्यानी लिहिली असती तरी त्यांचे कवी म्हणून स्थान अढळ राहिले असते.

**मर्ढेकर व कुसुमाग्रज**

काव्याचे जे कार्य आहे ते त्याची कविता सहज करून जाते. कोणत्याही गोष्टीच्या सर्व बाजू विचारात घेऊन त्याची सगती लावीत बसणे हे काव्याचे कार्यच नव्हे. भावनेचा एकादा पैलू, विचाराची एकादी शलाका घेऊन तिचा प्रकर्षाने, उत्कटतेने आविष्कार करणे हेच काव्याचे कार्य आहे. मर्ढेकरांनी काव्यात जी समावेशक तार्किकता आणली ती काव्यास खरे म्हणजे मानवत नाही. या तार्किकतेचा पुढील टप्पा गाठण्याचे कार्य काव्यात होऊ शकले नाही. ते गगाधर गाडगीळानी गद्यात केले. आयुष्यातील सामान्यत्व व चाकोरी याच्या सदर्भात मर्ढेकरानी अपरिहार्यतेचे दर्शन घडविले हे खरे; परतु ते तेथेच थांबले. या अपरिहार्यतेची सागड प्रत्यक्ष अस्तित्वाशी घातली ती गाडगीळानी. मानवी जीवनातील दुःखे म्हणजे अस्तित्वाची केवळ सावलीच आहेत. सामान्यत्व व चाकोरी या गोष्टी अस्तित्वाच्याच दोन बाजू आहेत हा विचार गाडगीळानी माडला. मर्ढेकरानी काव्याच्या माध्यमातून फार मोठी झेप घेण्याचा प्रयत्न केला. त्याचा तो प्रयत्न अपुरा राहणे 'अपरिहार्य' होते – पण केवळ त्यानी तो प्रयत्न केला यामुळे त्याचे काव्य 'नव' ठरले. खऱ्या अर्थाने नवकवी असलेले पहिले व शेवटचे कवी असेच मर्ढेकराना संबोधावे लागेल. मर्ढेकराचे अपयश काव्याच्या स्वरूपाबद्दल कांही मूलभूत प्रश्न उपस्थित करते.

अस्तित्व कल्पनेच्या मूलभूत गृहीताचा असा मागोवा घेणे काव्याला किंबहुना ललित साहित्यालाच अशक्य असावे. अस्तित्व ही चागली गोष्ट आहे हे गृहीत मान्य करूनच ललित साहित्याला जीवनाचे दर्शन घ्यावे लागते – आणि घडवावे लागते. अस्तित्वाची वासना ही गोष्ट अतितार्किक आहे. तार्किकता ही या गृहीताला अनुषगिक आहे. अस्तित्व अनुकूल परिस्थितीत सतत राहील हे पाहण्याचे, म्हणजे दुय्यम स्वरूपाचे काम तार्किकतेचे आहे. तार्किकता या गृहीताला आव्हान देऊ शकते ती केवळ अस्तित्वात असल्यामुळेच.

मानवी अस्तित्व सातत्याने व अनुकूल परिस्थितीत राहावे हे मूलभूत गृहीत ललित साहित्याला आकार देते. अस्तित्वाचे अनेक पैलू, जीवनाचे सनातन नावीन्य हे ललितकृतीचे आधार आहेत. ते सोडून देऊन जीवनाचे आणखी निराळे दर्शन घडविणे व तेही ललित साहित्याच्या मर्यादेत राहून, हे सर्वथा अशक्य आहे. ही ललित साहित्याची मर्यादा आहे. या मूलभूत गृहीताच्या अंकित राहूनच जीवनाचा वेध घेणे हे ललित साहित्याचे कार्य आहे. **असे जरी असले तरी प्रचलित अनुभूतीच्या थोडे पुढे जाऊन जीवनाचा अन्वय लावणे हे खऱ्या ललित साहित्याचे – विशेषतः काव्याचे महत्त्वाचे कार्य आहे.**


**पृथ्वीचे प्रेमगीत**

कवी कुसुमाग्रजांनी हे कार्य केलेले नाही. प्रचलित अनुभूतिसमूहास उत्कटता देण्याचे कार्य त्यांच्या काव्याने केले. परतु अनुभवांच्या आवर्तनातून त्याना अद्याप अशी एकादी सगती सापडलेली नाही की अनुभवाचा खरेपणा आणखी वाढावा. याचे कारण असे असावे की त्यानी पुनरुत्थानाचा सिद्धात स्वीकारला आहे. पूर्वी मानवप्राणी चांगला होता, समाजधारणा व सस्कृतीच्या खोटया कल्पना यानी त्याची अवनती होत होत तो सध्या माणुसकीस पारखा झाला आहे, पुन्हा केव्हा तरी त्याचा आत्मा जागृत होईल, – पृथ्वीवर क्राती होईल – समानतेचे सुवर्णयुग नादेल ही भूमिका त्यांच्या काव्यात वारवार आढळते. आणि हे नवयुग आणण्याचे कार्य बडखोर – असामान्य नेते करीत असतात. करीत राहतील असे त्याना वाटते.

त्यांच्या एकूण सर्वच काव्यात सामान्याबद्दल विलक्षण तिरस्कार आणि असामान्यत्वाबद्दल पराकाष्ठेचे आकर्षण दिसून येते. पृथ्वी सूर्याची प्रेमयाचना करताना इतर ग्रहाना ज्या भाषेत अव्हेरते, ती भाषा कुसुमाग्रजांच्या काव्याचा स्थायीभाव आहे. घरप्रपचसंसार या गोष्टी कवडीमोल मानण्याची वृत्ती असलेल्या क्रातिकारकांचे, खलाशांचे, नेत्याचे स्तवन करण्यात कुसुमाग्रजांच्या प्रतिभेस सार्थक वाटते. त्याना समतेचेही विलक्षण आकर्षण आहे. आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापित झाल्याखेरीज इतर सगळे व्यर्थ आहे असे त्याच्या काव्याचे ध्रुवपद आहे. सर्व माणसे सारखी आहेत. त्यांना सारखी लेखणे हीच खरी मानवता अशी त्यांची श्रद्धा आहे.

वरील सबंध परिच्छेद वाचीत असताना त्यातील विसंगती कोणाच्या लक्षात येईल की नाही कोण जाणे. परतु कुसुमाग्रजांची ही भूमिका कमालीची विसगत आहे.

[पृष्ठ ६६ वर पाहा]




## जागर

काच आकाशाची निळी
हले पाऱ्याचे चांदणे
असा देखणा जागर
रात्र डोळ्यास बांधणे

गार हवेचा विळखा
देह कापुराचा झुके
घट्ट ओळखीची मिठी
स्तब्ध ओठावर धुके

धुंद नाचतात उल्का
निघे प्रकाशाची तार
रात्र सरता सरेना
खुले पापणीचे दार

*– ललित सोनोने*

## हट्ट

हट्ट असा एकांताचा
जडला मज कधीचा
अंधारावर रेशीम धागे
जुडूनि पुनः उकलायाचा...
कळलेले जरी मज
वाळूत उभा तू तेथ
मनचे तळवे रुतून बसले
स्मृतीस पिंजत काळोखात !

*—सुधा कुलकर्णी*

## एक पक्षी

तिन्ही सांजेला एक पक्षी एकाकीच उडणारा
दूर दूर एक तारा हळूच त्याला बघणारा;
सुन्न सुंद मुके झाड पान पान झडलेले;
चांदण्या रात्री कधीतरी स्वप्न त्याला पडलेले;
स्वप्नात त्याच्या तोच पक्षी चोंच मारून गेलेला
फांदीवरती त्याचा खोपा अजूनही उरलेला !

*—प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी*

## स्मरण

विसरायाचे नाहि विसरलो
परी विसरलो हिरवे गाणे
हिरव्या-पिवळ्या माळावरली
लाल-तांबडी रेखिव वळणे

कसा विसरलो वाटेवरल्या
झुऱ्या-बावऱ्या बाभळ-बोरी
लेकुर-वाळ्या शेळ्यांमागिल
मूक-लाजऱ्या अल्लड पोरी.

कसा विसरलो बांधावरल्या
रंगित ओळी रानफुलांच्या
फुला-फुलावर होत्या लिहिल्या
स्पर्श-कथा त्या मखमालीच्या

कसा विसरलो झाडीमधले
एक चिमुकले घरटे माझे
घरट्यांमधली स्वप्नें सुंदर
स्वप्नामधले जीवन माझे

*—ह. शि. खरात*

# शिकार

नर गाठोडयासारखा खाली आला. रक्तबंबाळ मादी वर उडाली,
आणि आर्त स्वराने ओरडली– पटर्र घुम्....घुम्....!

सोसायटीच्या दप्तराची तपासणी संपवून मी चावडीसमोर निवांतपणे बसलो होतो. खुर्चीत ऐसपैस मांडी घालून 'पिवळा हत्ती'चा धूर सोडत होतो. अष्टमीचा चंद्र फिकट प्रकाशाची बरसात करीत होता. मंद वाऱ्याने आसपासच्या झाडांच्या फांद्या हलत होत्या. त्यांच्या सावल्या जमिनीवर वेडयावाकडया नाचत होत्या. नागपंचमीच्या गाण्यांचे फेर धरले गेले होते. दूरवरून अस्पष्ट आवाज येत होता, "गुडी गुडी रथ चाले रामाचा!" प्रयत्न करूनही त्या ओळीचा अर्थ लागत नव्हता. नजिकच्या इनामदारांच्या वाडयातून शुद्ध ब्राह्मणी थाटाचे स्वर निघत होते," "आज मथुरेचा बाजार। सोड हरि पदर."

उद्या दुसरी कुठली तरी सोसायटी तपासायला पाहिजे होती. फिरतीने जीव उबून गेला होता. इथल्या सोसायटीचे काम बरे होते. पण हातात फार मोठी शिल्लक ठेवली होती. ती तपासून बँकेत पाठवली की काम संपणार होते. ती शिल्लक वापरलेली आहे हे मलाही समजू शकत होते. पण या सोसायटीच्या चेअरमनचे तालुक्यात वजन होते. ते जिल्हा परिषदेचे सभासद होते. त्यांनी 'सायंकाळपर्यंत रक्कम आणतो' म्हणून सांगितले होते. त्यांच्या येण्याची वाट बघत मी बसून होतो.

चावडीत कुणाची तरी पावले वाजली. मी वळून बघितले. शिपाई होता. कोपऱ्यात ठेवलेली बंदूक घेऊन तो माझ्याजवळ आला, "रावसाव! बंदूक सरकारांच्यात ठिवू का?" त्याने विचारले. "जरा इकडं आण! मी बघतो. मग ठेव!" येताना मी लोड केली होती म्हणून खात्री करून घेतली. सहज म्हणून बंदूक समोरच्या झाडावर रोखली. एक डोळा मिटला.

"रामराम रावसाव!" कुणाचा तरी राकट आवाज आला.

बंदूक शिपायाजवळ देऊन मी त्याच्याकडे पाहिले. बघता बघता त्याने पानाची लालभडक पिचकारी मारली. घुंगरे लावलेली पानाची पिशवी आवाज करीत खांद्यावर टाकली. शिपायाच्या हातातील बंदुकीकडे तो निरखून पाहात होता. माझ्याकडे बघत त्याने विचारले, "रावसाव! एक इचारू का?"

"हं," मी कुठेतरी बघत म्हटले.

"हत्यार आपलंच का?"

"होय, का?"

"न्हाई आपलं सजगती इचारलं!" मग तो जरावेळ गप्प राहिला, आणि पायाच्या अंगठयाने जमीन उकरत सावकाश म्हणाला. "मजी माजं म्हननं असं, सोतासाटीच पाळलंय कां शिकारीचा शोक हाय थोडा?"

"हं! तसा आहे थोडासा!" गडी शिकारीतला आहे हे बघून मीहि खुलला,

"जवळपास आहे का एखादं रान?"

"हां हाय की! नुसतं जनावरच न्हाई तर ख्योळ बी हुतोय चांगला!"

"असं! किती लांब आहे? एकदोन दिवसांत जाता येईल का?"

"आता वं! एकदोन दीस कशाला? एक टेक वलांडलं की आलाच बनगरवाडा! न्याहारी करून जायचं अन जेवायला माघारी!" गडी आता रंगला होता.

"नाव काय तुझं? काय करतोस धंदा?" काहीतरी विचारावं म्हणून मी विचारलं.

"जी! ईस्वरा म्हनत्यात मला! जातीनं रामुशी हाय मी! कशाचा धंदा रामुशाला! कुठंतरी चोरी मारी तरी, न्हाईतर दारूची भट्टी! लांडग्यावानी काम रावसाव! घावली तर दिसांत चार मेंढरं! न्हाईतर शाडूची माती चाटूनच वरीस जातं" बेफिकीरीने त्याने सांगितले.

"मग आपण सकाळी जाऊ! काय जनावरं आहेत?"

**बाळ निस्वडेकर**

"जित्राब तसं मोटं नाही! हरन, ससा! निदानीला मरळ न्हाईतर पानकोंबडया हायतीच की!" हसत हसत तो म्हणाला.

"तू ये सकाळी! आपण जाऊ! मी झोपतो आता!" मी उठलो आणि बिछान्याकडे गेलो.

सेक्रेटरी आणि चेअरमन तिथे बसले होते. हातातली बिडी विझवून सेक्रेटरी उभा राहिला. "जेवण आवडलं का आपल्याला?"

"जेवणाचं ठीक आहे, पण शिलकेचं काय केलं तुम्ही! उद्या ती बँकेत गेली पाहिजे!" मी मुद्याला हात घातला!

"उद्या दिवस मावळायच्या आत मी रक्कम उभी करतो." चेअरमन म्हणाले. "माझ्यासाठी म्हणून ऐका! उद्या एक चांगला रामोशी देतो. शिकार करा! परवा आपण सगळेच रकम घेऊन जाऊ!"

"ठीक आहे! पण रकम घेतल्याशिवाय मी जाणार नाही!"

"त्याची काळजी नको! आपण झोपा!" ते दोघेही निघून गेले.

थोडेफार पोटात ढकलून सकाळी आम्ही बाहेर निघालो. बाहेर पडताच गाय आडवी गेली. इनामदार म्हणाले "रावसाहेब! शकुन तर चांगला आहे! मोठी शिकार आणा! वाट पाहतो!" मी नुसते हसलो. डोक्यावरची हॅट उन्हाकडे कलती करून पायऱ्या उतरलो.

जंगल बरेच दाट होते. कुबट वास येत होता. वस्त्रगाळ भुकटीसारखे ऊन गाळून अंगावर पडत होते. आत शिरताच आमच्या पायाजवळून दोन पकुडर्या उडाल्या.

"काय ईश्वरा? टाकायचा का बार?"

"सायेब, उडती पाकुर्डी बाराला पडत नाही. वाकडी तिकडी उडती." ईश्वराची शिकारीतली माहिती अचूक होती. बंदूक उडवणे आणि शिकार पडली तर पडली, नाही तर दुसरी हा माझा खाक्या होता. ईश्वरा

शिकारीचा अंदाज घेणारा होता. बार फुकट जाऊ देणे त्याला कमीपणाचे वाटत होते.

आम्ही सावकाश चालत होतो. तो मला वेगवेगळ्या गोष्टी सांगत होता. तंबाखू चव देऊन खात होता. दाढेत घोळवीत पिचकाऱ्या मारत होता. एकाएकी तो काळा रामोशी थांबला आणि हळूच म्हणाला "सायेब ! म्होरं हरन हाय!" ईश्वराच्या बोटाच्या दृष्टीने मी बारीक नजर लावली तेव्हा मला ते दिसले. त्या रानाच्या करड्या रंगाशी ते एकजीव झाले होते. लांडे शेपूट उडवीत गवत खुडत होते. ईश्वराच्या सराईत डोळ्यांनी ते अचूक हेरले होते.

बंदुकीतली काडतुसे मी पुन्हा पाहिली. दस्ता खांद्याला लावून दोन्ही नळ्यांच्यामध्ये हरीण घेतले. सेफ पुढे सारला आणि घोड्यावर बोट ठेवले. ईश्वरा बेताने माझ्या कानाला लागून म्हणाला. "राग मानू नका सायेब ! गोळी शिस्तीनं मारा ! रान तोटकं हाय ! जनावर बुजलं मंजी पुना उटत न्हाई !" डोळा समोर घेतला. धाड्दिशी बार झाला. फऱ्यात ओझरत्या लागलेल्या छऱ्यासह उशा घेत हरण नाहीसे झाले. मी शरमलो. "गड्या ईश्वरा ! चुकलंच माझं !"



पुष्कळ पायपीट झाली. पण बाराच्या आवाजाने बुजलेली जनावरे मरून झाडीत बसली होती. ती उठत नव्हती. मरळीसाठी डोहाच्या काठी बसून मी कंटाळलो. होतो. तेव्हा आम्ही परत निघालो. सूर्य आता माथ्यावरून कलला होता. मानेवरून वाहणारे घामाचे ओघळ सुकले होते. ओठ सुद्धा खारट झाले होते. शिकारीसाठी म्हणून घातलेल्या बुटात पाय उकडून निघाले होते. पायांवर काटेरी झुडुपांच्या फांद्यांनी ओरखडे निघाले होते. वाळलेल्या रक्ताने त्यांच्या तांबूस रेघा स्पष्ट दिसत होत्या.

खांद्याला बंदूक अडकवून ईश्वरा चालत होता. तो शेलकाटा काळा माणूस अजिबात दमला नव्हता. 'सायेब दमलाय' हे त्याने ओळखले होते. आणि निरनिराळ्या गोष्टी सांगून तो मला हसवत होता.

"माजा एक चुलता हुता सायेब ! लई नंबरी शिकाऱ्या ! हरनाची शिकार मुटी फैनाबाज करायचा ! कोसकोस पळून हरन धरायचा ! चारदोन दिसांनी घरात हरनाचं कोरड्यास हुयाचं !" 'हूं हूं' करत करत मी चालत होतो. ईश्वरा एकाएकी बोलायचा थांबला म्हणून मी त्याच्याकडे बघितले. पिवळ्या धमक फुलांनी लहडलेल्या बाभळीच्या झाडाकडे तो टक लावून बघत होता. "मोठी न्हाई तर न्हाई ! कोरड्याशापुरती तरी शिकार हाय सायेब !" बाभळीकडे पाहात तो म्हणाला.

बाभळीच्या एका फांदीवर पारव्याचे एक जोडपे बसले होते. मादी आपली वेडी बागडी होती. नर मोठा ऐटबाज होता. त्याच्या गळ्यामोवतीची काळी कडी मोठी सुरेख दिसत होती. पिसे फुलवीत तो इकडे तिकडे नाचत होता. मादीच्या अंगाला अंग घाशीत होता. आपली चोच तिच्या पिसांत खुपसत होता. "टाका बार सायेब ! गडी नादात हाय ! उडनार न्हाई !" पाठीची बंदूक काढून माझ्या हाती देत ईश्वरा म्हणाला.

बंदुकीची नळी वाकवून मी एल्. जी. ची काडतुसे काढून टाकली. चार नंबर आत टाकून बार ठणकावला...नर गाठोड्यासारखा खाली आला आणि बाभळीच्या बुंध्यावर पडला. रक्तबंबाळ मादी वर उडाली. आणि आर्त स्वराने ओरडली, पर्टर्र घुम् घुम्......! आणि तीही खाली पडली. पडताना तिचे डोळे नराकडे होते. चोच वासलेली होती. माझ्या डोळ्यांत शिकारीचे हसू होते.

ईश्वराने ती जोडी उचलून धोतराच्या पदरात बांधली. रक्ताचे लहानसे डाग त्याच्या धोतरावर पडलेले होते. अगदीच फुकटात फेरी गेली नाही याचे समाधान त्याच्या चालीतमुद्धा दिसत होते. त्याने बसून पान खाल्ले आणि आम्ही रस्ता कातरु लागलो.

"तर काय झालं सायेब !" ईश्वरा सांगू लागला, "त्यानं लई हरनं मारली ! त्याचं मनच त्याला खायला लागलं ! म्हातारपनी एकदा आजारी पडलं अन् हरनासारखं वरडून मेलं !" हे सांगताना तो काळा रामोशी फार हसला. त्याचा चेहरा निळा जांभळा झाला आणि डोळ्यांत पाणी आले.

माझ्या पोटात मात्र उगीच कसनुसे झाले आणि रक्तबंबाळ मादीचा आर्त स्वर कानात घुमला, "पर्टर घुम् घुम्......"

● ● ●

**मृत्यूच्या या सर्व भयंकर प्रकारात आपल्या बायकोला साजेसा असा कोठलाही प्रकार त्याला आठवेना. छे ! तो लाल मृत्यू नकोच... आगीमुळे माणूस होरपळून निघेल ! रोगाचा काळा मृत्यूही नको... वाघाच्या तोंडातला पिवळा मृत्यूही तिला अपुरा पडला असता. छे !**

: लेखक :
मार्क्स डाऊथेंडाय

# सूड

: अनुवाद :
श्री. भा. श्रोत्री

मुंबईमधील मजूरवस्तीच्या एका सार्वजनिक नळाजवळ दलालची बायको उभी होती. नळ वाहत होता. आणि नळाखाली आपल्या सहा वर्षांच्या मुलाचे डोके ती जोरजोरात घासून धूत होती.

सकाळचे सात वाजले आहेत. भारतीयांनी रस्ते गजबजून गेले आहेत, आणि लोक घाईघाईने कोठेतरी जात आहेत. जणू काही लांडग्यांचा कळपच कोठेतरी निघाला आहे. दोन चाकांच्या गाड्यांनी रस्ता गजबजून गेला आहे. रस्त्यावरील कोंबड्या आणि शेळ्या त्या गाड्यांमधे अडमडत आहेत. काही लोक रस्त्याच्या कडेस शांतपणे बसले आहेत आणि न्हाव्यांकडून दाढी करून घेण्यात गुंगले आहेत. न्हाव्यांनी आपली धोकटी समोरच ठेवली आहे आणि तीतील हत्यारे इतस्ततः पसरली आहेत. कोणाच्याच अंगात काहीही वस्त्र नाही, परंतु प्रत्येकाच्या डोक्यावर पागोटे दिसत आहे.

मुलाची आंघोळ संपल्यावर दलालच्या बायकोने त्याचे केस पुसले आणि केसांना तेल लावून त्याचा भांग पाडला. आता त्याचे केस युरोपियनांच्या गुळगुळीत पॉलिश केलेल्या काळ्या बुटांसारखे लखलखत आहेत. आता तिने स्वतःचे केस सोडून आपले डोके नळाखाली धरून ती यथेच्छ आंघोळ करू लागली. तिच्या डोक्यावरून नळाभोवती पाणी उडत होते.

जवळच उभे असलेले एक वासरू, एक कुत्रा आणि एक दोन कोंबड्या नळाजवळ आल्या आणि रस्त्यावर उडत असलेले पाणी टिपू लागल्या.

दलालच्या उघड्या दुकानात एकदोन कामगार इंग्रजी शिवण्याच्या मशिनवर बसले होते आणि दुपट्टा आणि पागोटी शिवत होते, ते उडणाऱ्या पाण्याकडे बघून हसत होते. त्यांच्यातला एक कामगार–अलिमान–तिला ओरडून म्हणाला, " एलिदा, तुझ्या डोक्याची काळजी घे हं ! नाहीतर कारंजाखाली त्याचे पाण्यात रूपांतर होऊन जाईल."

एलिदाने, दलालच्या बायकोने, त्याला काहीच उत्तर दिले नाही. परंतु आपली आंघोळ पुरी झाल्यावर तिने आपल्या मुलाला अलिमानकडे धाडून दिले. अलिमानने एक क्षणभरच मुलाचे डोक्यावरून हात फिरवला आणि तोंडाने तो काहीतरी पुटपुटला. एवढे झाल्यावर त्याने मुलास जाऊ दिले. मग नम्रपणे तो आपल्या शिवण्याच्या कामात मग्न झाला.

आपल्या नवऱ्याच्या दुकानासमोरच्या नळावर ती बाई जेव्हा जेव्हा आंघोळीस येत असे, त्यावेळी ती आपल्या मुलाला अलिमानकडे धाडत असे. अलिमान मग प्रेमाने त्या मुलाच्या डोक्यावरून हात फिरवीत असे आणि तोंडाने पुटपुटून त्याला आशीर्वाद देत असे. हे, त्या मुलाला चालता येऊ लागल्यापासून चालू होते.

अलिमान त्या मुलाला इतक्या प्रेमभराने का जवळ घेतो, याचा विचार करावयास कोणासही वेळ नव्हता. परंतु त्या दुकानाचा मालक, दलाल मात्र कोपऱ्यावरील सोनाराचे दुकानात बसून विचार करीत बसलेला असे. कित्येकदा, त्याची गुडगुडी विझून जाई. मग ती तो पुन्हा पेटवून पुन्हा आपल्या विचारांना चालना देत असे. बसल्या जागेवरून तो नेहमी आपल्या बायकोच्या, मुलाच्या, अलिमानच्या आणि इतर कामगारांच्या हालचालींकडे लक्षपूर्वक पाहत असे. हे त्या सोनाराच्याही कधीं लक्षात आले नव्हते.

आज सकाळीं त्याची बायको मुलाला घरीं घेऊन गेल्यावर दलालने एकदा आपल्या कपाळावरचा घाम पुसला, पायात जोडे सरकवले आणि विचार करत करतच तो केव्हाच रस्त्यावरील गर्दीत मिसळून गेला. दलाल निघून गेला होता हे सोनाराच्या दुकानात कोणाच्याच लक्षात आले नाही. दलाल जो नाहीसा झाला तो एका अरुंद बोळातील एका देवळासमोर येऊन उभा राहिला.

देवळात अनेक हस्तधारी कालीमाता, सूडाची देवता, उभी होती. देवीची मूर्ती लाकडात घडविलेली होती. देवळात सूडाच्या सर्वच देवता होत्या. सणाच्या दिवशी त्यांची हमरस्त्यावरून मिरवणूक काढली जात असे. कालीमातेसमोर पत्र्याची एक मोठी पेटी ठेवली होती. तीमध्ये लोक भाविकतेने तांदूळ, गहू अगर पैसे टाकतात. दलालने पेटीत एक चांदीचे नाणे फेकले आणि देवीसमोर तो ध्यानस्थ बसला. देवी आपल्याला काहीतरी कौल देईल अशी त्याची अपेक्षा होती. देवी लिंबू रंगाच्या एका व्याघ्रावर स्वार झाली होती. कुंकू आणि तेल माखून वाघाचे तोंड लाल केले होते. असे वाटावे की, ते तोंड माणसाच्या रक्ताने माखलेले आहे. देवीच्या अनेक हातांत विषारी तलवारी, भाले व खंजीर होते. तिने जणु काही युद्धसाहित्यगृहातली सर्वच शस्त्रे आपल्या हातांत धरली होती आणि हवेत फिरवीत होती. देवळासमोरून जाताना प्रत्येक भारतीय न चुकता देवीसमोर वाकून नमस्कार करतो. त्यावेळी आकाशातील अग्निबाणाप्रमाणे त्याचे डोळे चमकतात. दलालाने तीनदा वाकून नमस्कार केला. देवीचे लक्ष वेधण्याकरिता त्याने हाताने टाळयाही वाजवल्या. एलिदाचा आपल्या नोकराशी अनैतिक संबंध आहे हे त्यान

केव्हाच ओळखले होते, कारण मुलगा जसजसा मोठा होत होता तसतसा तो अधिक अधिक अलिमानसारखा दिसू लागला होता. अखेरीस आज एलिदाचा सूड घेण्याचे त्याने ठरविले होते.

आपल्या बायकोकरिता कोठल्या प्रकारचे मरण घडवून आणावे हे शोधण्याकरिता तो कालीमातेच्या देवळात आला होता. आतमध्ये एका मेजावर तांबड्या, हिरव्या, पिवळ्या बाहुल्यांच्या रांगा लागल्या होत्या. शरीरात भाला खुपसलेल्या माणसांच्या अनेक आकृत्या होत्या. हत्तीच्या पायांखाली तुडविले जाणारे इंग्रजी सैनिक दिसत होते. निरनिराळ्या प्रकारच्या व्याघ्रांवर कालीमाता आरूढ झाली होती. पाप केल्यास कोठल्या प्रकारचे मरण येईल, हे त्या अनेक आकृती दाखवीत होत्या. निळा वानरांचा देव तेथेच उभा होता आणि आपल्या विचकणाऱ्या दातांनी तो बघणाऱ्यास घाबरवीत होता. माणसे चाबकाच्या फटक्यांनी ठार मारली जात होती, वाघ त्यांना फाडून खात होते. त्या पिवळ्या व्याघ्रदेवतेचे डोळे काचेचे केले होते आणि ते भयानक दिसत होते. येथे मृत्यूची भयानकता सगळ्या आकृत्यांतून दृग्गोचर होत होती. सांडलेले रक्त दाखविण्याकरिता भरपूर गुलालाचा आणि शेंदराचा वापर करण्यात आला होता. शेंदूर आणि गुलालाचा वापर करण्यात कोठलीही काटकसर दिसत नव्हती.

दलाल गहन विचारात गढून गेला होता. तो त्या मृत्यूच्या आकृत्यांकडे बघत होता. प्रत्येक वेळी यातलीच आपल्याला एक भयंकर शिक्षा झालेली आहे, असे समजून त्याने त्याचे आपल्या शरीरावर परिणाम अनुभविले. परंतु मृत्यूच्या या सर्व भयंकर प्रकारांत आपल्या बायकोला साजेसा असा कोठलाही प्रकार त्याला आढळेना. छे, तो लाल मृत्यूहि कमीच; वाघाच्या तोंडातला पिवळा मृत्यूही तिला अपुरा पडला असता. छे, तीनशेसाठ मृत्यूंच्या प्रकारांतला एकहि मृत्यू दलालच्या बायकोला योग्य नव्हता.

देवीने दलालची घोर निराशा केली होती, म्हणून तो दुःखाने देवळाचे बाहेर पडण्याच्या बेतात होता. बघा ! त्याचे पागोटे दारावरच्या एका खिळ्यास अडकले आहे, ते सुटले आहे आणि त्यातून दलालने साऱ्या



आयुष्यात साठविलेले द्रव्य खाली घरंगळत आहे. सर्व नाणी इतस्ततः पडून त्यातील काही नाणी कालीमातेच्या पायापाशी येऊन पोचली.

दलालने डोळे उघडले आणि त्या नाण्यांच्या खणखणाटाचा आवाज त्याने आश्चर्याने ऐकला. जणू काही प्रत्येक नाणे त्याला काहीतरी सांगत होते.

त्याच्या डोक्यात चटकन एक कल्पना आली. मागे वळून तो देवीसमोर पुन्हा तीनदा वाकला आणि पैसे तसेच टाकून तो निघून गेला.

"कालीमातेने मला कौल दिला ! ! कालीमातेने तुला तपकिरी मृत्यूची शिक्षा दिली आहे, एलिदा. तुला दारिद्र्यात टाकून गेले पाहिजे."

रात्री, ज्यावेळी काटेरी कुंपणाप्रमाणे घरांचे माथ्यांवर तारे वर उगवलेले असतात, अशा वेळी दलाल त्या काळोख्या रात्रीत निघून गेला. त्याच्या बायकोस दुसरे दिवशी वाटले असते, माझा नवरा दारासमोर घेरी येऊन पडला, आणि इंग्रजी सैनिकांनी त्याला प्लेग झाला आहे असे समजून छावणीत नेले असणार.

डोक्यावर ताऱ्यांचा भार घेऊन दलाल सारखा चालत होता. उद्या महिन्याचा पहिला दिवस, उद्या शिवण्याच्या मशिनचा हप्ता भरलाच पाहिजे. उद्या पहिली तारीख, उद्या घराचे भाडे भरलेच पाहिजे. दरिद्री नोकर एलिदाला काय मदत करणार ? अलिमानला दुसरी नोकरी शोधली पाहिजे, आणि एलिदा, तिला मुलाला घेऊन भिक्षा मागावयाला घराबाहेर पडावे लागेल. दुसरे काय करणार ती ?

ताऱ्यांच्या दगडी भाराखाली दलालचा रात्रीचा प्रवास चालू होता. त्याला वाटत होते, की देवीचे सर्व हात आपल्याला फुटले आहेत. आणि त्या सर्व हातांनी तो सूड घेत होता. सूड !

त्या रात्री, जणू काही रात्रीच्या काळोखाइतकी आपल्याकडे विपुलता आहे, असे समजून दलाल अबूकडे निघाला होता. तेथे गेल्यावर तो जैन होणार होता. अबूचे डोंगरावर नग्न जैन राहतात आणि ते स्त्रीला कोठलेही अस्तित्व नाकारतात. ● ● ●








"अहो, मला कुणीतरी वाचवा हो !" आतून किंकाळी ऐकू आली. परंतु पुढे कोणीच जाईना. आपण त्या आगीत शिरावे आणि त्या तरुण विधवेस बाहेर काढावे असा प्रबळ विचार हरीच्या मनात येऊन गेला. परंतु त्या आगीच्या प्रचंड लोळांकडे पाहून त्याला पुढे पाऊल टाकण्याचे धैर्य होईना ......"

लहानग्या हरीला आगीत भस्मसात् होणाऱ्या तरुण विधवेला वाचविण्याचे धैर्य झाले नाही. कारण 'कृती' हा त्याचा स्वधर्मच नव्हता. त्याचा पिंड होता कलावंताचा, लेखकाचा. तो त्याला पूर्वायुष्यातील अपेक्षाभंगाच्या आणि दारुण निराशेच्या अनेक अनुभवांनंतर सापडला, म्हणूनच पूर्वार्धाच्या अखेरीस या कादंबरीच्या लेखकाने लिहिले—

"हरिभाऊंच्या वृत्ती अशा तऱ्हेने आता लेखनधर्मावरच स्थिर होत आल्या होत्या. लौकिक परीक्षेतील अपयशाचा शाप त्यांच्यातील सहृदयतेमुळे आता उःशाप ठरत होता. हरिभाऊंना हळूहळू आपला धर्म सापडू लागला होता."

स्वधर्माची ओळख पटल्यावर सुरू झालेल्या हरिभाऊंच्या जीवनप्रवासाची ही करुणोदात्त कहाणी या अंकात पूर्ण होत आहे.

—संपादक



# हरी नारायण

लेखक : भीमराव कुलकर्णी



: ८ :

मुंबईस जावयाचे म्हणजे हरिभाऊ दोन-तीन पुस्तके घेऊन गाडीत बसायचे, परंतु आज त्यांनी का कोण जाणे, एकही पुस्तक जवळ घेतले नव्हते. सबंध प्रवासात एका खिडकीशेजारी बसून ते शून्य दृष्टीने बाहेर कुठेतरी पाहात होते. बाहेर दुतर्फा पसरलेल्या वनराजीकडे व डोंगरदऱ्यांकडे पाहता पाहता त्यांच्या मनातील खेद एरव्ही कुठेतरी पळून जायचा; परंतु आज ती सृष्टिशोभा त्यांच्या मनाला सुखवू शकत नव्हती. वडिलांनी त्यांना मुंबईला तावडतोब बोलावले होते म्हणून हरिभाऊ अनिच्छेने निघाले होते.

स्टेशनवरून आपल्या वडिलांकडे एकदम न जाता हरिभाऊ अण्णासाहेबांकडे गेले.

" या तात्यासाहेब, बरेच दिवसांनी असं मधेच येणं केलंत ? "

" चहा टाकते ! " अण्णासाहेबांच्या बाईंनी त्यांचे स्वागत सुरू केले.

" नको ! "

" काहो ? बरं नाही वाटत का ? "

" सगळं ठीक आहे ! "

हरिभाऊंची मनःस्थिति बरोबर नाही, हे बाईंनी ताडले आणि तात्याने आपल्याशी चार शब्द बोलावे, आपली सुखदुःखे सांगावीत अशी प्रबळ इच्छा त्यांना झाली. त्यांच्या मनातून तात्याशी झालेले चारपाच वर्षांपूर्वीचे संवाद आठवले.

अण्णासाहेबांनी पहिल्या पत्नीच्या निधनानंतर बाईंना घरी आणले होते. बाईंचे सासर-माहेर अतिशय संपन्न होते, परंतु नवरा अकाली वारला आणि सासरच्या लोकांनी 'कुत्रा खाऊ नये' असे हाल करावयास सुरुवात केली. घरच्या जाचाला कंटाळून आत्महत्या करण्याच्या विचारात असताना अण्णासाहेबांनी त्यांना आश्रय दिला.

अण्णासाहेबांसारखे सावज हाती सापडले आहे तेव्हा त्याचा भरपूर फायदा उठवावा, अशी बाईंची सुरुवातीची भावना होती आणि आपण जणू काही अण्णांच्या इस्टेटीच्या मालकीणबाई याच तोऱ्यामध्ये त्या राहू लागल्या होत्या.

तात्या पुण्याला राहावयाला गेला परंतु अधूनमधून तारा करून अण्णांनी त्याला मुंबईला बोलवावे, असे नेहमी घडे. त्यावेळी पहिल्या दोन-चार भेटीत त्या तात्याशी काहीशा थंडपणानेच वागल्या, परंतु चार-पाच भेटींनंतर तात्याचा शांत व प्रेमळ स्वभाव पाहून त्यांना त्याच्याबद्दल आपुलकी वाटू लागली होती. कामाच्या दिवसात अण्णासाहेब कोर्टात गेले की त्यांना हे मोठे घर खायला येत असे. त्यावेळी तात्याने त्यांना आपण वाचलेल्या पुस्तकातील काही कथा सांगाव्या, यामुळे हळूहळू त्यांना तात्याविषयी प्रेम आणि आदर निर्माण झाला. पुण्यामधे आजूबाजूला घराघरातून चाललेली संसारचित्रे तात्या सांगू लागला तर बाई थक्क होऊन त्याचे बोलणे ऐकत बसत.

तात्याच्या समजुतीच्या चार शब्दांनी त्यांचा देवाधर्माकडे ओढा निर्माण झाला होता, आणि गेल्या पाचसहा वर्षांत अण्णासाहेबांच्या

हितसबंधाची त्या काळजी घेत होत्या. अण्णांनी पैसे उधळू नयेत, वेळच्या वेळी खावे, प्यावे याकडे त्या लक्ष देत होत्या आणि त्यामुळे अण्णा खूपच निवळले होते. कोर्टदरबारी त्याचा मान सारखा वाढत होता आणि कामे सारखी वाढून फुरसद मिळत नसली तरी पैशाचा अव्याहत ओघ त्यांच्याकडे लागलेला होता. रात्रीबेरात्री अण्णा मोठमोठी उत्तमोत्तम पुस्तके घेऊन वाचीत बसत. आपण 'मौजेच्या चार घटका' नावाची माला काढावी आणि त्यात जगातल्या उत्तमोत्तम ग्रंथांची मराठीत आकर्षक भाषांतरे द्यावीत, असे त्यांना वाटत होते. त्यावेळी त्यानी कालिदासाचे 'शाकुंतल' नाटक मराठीत आणले होते आणि इतर काही नाटकाची रूपातरे करण्याची मनीषा कार्यव्यापृततेमुळे प्रत्यक्षात येत नव्हती. आपल्या तात्याने मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात चालविलेली कामगिरी ते आस्थेने व कौतुकाने पाहात होते आणि 'मनोरजन' व 'पुणेवैभव'मधील त्याच्या कृतीनी तर त्यांच्या मनात त्याच्याबद्दल मोठयाच आकांक्षा निर्माण होत होत्या.

हरिभाऊनी नको म्हटले तरी बाईंनी मोठ्या आस्थेने त्याच्यासाठी चहा टाकला. चहा झाल्यावर सहज हरिभाऊचे लक्ष दिवाणखान्यातील नव्या कपाटांकडे गेले. उजव्या बाजूच्या कोपऱ्यात एका नव्या कोऱ्या कपाटात मोठमोठी पुस्तके ठेवलेली होती. आतापर्यंत हरिभाऊचे दिवाणखान्याकडे लक्ष नव्हते. आता एकदम दिवाणखान्याकडे लक्ष गेले आणि त्याना दिवाणखाना एकदम बदललेला दिसला. दिवाणखान्यातील पूर्वीची चित्रे नाहीशी झाली होती आणि मध्यभागी महादेवाचे भले थोरले तैलचित्र लक्ष वेधून घेत होते.

उठून हरिभाऊनी नवे थोरले कपाट उघडले तेव्हा बाई म्हणाल्या, "चारच दिवसांपूर्वी खूप मोठं पार्सल बाधून आणल यानी!"

हरिभाऊंनी कपाटे उघडून पाहिली, तेव्हा संस्कृतची पाश्चात्य राष्ट्रांतून, विशेषत: जर्मनीहून आणविलेली मोठमोठी पुस्तके होती ती! त्यांतले वेदावरचे एक पुस्तक अण्णासाहेबांनी नुकतेच वाचून सपविले असावे, कारण त्यावर निरनिराळ्या ठिकाणी तावडया पेन्सिलीने खुणा केल्या होत्या.

जर्मनीमध्ये प्रसिद्ध झालेली संस्कृतातली इतकी पुस्तके पाहून हरिभाऊंनाही कमालीचे आश्चर्य वाटले. आपल्या राष्ट्रातील ह्या प्राचीनतम वाङ्मयाचा जर्मन्यानी इतक्या आस्थेने अभ्यास करावा आणि आपल्याला त्याची कल्पनाही असू नये, याची त्याना खंत वाटली. हरिभाऊ ती पुस्तके वाचण्यात दग होते इतक्यात अण्णासाहेब बाहेरून आले.

"काय तात्या, केव्हा आलास?" त्यानी विचारले. उत्तराचीही वाट न पाहता झटपट कपडे बदलून ते आघोळीला गेले. बराच वेळ झाला. अण्णासाहेब येईनात, तेव्हा हरिभाऊंनी विचारले,

"काय करताहेत अण्णा?"

"ते देवपूजेला बसले आहेत." बाई म्हणाल्या.

हरिभाऊना ते ऐकून एक चागलासा धक्काच बसला. अण्णा आणि आणि देवपूजा? हरिभाऊ उठून आत गेले—

देवघर अतिशय आकर्षकरीत्या सजविले होते. उत्तम शिसवी लाकडाचे देवघर नंदादीपाच्या शात प्रकाशात चकाकत होते व अण्णासाहेब निश्चलतेने नाक धरून जप करीत होते. हरिभाऊ अण्णासाहेबाना निरखून पाहू लागले, तेव्हा अण्णांचे एकेकाळचे पिळदार शरीर अजूनही तेजस्वी दिसत होते. मिशांमुळे एरवी करडी दिसणारी त्याची नजर आता देवासमोर बसल्यानंतर अतिशय शात व सौम्य दिसत होती.

थोडया वेळाने देवपूजा आटोपून अण्णा उठले व म्हणाले, "हं चला तात्यासाहेब!"

अण्णांनी वरील उद्‌गार हसतच उच्चारले असले तरी त्याचा रोख काहीसा निराळा भासल्यामुळे हरिभाऊ त्यांच्या चेहऱ्याकडे पाहातच राहिले.

"अरे, नानानी तिकडेच जेवायला बोलाविलं आहे. लग्न झाल्यापासून वहिनीकडे जेवण्याचे काही फारसे प्रसंग आले नाहीत. तुझ्या नव्या आईच्या हातच तुलाही फार वेळ जेवायला मिळालं नसेल, होय ना?"

"हो, नाना बदलीमुळे बाहेरगावीच नेहमी असतात; त्यामुळे..."

"हं, आलं लक्षात; चला!" अण्णा हसतच तयार झाले, आणि हरिभाऊ मुकाटयाने त्याच्या मागोमाग चालू लागले.

जेवणें आटोपली. पान खाण्यासाठी नानासाहेब, अण्णांना व हरिभाऊंना घेऊन बैठकीत आले. हरिभाऊंना वातावरण चमत्कारिक वाटत होते. ज्यासाठी वडिलांनी तातडीने बोलावले त्याचा अजून स्फोट होत नव्हता.

इतक्यात नानासाहेबानी पानाच्या शिरा काढता काढता एकदम मुद्दयालाचा हात घातला.

"काय तात्या, शेवटी कॉलेजशिक्षणाचा निकाल लागला ना?" हरिभाऊंनी यावेळेस बोलण्यात शहाणपणा नाही हे ताडले.

आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या असताही त्याने त्याचा उपयोग करून घेतला नाही, याबद्दल एकीकडे दु:ख व एकीकडे सताप त्यांच्या वडिलाच्या मनी दाटून आला होता.

"आमचं कपाळ फुटकं म्हणून आम्ही शाळेत जाऊ लागलो होतो, त्यावेळी आमचे वडील आम्हाला सोडून गेले. आमची चिमामावशी मोठी कर्तबगार स्त्री. ती एकटी पुण्याला होती. तिनं आम्हांला पुण्याला नेलं, परंतु तिची आबाळ आम्हाला पाहावेना, म्हणून आम्ही शाळा सोडून इंदूरसारख्या दूर ठिकाणी महिना दहा रुपयांवर अठरा अठरा तास मानेवर खडा ठेवून खर्डेघाशी केली. ह्या अण्णाला फीसाठी पैसे हवेत म्हणून पोस्टात पोस्टमनची नोकरी स्वीकारून आम्ही इथपर्यंत कष्टानं चढत आलो. आमच्या घराण्यात आमचा वंश चालविणारे तुम्ही एकटेच चिरंजीव! 'मधली स्थिति' नावाची कादंबरी तुम्ही लिहिली, हे गाडीत एका प्रवाशान आम्हांला सागितल तेव्हा आम्हांला देखील आनद झाला, परंतु तीन वर्षं बसून कॉलेजची साधी पहिल्या वर्षाची परीक्षासुद्धा तू पास होऊ शकला नाहीस!"

हरिभाऊनी तोंडातून अक्षर काढले नाही. एकटक ते जमिनीकडे पाहात होते. "मग पुढे काय करायचं ठरविल आहे!" नानासाहेबांनी उसळून विचारले.

रागाने विचारलेल्या या प्रश्नास तडकाफडकी उत्तर देणे हरिभाऊना कठीणच गेले. कारण तिसऱ्यादा परीक्षा नापास झाल्यानंतर त्याचे विचार आत्महत्येपर्यंत गेले होते, परंतु आपल्याला मोठा लेखक व्हायचे आहे याच एका महत्त्वाकांक्षेने त्याना सावरले होते. कोणाची नोकरी करू नये, खूप लिहावे-वाचावे आणि 'लेखन' हाच आपला

व्यवसाय करावा, अशी त्यांच्या मनाची पक्की धारणा झाली होती आणि त्यासाठी काही सबळ कारणही होते. 'मनोरंजन' मासिकामध्ये त्यांनी लक्ष घातल्यावर 'मनोरंजन' चे वर्गणीदार वाढून ते मासिक फारसे फायद्यात नसले तरी तोटचातही राहिले नव्हते. त्याच्या बरोबरच्या चारपाच जणानी मिळून एक पुस्तके प्रकाशित करणारी कंपनी स्थापन करून तिच्यातर्फे 'आजकालच्या गोष्टी–गोष्ट पहिली' हे पुस्तक, म्हणजे आपली पहिली 'मधली स्थिति' ही कादंबरी प्रसिद्ध केली होती. केवळ पाच-सहा महिन्यात ते पुस्तक चांगले खपून त्याच्या हजार प्रती पार संपल्या होत्या.

यानतर हरिभाऊ म्हणाले होते, "मला नोकरी करायची नाही ! परंतु आम्ही आमचं पोट भरू ! " हरिभाऊ कसेबसे अदबीने बोलले.

"सर्वांचीच भरली पाहिजेत, आपलच भरून कसं चालेल ?" नानासाहेबानी आणखीनच रागाने विचारले. आता मात्र अण्णासाहेब मध्ये पडले

"नाना, या प्रश्नाची चर्चा आता नको. मी पाहीन पुढे काय करायच ते ! हरी, तू जा बघू आत...! "

हरिभाऊची तेथून तात्पुरती सुटका झाली. त्या दिवशी सध्याकाळी अण्णा हरीला एकटा गाठून म्हणाले—

"हरी, तुला माझ्या अतःकरणात काय चालल आहे, हे कसं सांगू रे ! तू वकील होऊन इग्लंडला जाऊन बॅरिस्टर होऊन यावस असं मला फार वाटत होत, परंतु ते आता सर्व मृगजळ ठरलं. आता तू एखादी चांगली नोकरी करावी म्हटलंस तर बी. ए झाल्याखेरीज तुला कोणी विचारणार नाही. नाना लवकरच रिटायर होत असले तरी त्यामुळे तू एखादी हलकी नोकरी पत्करावी हे मला पसत नाही. हरी, आमच्या सगळचाच्या आशा तुझ्यावर खिळून आहेत, आणि तूच असा पदोपदी अडखळायला लागलास तर आम्हा मोठचा माणसाना कसं वाटेल, याचा विचार करावयाला नको का ?"

"अण्णा, मला हे सारे समजत का नाही ? मला काय नापास होण्याची हौस आहे काय ? पण नशीबाचे फासे काही केल्या सरळ पडत नाहीत त्याला मी तरी काय करू ? "

"हे बघ तात्या, तुझ्या 'आजकालच्या गोष्टी' मी वाचल्या आहेत आणि त्या मला अतिशय आवडल्या असं मी अनेकाकडे बोलूनही दाखविल आहे. मात्र निव्वळ लेखनावर चार पैसे मिळतील, अशी काही आज आपल्याकडे परिस्थिती नाही. तेव्हा तू उत्तम लेखक होशील यात मला काही सदेह नाही. परंतु तू नुसता लेखक होऊ नयेस तर त्याला जोडधदा म्हणून तू प्रकाशकही हो ! तुझ्या प्रकाशनासाठी सुरुवातीला मी पैसा पुरवीन. परंतु त्यासाठी तुला छपाईच्या आणि इतर बाबी नीट शिकून घेतल्या पाहिजेत."

'मनोरजना' साठी प्रुफे तपासणे, आकर्षक छपाईची व्यवस्था करणे, याचा अनुभव हरिभाऊना होताच, परंतु पुन्हा एखाद्या प्रेसमधे जाऊन छपाईचा व्यवसाय शिकण्याची कल्पना त्यांना मुळीच रुचली नाही. परंतु आपले चुलते इतक्या आस्थेने एखादी गोष्ट सुचवितात त्याला नकार देणे चागले नव्हे, या विचाराने ते त्या कामास तयार झाले.

प्रेसचे काम शिकण्यासाठी अण्णासाहेबानी व्यवस्था केल्याप्रमाणे हरिभाऊ 'जगदीश्वर प्रेस' मध्ये जाऊ लागले.

चार पाच दिवस खिळे उलटे सुलटे करूनही हातांना त्याची सवय काही होईना. प्रेसमध्ये बहुतेक खेडवळ माणसे होती. त्यानी जुळविलेली अक्षरे घेऊन कोणी म्हणावे, 'अहो आपटे, तुम्हाला साधी ओळीनमेंट येत नाही म्हणजे कमाल आहे ! "

"ओळीनमेंट ? म्हणजे ?"

"अहो ओळीनमेंट म्हणजे 'एका ओळीत घ्या'."

"अहो ओळीनमेंट नव्हे, अलाइनमेंट म्हणा !"

"तेच ते हो ! ती अक्षरे नीट जुळवा आधी ! "

हे बोलणे कधी मालकाच्या कानावर गेले की ते सागत, "आपटे, ह्या लोकाबरोबर वाद घालू नका."

एकदरीत प्रेसच्या कामामध्ये लक्ष घालावे असे त्याना उत्सुकतेने कधीच वाटले नाही. एखादे पुस्तक घेऊन ते वाचीत बसावे, किंवा प्रेसमधून बाहेर पडून ग्रंथसंग्रहालयात जाऊन बसावे असा क्रम चाले. 'मोठचा घरचा मुलगा' म्हणून मालकही त्यांना विशेष विचारीत नसत.

सहा महिन्यांनी अण्णासाहेब एकदा प्रेसमध्ये गेले आणि त्यानी विचारले,

"काय म्हणतोय तुमचा नवा विद्यार्थी ?"

मालक नुसतेच हसले.

"का, काही तयार झाला आहे का ?"

"हा, झालाय थोडासा !"

"थोडासा, म्हणजे ?"

"म्हणजे तुम्ही प्रत्यक्षच पाहा."

अण्णासाहेबाच्या लक्षात आले की हरीचे यातही मन नाही !

प्रेसमधून घरी आल्यानंतर हरिभाऊंनी काशीताईंना पत्र लिहिले. पत्र सपवताना त्यांनी उद्विग्नतेन लिहिले,—

'माझे व परीक्षेचे अगदीच वाकडे दिसते आहे. मी आता अगदीच कुचकामाचा ठरलो आहे.'

अण्णासाहेबांना रात्री त्यानी सागितले,

"मी उद्याच पुण्याला जाईन म्हणतोय !"

"होय रे, शेवटी ती गोष्ट पक्की आहेच. तू इकडे आलास म्हणून तिकडे रोज तुझी आजी आणि चिमामावशी तुझ्या आठवणी काढतात. त्या दोघीनी लाडानं तुला फार बिघडवून टाकल आहे. म्हणून मी तुला मुबईला ठेवून घेणार होतो, परंतु तुझं तर इथं कशातच लक्ष लागत नाही. तात्या, तुझ्या आईला व काकूला मरतेसमयी तुझा मी प्रतिपाळ करीन, असं आश्वासन दिलं होत, परंतु मी तुला आता कशा रीतीनं मदत करावी, हेच समजेनास झाल आहे."

"अण्णा, खरंच मला सध्या काही सुचत नाही. पुण्यात गेल्यावर मी पत्र लिहीन."

"अरे पण मी म्हणतो, तू एखादी ग्रथप्रकाशनाची कंपनी का नाही काढत ? मी त्यासाठी दहा हजार रुपये एका रकमेनं द्यायला तयार आहे."

"नको. माझ्या हातून ते चागल्या रीतीनं होणार नाही."

"अरे मी तुझ्या पाठीमाग उभा असताना तुला भीती का वाटावी ?"

"अण्णा, प्रकाशनव्यवसाय म्हणजे त्यात जबाबदारी ही आलीच. ती माझ्याच्यान पेलवणार नाही. उलट घद्यात बूडच येईल !"



**तुला कशा रीतीनं मदत करावी हेच समजेनासं झालं आहे.**

" अरे मग आयुष्यात एखादी तरी जबाबदारी अंगावर घेऊन ती पेलून दाखवावी, असा पुरुषार्थाचा एखादाही विचार तुझ्या मनात येऊ नये ? मी लांबलांबच्या नातेवाईकांना मदत केली परंतु एकानंही यश दिलं नाही. वाटलं होतं तू देशील ! माझ्या पैशाला कसलं यशच नाही काय ? " अण्णासाहेब खिन्नतेने म्हणत होते.

एरवी रात्री दीडदोन वाजेपर्यंत जागत बसून वेदोपनिषदे चाळणारे अण्णासाहेब अस्वस्थ चित्ताने त्या दिवशी तळमळत अंथरुणावर पडले.

अण्णासाहेबांना निराश करून हरिभाऊ पुण्यास आले खरे, परंतु हरिभाऊंच्या कर्तृत्वावरचा चुलत्याचा विश्वास अजून संपला नव्हता.

पुण्यात 'आनंदाश्रम' नावाची संस्था स्थापन करावी, दुर्मिळ अशा हस्तलिखितांचा संग्रह करावा, त्यांच्या प्रकाशनाची व्यवस्था करावी, सर्वसंगपरित्याग करून जीवन कंठणाऱ्या संन्याशांना तेथे आश्रय द्यावा व सच्चिदानंदांचे देवालय बांधून तेथेच काल कंठावा, या हेतूने अण्णासाहेबांनी आपल्या स्नेह्यामार्फत मोरोबादादाच्या वखळीतील जागा पाच हजार रुपयांस खरेदी करून टाकली. या योजनेबद्दलचे पत्रक आणि गोपाळराव आगरकरांनी अण्णासाहेबांच्या गौरवाचा लिहिलेला 'केसरी' तील खास अग्रलेख वाचून हरिभाऊंच्या अन्तःकरणात पुनः खळबळ माजली. आपण प्रकाशनव्यवसायाला नकार दिला म्हणून आपल्याला दूर ठेवून अण्णासाहेबांनी ही संस्था काढण्याचे ठरवले आहे, त्या वास्तूच्या उभारणीची जबाबदारी त्यांनी मुद्दामच आपल्यावर टाकली नाही अशी हरिभाऊंची समजूत झाली.

निराशेच्या अंधाऱ्या मनोवस्थेत चाचपडत असताना हरिभाऊंचा स्वतःचा अहंकार, अभिमान पदोपदी त्यांचं सांत्वन करीत होता. त्यांच्या लेखनकलेच्या सुप्त शक्तीचे तेज त्यांच्या निराश मनात कुठेतरी खोल दडलेले त्यांना प्रतीत होत होते आणि असल्या परिस्थितीत तोच त्यांना दिलासा वाटत होता.

कायम व्यवसायनिश्चिती होईपर्यंत काहीतरी करणे हरिभाऊंना आवश्यक होते. हरिभाऊंनी नूतन मराठी विद्यालयात शिक्षकाची नोकरी पत्करली. अर्थात या व्यवसायातही एक प्रश्न त्यांना सतत अस्वस्थ करीत असे—जो चांगला विद्यार्थी असू शकत नाही तो चांगला शिक्षक कसा असू शकेल ? नव्हे, नव्हे, त्याने शिक्षक होणे हा विद्यार्थ्यांवर अन्याय आहे. त्यांचे मन असे बंड करून उठे परंतु मन मारून ते शिक्षकाची नोकरी करू लागले.

वादळात सापडलेल्या दिशाहीन तारूप्रमाणे हरिभाऊंची अवस्था झाली. घरी-दारी, पुण्यामध्ये अण्णासाहेबांचे कौतुक होत होते. बगूताई व चिमामावशी यांना तर परमावधीचा आनंद झाला होता.

" अग, माझ्या अण्णाला मी चांगला ओळखते. त्याच्या हातून वेडंवाकडं काही घडायचं नाही. एवढे हजारो रुपये मिळविले त्यानं पण सारा पैसा देवधर्मासाठी खर्चायची दानत आहे त्याच्याजवळ. अग असा पैसा मिळविणं आणि अशा रीतीनं खर्चणं याला तसंच पूर्वपुण्य लागतं. " बगूताई सांगत होत्या.

सोवळे–ओवळे आणि देवधर्म डोळ्यांत तेल घालून जपणाऱ्या चिमामावशीला तर स्वर्ग दोन बोटे उरला. त्यातच अण्णासाहेब पुण्याला आले की, चिमामावशीचा सल्ला घेऊ लागले, त्यामुळे त्यांना तर अण्णांना कुठे ठेवू आणि कुठे नको असे होऊन गेले.

पुढच्याच आठवड्यात अण्णासाहेब पुण्याला आले. हळूहळू त्यांचा एकंदर पोषाख, विचारसरणी, आचारविचार यांमध्ये कमालीचा फरक पडू लागला होता. त्यांच्याकडे पाहिल्यावर आणि त्यांच्याशी चार शब्द बोलल्यावर हे कोणीतरी कडवे धर्मनिष्ठ आहेत, असे वाटावे.

अण्णासाहेबांमधला हा पापभीरू बदल आता कुठल्या थराला गेला आहे याची प्रचीती हरिभाऊंना आली.

अण्णासाहेब कद नेसून त्या दिवशी जेवायवास बसले होते. शेजारी हरिभाऊ मुकाट्याने बसून चार घास खाण्याची पराकाष्ठा करीत होते. कमी दिसत असल्यामुळे जवळच पाटावर बगूताई हातामध्ये जपमाळ घेऊन बसलेल्या होत्या आणि चिमामावशी नाना तऱ्हेचे प्रश्न विचारीत अण्णासाहेबांना काय हवे नको ते बघत होत्या.

" काय अण्णा, कुठपर्यंत आला तुझा आश्रम ? " मध्येच त्यांनी विचारले.

" जोरात पुरा होतोय. अग मावशी, पण एक अडचण उभी राहिलीय ? "

" कसली बाबा ?"

" अग वखळीत पिंपळ आहे, त्याचं काय करायचं हा प्रश्न उभा राहिलाय ! "

" बाई, बाई, नको रे तोडूस बाबा कोणा चांगल्या शहाण्याला विचारल्याखेरीज ! "

" चिमा, काही तरीच बाई तुझं ! अण्णासारखा शहाणा माणूस असताना आणखी दुसऱ्या शहाण्याची गरज काय ?" बगूताई मध्येच म्हणाल्या."

" अग ताई, तसं नाही म्हणत मी. मुहूर्त आणि पंचांग पाहावं लागतं. अंगणातला पिंपळ तोडायचा नसतो. घराण्याचा निर्वंश होतो म्हणतात. "

" अगबाई, हे नव्हतं मला बरीक ठाऊक ! मग विचार बाबा कुठल्या तरी शहाण्याला ! "

" अग ब्रह्मवृंदांना बोलावून विचारून पाहिलं, पण प्रत्येकजण झाड तोडू नका म्हणतोय ! "

"मग नको रे बाबा त्याला हात लावूस ! "

"अग, हात न लावून कस चालेल ! त्याखेरीज इमारत पुरी होणार नाही. तेव्हा मोठा प्रश्न पडलाय बघ ! "

"मग तू असं का करीनास ?"

"कसं म्हणत्येस ?"

"जवळच आळंदीला स्वामी नरसिंहसरस्वती राहतात. त्याना जाऊन भेट !"

पाच वर्षांपूर्वी चिमामावशी नेमाने आळदीस जाऊ लागल्या व आल्यागेल्याना स्वामीचे माहात्म्य ऐकवू लागल्या, त्यावेळी अण्णानी त्याची भरपूर थट्टा करून चिमामावशीचा रोष ओढवून घेतला होता, परंतु आता मात्र अण्णा जेवण झाल्यावर स्वामीकडे जाण्यासाठी लगोलग जाण्यास तयार झाले. हरिभाऊंनाही बरोबर येण्याचा त्यांनी आग्रह धरला.

* * *

घोडागाडीत बसून भर दुपारच्या प्रहरी चुलते-पुतणे आळदीला निघाले.

आळंदीला स्वामीचा एकंदर थाट औरच होता. चारी बाजूनी भक्त येत असत आणि स्वामीच्या पायांशी पैसा ओतीत. अगावरची कषायवस्त्रे देखील एखाद्या सम्राटाला शोभतील अशी होती आणि स्वामीचे एकदर व्यक्तिमत्त्व मोठे प्रभावी होते.

अण्णासाहेबानी मोठ्या भक्तिभावाने स्वामीच्या चरणकमलावर मस्तक ठेवून त्यांचा आशीर्वाद घेतला व त्याचे कुशल विचारले.

"आमचं इथ प्रस्थान बसल्यापासून आमच्यामुळे ज्ञानेशाच प्रस्थ वाढत आहे. " स्वामी म्हणाले. जवळच बसलेल्या हरिभाऊनी एकदम चमकून त्याच्याकडे पाहिले.

स्वामीनी बखळीतील पिंपळ तोडून त्याची लाकडे अग्निहोत्र्याना देण्यास सांगितले व नतर इमारत बाधण्यास अनुज्ञा दिली. इमारत-बाधणीमधील अडचण अशा रीतीने दूर होताच आनदाश्रमाची इमारत झपाट्याने तयार होऊ लागली. हरिभाऊचे त्यात फारसे लक्ष नव्हतेच. कारण देखरेखीची सपूर्ण व्यवस्था अण्णासाहेबानी आपले परममित्र दादासाहेब कानिटकर याच्यावर सोपविली होती. आणि नाहीतरी आनदाश्रमाची जबाबदारी आपण स्वीकारावी हा विचार हरिभाऊंच्या मनात कधीच नव्हता.

भरपूर लिहावे ह्या वेडाव्यतिरिक्त अन्य वेड त्याना नव्हते. शिक्षकाचा पेशा संभाळून लिहिणे म्हणजे काठावर बसून पोहोण्याचे धडे घेण्याइतके कठीण, असे त्याच्या मनाने घेतले. हे वेड आणि व्यवसाय ह्याचा सांधा बसेल असा एकच मार्ग त्याना दिसू लागला—

साप्ताहिक काढायचे ! स्वत:चे स्वतत्र साप्ताहिक. राजकारण नको—धर्मकारण नको—वाचकांची करमणूक करता करता समाजातली दु:खे त्याना जाणवतील असे साप्ताहिक ! ज्या कर्मासाठी आपला जन्म आहे असे माणसाला वाटते तेच त्याने केले पाहिजे. हरिभाऊनी निश्चय केला. साप्ताहिक काढायचे. नाव— 'करमणूक !'

आपल्या निकटवर्ती मित्राजवळ ही कल्पना हरिभाऊनी प्रथम उच्चारली. दामुअण्णा कुलकर्णी यानी तात्काल व्यवस्थापकाची जबाबदारी घेण्याचे मान्य केले.

हरिभाऊनी रात्र रात्र विचार करून सबंध योजना कागदावर उतरविली होती. साप्ताहिकात क्रमश: कादबरी, दोन तीन अंकांत संपेल अशी दीर्घ कथा, नाटके, प्रहसने, चालू विषयावर आकर्षक व विनोदी टीका, मनोरजक चुटके, विनोदमहदाख्यायिका व नवीन कविता इत्यादि मजकूर द्यावा.

"खर्चाचा अदाज़ काढा." कुलकर्णी म्हणाले.

"तोही मी काढून ठेवलाय." हरिभाऊ म्हणाले, "दर आठवड्यास छपाई वीस रुपये, कागद सहा रुपये, इतर व वाटणावळ चार रुपये. अशा रीतीनं आठवड्याचा तीस रुपये व वर्षाभराचा १५०० रुपये खर्च येईल."

"पण प्रती किती ?"

"दोन हजार. एक हजार काढल्यास बाराशे रुपये पडतील."

"पहिल्या साली साधारण किती वर्गणीदार होतील, असा तुमचा अदाज आहे ?"

"एक हजार. परतु तेवढ्यानं खर्च भागणार नाही. दोन हजार वर्गणीदार झाल्यास पेपर फायद्यात चालेल. कारण त्यामुळे जाहिरातीच्या उत्पन्नातून संपादकाला काही पगार देता येईल ! "

"किती ?"

"मुख्य एडिटरला रु. चाळीस पगार, दुसऱ्याचा रु. तीस, तिसऱ्याचा पंधरा. वर्गणीदार आणखी वाढले तर लेखकालासुद्धा पाचसहा रुपये मोबदला द्यावा, म्हणजे त्यास उत्तेजन मिळून पेपर चागला चालेल."

"हो, पण पेपरचा आकार, त्याची वर्गणी... "

"आकार 'केसरी' एवढा, वर्गणी फक्त एक रुपया. आतल्या दोन्ही पानावर एकही जाहिरात शिरू द्यावयाची नाही. जाहिराती काय त्या पहिल्या व चौथ्या पानावर ! "

प्रकाशक "कुलकर्णी आणि मंडळी" या नामकरणाने हरिभाऊनी कामाचा श्रीगणेशा केला. कुलकर्णी कधी साशक होत, एवढे हरिभाऊच्या लक्षात आले. त्यावर त्यानी आत्मविश्वासाने त्याना सागितले,

"या सर्व गोष्टी कदाचित कल्पनेचे खेळ आहेत, असं तुम्हांस वाटेल. परंतु त्यासबंधी विचार करकरून माझ्या मनाची पक्की खात्री झाली की, या सर्व गोष्टी शक्य आहेत. इतकंच नव्हे तर माझ्या म्हणण्याचा विचार करून जर प्रथम दोन तीव वर्षं नफ्याकडे लक्ष न देता कपनी वरीलप्रमाणे करील, तर या सर्व गोष्टी अनुभवास आणून दिल्याखेरीज मी कधी राहणार नाही. ग्रॅज्युएट लोक जे आपल्या डिग्रीच्या जोरावर करतील, ते आमच्यासारख्यानी काही मेहनत केल्यानही होणार नाही, असं मला वाटत नाही."

"मग ?"

"मग काय, आज दसरा आहे. आजपासून दोन महिन्यानी म्हणजे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापासून दर शनिवारी पत्र चालू करायचं. डिसेंबरच्या पहिल्या 'केसरी'त एक लहानशी जाहिरात देऊ. पत्राच्या पहिल्याच अकाच्या १५–२० हजार प्रती प्रसारासाठी फुकट वाटून टाकू. पधरा हजार प्रती म्हणजे जवळ जवळ लाख लोक ते वाचतील, अस जाहिरातदाराना पटवून देऊ व जाहिरातीचे दरही कमी ठेवू म्हणजे जाहिराती अतोनात येतील."

डिसेबरच्या 'केसरी'मध्ये 'करमणूक'ची छोटी जाहिरात

फडकली. ती वाचताच अण्णासाहेबांना हरिभाऊंचा अतिशय संताप आला. अण्णासाहेब प्रकाशन कंपनी काढण्यासाठी हवी तेवढी रक्कम द्यावयास तयार असता हरिभाऊनी आपल्याला न विचारता असे करावे, यामुळे हा संताप होता. त्या संतापाच्या भरातच त्यानी पत्र पाठवले—

" तू जर माझी कोणतीच गोष्ट ऐकत नाहीस, तर तुला मजकडून कपर्दिकसुद्धा मिळणार नाही. "

हरिभाऊंना आपल्या नव्या योजनेबद्दल मोठा आत्मविश्वास असल्यामुळे आणि आनंदाश्रमाच्या उद्योगात त्यांना रस नसल्यामुळे त्यांनी चुलत्याना सरळपणे कळवले—

मी तुमच्या पैशाची केव्हाच आशा केली नाही. तुमचा पैसा स्वकष्टार्जित आहे. तुम्ही त्याचे मालक आहात. त्यावर माझा डोळा स्वप्नातसुद्धा नव्हता, आतासुद्धा नाही व पुढे कधीही असणार नाही. "

हरिभाऊच्या या उत्तराने अण्णासाहेबाना अतिशय वाईट वाटले. आपला हरि नूतन मराठीमध्ये शिकविण्याचे काम करतो, कँपमध्ये एका पाद्रयाकडे फ्रेंच शिकतो, कानिटकर मंडळीच्या ' मनोरंजन ' मासिकाची सर्व व्यवस्था बघतो, अशा बातम्या त्याच्या कानावर येतच असत. आता ही ' करमणूक ' पत्राची नवी जबाबदारी तो घेणार ! त्यांना हे कळत नव्हते, हरीत कर्तृत्व नाही म्हणावे तर हे सर्व उद्योग तो करतो कसा ? आहे म्हणावे तर आपल्या पैशाचे त्याला एवढे वावडे का ? त्याच्या हे लक्षात येत नव्हते की वृक्षाच्या छायेत काही महावृक्ष निर्माण होऊ शकत नाहीत !

## : ९ :

" अण्णा, आजकाल देवळा-रावळातून—आणि कथा—कीर्तनातूनसुद्धा बायका उठल्यासुटल्या ती रखमा आणि दादाजी याच्याबद्दल हव ते बोलत असतात ! आहे तरी काय हे प्रकरण बाबा ! "

" अग, ती रखमा आहेना, तिचं त्या दादाजीशी लहानपणी लग्न लागलं, परंतु इतके दिवस ती आपल्या दुसऱ्या बापाकडे राहत होती, आता नवऱ्यान तिच्याशी नांदण्याची इच्छा दर्शविली आहे. "

" मग त्यात वावग काय झाल ? पण हा दुसरा बाप म्हणजे काय रे ? "

" अग, तिच्या आईन पहिला नवरा मेल्यानंतर दुसऱ्या एका चांगल्या डॉक्टराशी पुनर्विवाह केला ! "

" काय बाई तरी एकेक ! आजकाल बायकांनी असा ताळतंत्र सोडलाय ! आग लागो तिच्या तोडाला ! निलाजरी मेली—! "

" बरं मग कोडतात का गेली ती ? " बगूताईंनी विचारले.

" अग, आता शाळेत जाऊन ती सुशिक्षित झाली आहे, त्यामुळे तिला आता नवऱ्याकडे जायला लाज वाटते ! "

" हा मेल्या त्या शिक्षणाचा परिणाम बर ! माझी मुलगी असती तर तिला नवऱ्याकडे नेऊन आदळली असती ! "

इतका वेळ शातपणे जेवत असलेल्या हरिभाऊंना आता हे एकवेना.

" अगं पण मावशी, तिचा हा नवरा दारुड्या आहे, आणि त्याचा सगळा डोळा तिच्या इस्टेटीवर आहे. रखमाबाईसारख्या सुशिक्षित स्त्रीन आयुष्यभर या दारुड्याशी ससार करावा, असं तुला वाटतं काय ? "

" वाटतं काय म्हणजे काय ? पती हा कितीही वाईट असला तरी तो परमेश्वर असतो बाबा ! "

" काहीतरी खुळचट कल्पना ! " हरिभाऊ त्वेषात बोलून गेले.

अण्णांचा हात जेवताना तसाच अडला. त्यानी हात खाली घेत म्हटले, " अगदी रानडे—भांडारकर अगात संचारल्यासारखा बोलायला लागलास तू. अरे ' मराठा ' मध्ये तो दादाजी दारुडा नाही, आणि सुधारकानी त्याला विनाकारण बदनाम करण्याचा प्रयत्न चालविला आहे, याबद्दलची पत्र वाचलीस ना तू ? "

" अण्णा, ते बळवतराव ' मराठ्या 'त छापणार आणि तुम्ही वाचणार ! चार वर्षांपूर्वी जर अशी घटना घडती तर तुम्ही निश्चितपणे त्याची बाजू घेतली नसती ! "

आनंदाश्रमाच्या कामात हरिभाऊ लक्ष घालीत नाहीत हा अण्णासाहेबाचा राग होताच. त्यात त्यांच्या पैशाची आपल्याला मुळीच गरज नाही असे हरिभाऊनी कळवल्यामुळे तर त्यांचे मन पराकाष्ठेचे दुखावले होते. घरात मात्र चिमामावशी व बगुताई अण्णाची तोंड फाटेपर्यंत स्तुती करीत असत. एकदा मने दुखावली की साध्या विषयात माणसे किरकिर करू लागतात. तसाच अनुभव हरिभाऊना येत गेला. त्यातच चुलत्यामध्ये घडून आलेला बदलही अस्वस्थ करीत होता. दसऱ्यापूर्वी काही महिने अगोदर आगरकरानी ' केसरी ' सोडल्याची वार्ता साऱ्या पुण्यात हां हा म्हणता पसरली. आगरकर बाहेर पडले. त्यांनी दसऱ्यापासून ' सुधारक ' नावाचे पत्र काढण्याची लगेच जाहीर घोषणाही केली.

दसऱ्याच्या दिवशी आगरकराच्या सुधारकाचा अक मोठ्या दिमाखाने बाहेर पडला. " इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार " या आपल्या ब्रीदवाक्यानेच आगरकरांनी सगळ्या तरुणांची अंतःकरणे काबीज केली होती.

त्या उलट एका छोट्याशा खोलीत आपल्या काही मित्राबरोबर ' करमणूक ' पत्र सुरू करण्याच्या कल्पना मनी खेळवीत हरिभाऊ बसले होते. प्रत्येकी शंभर रुपयाचे तीस सभासद होतील आणि हजार वर्गणीदारांकडून मनिऑर्डरी येतील ही त्याची कल्पना, पाण्याच्या बुडबुड्यासारखी ठरली होती.

त्याच दिवशी अण्णा मुंबईहून पुण्यास आले होते. आल्यापासून ते नानाप्रकारच्या गोष्टी करण्यात दग होते.

दुपारी बारा—दीडच्या सुमारास ते भोजनासाठी घरी आले तेव्हा हरिभाऊ नुकतेच बाहेरून येऊन त्यांची वाट पाहात होते,

" अरे हरी, गेला होतास कुठं ? किती शोधायच तुला ? "

" कुठं नाही, इथंच होतो. "

" अरे इथं म्हणजे कुठं ? आनंदाश्रमाकडे यायच नाही का ? दसऱ्याच्या मुहूर्तावर आश्रमात छपाईचं यत्र बसवायचं म्हणून मी इतकी धडपड केली, तुझ्या हातून त्याची पूजा करावी म्हणून बारापर्यंत वाट पाहिली पण तू कुठं पाताळात जाऊन बसला होतास कुणास ठाऊक ? "

" हरी, अस का बरं करायचं ते ? अण्णासाहेबांनी तुझ्यासाठी एवढं मोठं कार्य उभ करावं आणि तू अशी टाळाटाळ करावी, हे तुला शोभत का ? " मावशी म्हणाली.

" मावशी, टाळाटाळ कुठे केली ? काही मित्राबरोबर मी चर्चा करण्यात गुतलो होतो ! "

"त्या 'करमणूक' पत्रासंबंधीच ना? मावशी, या तुझ्या नातवाला आयुष्यात काही ददात पडू नये म्हणून मी रात्रीचा दिवस करतोय! संन्यास घेऊन कुठेतरी निघून जावं म्हणून हज्जारदा मनात आलं, परंतु आनंदाश्रमासाठी मन मारलं. लाख दीडलाखाची दौलत उभी करण्याची ताकद माझ्यात आहे आणि हा हरी स्वतःचं वर्तमानपत्र काढण्यासाठी चार पैसे भीक मागत हिंडतोय! बरं, मी त्याला हवा तेवढा पैसा द्यायला तयार असताना असे भिकेचे डोहाळे सुचणं बरं का?"

"हरी, हा कसला रे वेडेपणा...?"

"पण अण्णा, मी भीक मागतोय असं तुम्हांला कोणी सांगितलं? मी त्या लोकांना आमच्या व्यवसायात भागीदार व्हायला सांगतोय!"

"अरे पण का? तुला त्यासाठी तीन हजार रुपये हवे आहेत ना? मी तीस हजार रुपये देतो! आनंदाश्रम कुणासाठी आहे? तुला स्वतःला एक मोठा प्रेस आणून दिलाय. हाताखाली विद्वान शास्त्रीमंडळी आणून देतोय. तू त्यांच्यावर देखरेख कर. नानाप्रकारचे ग्रंथ तयार करवून घे. तुला हव्या त्या स्वरूपात प्रसिद्ध कर..."

"पण अण्णा..."

"तुमचं मुळीच ऐकायचं नाही असंच ना?" त्यातही मध्येच तोडून काहीशा कडवटपणाने अण्णासाहेबांनी म्हटले.

हरी मुकाट्याने तसाच बसून राहिला.

"हरी, आतापर्यंत तुझं सर्व सहन केलं. यापुढं या बाबतीत मी कोणाचं काही ऐकून घेणार नाही. तेव्हा आता तुला माझ्या आश्रमाची आवश्यकता असेल तर तुला माझ्या इच्छेप्रमाणं वागलं पाहिजे! नाहीतर तुला तुझा मार्ग मोकळा आहे. तुझ्याबद्दल माझ्या फार अपेक्षा होत्या, परंतु प्रत्येक अपेक्षा धुळीला मिळवायची असं तू ठरविलेलं दिसतंय! तेव्हा आता शेवटचं काय ते एकदा मला सांग."

अण्णासाहेबांना काहीतरी सांगण्यासाठी हरिभाऊंचे ओठ फुरफुरले परंतु त्यांनी आपल्या तोंडावाटे शब्द बाहेर पडू दिले नाहीत. हरिभाऊ इतके विचारूनही काहीच उत्तर देत नाही हे पाहून अण्णासाहेब अतिशय संतापले आणि उठून चालते झाले.

कार्तिक महिना उजाडेपर्यंत चुलत्या-पुतण्यांचे काही दिवस कसलेच संभाषण नव्हते. कार्तिक शुद्ध प्रतिपदेच्या आदल्या दिवशी अण्णासाहेब हरिभाऊंना आपण होऊनच म्हणाले,

"तात्या, तुझ्यावर कितीही रागवायचं ठरविलं तरी काही इलाजच चालत नाही रे बाबा! हे बघ, उद्या आपल्या आनंदाश्रमाची व नव्या प्रेसची स्थापना व्हायची आहे. इमारतीची वास्तुशांत तुझ्या हातानंच व्हायची आहे. गोखल्यांच्याकडे निरोप पाठवून मथूला बोलावून घेण्यास मी मावशीस सांगितलं आहे."

मुकाट्याने हरिभाऊ आनंदाश्रमात गेले खरे, परंतु आनंदाश्रमाच्या जबाबदारीत आपणास संपूर्णपणे गुंतवून घ्यावे, असे काही त्यांस वाटेना. अण्णासाहेबांच्या अटी तर अतिशय जाचक होत्या. आनंदाश्रमाच्या व्यवस्थापकाने निष्ठेने सोवळे-ओवळे जपले पाहिजे, सुधारकी चाळ्यांना वाव देता कामा नये, अकरा ते सहा दररोज तेथे मान मोडून काम केले पाहिजे, शास्त्री-संन्याश्यांचा आदराने सत्कार व सन्मान केला पाहिजे, हे सगळे आपल्याला जमणार नाही आणि आपण तर उगीचच खोट्या देवधर्माच्या गोष्टी करीत बसणार नाही!



'आमच्याकडे पाहुण्याची आठवण झाली म्हणायची!

अण्णांना पाहिजे तर त्यांनी दुसरा कोणीही पुजारी व्यवस्थापक हाती धरावा!

'आनंदाश्रम' सुरू झाला तरी अण्णा मुंबईलाच राहात होते. त्यामुळे काहीही काम निघाले की ते हरिभाऊंना पत्र लिहून ते तातडीने करण्याची आज्ञा करीत आणि हरिभाऊंना ते करीत बसावे लागे. इच्छा नसताना हरिभाऊ व्यवस्थापकाच्या खुर्चीवर बसू लागले. अण्णासाहेबांना पत्रद्वारे दादासाहेब इकडच्या हकिकती कळवीतच होते.

आनंदाश्रमाच्या वास्तूत हरिभाऊ शिरले की तिथल्या दैनंदिन रगाड्यात त्यांच्यातला लेखक गुदमरू लागे. एक ओळ कागदावर उतरवणे त्यांना जमत नसे. आपली ही व्यथा त्यांनी दामुअण्णांना सांगितली. दामुअण्णांनी त्यांना सांगितले--"किबे वाड्यातल्या दोन खोल्या माझ्या ताब्यांत आहेत. त्यातली एक खोली तुम्ही वापरा." हरिभाऊंची अडचण दूर झाली. आनंदाश्रमातले काम केव्हा संपते व किबेवाड्यातील आपल्या खोलीत टेबलासमोर आपण केव्हा बसतो असे हरिभाऊंना आता होऊ लागले.

'गणपतराव' कादंबरीची प्रकरणे आता वाट चालू लागली. आगरकरांचा 'सुधारक' गणपतरावांच्या रूपाने अधूनमधून दिसू लागला. कधी तो म्हणे—"मनुष्याने दुसऱ्याला सुखी राखण्याकरता आपले नुकसान किती आणि कोठपर्यंत सोसावे? लोकांना क्षणभर सुख देण्यासाठी आपण जन्माचे मातेरे करावे का?"

दिवस हळूहळू जात होते. घर-आनंदाश्रम-किबेवाडा या त्रिकोणात हरिभाऊंचे आयुष्य आता सावरू लागले.

एके दिवशी नेहमीप्रमाणे सकाळचे जेवण आटोपून हरिभाऊ आनंदाश्रमात जाण्यासाठी निघाले, त्यावेळी वर माडीवर हातात विडा घेऊन मथू उभी होती.

अंगात कोट चढविला आणि त्यांनी मथूकडे निरखून पाहिले,—

"मथू, काय ही तुझ्या शरीराची अवस्था? किती ग वाळलीस तू?"

" एक माणूस सारखं सकाळसंध्याकाळ आपल्या कामात असतं. त्याला आमच्याकडे पाहण्याची आठवण झाली म्हणायची ?" मथू हसतच म्हणाली.

मथू इतक्या मोकळेपणाने आणि हसत हसत प्रथमच बोलत होती. तिच्यामध्ये पडलेला हा फरक पाहून हरिभाऊंना बरे वाटले; परंतु तेवढ्यात घाई करून ते म्हणाले,

" मथू, कसलं आमचं पाहणं घेऊन बसलीस ? आम्ही परस्वाधीन माणसं ! मुकाट्यानं इतर चौघे करीत राहतील तसं करीत राहायचं झालं !"

" पण आपल्या बऱ्यासाठीच आहे ना ते ?"

" म्हणजे तूही आता उपदेश करू लागलीस वाटतं ? कर बापडी !"

" नाही हो, मी आपली सहज म्हणाले ! पण घरात एका माणसाचं हल्ली काय सारखं कौतुक होत असतं ?"

" कसलं ग ?"

" आजेसासूबाई आणि मावशी सारखं तुमचं कौतुक करीत असतात. परवा अण्णासाहेब आले होते, त्यावेळी ते मावशींना सांगत होते की, तुम्ही आनंदाश्रमाची व्यवस्था फारच छान ठेवली आहे आणि..."

" पुरे पुरे कौतुक ! घरी असं कौतुक करायचं आणि तिकडे मोठमोठी पत्रं लिहून आम्हाला सारखं असं करा आणि तसं करा, करू नका, असे हुकूम सोडायचे !"

" स्वारी बरीच रागावलेली दिसतेय !" मथू हळूच म्हणाली.

" छे ग, मी कशाला रागावतोय ! ते आनंदाश्रमाचे मालक, मग आपण त्यांचं ऐकायला नको का ?"

" नाही हां, परवा ते सासूबाईंना सांगत होते की, पुण्याची सगळी इस्टेट तुमची आणि मुंबईच्या इस्टेटीचे ते मालक !"

" म्हणजे आनंदाश्रमाच्या मालकीणबाई त्या आपणच ना ?" हरिभाऊ थट्टेने म्हणाले.

" खरंच गडे, आपण आनंदाश्रमामध्ये राहायला जाऊ या ना ! मग मी तिथे खूप शिकेन, तुमच्याबरोबर फिरायला येईन. पाहिजे तर सभेलादेखिल येईन !"

" चल ! खुळी कुठली !"

हरिभाऊ जिना उतरून खाली आले. परंतु बाहेर पडण्यापूर्वी स्वैंपाकघरात गेले. त्यांनी मावशीला विचारले ?—

" हिला काय होतंय हल्ली—? वाळलेली दिसते !"

" तुला नाही समजायचं ते इतक्यात ! काही खावंसं वाटलं तर मला सांग म्हणून कितीदा सांगितलं तर बोलतच नाही बघ..."

हरिभाऊ तसेच बाहेर पडले. जाता जाता ते स्वत:शीच म्हणाले,

" ही बायकांची जात मुळातूनच हुशार ! परोत्कंठा जागृत करून ती अतृप्त ठेवण्याबद्दल व ती तशी ठेवून मनुष्याची मौज पाहण्याबद्दल अशा चतुर असतात की पुसू नये..."

## : १० :

दादाजी–रखमा खटल्याचा निकाल ऐकण्यासाठी पुण्यातील अनेक तरुणांबरोबर हरिभाऊही गेले होते. कोर्टाने ' हिंदुधर्मशास्त्रानुसार कोठल्याही परिस्थितीत रखमाबाईनं दादाजीकडे नांदण्यास गेले पाहिजे ' असा निकाल दिला आणि बाहेर अण्णासाहेब हरिभाऊंकडे वळून म्हणाले—

" बघ हरी, मी म्हणालो तसंच झालं ना ?"

हरिभाऊंनी नुसतीच मान हलवली. बरोबर माधवराव जोशी होते कोर्टातून घरी परत येत असता अनेक विषयांवरून रेंगाळत बोलणे डॉ. आनंदीबाई जोशी यांचे जे चरित्र काशीताई कानिटकरांनी लिहिले होते त्यावर आले. ' इंदुप्रकाशा 'त त्यावर कडक टीका प्रसिद्ध झाली होती.

माधवराव जोशी म्हणाले—

" ही मिल-स्पेन्सर वाचणारी सुधारक मंडळी देखील हल्ली शास्त्रीबुवांची भाषा वापरू लागली आहेत हेही तुमच्या लक्षात आलं असेलच. "

" ते कसं काय बुवा ? " हरिभाऊंनी प्रश्न केला.

" काशीताईंनी डॉ. आनंदीबाई जोश्यांच चरित्र लिहिलं आहे त्यावरची ' इंदुप्रकाशा 'तील टीका वाचून काशीताईंनी ख्रिस्ती मिशनऱ्यांबद्दल लिहिताना चक्क शास्त्रीबुवासारखी अनुदार भाषा वापरली आहे. '

" माधवराव, मी रोज कँपात फ्रेंच शिकायला जातो. आपण मिशनऱ्यांच्या कार्याचं महत्त्व अद्याप ओळखलं नाही. त्यांची सेवावृत्ती, स्वार्थत्याग यांचा थोडासा तरी विचार नको का करायला ? "

" अहो, पण सेवावृत्तीच्या छुप्या नावाखाली ते धर्मप्रसार करतात, त्याचं काय ? "

" अहो मिशनरी म्हणजे सगळेच सद्गुणाचे पुतळे असं माझं मुळीच म्हणणं नाही. तेही आमच्याप्रमाणे मनुष्यच आहेत. त्यांच्यातही आमच्याप्रमाणे दोष आहेत. ज्या महारां-मांगास सर्व हिंदू लोक तुच्छ मानून ईश्वरदर्शनाचा लाभ घेऊ देत नाहीत, ज्यांची सावलीही आपल्या अंगावर पडू देत नाहीत त्यांना शिक्षण देणारे दुष्ट आणि तुम्ही चांगले ? आपल्या स्वजातीयांस रानटी अवस्थेतून काढून त्यांची स्थिती सुधारून त्यांना ईश्वरकृपेचा लाभ करून देणारे, आफ्रिकेच्या अंतर्भागात जाऊन परोपकारार्थ झटणारे मिशनरी कोणीकडे, आणि रानावनात नसून अप्पलपोटेपणानं तप करून ईश्वरप्राप्ती करून घेण्यास झटणारे मठ कोणीकडे ? ख्रिस्ती धर्मातील मानवप्रेम मोठं उदात्त आहे असं तुम्हाला नाही का वाटत ? "

" परंतु राजाश्रयाच्या साहाय्यानं– "

त्यांना पुढे बोलू न देता हरिभाऊ तात्काळ म्हणाले, " राजाश्रयामुळे मिशनऱ्यांनी काय विपरीत केलं हे मला कळत नाही ! राजाश्रय मिशनऱ्यांना आहे, असं म्हणण्यापेक्षा तुम्हालाच आहे असं समजा ! तुमच्या रीतीभातीत राज्यकर्ते पडत नाहीत, म्हणूनच तुम्ही आपल्या बायकांस हवं त्या तऱ्हेनं वागविता. दुर्दैवी बालविधवा चौदा पंधरा वर्षांची असली तरी तिला तीर्थं, पुण्यनदी अशी मोठमोठी नावं देऊन ब्राह्मणाच्या पडशा भरण्याकरिता त्यांची वपन करता ! "

हरिभाऊंना चिडीमुळे पुढे बोलवेना.

" हरिभाऊ, मला तर एकंदर तुमच्या चुलत्यांची विचारसरणी टिळकांसारखी आणि तुमची आगरकरांसारखी वाटू लागली आहे. "

" छे, छे, तसं मुळीच नाही. आगरकरांची विचारसरणी मला मान्य असली तरी समाजाला शिव्या देऊन आणि समाजावर तीव्र आघात करून इष्ट ती सुधारणा होणार नाही. उलट, समाजाला

मुद्दाम मलत्या मार्गानं चेतविण्यासारखं ते होईल, आणि आधी राजकीय स्वातंत्र्य मिळावं म्हणून समाजातील अतिशय विचारी आणि शांत व्यक्तींच्या सुधारणाविषयक आचारावर सगळ्यांनाच सुधारक म्हणून टिळकांच्या झोडपण्यानं राजकीय दृष्टचा लोकजागृती झाली, तरी सामाजिकदृष्टचा विचारी लोकांचे पाय ओढल्यासारखं होईल. पण लक्षात कोण घेतो ! ...... " हरिभाऊंनी नि.श्वास सोडला.

" हरिभाऊ, मी म्हणतो की, या गोष्टींवर श्रद्धा नसेल तर तुम्ही मग आनंदाश्रमाची जबाबदारी शिरावर घ्यावी कशाला ? '

" माधवराव, शेवटी आयुष्यात कर्तव्य म्हणून काही गोष्टी कराव्या लागतात. माझ्या वागणुकीनं घरातील माझ्या आवडत्या लोकाना दु:ख होत असेल तर मला अतिशय वाईट वाटेल. आनंदाश्रमाची जबाबदारी मी चांगल्या रीतीनं सांभाळावी, असं अण्णासाहेबांना वाटतं ना ? झालं तर मग, मी अतिशय निष्ठेनं, केवळ त्यांच्या इच्छेसाठी एक व्रत म्हणून हे काम सांभाळीन. "

" कॉलेजमध्ये असताना तुम्ही स्वत बद्दलची जी स्वप्नं रंगवीत होता त्याचं काय ? "

" ती स्वप्न प्रत्यक्षात येतील, असा अजूनही मला आत्मविश्वास आहे. टिळक–आगरकरांचे मार्ग माझ्यासारख्याला पेलवले नाहीत म्हणून स्वस्थ कसं बसता येईल ? माझ्या मार्गानं मला जायला हवं–"

" कोणत्या ? "

माधवरावांच्या या प्रश्नाला कशा रीतीने उत्तर द्यावे, याचा हरिभाऊ विचार करीत होते. ' मधली स्थिती ' कादंबरी प्रसिद्ध झाल्यानंतरचा एक प्रसंग त्यांना आठवला—कादंबरी पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्यानंतर सुधारकांना अर्वाच्य शिव्या देऊन आपल्या ' पुणे-वैभवा 'चा खप वाढवू पाहणारे केळकर एकदा हरिभाऊंना म्हणाले,

" हरिभाऊ, तुमची कादंबरी प्रथम प्रथम तिच्यातील सुधारकांच्या चाळ्यांच्या वर्णनामुळं मी प्रसिद्ध करण्याचं ठरविलं, परंतु कादंबरी जसजशी पुढे चालली, तसतशी तिच्यातील वर्णन सुधारकांची निंदा करण्यासाठी आहेत का त्यांच्याबद्दल सहानुभूती निर्माण करण्यासाठी आहेत, हे समजेनासं झाल. सुरुवातीची तिच्यातील वर्णनं वाचून आम्हाला गुदगुल्या होत असत, पण पुढेपुढे त्यातील धर्मनिष्ठ लोकांची दुष्ट कृत्यं व व्यसनं पाहून आम्हांलाच लाज वाटायला लागली. शनीच्या पाराजवळील अड्ड्यातील दोन-तीन व्यक्तींना आपल्या कृत्यांची कादंबरीतील वर्णनं वाचून शरम वाटल्याचं मला ठाऊक आहे."

त्या प्रसंगाची तीव्रतेने आठवण आल्यानंतर ते जोराने माधवरावांच्या पाठीवर थाप मारून म्हणाले, " ते मी आजच सांगत नाही."

" लहानापासून थोरापर्यंत सर्व स्त्रीपुरुषांचे मनोरंजन करून, ज्ञान देणारे हे पत्र दर शनिवारी निघते." असे शीर्षभागी जाड्या अक्षरात छापलेले ' करमणूक ' पत्र ऑक्टोबरातल्या एका शनिवारी पुण्यात सर्वत्र झळकले. त्यातील एका विधवेने लिहिलेल्या आपल्या बालपणच्या जीवनातील हकीगतीची चर्चा हळू हळू सर्वत्र सुरू झाली.

हरिभाऊंनी आपले हृद्गत सांगितले होते—

" जी गोष्ट जनसमूहाने अवश्य करावी म्हणून ' केसरी–सुधारक ' एखाद्या कठोर पित्याप्रमाणे कठोर शब्दांनी सांगणार व समाजाचे अप्रशस्त वर्तन झाल्यास वेळी वाक्प्रतोदाचे तडाखे लगावणार, तीच गोष्ट हे पत्र प्रेमळ मातेप्रमाणे गोड गोड शब्दांनी व चांगल्या चांगल्या गोष्टींनी अप्रशस्त वर्तनाबद्दल मायेचे शासन करणार ! एवढे मात्र ध्यानात ठेवावे की, हे पत्र आचरट आईप्रमाणे फाजील लाड करणार नाही. या पत्रात आता आपणास हवा तसा आचरट व पांचकळ मजकूर वाचावयास सापडेल अशी आशा धरून जे याचे वर्गणीदार होतील, त्यांची अत्यंत निराशा होईल. नाटिका-फीटिका अशी मोठमोठी नावे घेऊन पांचकळ व फाजील मजकूर खरडण्यासाठी हे पत्र नव्हे. ज्यास पुढच्या माडीपासून चुलीपर्यंत व दिवाणखान्यातील टेबलापासून फणीकरंड्याच्या पेटीपर्यंत कोणाच्या हाती पडले तरी हवे त्याने हवे त्याच्या देखत नि.शंकपणे वाचण्यास हरकत नाही, असे पत्र पाहिजे असेल तर त्याने अवश्य ' करमणुकी 'चे वर्गणीदार व्हावे. सध्याच्या बऱ्यावाईट स्थितीचे, कोणीही वाचले असता बिलकूल नाक मुरडण्याचे कारण नाही, असे चित्र पाहिजे असेल त्या गृहस्थास आम्ही आदरपूर्वक आमंत्रण करतो. शनिवारी संध्याकाळी थकून भागून आल्यावर आपल्या कुटुंबातील लहानमोठ्या माणसास जमवून खुशाल हसत खेळत करमणूक करून ज्ञान मिळवण्याची ज्यास इच्छा असेल त्याचे आम्ही नम्र सेवक आहोत. "

करमणुकीचा पहिला अंक बाहेर पडण्यापूर्वी होत असलेली हरिभाऊंची धडपड पाहून अण्णासाहेब सहज म्हणाले होते,

" तात्या, दिवसभर किती उद्योग करायचे माणसान ! तू आनंदाआश्रमाच काम काळजीपूर्वक बघतोस हे बघून मला बरं वाटतं. परतु त्यानतर ते शाळेतील शिकविण, फ्रेंच शिकायला जाण आणि पुन्हा वर तुझी ही ' करमणूक ' ! चिमामावशी तर म्हणत होती की तू हल्ली जेमतेम दोन वेळा जेवायला घरी तोंड दाखवतोस म्हणून ! कशाला रे ह्या बाकीच्या उद्योगात वेळ घालवून स्वत:च्या प्रकृतीची आबाळ करतोस ? "

अण्णांच्या आवाजात काळजी होती, प्रेम होते. तो आवाजच सागत होता की, हरिभाऊंच्या या सगळ्याच धडपडींना विरोध करण्याची त्यांची इच्छा नव्हती ! तो आपल्या आनदाश्रमाचे काम बघतो ना ! मग झाले !! अशी त्यांची वृत्ती बनली होती, परतु त्याचबरोबर इतर उद्योग न करता आनदाश्रमालाच त्याने सर्वस्वी वाहून घ्यावे अशी अतरीची उत्कट तळमळही होती.

" हरी, मला त्या वकिलीचा कटाळा आलाय ! शेकडो रुपयांच्या थैल्या घेऊन पक्षकार येतात, परतु पैशाची मला कसलीच आसक्ती वाटत नाही. परंतु अजून काही वर्षं या आनंदाश्रमासाठी मला ते काम नको वाटलं तरी केल पाहिजे !

" अण्णा, तुम्ही सागता हे मला ठाऊक का नाही? मी आपल्या परीन आनदाश्रमाच्या कामात कसलीही कसूर करणार नाही. तुम्ही सांगितल्याप्रमाणे आनंदाश्रमाचं उद्दिष्ट आता पक्कं ठरून गेलं आहे. आता उद्दिष्टं बरी असोत वा वाईट असोत, इष्ट असोत वा अनिष्ट असोत, ती आता निष्ठेनं पाळली गेली पाहिजेत, याची खूणगाठ मी मनाशी बाधली आहे. आनंदाश्रम चालविण्याच्या बाबतीत तुम्ही माझ्याकडून ज्या वर्तणुकीची अपेक्षा ठेवली आहे, त्यामध्ये माझ्या हातून एक तसूभरही अतर पडणार नाही ! "

" होय रे, हे सगळं करण्यामध्ये माझा मोठा परमार्थ असला तरी तुझी व्यवस्था करून देण्याचा स्वार्थही आहे. तुझ्या चरितार्थासाठी तुला दुसऱ्या कुणाच्या तोंडाकडे पाहायला लागू नये अशी



हा गाभारा ! हे इकडे गोमुख...

माझी धडपड असता तू दुसऱ्यांचे शेअर्स जमवून प्रकाशन कंपनी काढतोस याचा अर्थच मला समजत नाही."

अण्णासाहेबांशी या विषयावर अधिक वाद करणे हरिभाऊंना नेहमीच संकट वाटायचे. कारण अण्णासाहेब संतापले म्हणजे अधिकच उग्र होत असत व त्यांना जास्त मनस्ताप देणे हरिभाऊंना मुळीच आवडले नसते, म्हणून हरिभाऊ आपले गप्पच राहिले.

'करमणूक' चा पहिला अंक खिशात ठेवून हरिभाऊ घराच्या पायऱ्या चढले तेव्हा त्यांना हीच भीती वाटत होती की अण्णांनी कौतुकाचे शब्द दिले नाहीत तरी चालेल पण ते अधिकच रागावणार नाहीत ना ?

उंबरठा ओलांडून ते आत आले आणि त्यांच्या लक्षात आले की समोर भलामोठा प्लॅन पसरून अण्णासाहेब कसल्यातरी नादात आहेत. हरिभाऊ जवळ येताच ते म्हणाले—

" शंकराच्या देवळाचा हा गाभारा ! इथे एकदा सच्चिदानंदांची प्रतिष्ठापना झाली म्हणजे नित्य पूजा-अर्चा न चुकता चालवायची बरं का ! देवस्थानाचं हे तीर्थ इकडच्या गोमुखीतून असं बाहेर पडेल, आणि त्याखाली इथे माझी अगदी छोटीशी समाधी बांधायची बरं का ! एकीकडे त्या पवित्र तीर्थोदकानं नित्य स्नान घडत असता मी आतापर्यंत केलेल्या पातकांतून जसा मुक्त होत जाईन तसेच आनंदाश्रमामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या प्राचीन संस्कृत ग्रंथांकडे माझ्या मृतदेहाभोवती घुटमळणारा आत्मा अनिमिष पण अदृश्य नेत्रांनी पाहात राहील !"

तो प्लॅन पाहता पाहता अण्णासाहेबांची जी समाधी लागली होती ती पाहून हरिभाऊंनाही आपण जगात डुबी घ्यावीशी वाटली. त्या दिवशी करमणुकीच्या भविष्यकालीन समृद्धीची सुखस्वप्ने रंगवीतच ते आपल्या खोलीवर गेले.

" पण लक्षात कोण घेतो ?" कादंबरीचे पुढचे प्रकरण लिहिता लिहिताच त्यांच्या मनात साकार होत असलेल्या नायकाने सगळ्या अडचणींवर मात करून स्त्रियांना नवा मार्ग दाखविला आहे. केशवपन, बालविवाह इत्यादि दुष्ट रूढींचा नायनाट केला आहे. स्वतःच्या पत्नीला सुशिक्षित करून तिच्याशी काव्यशास्त्रविनोदात रममाण होताना तो कमालीचा सुखावला आहे. त्याच्या मित्रांनी त्याच्या विचाराने प्रभावित होऊन धाडसाने अनेक विधवाकुमारींचे संसार उभे केले आहेत आणि फळाफुलाला आणले आहेत. राजकारण व समाजकारण यांच्याबद्दल 'करमणुकी'त एक ओळही आली नसताना तीमध्ये आलेल्या कादंबऱ्यांतील जीवनचित्रणाने सारा महाराष्ट्र बदलला आहे. तिच्या कर्त्याने आपले वृत्तपत्र आबालवृद्धांच्या करमणुकीस्तव राबविले असले तरी त्याद्वारे लोकप्रिय होऊन राजकारणाची आणि समाजकारणाची प्रचंड धुरा आपल्या शिरावर त्याने वाहिली आहे आणि उद्याच्या स्वतंत्र भारताच्या नानाविध उपक्रमांना त्याने प्रेरणा दिली आहे. आनंदाश्रमामध्ये भारतातील विद्वद्‌गण गोळा झाला आहे आणि अण्णासाहेब सद्‌गदित अंतःकरणाने आपल्या पुतण्याचे हे सारे कर्तृत्व 'याची देही याची डोळा' पाहून मनोमनी धन्य झाले आहेत.

...आपल्या छोट्याशा खोलीत एका टेबलासमोर बसून शास्त्रीबुवा कित्येक दिवस काहीतरी लिहीत होते आणि शांतपणे बसून लिहिलेला तो मजकूर वाचण्यासाठी निबंधमालेचा अंक केव्हा बाहेर पडतो, याची वाट पाहात त्यावेळची तरुणमंडळी जमखिंडीकरांच्या वाड्याभोवती घिरट्या घालीत. ही मंडळी निवडक होती, मर्यादित होती, सुशिक्षित आणि वरच्या वर्गातील होती, परंतु किब्यांच्या वाड्यातील एका खोलीत बसून हरी नारायणाने लिहिलेला मजकूर अगदी कोळ्यामाळ्यापर्यंत, लोहारमहारापर्यंत जाणार होता आणि ती मंडळी खडबडून उठणार होती. त्याच्या कर्त्याचा जयजयकार करणार होती. हा कर्ता होता तरी कसा ? काय चमत्कार पाहा ! हरिभाऊंनी त्याचे चित्र मोठ्या उत्सुकतेने न्याहाळण्यास सुरुवात केली, तर त्यांचा चेहरा त्यांना अंधुक दिसू लागला. वाकवाकून असे का दिसते म्हणून ते पाहू लागले तेव्हा उलट ते अधिकच अंधुक दिसू लागले. त्यांची शोधण्याची मोठी धांदल उडाली आणि त्या व्यक्तीऐवजी दुसरीच कोणी तरी व्यक्ती त्यांना दिसू लागली. किंबहुना ती एक नसून त्या दोन आहेत आणि क्षणात ही तर क्षणात दुसरी याप्रमाणे ती सारखी निरनिराळी रूपे धारण करीत आहे असा भास झाला. वज्राघात झाल्यासारखे त्यांना वाटले आणि ते एकदम खडबडून जागे झाले. डोळे उघडल्यानंतर जिकडेतिकडे फक्त काळोख. कोठे काहीच दिसेना. जागे झाल्यानंतरही आपल्याला पडले ते स्वप्न नसून सगळे काही खरे दिसले असे वाटत होते ! परंतु ती स्थिती फार वेळ टिकली नाही. थोड्याच वेळात ते सर्व स्वप्न असून आपण उगीच वेड्यासारखे पाहिले असे वाटले. त्यांचे सगळ्यात अंतस्थ असे जे मन ते मात्र त्यांना सारखे टोचीत होते की, आपण पाहिले त्यात सगळे खरे होते.

: ११ :

महाबळेश्वराच्या एका प्रशस्त बंगल्यामध्ये व्हरांड्यात अगदी पहाटेच्या सुमारास पुढून झुंजुमुंजू झालेल्या रस्त्याकडे पाहात, अंगा-

भोवती शाल लपेटून हरिभाऊ आरामखुर्चीत पडले होते.

पाहता पाहता एकदम त्यांचे डोळे पाण्याने भरून आले. पाण्याचा शिडकावा झालेल्या काचेमधून समोरचे अस्पष्ट दृश्य दिसावे, त्याप्रमाणे त्यांच्या मनात कितीतरी अस्फुट चित्रानी गर्दी केली.

*"काय भाऊ, झोप लागली की नाही रात्रभर?"* या काशीताईंच्या आवाजाने ते जागे झाले.

हरिभाऊंनी तत्परतेने डोळे पुसले, परंतु काशीताईंच्या चाणाक्ष नजरेतून ते सुटू शकले नाही. काशीताई पुन: घरात गेल्या.

काशीताईंनी मे महिन्याची सुटी महाबळेश्वरास घालविण्यासाठी इतका प्रशस्त बंगला भाड्याने घेतला होता आणि मोठ्या आग्रहाने हरिभाऊना त्यांनी महाबळेश्वरास बोलावून घेतले होते.

सकाळ-सध्याकाळ गोविंदराव काशीताईंच्या सहवासात महाबळेश्वराच्या निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेत मनसोक्त भटकण्यात एरवी हरिभाऊना कमालीचा आनंद वाटला असता, परंतु मुद्दाम एखाद्या चर्चेमध्ये त्याना गुतवावे, त्यावेळी ते थोडेसे खुलत, एरवी नेहमी सारखे बडबडण्यास उत्सुक असलेले हरिभाऊ सोप्यातल्या एका खुर्चीवर बसून शून्य मनाने रस्त्याकडे पाहात बसत. रस्त्यावरून युरोपियन व पारशी स्त्री-पुरुषाचे थवेच्या थवे स्वच्छंद मनाने इकडे तिकडे विहार करीत आणि अधूनमधून त्याच्या शृगारचेष्टितांनाही ऊत येई. डोळे उघडे असूनही हरिभाऊना आपण काही पाहात आहोत असे वाटत नसे.

हरिभाऊ पुत्रनिधनाची गोष्ट मनाला लावून घेतील असे वाटले नव्हते ! पुरुषानी इतके हळवे असू नये असे त्यानाही वाटे; परंतु कळत होते ते वळत नव्हते.

महिनाभर हरिभाऊंनी त्याला स्वत: साभाळला, अगदी तळहातावरच्या फोडासारखा. रात्रदिवस त्याच्या उशाशी बसून त्यानी काढले परंतु अखेर त्याने हरिभाऊना फसवले होते.

त्याना मुलाच्या आठवणीपाठोपाठ येत असता दुसरीच एखादी आठवण त्यांच्या नजरेसमोर तरळू लागे आणि आपण मुलाचे दु:खही सहजी विसरू शकतो या विचाराने ते पुन: ओशाळे होत.

—'करमणुकी'तून 'पण लक्षात कोण घेतो !' ही कादबरी प्रसिद्ध होऊ लागली तसतशी त्या कादबरीने वाचकाच्या मनाची चांगलीच पकड घेतली. 'करमणुकी'च्या ऑफिसात सध्याकाळच्या वेळी हरिभाऊ एकदा मित्रांबरोबर गप्पा मारीत बसले असता कुणीतरी विचारले,

"हरिभाऊ, ही तुमची विधवा कोण हो ? "

"आपलं नाव कोणालाही सांगावयाचं नाही, अशी तिनं शपथ घेतली आहे." हरिभाऊ डोळे मिचकावून गमतीच्या सुरात म्हणाले.

"तरी पण ?"

"छे ! छे !!"

"हरिभाऊ, तुमच्या या विधवेच्या चरित्रान आमच्यावर मात्र एक नवं संकट गुदरविलं आहे !"

"कोणतं बुवा ?"

"दर शनिवारी संध्याकाळी घरी गेल्यावर 'करमणुकी'तील कादंबरी वाचण्याची आमच्यावर सक्ती होते."

"मग ?"

"मग काय ? वाचून दाखविल नाही तर जेवण मिळणार नाही या मीतीनं आम्ही मुकाट्यानं वाचून दाखवितो झालं !"

"अरे त्यापेक्षा तिला आपण होऊनच चार अक्षरं का नाही शिकवीत ?"

"अरे भलतच ! माझी आई माझे कान उपटील आणि काकू मला फाडून खातील !"

"अगोदर काकूना फाडून खाऊ्ला सांग म्हणजे आईच्या कान उपटण्याचा प्रश्नच येत नाही."

मग काही काळ मथूच्या विचाराने ते अस्वस्थ झाले. मथू बराच काळ हल्ली आजारी असायची. लिहिणेवाचणे तर आता नावालाही नव्हते. ती वारवार हल्ली माहेरी जात होती, आणि तिचे मूल जगले नाही म्हणून तिची आजी तिच्या नवऱ्याच्या सुधारकी चाळ्यांमुळे असे घडले म्हणून हरिभाऊवर खापर फोडीत होती. कादंबरीचे प्रत्येक प्रकरण लिहिल्यानंतर ती कोणाला तरी तात्काळ वाचून दाखवावी, असे त्याना उत्कटतेनें वाटले, तरी त्यांच्या आयुष्यांत ती गोष्ट प्रत्यक्षात येण्याची शक्यता नव्हती. आपली पत्नी आपल्या शेजारी उत्सुक डोळ्यांनी आपल्या हालणाऱ्या पेनाकडे लक्ष देत कुतूहलाने पाहात बसली आहे, आणि अधूनमधून 'कुठपर्यंत आलं हो !' असे कौतुकाने वाचते आहे. 'झालं हां, झाल हां,' असे म्हणत आपण मनोमनी सुखावून समोरच्या तावावर एकामागून एक आपल्या मनातील चित्रे उमटवीत आहोत. रात्रीची बरीच वेळ झाली आहे, त्यावेळी आपण लिहिलेला मजकूर आपल्या पत्नीला वाचून दाखवीत आहोत आणि मधले बोट डाव्या गालावर व अंगठा हनुवटीखाली ठेवून कुतूहलानें जीव कानांत आणून आपल्या तोडावाटे बाहेर पडणारे शब्द हृदयात साठविते आहे. सगळे ऐकून झाल्यावर "खरंच, इतकं चागलं तुम्ही कस हो लिहिता ?' असा प्रश्न ती विचारीत आहे आणि आपण तिला जवळ घेऊन......

हरिभाऊच्या मनासमोर असे रम्य चित्र रेंगाळत असे— परतु वस्तुस्थितीशी त्याचा सबध नव्हता.

पहिले मूल गेल्यानतर मथूला आणण्यासाठी खुद्द हरिभाऊ सासुरवाडी गेले होते. बाळंतपणामुळे पाढरीफटक पडलेली मथू पाहताच त्याच्या अत:करणात कालवाकालव झाली. तिच्या चेहऱ्यावरचे दु:ख हे मातेचे दु:ख होते. स्त्रियांबद्दल अपार करुणा बाळगणाऱ्या हरिभाऊंनासुद्धा आपल्याला त्या दु:खाची खरी तीव्रता समजण्यासाठी स्त्रीचाच जन्म घ्यावा लागेल, असे क्षणभर मनाला वाटून गेले.

घरी आल्यावरसुद्धा मथू शून्यमनस्क बसलेली असे. मथू काहीच खातपीत नाही, आताशा बोलत नाही म्हणून चिमामावशी तक्रार करीत.

पहिले मूल गेल्यापासून मात्र घरातला सासुरवास बराच कमी झाला होता. तिच्या लिहिण्यावाचण्याच्या वेळची घरातली खुसपूस सोडली तर चिमामावशी आणि बगूआत्या आपल्या घरातील मोठ्या कौतुकाची सून म्हणून तिला वागवीत होत्या आणि तिला कोणी कामही विशेष सागत नव्हते.

"मथू, का बोलत नाहीस ? का आमच्याशी बोलायचं नाही असं ठरविलं आहे ?"

"इश्श्य !"

"मग तुला काय हवंय ते सांग बघू !"

## दोन अभंग

बरे झाले तुवा केलेस आंधळे
निवले हे डोळे अंधारात.
पुढे आणि मागे दोन्हीकडे ठेचा
पाऊलांना खाचा पाविञ्याच्या.
बोलावितो, परी सांग कसा येऊ
कोणा हाती देऊ हात माझा.

*

थोडक्याची झाली गावभर बोब
मनातली झोब कुणा सांगू.
माझ्याभोती सारी बहिऱ्यांची वस्ती
कशी करू नस्ती उठाठेव
काय करू बापा हेलावले गाव
नाठाळांचे नाव स्थिर व्हाया.

—कृष्णमाधव देशमुख

"मी सागेन ते इकडून ऐकायचं होईल का ?"

"जरूर ! बोल वघू !"

"आपण वरीक निराळे होऊ !"

तिच्या या शब्दाने हरिभाऊ एकदम दचकले आणि मग नेहमीच्या पद्धतीने त्यांना तिची थट्टा करण्याची लहर आली,

"ओहो, हे बेत चालले आहेत वाटतं ! छान, छान ! आपण असं करू, चिमामावशीना बोलावून आताच पक्कं करून टाकू ! मावशीऽ एऽ मावशीऽऽ"

हरिभाऊंनी मावशीना हाक मारली तशी मथू घाबरीघुबरी झाली. कशाला आपण निराळे होण्याची भाषा काढली असे तिला झाले. आपल्या नवऱ्याचा स्वभाव आतापर्यंत तिच्या चागल्याच परिचयाचा झाला होता. कुणाला वाईट वाटेल असा शब्दसुद्धा चुकून त्याच्या तोंडून वाहेर यावयाचा नाही, मग निराळे होण्याचे तर नावसुद्धा काढायला नको.

"नका हो असं करू ! कसली मेली तुम्हांला सदान्‌कदा असली जीवघेणी थट्टा सुचते ती !" असे म्हणून ती अंथरुणावर पडून स्फुदू लागली.

या आठवणीवरोवर एक विचारही त्यांच्या मनात आला की मथूचे सुख हें आपल्या सुखाशी फारसे निगडित राहणे कठीण आहे, निदान गोविंदराव आणि काशीताई यांच्या संसारसुखातील काही क्षणही आपल्या ससारात उत्पन्न होणे कर्मकठीण आहे.

हरिभाऊंचे विचारचक्र जोरात चालू असतानाच पोस्टमनने पत्रे फेकली. अण्णासाहेबाचे हरिभाऊंना पत्र आले होते आणि सुधारकाच्या इंग्रजी विभागाचे सपादक गोपाळराव गोखले यांचे पत्र गोविंदरावांकडे आले होते.

अण्णासाहेबाचे पत्र हरिभाऊ वाचीत असतानाच गोविंदराव बाहेर आले व त्याचे पत्र हरिभाऊंनी त्याचे हाती दिले.

"काय म्हणतात अण्णासाहेब ?" गोविंदरावांनी विचारले.

"त्यांच्या डॉक्टरानी त्याना पाठीच्या मणक्यावर ऑपरेशन करण्यासाठी फ्रान्समध्ये जाण्याचा पुन्हा सल्ला दिला आहे."

"मग जाणार म्हणतेय काय स्वारी ?"

"छे, फ्रान्सला जायचं म्हणजे आनदाश्रमासाठी जमा केलेली पुंजी खर्च करावी लागेल. अण्णासाहेबाच्या हातून ती गोष्ट कालत्रयीही घडायची नाही."

"कमाल आहे की नाही, अण्णासाहेबाच्या निष्ठेची ! आनंदाश्रमासाठी तीन-चार लाख रुपये मिळविले की संन्यास घेण्याची त्याची मनीषा मजकडे त्यानी अनेक वेळा बोलून दाखविली आहे, परंतु त्या अगोदर या भयकर विकारावर इलाज नको का करायला ? इकडे गोखल्यानीही आगरकराबद्दल असंच लिहिलं आहे. गेल्या आठवड्यात दम्यान त्यांना घावरं केलं होतं. मोठमोठ्या डॉक्टराना दाखवा म्हटल तर थट्टेवारी नेतात आणि स्वतःच मनाला वाटेल तसले काढे आणि चूर्णं घेत बसतात. ! त्यानी तुमच्या 'पण लक्षात कोण घेतो' ची उत्सुकतेन चौकशी केली आहे !"

"अहो माझी आणि गोखल्याची ओळख मोठ्या विचित्र कारणामुळे झाली अस तुम्हाला सागितलं तर कदाचित हसू येईल." हरिभाऊ म्हणाले. हरिभाऊंच्या चेहऱ्यावरची खिन्नतेची छाया क्षणभर लोप पावली आणि उत्सुकतेने त्यांचा चेहरा भरून आला.

त्या दिवशी रात्री आपल्या खोलीत हरिभाऊ एकटेच लिहीत बसले असता दारावर कोणीतरी टकटक केले. हरिभाऊंनी दरवाजा उघडला तेव्हा दरवाज्यातील व्यक्तीची त्यांना ओळख पटली नाही. त्याच्या चेहऱ्यावरचे प्रश्नचिन्ह पाहून ती व्यक्ती म्हणाली,

'माफ करा हं मी तुमच्या कामात भलत्या वेळी व्यत्यय आणला. पण काही केल्या चैन पडेना म्हणून नाइलाजास्तव याव लागलं."

हरिभाऊ आणखीनच बुचकळ्यात पडले तेव्हा ती व्यक्ती म्हणाली,

"अरेच्या, विसरलोच की ! माझं नाव गोपाळ गोखले."

"ओहो, गोपाळराव गोखले !" हरिभाऊ म्हणाले व त्याना बसावयास खुर्ची पुढे केली. गोपाळरावानी त्याच्या येण्याचे कारण सागितले.

"हात्तीच्या, अहो कुठल्यातरी लगोटीएवढ्या जिल्हापत्रात तुमच्या 'सुधारका'तील अग्रलेखावर तुमच्यावर फुसकुली टीका केली होती."

"तरी पण ती काय होती, कशा प्रकारची होती ?"

"अहो मी सहज चाळली. मी ती विसरूनसुद्धा गेलो."

"तुम्ही ती कुठे पाहिलीत ?"

"सकाळी आनदाश्रमाच काही काम घेऊन 'केसरी' कचेरीत गेलो होतो. तिथे नवीन आलेली वर्तमानपत्र पाहताना कुठेतरी वाचली झाल !"

गोखले खूप अस्वस्थ झाले होते. शेवटी तशा रात्री 'केसरी' ऑफिसमध्ये जाऊन मित्राकरवी ऑफिस उघडून हरिभाऊंनी त्याना ते पत्र काढून दाखविले तेव्हा कुठे गोखल्यांना समाधान झाले.

गोखल्यांशी या निमित्ताने झालेला परिचय सारखा वाढतच गेला. आणि त्याच्याकडून डेक्कन एज्युकेशन सोसासटीतील फर्ग्युसन कॉलेजमध्ये नित्य घडणाऱ्या घटनाची माहिती हरिभाऊंना दररोजच्या

बैठकीत मिळू लागली. 'सुधारक' आणि 'केसरी' यांमध्ये ज्या टाकांच्या फेकी नित्यश: होत त्यांचे पडसाद कॉलेजमध्ये कशा रीतीने उमटत, प्रसंगी टिळक-आगरकर एमेकांशी वादविवाद करायला तयार कसे होत, त्यावेळी गोपाळराव गोखले मध्ये पडून वादामध्ये वैयक्तिक टीका न होता तात्त्विक खल व्हावा, याची दक्षता कशी घेत......

याच सुमारास टिळकांनी फर्ग्युसन कॉलेज सोडले, त्या विषयावर बोलताना हरिभाऊ गोखल्यांना म्हणाले,

"काय गोपाळराव, टिळकांनी नामजोश्यांना हाती धरून आगरकरांस 'केसरी'तून बाहेर काढलं, त्याचा सूड म्हणून आगरकरांनी तुम्हांस हाती धरून टिळकांना डेक्कन एज्युकेशन सोसायटीतून बाहेर काढलं, अशा वावड्या सबंध पुण्यात उठल्या आहेत, ते खरं का ?"

"काय भयंकर लोक असतात एकेक !"

"मग बरोबर काय घडलं !"

"त्याचं असं झालं. डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन झाली, त्यावेळी जरुरीपुरतं अल्प वेतन घेऊन प्रत्येकानं स्वार्थत्यागपूर्वक संस्थेला आजन्म वाहून घ्यावं, असं ठरलं होतं. परंतु सध्या फर्ग्युसन कॉलेज निघाल्यापासून संस्थेची आर्थिक स्थिती बरी असल्यानं थोडीशी पगारवाढ करावी, असा ठराव पास झाला, तो टिळकांना रुचला नाही म्हणून त्यांनी राजिनामा दिला."

"पण काय हो गोखले, तुम्हांला असं वाटत नाही का की या बाबतीत टिळकांचं वागणं अधिक बाणेदारपणाचं व स्वार्थत्यागाचं आहे ?"

"नाही कोण म्हणतो ! आगरकरांनीही तेच बोलून दाखविलं. मी तरी संस्थेत प्राध्यापक म्हणून आलो, तो टिळक, आगरकर यांच्या स्वार्थत्यागानं भारावूनच ! संस्थेच्या संस्थापकांची स्वार्थत्यागाची भावना आमच्यात नाही असं नाही, परंतु इतरही काही गोष्टी विचारात घ्यायच्या असतात."

"ते काहीही असो. पुण्याच्या लोकांमध्ये सध्या टिळकांची किंमत या राजीनाम्याच्या प्रकारामुळं व संमतीवयाच्या चळवळीच्या वेळी त्यांनी जे बाणेदार वर्तन केलं, त्यामुळे खूपच वाढली आहे !"

"पण हरिभाऊ, संमतीवयाच्या चळवळीमध्ये टिळकांनी काहीसा वाकडा मार्ग स्वीकारला, आणि तुम्ही त्यामध्ये चुकून ओढले गेलात, असं मला वाटतं."

"ते कसे ?"

"अहो त्याची मोठी गंमतच झाली. ह्या चळवळीला उग्र स्वरूप आलं, त्यावेळी कायदेशीर सल्ला घेण्यासाठी टिळकांनी आमच्या अण्णासाहेबांना बोलावून घेतलं......"

"पण काय हो, अण्णासाहेब आणि टिळक यांचा इतका स्नेह जमला तरी कसा आणि केव्हा ?"

"अण्णासाहेबांना पाठीच्या मणक्याचा विकार झाला म्हणून हवा बदलण्यासाठी आण्णांनी एक लोणावळ्याला व नंतर काही दिवसांनी सिंहगडला एक असे बंगले घेतले. सिंहगडावर त्यांची आणि टिळकांची चांगलीच जानपछान झाली. हल्ली आमच्या अण्णांची वृत्तीही नाही म्हटली तरी सनातनीच झाली आहे. टिळकही पक्के सनातनीच आहेत, हे आपल्याला ठाऊकच आहे. अण्णासाहेबांनी आल्याआल्याच मला बोलावून विचारलं, "हरिभाऊ, तुझे 'ज्ञानप्रकाश' मधले लेख

## हे पोरगं इथेही आहे



'हरी नारायण' या कादंबरीचे लेखक प्रा. भीमराव कुलकर्णी यांनी लिहिलेल्या '**माणूस बोलू लागला**' या पुस्तकास महाराष्ट्र सरकारने दोन हजार रुपयांचे पारितोषिक जाहीर केले आहे याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो.

'हे पोरगं अनेक ठिकाणी असतं' अशी तक्रार 'ललित' मासिकाने नुकतीच केली होती. तक्रारीला आणखी एक जागा झाली एवढेच. –सं.

वाचले. अरे राजकारणाच्या क्षेत्रात तुला अजून फारसं कळत नाही. अरे सरकारला कायदा करण्याची संधी द्यायला आम्ही काय वोळचानं दूध पितो काय रे !' परंतु माझा स्वभाव माहीत असल्यामुळे त्यांच्या टिळकांबरोबर तिसऱ्या मजल्यावर वाटाघाटी सुरू झाल्या आणि माझे मित्र पानसे, जोशी यांच्याबरोबर आम्ही दुसऱ्या मजल्यावर बसलो."

"मग तुम्ही टिळकांच्या पत्रकावर सही कशी केलीत ?"

"आमची चर्चा चालू असता एकदा टिळक मध्येच आमच्या खोलीत आले. आणि म्हणाले, 'हरिभाऊ, या संमतीवयामध्ये मुलीच्या लग्नाचं वय एखाद्या-दुसऱ्या वर्षानं वाढविण्यासाठीं कायदा करावा अशी ओरड चालू आहे. पण मी म्हणतो, मुलीचं वय सोळा वर्षाचं झाल्याशिवाय आपण तिचा विवाह करणार नाही, अशी आपण सर्वांनीच प्रतिज्ञा केली तर सरकारला या बाबतीत हात घालण्यास कसलीच संधी मिळणार नाही, होय ना ?"

मी एकदम मानेनेच होय म्हटलं आणि त्यावेळी टिळकांनी आपल्यासमोर तशा अर्थाचं पत्रक टाकलं व म्हटलं,

"आपटे, तुम्हांला अद्याप मूलबाळ काही नाही, परंतु मला मुलगी असूनही मी प्रतिज्ञा घ्यावयास तयार आहे. वोला, आहे तुमची हिंमत ?

टिळकांच्या हल्ल्यानं सगळेच बावचळले परंतु मी मोठ्या ऐटीत त्यावर सही ठोकली.'

"आपटे, तुम्ही फसलात असं मी म्हटलं मी, ते म्हणूनच !" गोखले म्हणाले, "अहो, संमतीवयाला अनुकूल असणाऱ्यांचं पारडं जड होऊ लागलं, तेव्हा लोकमत आपल्याकडे ओढून घेऊन सुधारकांची फजिती करण्यासाठी टिळकांनी हा मोठा विचित्र पेच टाकला. अहो, रानड्यांनी कितीतरी अगोदर ही सूचना केली होती, परंतु ते श्रेय त्यांना रानड्यांना द्यावयाचं नव्हतं !"

"हात्तीच्या ! आम्हांला तुमच्या राजकारणाचे एवढे बारीकसारीक छक्केपंजे ठाऊक नव्हते बुवा ! एकूण टिळकांनी इथेही आगरकरांवर मात केली म्हणायची !"

"अहो कसली मात आणि काय घेऊन बसलाहात ? टिळकांनी या प्रकरणात मोठा कावा लढविला ' तरी आपल्या मुलीचं लग्न सोळा

वर्षांच्या आत करणार नाही ' ही टिळकाची प्रतिज्ञा वाचून आगरकरांना मोठा आनंद झाला. टिळकाच याबाबतीत प्रत्यक्ष जाऊन अभिनंदन करावं, असही त्यानी मजजवळ बोलून दाखविल ! "

" काय पण बेरकी आहेत हो दोघे ! 'केसरी-सुधारका'तून साता जन्मीच्या शत्रूप्रमाणे हे दोघे एकमेकावर तुटून पडतात आणि..."

" अहो त्यातच गमत आहे. माधवराव रानडे मला परवा सहज बोलता बोलता म्हणाले, 'गोखले, हे टिळक-आगरकर लोकांना अद्याप नीट समजले नाहीत. मी त्यांना केव्हाच ओळखलंय. आपल्यामुळे 'केसरी' मध्ये वितुष्ट येऊ नये म्हणून आगरकरांनी 'केसरी' सोडला आणि आपल्यामुळे डेक्कन एज्युकेशन सोसायटीत विनाकारण वादंग माजू नये म्हणून टिळकानी राजीनामा दिला. जणूकाही परमेश्वरी इच्छेप्रमाणे एकमेकांच्या हितासाठीच असं वर्तन केलं. बाकीची कारण म्हणजे नुसती निमित्तमात्र ! "

गोखल्याचे अखेरचे शब्द हरिभाऊंच्या कानामध्ये कितीतरी वेळ गुणगुणत होते.

एके दिवशी गोपाळराव गोखल्याकडून हरिभाऊकडे एक माणूस चिठ्ठी घेऊन आला. आगरकराकडे काही निमित्ताने हरिभाऊना चहाचे निमंत्रण होते.

हरिभाऊ मुद्दाम मोठ्या अगत्याने आगरकराकडे गेले. गोविंदराव कानिटकर, काशीताई कानिटकर, माधवराव रानडे व त्याच्या पत्नीही आल्या होत्या आणि गोखलेही होतेच.

आगरकराचा एकदर थाट पूर्वी शाळेत असल्याप्रमाणेच अतिशय साधा होता. दम्याच्या विकारामुळे ते बरेच खगलेले दिसत होते आणि अंगातल्या साध्या बाराबदीमुळे ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रोफेसर असतील असे स्वप्नातही वाटले नसते. भरदार मिशामुळे ते काहीसे उग्र भासत असले तरी त्याची बोलण्याचालण्याची रीत अतिशय सौजन्याची व सभ्यतेची होती. सुधारक आगरकराचे घर काही निराळेच असेल, अशी हरिभाऊची आपली कल्पना होती. परंतु त्याच्या घरी तर देवघरापासून सगळे काही व्यवस्थित होते. पुरुषमडळी बाहेरच्या खोलीत गप्पा मारीत बसली असता मध्येच हरिभाऊना काशीताईंनी बोलावले,

" हरिभाऊ, तुम्ही असे नीट प्रकाशात क्षणभर उभे राहा. "

" आ, हे काय नवीन ! "

" रमावहिनीना तुम्हांला पाहायचं आहे ! "

" कोण रमावहिनी ? "

" रानड्याच्या ! 'पण लक्षात कोण घेतो !' रचणाऱ्याची मूर्ती त्याना बघायची आहे ! "

" छे, काहीतरीच ! "

" झाल, सपलं काम ! आता तुम्ही जाऊ शकता ! " हरिभाऊ बैठकीत येऊन गोखल्याशेजारी बसले.

" काय हरिभाऊ, बहिणभावाचं कसलं हितगुज चालल होत ? " आगरकरानी थट्टेने विचारले, तेव्हा आगरकराना हे नाते कसे कळले, याचे हरिभाऊना आश्चर्य वाटले.

" आम्हाला गोविंदरावानी सागितलं आहे अगोदरच ! आम्ही सुद्धा हरिभाऊ तुमची ती कादंबरी वाचतो ! तुम्ही दुसरी कादंबरी 'म्हैसूरचा वाघ' मात्र नियमान देता आणि मध्येच केव्हातरी 'पण लक्षात–' चं पुढचं प्रकरण छापत नाही, तेव्हा आमचाही विरस होतो."

रानडे हसत हसत म्हणाले. तेव्हा हरिभाऊ एखाद्या लहान मुलाप्रमाणे जमिनीकडे पाहू लागले.

जुन्या आठवणीने हरिभाऊ रंगले हे पाहताच गोविंदराव काहीसे सुखावले. त्यानी गोपाळरावाचे पत्रही त्याचे हाती दिले.

## : १२ :

हरिभाऊ अण्णासाहेबाच्या बगीत बसून पुत्रमुख पाहण्यासाठी गोखल्याच्या घरी आले होते.

काही तासापूर्वी जन्माला आलेल्या गोळचाला चुलते-पुतणे निरखीत होते. 'हरी, मला सारखी लक्ष्मीवहिनीची आणि तुझ्या काकूची आठवण येते बघ... " अण्णासाहेब म्हणाले, आणि त्याच्या डोळयात पाणी तरळले.

अण्णासाहेब गेल्या काही दिवसात आजारी पडल्यापासून खूपच हळवे झाले होते.

" मुली, संभाळून राहा बरं ! "

मथूचा निरोप घेऊन अण्णासाहेब झटकन खोलीबाहेर पडले. आपल्याला मुलगा झाला, या आनंदात हरिभाऊ आठवडाभर मोठ्या खुशीत होते.

त्यामुळें चिमामावशीबरोबर गप्पागोष्टी रगू लागल्या.

" मावशी, हरीनं 'करमणुकी 'त काय छान कादंबरी लिहावयास सुरुवात केली आहे. मला तर ती वाचताना माझ्या लहानपणची सारखी आठवण आली बघ ! " अण्णासाहेब जेवताना म्हणाले.

" मी कसली ती तुमची कादंबरी का फादंबरी वाचत्ये ! माझ्याजवळ नको हो असले थेर ! "

" अग पण त्यात थेर बीर काही नाहीत हो ! त्यामधे त्यानं लक्ष्मीवहिनीचं असं चित्र काढलं आहे की ते वाचताना डोळयात पाणी आल बघ ! "

" पण काय रे हरी, नानानी वाचली की नाही ती प्रकरणं !

" मला ठाऊक नाही. "

" म्हणजे नारायणाचही वर्णन यात केलं आहे का ! जळ्ळं मेल; आपल्या घरच्या लोकाबद्दल काहीतरी लिहायचं म्हणजे काय ? " चिमामावशी फणकाऱ्याने म्हणाल्या. " नाही ग मावशी ! तुझं आपलं नेहमी काहीतरीच बोलणं !"

" म्हणजे यानं त्यामधे असं काय लिहिलं आहे रे ? तुला आज अचानक एवढं प्रेम वाटायला लागलय म्हणजे तात्यान काही विशेषच केलं असल पाहिजे." चिमामावशी कौतुकाने हरीकडे पहात म्हणाल्या. अण्णासाहेब जोरजोराने हसू लागले.

" मावशी, तुझ्या नातसुनेला चार बुक वाचायला शिकू दिली असतीस तर तुझ्या या नातवाचं कौतुक तिनं वाचून दाखविलं नसतं का ? "

गप्पाष्टकात जेवण रगत चालले होते. तोच दाराशी गोखल्यांकडील निरोप घेऊन एक माणूस आला. हरिभाऊ पानावरून उठून दाराशी आले.

" गोखल्याच्या घरी असाल तसं बोलावलं आहे—"

" काय झालं—" हरिभाऊनी घाबरून विचारले. तो माणूस बोलेना. तेव्हा हरिभाऊ जोराने म्हणाले —

" काय झालं ? हिला बरं नाही का ? का बाळाला तापबिप चढलाय ? "

" मथुराबाईचा जीव घाबरलाय. "

हरिभाऊंनी शर्ट अडकवला आणि ते गोखल्यांच्या घराच्या दिशेने धावत सुटले. हरिभाऊंनी गोखल्यांच्या पडवीत पाऊल टाकले मात्र–त्यांच्या सासऱ्याने त्यांना मिठी मारून– " हरिभाऊ ! मथू गेली ऽ " म्हणून हंबरडा फोडला.

सासऱ्यांना दूर करून हरिभाऊ आत गेले. मथूचा निश्चल देह झाकलेला होता आणि तिची आजी आर्त स्वरात आक्रोश करीत होती. परंतु मथू आपल्याला सोडून गेली, यावर विश्वास ठेवण्यास त्यांचे मन तयार होईना. ते वेड्यासारखे जवळ जाऊन एकसारखे तिला हाका मारू लागले.

हरिभाऊंना दूर करून मथूचा मृतदेह उचलण्यात आला. तेव्हा दुःखावेगाने हरिभाऊंनी टाहो फोडला आणि ते मूर्च्छा येऊन खाली कोसळले.

मृताला अग्नी देताना त्यांचा हात थरथर कापू लागला आणि डोळ्यांतून अखंड अश्रुपात चाललेला असता त्यांचे अंतःकरण आतून दुःखावेगाने म्हणत होते–" मथू, तू आमच्या घरी फार सहन केलंस ग ! तुझी कोणतीच इच्छा हा नतद्रष्ट हरी पुरी करू शकला नाही. तू काहीही म्हटलंस तरी या दुष्ट हरीनं ती गोष्ट थट्टेवारी न्यावी ! तू फार सहनशील आणि मोठी भावडी होतीस, म्हणून हे सारं सहन केलंस ! मथू, हा हरी तुझा अनंत अपराधी आहे त्याला क्षमा कर, तू त्याला अनंत वेळ क्षमा करूनही त्याच्या अपराधाला आता क्षमा नाही. "

मथू गेली आणि मूलही अतिशय अशक्त होते. आईच्या दुधाविना ते रात्रंदिवस किरकिर करू लागले. हरिभाऊंच्या आत्याने रात्रंदिवस त्याला मांडीवर घेऊन बसावे आणि हरिभाऊंनी जवळ बसून त्याकडे पहावे. बाळ जागे आहेसे दिसले की त्याला मांडीवर घेऊन खेळवावे. रात्री बराच वेळ त्याला दोन्ही हातांवर धरून त्याच्याशी एकटेच खूप बडबडावे आणि मथूची आठवण झाली किंवा काहीही करून बाळाचे रडे थांबले नाही तर लहान मुलासारखे हरिभाऊंनीच अश्रू ढाळायला सुरुवात करावी.

घरातल्या लोकांना बाळापेक्षा हरिभाऊंचीच काळजी वाटू लागली.

बहुतेक एक दिवसाआड काशीताई समाचाराला येत. एकदा त्या आल्या त्यावेळी हरिभाऊ बाळाशी दंगले होते. बाळही कधी नाही तितके सारखे हसत होते आणि हरिभाऊंना साथ देत होते.

काशीताईंना पाहून जे थांबले आणि म्हणाले, " बघा गुलाम कसा आज सारखा हसतो आहे ! " पण दैव हरिभाऊंना हसत होते. एके-दिवशी सायंकाळी बाळाला ताप भरून ते निपचित पडले आणि फारसे इलाज होण्यापूर्वी दुसऱ्या दिवशी देवाघरी गेले !

हरिभाऊ बाळाला मांडीवर घेऊन शून्य मनाने त्याच्याकडे पहात होते. बाहेर मित्रमंडळी खाली मान घालून उभी होती. बराच वेळ बाळाला बाहेर नेण्यासाठी कोणाला ते हातही लावू देईनात. " भाऊ ! " काशीताईंनी हलकेच हाक मारली आणि एकादा बांध फुटावा त्याप्रमाणे हरिभाऊंनी हंबरडा फोडला.

* * *



गोपाळराव जोशी दरवाज्यात उभे होते... !

## : १३ :

" **मी** गोपाळ ! आत येऊ का ? "

रावसाहेब रानड्यांच्याकडे गप्पा भर रंगात आल्या असता कोणी-तरी दारावर टकटक केले आणि बाहेरूनच प्रश्न विचारला,

" हा कोण गोपाळ बुवा ? " रानडे विनोदाने म्हणाले.

रावसाहेब रानड्यांच्या या उद्‌गारांनी मंडळीत किंचित हशा पिकला. रानडे अशा प्रकारे गमतीने बोलले हे हरिभाऊंच्या दृष्टीने विशेष होते. कारण नेहमी संथ, पोक्त आणि विचारपूर्वक बोलण्या-बद्दल त्यांची विशेष ख्याती त्यांनी ऐकली होती.

इतक्यात नोकराने पुढे जाऊन दार उघडले. गोपाळराव जोशी दरवाज्यात दत्त उभे होते.

गोपाळरावांना पाहून गोविंदराव कानिटकरांच्या हातातला कप तसाच राहिला. संतापाची एक सूक्ष्म लकेर त्यांच्या मनात चमकारून गेली. मात्र त्यांच्या पोषाखाकडे पाहून रमाबाईवहिनीसाहेबांनी तोंडाला पदर लावला. पायांत उंची प्रकारचे बूट व लोकरी पँट घातलेल्या या इसमाने अंगावर बाराबंदी चढविली होती व डोक्यावर मुसलमानी पद्धतीची उंच केसाळ टोपी तिरकी ठेवून दिली होती.

गेले सात-आठ महिने हा इसम पुण्यातील सगळ्या सुधारकांमागे हात धुऊन लागला होता. वास्तविक अतिशय हुशार व अत्याधुनिक विचारसरणीच्या गोपाळरावाला भलत्या वेळी कोणाची कशाप्रकारे थट्टा करावी याची केव्हा लहर येईल याचा नेम नव्हता. इतर सुधारकांनी हौसेखातर आपल्या बायकोला नुकते कुठेच र ट फ शिकवावयास सुरुवात केली होती, त्यावेळी यांनी आपल्या पत्नीस अमेरिकेस नेऊन तिथल्या विद्यापीठात शिक्षण घेण्यास तिला प्रोत्सा-हन देऊन डॉक्टर केले होते. आधुनिक सुशिक्षित स्त्रियांमध्ये गेली दहा

वर्षे पुण्यास ठाण देऊन बसलेल्या पंडिता रमाबाईनंतर आजकाल गोपाळराव जोश्याची पत्नी डॉ. आनंदीबाई जोशी याचे नाव घेतले जात असे. संस्कृत विद्येत पंडिता रमाबाईंचा हात धरणारा कोणी नव्हता, परंतु मध्यतरी अमेरिकेस जाऊन त्या ख्रिस्ती होऊन आल्या होत्या. परंतु अत्यत प्रतिकूल परिस्थितीत राहूनही गोपाळराव व आनदीबाई धर्मांतर केल्याशिवाय परत आले, त्यावेळी सगळ्या सुधारकानी त्यांना डोक्यावर घेतले होते.

पुण्यामध्ये चाललेल्या सुधारकी चळवळींना एकदम मोठा धक्का द्यावा म्हणून या इसमाने एकदा वर्तमानपत्रात मोठी जाहिरात देऊन जाहीरपणे संगमावर जाऊन एका ख्रिश्चन पाद्र्याकडून बाप्तिस्मा घेतला होता आणि दोन-चार दिवसातच आपण पुन्हा धर्मांतर करून परत हिंदुधर्मात आल्याचे जाहीर केले. मध्येच एकदा त्यांनी पुण्यात जाहीरपणे गर्दभ राजा-राणीची एक जोडी शोधून आणून मोठा माडव घालून त्यांचा विवाहसमारंभ साजरा केला व त्यात वरपित्याचा मान स्वतःकडे घेऊन एकदर समारभाचे फोटो वृत्तपत्रातून प्रसिद्ध करून सबंध पुणे शहरात धमाल उडवून दिली. परंतु त्याच्या या एकंदर चाळ्यांमुळे पुण्यातील ब्राह्मणानी त्यांजवर बहिष्कार टाकल्यासारखे केले होते. ते कुणाच्या घरी येताना दिसले की मडळी दरवाजे बंद करून घेत. मोठमोठ्यांच्या घरी तर देवडी-वरच त्याना थोपवून धरण्यात येई. मला प्रायश्चित्त देऊन परत आपल्या धर्मात घ्या म्हटले तर लोक त्यांची थट्टा करीत. त्याना दुरून प्यावयास पाणी घातले किंवा त्यांच्याशी नुसते संभाषण केले तरी ही गोष्ट धर्मबाह्य झाली असे म्हणण्यापर्यंत पोटार्थी भिक्षुक मंडळींची नजर गेली होती. रानड्यांसारखे चारदोन सुधारकच काय ते त्यांना जवळ फिरकू देत.

सहा महिन्यापूर्वी त्यानी पुण्यांतील पचहौद मिशनतर्फे नामांकित अशा शभर एक व्यक्तींना व्याख्यानास बोलाविले. व्याख्यान सपल्या-नंतर पाश्चात्य रीतिरीवाजांप्रमाणे सगळ्यांसमोर ख्रिस्ती बायांतर्फे चहा–बिस्कुटे ठेवण्यात आली. बऱ्याच जणांनी त्यावर ताव मारला, परंतु कित्येक जणानी पुढे केलेले पेले हातात घेऊन तसेच ठेवून दिले होते. समारभ संपल्यानतर गोपाळराव जोश्यानी 'पुणे-वैभव' मध्ये एकदर समारंभास हजर असलेल्या व्यक्तींची यादी प्रसिद्ध करून पुढे लिहिले होते,

> "हे रावसाहेब आणि रावबहादूर सुधारक लोक प्रत्यक्ष महारानी बनविलेल्या पण गोऱ्या मडमानी लुसलुशीत हातानी आपल्या हातात आलेला चहा पिऊन मिटक्या मारीत व ढेकरा देत आपापल्या घरी निघून गेले, ही गोष्ट आमच्या पुणेकर सनातन धर्माभिमान्यांस आणि ब्रह्मवृंदास रुचते तरी कशी? हे रावसाहेब व रावबहादूर मोठमोठे हुद्देदार आहेत म्हणून की काय याच्या घरी जाऊन वर्षातून दहापाच वेळा पक्वान्ने झोडण्यास आणि भरपूर दक्षणा घेण्यास मिळते, तेव्हा त्याचे नाव ही भिक्षुक मडळी कशाला काढते! गप्पच बसावयाची. गोपाळराव जोशासारखा एखादा निर्धन मनुष्य अमेरिकेतून किंवा विलायतेहून जाऊन आला की लागले त्याच्या पाठीस. त्याच्या पंगतीला जाऊन बसण्याचा शब्द काढला तर पाप लागते, आणि ख्रिस्त्याच्या हातचे वाटेल ते खाणारे यजमान खुशाल चालतात!"

गोपाळरावाच्या या साऱ्या करामतीचे परिणाम प्रत्यक्ष रोत्या सगळेच सुधारक भोगत असल्यामुळे त्याच्या आगमनानतर मडळी एकदम गप्प बसली.

"काय मडळी, मी तुमच्या सभाषणात व्यत्यय नाही ना आणला?" गोपाळरावांनी विचारले.

"तो तुमचा धर्मच आहे." मध्येच गोविंदराव म्हणाले.

परंतु प्रकरण फारसे चिघळू न देता माधवरावानी आपल्या नेह-मीच्या मुत्सद्देगिरीने संभाषण्याचा ओघ चालू ठेवला.

"रावसाहेब, मी बुभुक्षा आहे' पोटावरून हात फिरवीत गोपाळ-राव म्हणाले.

माधवरावानी रमाबाईंकडे पाहिले. नाखुषीनेच स्वयंपाकघरातील ब्राह्मणाला निरोप देण्यासाठी त्या आत वळल्या.

गोपाळराव आत गेलेले पाहून माधवराव हळूच गोविंदरावाना म्हणाले,

"गोविंदराव, हरिभाऊ आपटयांबरोबर तुम्हांला मी जेवावयास एवढ्याचसाठी बोलाविलं होतं की..." पुढे बोलण्याअगोदर त्यानी एकदा हरिभाऊकडे नजर टाकली. हरिभाऊ शांतपणे तक्क्याला टेकून निद्राधीन झाले होते.

"रात्रभर झोपत नाहीत..." काशीताई म्हणाल्या.

झाली ही गोष्ट बरीच झाली या भावनेने रानडे म्हणाले, "आमच्या रावसाहेब साठ्याची कन्या हरिभाऊंसाठी तुम्हाला कशी काय वाटते?'

'नको बाई, ती तर सुधारकाची मुलगी. आपट्याच्या घरात चालायची नाही ती.'

"पण माधवराव आपटयांचं मन वळविण्याच काम माझ्याकडे लागलं."

"त्याचा काही उपयोग नाही. त्याच्या घरी माधवरावाची एक मावशी राहते. मोठी कर्तबगार व मानी स्त्री आहे. तिच्या संमती-वाचून त्याच्या घरचं पान हलावायचं नाही."

"तुमच्यासारख्यानी सागून पाहिलं तर..."

"मुळीच नाही. आपल्या पहिल्या पत्नीला शिकविण्याची हरि-भाऊंची खूपच हौस होती, परतु त्याच्या या आजेमावशीनं काही म्हटल्या काही जमू दिलं नाही. तिला शिकण्याची गोडी लागावी म्हणून सगळे प्रयत्न त्यानी केले परतु त्याचं काही चाललं नाही. एकदा माझ्याबरोबर चुकून पंडिता रमाबाईंच्या व्याख्यानाला ती आली होती म्हणून तिला घरात आठ दिवस कुठंही हात लावण्यास बदी करण्यात आली होती! हरिभाऊनी एकदा पंडिता रमाबाईंना घेऊन मला त्याच्यां घरी बोलावल होतं, त्याची कुणकुण घरी लागली तेव्हा तर त्या म्हणाल्या,

"तात्या, असली बाटगी बाई माझ्या घरी आलेली चालायची नाही. मी ताकीद देऊन ठेवते. तशातही तू हट्टानं इथे तिला आण-लीस तर मी तिच्यावर शिव्याचा भडिमार करीन. बघ बरं, कधी सोडायची नाही. तुला असले ढंग करायचे असतील तर खुशाल आपल्या बायकोला घेऊन बाहेर चालता हो. माझं काय व्हायचं असेल ते होईल. माझे डोळे मिटायच्या आधी हे प्रकार इथे चालायचे नाहीत.

तुला जर त्या अवदसेचे पाय या घरी लागायला हवे असतील तर मला नि बगूताईला अगोदर ओंकारेश्वराला पोचव; मग घरात पाहिजे तो गोंधळ घाल. आता तू जा आणखी माझ्या इथे येऊ नको म्हणून तिला साग. तुला बोलवायला कुणी सागितलं होतं ? आपलं ज्यानं उठावं त्यानं बायकाना शिकवाव ! दुसरं काही राह्यलंच नाही मेल्यांना करायला. तुम्ही मरा आता बागड्या ! तुम्ही काय दिवे लावले ते आता जगजाहीरच आहे. मडम राडेची– किरिस्ताव..."

"मग मी आपली सूचना माग घेतो." रानडे म्हणाले.

"हां, तेच बर; म्हणजे अधूनमधून त्यांच्या घरी हक्कानं पूर्वीप्रमाणेच जाता येईल." काशीताई म्हणाल्या.

इतक्यात गोपाळरावांची स्वारी ढेकरा देत बाहेर आली. "रावसाहेब, पुण्यामध्ये तुम्हा सुधारकाची शकराचार्यांतर्फे जाहीर चौकशी होणार आहे. चौकशी करण्यासाठी राजाच्या हुजऱ्याप्रमाणे शंकराचार्यांचे दूत पुण्यात येऊन ठाकले आहेत, तेव्हा हुश्शाऽर राहा."

* * *

*त्या दिवशी संध्याकाळीच तांबडतोब निघून ये, म्हणून पुण्याहून* अण्णासाहेबांची तार आली आणि तातडीने हरिभाऊ पुण्यास निघून आले. घरी नानासाहेब, अण्णासाहेब आणि इतर सर्व बायकामंडळी हरिभाऊंच्या लग्नाचा विचार करण्यासाठी मुद्दाम जमली होती. जवळ जवळ त्यासाठी खास बैठकच जमली होती.

"तात्या, शक्य तितक्या लवकर तू लग्न करावंस या इच्छेनं आम्ही सर्व तुला चार शब्द सांगावेत या इच्छेन जमलो आहोत. मी जरी सुधारकी बाण्याचा असलो तरी तरुणपणी पहिली पत्नी निवर्तल्यावर ताबडतोब दुसऱ्या मुलीशी विवाह उरकला पाहिजे, हे माझं ठाम मत बनलं आहे."

"झाले की आता सहा महिने..." मध्येच एक आत्या म्हणाली.

"हरी, तुझ्या मनात काय आहे, ते एकदा पक्कं कळू दे." नानासाहेब थोड्याशा करड्या स्वरात म्हणाले.

"मला लग्न करायच नाही."

"काहीतरी वेड्यासारखं नको रे बोलू !" चिमामावशी.

"अगदी पक्का विचार करून ठरविलस ना ?" नानासाहेब.

"हो."

"मग आमचा नाइलाज आहे. तुम्ही दिवसेदिवस फार शहाणे होत चालला आहात ! तेव्हा तुमचं तुम्ही पाहून घ्या." नानासाहेब रागारागाने उठून बैठकीतून चालते झाले.

हरिभाऊंच्या मनातील मथूची आठवण काही केल्या जात नव्हती आणि त्याबद्दल त्याना वेड्यात काढण्यात येत होते. खरोखर पुरुष म्हटला म्हणजे तो कठोरहृदयीच हवा काय? एखाद्या स्त्रीला अकाली वैधव्य आले म्हणजे मरेपर्यंत तिने अभद्र रूप घेऊन पतीचें रूप आठवीत बसावें आणि पुरुषाने मात्र ताबडतोब पहिलीला विसरून दुसरीच्या तयारीला लागावे का ?

ही अशी दुष्ट रूढी कोणी निर्माण केली ? ते स्वतःलाच विचारू लागले. आनंदाश्रमामध्ये त्यांची भेट घेण्यासाठी गोपाळराव गोखले व नानासाहेब पानसे आले तेव्हा हरिभाऊ म्हणाले,

"गोपाळराव, एखाद्या विधवेनं आयुष्यभर पतिस्मरणात दिवस घालवावे, तसे एकाद्या पुरुषान आयुष्यभर स्वस्त्रीच्या स्मृती हृदयकोशात साठवून त्याचं निरंतर स्मरण करीत का जगू नये ?"

"हरिभाऊ, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. ज्याला जमेल त्यानं तसं अवश्य कराव."

इकडे चिमामावशीना मात्र आयाबायांनी अगदी हैराण करून सोडले. ओसरीवर दुपारी वाती वळीत बसल्या किंवा देवळातून पुराणाला गेल्या की शेजाऱ्या-पाजाऱ्यानी त्यांना 'हरी विधवेशी लग्न करणार आहे म्हणे, खरे आहे काय ?' असे विचारावे आणि ते ऐकून त्याच्या अंगाची काहिली व्हावी, असे प्रकार नित्य घडून यावे.

"तात्या, आम्हांला बाहेर कोणी तोंड नाहीरे काढू देत. का तुला इतका मागपणा आला आहे ? तू पूर्वी कधी असं करीत नव्हतास रे ! या सुधारकानी आमचं वाटोळं करायचं ठरविलं आहे !" डोळयांत पाणी आणून त्यांनी हरिभाऊंना म्हणावे.

"मावशी, माझ्या हातून एखादी तरी वावगी गोष्ट कधी घडली का ? तू नुसत्या लोकाच्या सांगीवागीवर बरीक जाऊ नकोस म्हणजे झालं !"

"लोकं काही खोटं का येऊन सांगणार आहेत ? ते जळो मेलं. लोक काही का सागेनात, तू आपला मी सांगते तसं लग्नाला मुकाट्यान उभा राहा पाहू !"

आणि चिमामावशीचा हा कळकळीचा तणाणा चालू झाला की हरिभाऊ आनंदाश्रमाला निघून जात.

परतु फार दिवस असे करून चालणार नव्हते. बगूताई दिवसेदिवस क्षीण होत चालली होती. एके दिवशी तर घरात झालेला चुलीचा धूर डोळ्यात जाऊन त्यांनी डोळे पाढरे केले. त्यावेळी आनंदाश्रमाला न जाता बराच वेळ हरिभाऊ तिच्याजवळ बसून राहिले. जवळ दुसरे कोणी नसून फक्त हरिभाऊच आहेत असे पाहून ती एकदम आवेगाने उठून बसली आणि हरिभाऊंचा हात हातात धरून ती म्हणाली,

"तात्या, आता मी चार दिवसांची सोबतीण..."

"छे ग... !" डोळ्यात आसवे आणून हरिभाऊ म्हणाले.

"नाही रे बाबा, आता दिवस सपत आले. मरण्यापूर्वी तुझे दोनीचे चार हात झालेले पाहीन म्हणते. करशील का रे एवढी माझी इच्छा पूर्ण ?"

हरिभाऊंच्या डोळ्यांतून संतत अश्रुधारा सुरू झाल्या. बगूताईंनाही मोठा हुदका आला.

"बाळा, एवढ्याशा जीवनात पाडुरंगानं फार भोगायला लावलं रे ! मी कधी तुझ्याकडे काही मागितलं नाही. एवढी एकच भीक घाल तू माझ्या ओटीत..."

"आजी" हरिभाऊ एकदम आवेगाने म्हणाले, "तू सागशील ते मी करणार नाही असं कधी झालय का ग ? पण..."

हरिभाऊंच्या हुदक्यामध्ये आजीला पुढचा 'पण' ऐकू आला नव्हता.

—बगूआजीची प्रकृती त्यानंतर म्हणावी तशी कधी सुधारलीच नाही. जेवण झाल्यानंतर रात्री आनंदाश्रमात झोपी जाण्यापूर्वी हरिभाऊ तिच्या उशाशी थोडा वेळ बसून मग बाहेर पडत.

त्या दिवशी रात्री बराच वेळपर्यंत ते लिहिण्याच्या निमित्ताने जागले होते, परंतु लिहिणे काही होत नव्हते. रात्रीची वेळ बरीच झाली तेव्हा त्याच्या डोळ्यासमोरून बगूआजीचे चित्र तरळू लागले.

अगदी लहानपणापासून हरिभाऊंना आजीने तळहातावरील फोडा-प्रमाणे वाढविले होते. काही दिवसांपूर्वीच तिने दर्शविलेली इच्छा त्यांच्या मनात एकदम उभी राहिली आणि आजीने आपल्याला आवेगाने मिठी मारली आहे आणि तिच्या स्पर्शाने आपले गात्रन् गात्र पुलकित झाले आहे असे वाटू लागले न लागले तोच तिला काही तरी बोलावयाचे आहे व बोलता मात्र येत नाही अशी तिची अवस्था दिसू लागली. खुणेनेच तिने हरिभाऊंना खाली वाकावयास सागितले आणि हरिभाऊंनी कान तोंडाजवळ नेताच एकदा तिने डोळे भरून त्यांना पाहून घेतले आणि—

"बाळा, आता मी जाते रे. चिमाला अंतर देऊ नकोस." असे उद्‌गार काढले व गपकन् डोळे मिटून तिची मान खाली ओघळली. समोर टेबलावर ठेवलेले घड्याळ धक्क्याने त्याचवेळी खाली पडले आणि काचेचे तुकडे होऊन ते इतस्ततः पसरले. घाबरून हरिभाऊ जागे झाले. लिहिता लिहिताच टेबलावर मान ठेवून आपण दिवा न विझवताच झोपी गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. रात्रीचे दोन वाजले होते. भीतीने ते तसेच धडधड जिना उतरून खाली आले.

इतक्यात दरवाजावर बाहेरून कोणीतरी थाप मारली. दरवाजा उघडला. "तात्या, चला. बगूआजी......" त्याला पुढे बोलवेना.

हरिभाऊ अनवाणी धावतच घरी गेले. बगूआजीजवळ बसून चिमामावशी "मला रंडकीला एकटीला सोडून कुठे गेलीस ग? तुझ्या लाडक्या हरीला सोडून कुठे गेलीस ग?" अशा आर्तस्वरात हाका मारीत होत्या.

डोळ्यांतून अश्रूंच्या एकसारख्या धारा चालू असताना हरिभाऊंनी मनोमन कसली तरी शपथ घेतली-आणि शपथ घेतल्याबरोबर एक निराळाच चमत्कार घडून आला. कोण जाणे खरोखर तो भास होता का त्यांच्या आजीस त्याची मानसिक स्थिती कळून तसे घडून आले... तिच्या त्या मृत मुखावरील दुःखमय कळा अजीबात नाहीशी होऊन तिच्या चेहऱ्यावर समाधान विलसू लागले. एकाएकी तिची चर्याच पालटली. जणू काही मरणसमयीची तिच्या मनातील मोठीच काळजी दूर झाली व चर्येवरचे चिंतेचे औदासीन्य जाऊन अचानक समाधानाचे स्मित दिसू लागले.

आजीच्या मृत्यूने दुःखी झालेल्या हरिभाऊंविरुद्ध यावेळी काही सनातनी मंडळी निराळेच बेत रचीत होती. दहाव्याच दिवशी हरिभाऊंच्या उपाध्यायाने त्यांच्या घरी कोणीही ब्राह्मण कसलाही विधी करण्यास येणार नसल्याचे सांगितले. 'एक नाही शंभर ब्राह्मण मी आणून उभे करीन!' अण्णासाहेब म्हणाले, परंतु बाकीचे ब्राह्मण आपल्याला वाळीत टाकतील या भीतीने कोणीच येण्याची तयारी दाखवीना, तेव्हा रावसाहेब रानड्यांकडचे भिक्षुक बोलवावे असा बूट निघाला. रावसाहेब रानड्याना वाळीत टाकल्यामुळें त्यांनी शंभर रुपये वर्षासन ठरवून कित्येक ब्राह्मण नोकरीस ठेवून प्रश्न सोडविला होता. एखाद्या सुधारकाच्या घरी काही धर्मक्रिया निघाली की रावसाहेब रानड्यांकडे जावे आणि तेथले शास्त्री आणावे; असा चहा ग्रामण्य प्रकरणापासून पुण्यात व आजूबाजूस नियमच होऊन बसला होता. या प्रकरणात चुकून सनातन्याचे म्होरके म्हणून समजले जाणारे बळवंतराव टिळकही सापडले आणि त्यांच्या घरी कार्य निघाले तेव्हा रानड्यानी आपण होऊन आपले ब्राह्मण त्यांच्याकडे पाठविले. "काही नको रानड्याकडे जायला! कोणी मिळाला नाही तर हातांत पोथ्या घेऊन मी उभा राहीन." शेवटी अण्णासाहेब निकरावर आले.

नानासाहेबाना मात्र एकंदर प्रकारचा खूपच मनःस्ताप होत होता. आपण इतके कर्मठ सनातनी व धार्मिक असताना आपली अशी परवड व्हावी याचे त्याना खूपच वाईट वाटले. वास्तविक मिशनच्या सभेला हरिभाऊ गेले नव्हते, परंतु गोपाळराव जोश्यांनी मुद्दाम वात्रटपणा करून हजर असलेल्या लोकात त्याचे नाव छापलेले होते. आपण हजर असूनही चहा प्यायलो नाही अशी कबुली देणाऱ्या कित्येकाची शंकराचार्यांनी बहिष्कृततेतून सुटका केली. अशावेळी हरिभाऊंनी मी त्या सभेला हजर नव्हतो, अशी नुसती बातमी दिली असती तर सगळे ब्राह्मण त्यांच्याकडे यावयास तयार झाले असते.

"हरी, मुकाट्याने मी त्या सभेस हजर नव्हतो अशी बातमी दे बघू!" शेवटी संतापाने नानासाहेब म्हणाले.

"नाना, त्या दिवशी महत्त्वाच्या कामामुळें मी सभेस गेलो नाही, परंतु एरवी मी केव्हाही तिकडे गेलोच असतो."

"अरे परंतु तू गेला नाहीस ना? मग तसं प्रसिद्ध करण्यास काय हरकत आहे?"

"तसं केल्यानं सुधारकाचा घात केल्यासारखं होईल!"

"मसणात गेले तुझे सुधारक......"

"नाना......" हरिभाऊ एकदम ओरडले आणि मग ओशाळून एकदम शांत झाले.

बाराव्या–तेराव्या दिवशी हवे तेवढे ब्राह्मण नानासाहेबानी मिळवून आणले होते. अण्णासाहेबानी प्रत्येक ब्राह्मणाला दहा रुपये दक्षिणा देण्याची लालूच दाखविली होती आणि एरवी सुधारकाच्या नावाने खडे फोडणारे कित्येक भिक्षुक राजीखुशीने क्रियाकर्मांतर करण्यात गढले होते. क्रियाकर्मांतर सपले. नमस्काराची वेळ झाली. चिमामावशी डोळ्याला पदर लावून म्हणाल्या.

"हरी, पुढे हो आणि मी वर्षाच्या आत लग्न करीन असं म्हण."

हरिभाऊनी नमस्कार करताना मनात म्हटले–

"आजी, मला लग्नाचा आग्रह नको! मी अगदी संन्यस्त वृत्तीन राहीन. माझ्या वर्तनात वावग दिसेल असं काही माझ्या हातून घडणार नाही आणि मरेपर्यंत सगळ्यांचा सांभाळ करीन."

## : १४ :

गोविंदराव कानिटकर, गोपाळराव जोशी व हरिभाऊ याना रावसाहेब रानडे यानी नागपूर कॉंग्रेसला चलण्याचा आग्रह केला, व सर्व मंडळी नागपूरला गेली. बरोबर रमाबाईसाहेब व काशीताई होत्याच. राजकारणी रानड्याच्या सहवासात तसे हरीभाऊ नवखेच होते. त्याचे सगळे लक्ष काशीताई आणि रमाबाईसाहेबाच्या बोलण्याकडे असे. काशीताई आणि रमाबाईसाहेबाचे जिव्हाळ्याचे विषय होते. स्त्री–शिक्षण, घरादारामध्ये होणारी स्त्रियांची कुचंबणा आणि जुन्या वळणांच्या लोकाकडून होणारा छळ, यांचे त्या हिरीरीने वर्णन करीत होत्या.

कॉंग्रेसच्या मंडपातच हरिभाऊना घरी बोलवण्यासाठी परांजपे मंडळी आली. हरिभाऊंची आई परांजपे घराण्यांतली. त्याची आजी अजून हयात होती. काशीताईंना घेऊन हरिभाऊ परांजप्याच्या घरी

आजीला भेटावयास गेले.

आजीच्या पाया पडल्यावर वात्सल्याने तिने म्हटले " हरि, खानदेशात पारोळयास तुझा आमच्या घरी जन्म झाला, त्यावेळी तू इतका मोठा होशील याची कोणालाच कल्पना नव्हती बघ. माझ्या ताईच भाग्य मोठं, परतु ती सगळं पाहावयास राहिली नाही. "

जुन्या सगळया आठवणीना मग पूर आला.

हळू हळू बोलण्याचा ओघ हरिभाऊंच्या पुर्नविवाहाकडे आला. आजीने विचारले–

" अरे तू पुर्नविवाह करणार म्हणून इथे नागपुरात दिखिल लोक वेडवाकड बोलतात. खर का रे ? "

हरिभाऊ स्तब्ध राहिले होते.

" बोल ना रे ! "

" आजी, मी लग्नच करणार नाही. "

" नको रे बावा असं करूस. तू लग्न कर, पण कुमारिकेशी कर. तिला पाहिजे तर तू तुला हवं तस शिकीव ! "

आजी सारखे बोलत राहिली. तिला हरिभाऊंकडून आश्वासन हवे होते. आपल्या दुबळया हातानी तिने हरिभाऊंचा एक हात धरून ठेवला होता आणि ती सारखे " सांग ना रे " म्हणत होती.

आजी अगदीच हटून बसली तेव्हा हरिभाऊ म्हणाले,

" आजी तुझ्या मनाप्रमाणे करण्याचा मी प्रयत्न करीन. "

–नागपुराहून परत येताना रावसाहेब रानडयांशी बोलताना काशीताईनी सहजपणे या घटनेचा उल्लेख केला. गोविंदरावांच्या घरीही अशीच परिस्थिती होती. गोविंदरावाच्या वडिलानी गोविंदरावानी प्रायश्चित्त घेऊन मोकळे व्हावे आणि आईवडिलाना सुखी करावे असा आग्रह धरला होता. गोविंदराव म्हणूनच यावर म्हणाले–

" आपण अशा एका पिढीत जन्माला आलो आहोत की जिथे दोन कर्तव्यामधील लढाई आपणा सर्वांनाच खेळावी लागत आहे. परंतु या दोन कर्तव्यामध्ये आपल्या कुटुंबीयाबद्दलच कर्तव्य मी श्रेष्ठ मानतो. यदाकदाचित तुम्हाला वाटतं तेच खरं असलं, तरी त्याचा अभिमान धरून बसणं हे तुमचं कर्तव्य, की तुमच्याहून वृद्ध, तुमची आजपर्यंत ज्यानी सर्वतोपरी काळजी वाहिली त्याच्या आज्ञेबाहेर न जाण हे तुमचं कर्तव्य. दोन कर्तव्यांची लढाई जर उपस्थित झाली, तर आपण कोणत्या कर्तव्याला अधिक मानून ते करायला जावं, हा विचार नाही का ? अर्थातच हा विचार ज्यानं त्यानं स्वतःच्या कुवतीनुसार इच्छेप्रमाणं करायचा आहे हेही खरच आहे. "

* * *

" कायरे, मुलगी सुधारकाविधारकाची नाही ना ? चांगलीच थोराड दिसते बाबा. बापानं शाळेत दिखिल घातली असेल ! होय ना ! " चिमामावशी नाना पानश्याजवळ विचारीत होत्या.

" नाही, मावशी, घराण मोठं कर्मठ आहे. चोळकराची दररोज पाच पाच तास पूजा करीत बसण्याबद्दल ख्याती आहे आणि घरीच मुलीला लिहाय–वाचायपुरती शिकवली आहे. हे चोळकर बारामतीचे प्रसिद्ध वकील आहेत आणि त्याचे सासरे तात्यासाहेब जोग हुडीवाले दानधर्माबद्दल मोठे प्रसिद्ध आहेत. खाऊन पिऊन सुखी असल्यामुळे मुलीला नुक्तंच दहावं वर्ष संपलं असलं तरी बाराव्या तेराव्यासारखी दिसते. "

" मग एवढी वर्षं मुलीला कशी ठेवलीन या लोकांनी ? "

" मावशी, गेल्याच वर्षी तिच लग्न व्हायचं पण घरी अडचण आली. तशीच आईवेगळी पोर म्हणून लवकर लग्न करू नये असं बापाला वाटलं तर ते चुकल काय ? "

" धर्मशास्त्रापुढे फाजील प्रेमाबिमाची मातबरी मानू नये माणसानं! बघ बावा, हरीला पसत असेल तर मी बापडी वयाच एवढं कशीबशी खपवून घेईन. "

" मावशी, त्यांनी मुलगी पाहायची कबुली दिली आहे. "

नागपुराहून परत आल्यानतर हरिभाऊ घरी आले. गेले दहाबारा तास अर्धशिशीचा अतिशय त्रास होतो म्हणून चिमामावशी डोके धरून बसल्या होत्या. हरिभाऊ समाचाराला गेले तेव्हा त्या काहीच बोलल्या नाहीत.

सबंध आठवडा चिमामावशीनी अबोला धरला होता. घरी गेल्यावर ते हातपाय धुऊन पाटावर बसत आणि नेहमीप्रमाणे समोर बसून देखरेख करणाऱ्या चिमामावशी आत मुद्दाम जोराने कण्हत स्वत शीच काहीतरी बडबडत. हरिभाऊची आत्या हवे नको ते न विचारता नुसती वाढीत राहायची आणि घरात पचवीस तीस मडळीचा गोतावळा असताना कोणी एक शब्द बोलेल तर शपथ !

दिवसेंदिवस ही परिस्थिती हरिभाऊच्या हळव्या मनाला फारच त्रासदायक होत होती–

बारामतीला चोळकर वकिलांची मुलगी वेणू लग्नाशिवाय फार दिवस राहिली म्हणून लोक वाटेल ते बोलत असत.

" काय हो, ही चोळकर वकिलाची पोरगी दीपमाळ झाली आहे ? छे, छे, अलीकडच्या लोकानी अगदी ताळतंत्र सोडला आहे. पदर घेतल्याखेरीज बाहेर न्यायची सोय नाही अशी पोरटी झाली तरी पोरटीला घरात जपून ठेवलीन आहे. " असे उद्गार बायका काढू लागल्या आणि मुलीच्या मावशीनेही, ' या मार्गेसरात पोरीला उजवलीच पाहिजे ' असा आग्रह धरला. तेव्हा आपटयांच्या घरी चोळकरानी मुलगी दाखवायला नेली.

मुलगी आपटयांच्याकडे नेऊन आणलेल्याला नुकतेच कुठे दोन दिवस झाले होते, एवढयात कोणीतरी मावशीबाईंना येऊन सागितले की तुम्ही मुलगी दाखवली ते गृहस्थ भयंकर व भलतेच सुधारक आहेत. लग्न झाल्यावर पोरीला लेहंगा नेसवून शाळेत पाठवतील आणि चहाचा व बिस्कुटाचा आणि नानातऱ्हेच्या जिनसाचा रतीब लावतील. "

त्याचा या कानफुंकणीने मावशीबाई चागल्याच बिथरल्या.

" नको ग बाई असल्या घरात आमची मुलगी पडायला ! त्यापेक्षा विहिरीत ढकललेल परवडलं ! "

त्यांनी चोळकर वकिलाना नीट चौकशी करायला सांगितले. ते तडक पानश्याच्याकडे गेले.

" अहो, तुम्ही वेडा विचार करू नका. स्थळ उत्तम आहे. तुम्हाला कवडीचा खर्च न पडता यथास्थित होईल. ते सुधारक कसले न काय कसले ? तुमच्या मनात काय कोणी भलतंच भरविल आहे ? शाळेत पाठवतील तर पाठवीनात ? त्याच काय जात ? त्याना दिलीत मुलगी म्हणजे ती त्याची झाली. काही करीनात ? विनाकारण या पाजी लोकाच्या बोलण्यावर विश्वास ठेवून हातच उत्तम स्थळ घालवू नका ! " नाना पानश्यांनी त्याना खूप समजावून सागितले. परतु



" हरिभाऊंना पुढचे वाचवले नाही... !"

मावशीबाईंची सुधारक म्हणजे महा नीच अशी संभावना करून दिल्यामुळे काय करावे याचा त्यांना समज पडेना.

मुलगी पाहून तीन चार महिने झाले तरी चोळकर वकिलांकडून होकार येईना. तशी चिमामावशी खूप चिडल्या, ' एका दिवसात छप्पन मुली उभ्या करीन; अशी घोडनवरी करून घ्यायला आम्ही सुधारक थोडेच लागून गेलो आहोत ? ' त्या गरजू लागल्या.

* * *

——लग्नाच्या जेवणावळी सुरू झाल्या होत्या आणि वेणू पळतच कोठीच्या खोलीत आपल्या मावशीकडे गेली आणि तिच्या गळी पडून ओक्साबोक्शी रडू लागली.

" मावशी, बायका सारख्या सुधारक सुधारक म्हणून आपापसात कुजबुजताहेत. सुधारक म्हणजे काय ग ?"

" तरी मी यांना सांगत होतेच," मावशीबाईंनी मोठ्या आवाजात बोलायला सुरुवात केली. " आणि लग्न एवढ्यातच संपलं का ग ? ताईचं लग्न तर तीन दिवस चाललं होतं. माझं अर्ध्या दिवसांतच का ग ?" वेणू भांबावून एकेक प्रश्न विचारीत होती आणि मावशीबाई असहाय्यतेने तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होत्या.

लग्नामध्ये कसली हौसमौज नव्हती. गावाबाहेरच्या भाऊमहाराजांच्या बागेत अगदी चोरून केल्यासारखा लग्नसमारंभ घाईघाईने उरकून घेण्यात येत होता आणि जेवणाला आलेल्या बाया काही ना काही कारणास्तव नाक मुरडीत होत्या. नवरामुलगा तर तिकडे कुठे आनंदाश्रमात अगदी मुहूर्ताच्या वेळेपर्यंत बसला होता आणि लग्न झाल्यावर पानावर बसून उगीच भात चिवडल्यासारखा करून तावडतोब आनंदाश्रमात गेला. लग्नाला त्याची आई नाही, वडील नाहीत. एवढे त्यांच्या चुलत्याबद्दल बोलतात परंतु तोही नाही. येऊन जाऊन कारभार काय तो या चिमामावशींचा ! म्हातारी मोठी ढालगज दिसते ! माझ्या वेणूचं पुढे काय होणार दिसतंच आहे !" मावशीबाई सारख्या वेणूला पोटाशी धरून बडबडत होत्या.

तात्याचे लग्न उरकल्याचे ऐकून अण्णासाहेब मुंबईहून तातडीने आले. आल्यावरोबर त्यांनी विचारले——

" मावशी, कमाल आहे तुझी. इथे मी हाकेच्या अंतरावर मुंबईला होतो आणि तात्याच्या लग्नाला मला साधं आमंत्रण नाही म्हणजे काय ? "

" अरे हा लग्नच करणार नाही म्हणून बसला होता. चार दिवसांपूर्वी अचानक चोळकरांकडून होकार आला. तशीच भीडमर्यादा सोडून आनंदाश्रमापर्यंत जाऊन तात्याला बाहेर बोलावून विचारलं, " तात्या, मग कोणता मुहूर्त घ्यावयाचा ?"

" मावशी, मी सांगेन त्या अटी कबूल असतील तरच मी लग्नाला उभा राहीन !" असं हरी म्हणाला.

"अटी कोणत्या ?"

" ऐक, ' लग्न झाल्यावर मी मुलीला शिकवणार, तिला सभासंमेलनात घेऊन जाणार. लग्नाचा गाजावाजा करावयाचा नाही. फार लोकांना बोलवावयाचं नाही. मिरवणूक काढावयाची नाही.' शेवटी मी विचार केला आता वेळ घालविण्यात अर्थ नाही. झटपट लग्न उरकून घेतलं. नाना पानश्यांनी मदत केली– "

" छान–म्हणजे नव्या सूनबाई शाळेत जाणार तर–" अण्णासाहेबांनी म्हटले,

" लग्न तर झालं ! आता पुढचं बघून घेईन मी."

* * *

आनंदाश्रमात हरिभाऊ टेबलावर डोके टेकवून शून्यमनस्क होऊन बसले होते. समोर ' केसरी, ' ' पुणे-वैभव ' आणि सरकारी वृत्तपत्रे पडली होती.

बळवंतराव टिळकांनी 'केसरी'त लिहिले होते——

" कोणास हसावयाचे असल्यास तो तोंडास पदर लावून हसतो व त्यास अतिशय वाईट गोष्ट करावयाची झाल्यास ती तो प्रायः आपल्या घरात करीत नाही. जणू काय त्याचे मनच त्यास खात असते. आमचेकडचे घोडनवरे द्वितीय विवाह गावाजवळच्या एखाद्या बागेत उरकून घेतात, ह्याचेही बीज हेच होय...... मिल्ल-स्पेन्सरची बुके वाचून पोपटपंची करणे सोपे आहे, पण त्यांच्यासारखे दीर्घकाळ किंवा यावज्जीव ब्रह्मचर्य पाळून अहोरात्र शास्त्रव्यासंग करण्यात मात्र कोणाचे धैर्य होत नाही."

शेजारच्या दुसऱ्या वर्तमानपत्रात लिहिले होते–

" एका बोलक्या सुधारकाने बागेत हळूच जाऊन लग्न केले. आश्चर्य हे की, एका धर्मभोळ्या व चार घटका नाक धरून बसणाऱ्या गृहस्थाने आपली अकरा वर्षाची मुलगी त्यास दिली. "

' पुणे-वैभवा 'ने पाठविलेल्या अंकात खालील ओळी तांबड्या शाईने मुद्दाम अधोरेखित केल्या होत्या.

' वधू एका सुधारकाची पुर्नविवाहित कुटुंबाची कन्या आहे व वर एक नवीनच कुलंगे सुधारक आहेत. वधू सुशिक्षित आहे की नाही हे आम्हांस सांगता येत नाही. परंतु ती चांगली सुदृढ आहे हे आम्ही प्रत्यक्ष पाहिलेल्या लोकांकडून ऐकून खात्री करून घेतली आहे हे खास."

हरिभाऊंना पुढचे वाचवले नव्हते म्हणून त्यांनी डोळे मिटून घेतले होते. या विषारी टीकेपेक्षाही आपण आपल्या प्रतिज्ञेचा विश्वासघात केला ही कल्पना त्यांच्या उरी चांगलीच खुपत होती.

खुद्द गोविंदराव कानिटकरांच्या घरातच एक वादळ उठले. हरिभाऊंचा विवाह झाल्यानंतर अण्णासाहेबांकडे एकदा दादासाहेब

कानिटकर म्हणाले.

"अण्णासाहेब, हरिभाऊनी तुमच्या इच्छेला मान देऊन उचित अशी गोष्ट केली परंतु आमच्या घरच तारू काही सुरळीत मार्गावर येत नाही."

"का, काय झाल ?"

"आमच्या घरचा परिवार तुम्हास माहीत आहेच. त्यात हा गोविंदराव आणि त्याची बायको पडली सुधारकी. दोघेही त्या चहा ग्रामण्यात सापडून वाळीत पडले म्हणून घर सोडून मुलाबाळासह लोणावळ्यास रावसाहेब रानड्याच्या शेजारी राहावयास गेले आहेत. आता वैशाखात घरी एकदोन लग्न व्हायची आहेत अशा वेळी हा आमचा मोठा मुलगा व त्याची बायको वाळीत राहून आमचं घर त्याना वर्ज्य व्हाव हे विपरीतच नाही काय ?"

"मग त्याना प्रायश्चित्त घ्यावयास का नाही लावत ?"

"अहो, मी त्याना वारवार सांगून पाहिलं, परंतु सुनेच्या हट्टापुढे काही चालत नाही."

"दादासाहेब, तुमच्या या गोविंदरावानी आपल्या बायकोला फार चढवून ठेवलं आहे."

"अण्णासाहेब, काशीताईबद्दल का तुम्ही अस बोलता ?" मध्येच न राहवून हरिभाऊ म्हणाले, "मिशनच्या व्याख्यानास दोघेही गेले होते आणि आपण केल यात पाप काही नाही अशी त्यांची ठाम समजूत आहे पण अशा वेळी चार मडळींना खूष करण्यासाठी किंवा लग्नात मिरवायला मिळाव म्हणून का प्रायश्चित्त घ्यावयाच ? यात तत्त्वाचा काही प्रश्न आहे की नाही ?"

"आम्ही तूर्त काहीच बोलत नाही. तुमच्या सुनेला बोल लावल्याबद्दल या वधुराजांना फारच राग आला आहे."

ही हकीकत मुद्दाम गोविंदरावाच्या कानावर घालण्यासाठी हरिभाऊ मुद्दाम लोणावळ्यास गेले. आपल्या वडिलाची होत असलेली कुचंबणा पाहून गोविंदराव अतिशय अस्वस्थ झाले होते.

"हरिभाऊ, मलासुद्धा आमच्या दादांनी वारवार पत्र पाठवून प्रायश्चित्त घ्यायला सांगितल आहे, पण काय करू हो ! मला काही सुचतच नाही. आपण अस करू, रावसाहेब रानड्याकडे या प्रश्नाचा एकदम सोक्षमोक्ष करून टाकू."

गोविंदरावाची सगळी हकिकत ऐकून घेऊन रानडे तात्काळ म्हणाले, "मी जर तुमच्या जागी असतो तर सर्व मानहानी व कमीपणा सोसून आपल्या वडिलाना संतुष्ट केलं असत."

"रावसाहेब, मीच अशा अडचणीत आहेत अस नव्हे तर आमच्यापैकी सर्वजण आहेत."

"हो, मला ठाऊक आहे. सर्वांनी प्रायश्चित्त घेतल तरी मला वाईट वाटणार नाही."

"पण रावसाहेब, त्यासाठी अगोदर तुम्ही प्रायश्चित्त घेतलं पाहिजे !"

"मी का म्हणून ?"

"आम्हा सर्व मडळींना त्याखेरीज प्रायश्चित्त घेण्यास बर वाटणार नाही."

"असं असेल तर मी प्रायश्चित्त जरूर घेईन. लोककल्याणासाठी प्रभू रामचंद्रानी स्वतःच्या पत्नीचीही गय केली नाही. तिथे तुम्हा सर्व

---

**पाप**

तुझ्या कोमळेची
अव्हेरीली प्रीत
झाली वाताहात
आयुष्याची—
भुऱ्या डोळ्यातील
इंद्रबिंदु ओला
चिरी काळजाला
अजुनीही
कधी चांदण्यात
आठवते पाप
गाली अनुताप
जिवा जाळी......!

प्रसन्नकुमार पाटील

**त्रागा**

तुझ्या हाती दिले
माझे श्रद्धा-धन
आता माझे ऋण
तुझ्यावरी
तुझा देणेवार
होऊन सुखात
तुझ्या राऊळात
बसणार
आता विटेवरी
देई अर्धी जागा
करू नको त्रागा
उगाच तू

मा. गो. काटकर

---

लोकासाठी एक यःकश्चित प्रायश्चित्त घेतल तर काही चुकेल असं मला वाटत नाही. मी कुठल्याही अटीशिवाय प्रायश्चित्त घ्यावयास तयार आहे. तुम्ही दिवस ठरवा, त्याप्रमाणे पुण्यास मी जरूर येईन."

रानड्याच्या प्रायश्चित्ताची बातमी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यावर "काय हो वीर, तुमची तत्त्वं कुठे गेली !" अण्णासाहेबानी खोचकपणे विचारले होते तेव्हा हरिभाऊ काय उत्तर देणार ?

अण्णासाहेबानी असे म्हणावे यात काही आश्चर्य नव्हते, परंतु खुद्द सुधारक म्हणविणाऱ्या रानड्यांच्या मित्रांनी रानड्याविरुद्ध काहूर उठविले, त्याचे ते उद्‌गार ऐकून गोखल्यासारख्या हळव्या माणसाच्या डोळ्यात अश्रूपूर लोटला.

गोविंदरावाच्या घरी प्रायश्चित्ताचा कार्यक्रम घडला त्याला हरिभाऊ हजर होते. प्रायश्चित्त घेऊन गोविंदराव उठले तेव्हा ब्राह्मणानी "आपल्या वडिलांस नमस्कार करा." म्हणून सांगितले. तेव्हा दादासाहेबाजवळ गोविंदराव खाली वाकले. दादासाहेबानी त्याना घट्ट मिठी मारली आणि ते गहिवरून म्हणाले,

"इतक्या माणसात तू आज मला धन्य केलंस !" दादासाहेबांच्या डोळ्यातील प्रेमाश्रू पाहून गोविंदरावाचेही डोळे अश्रूनी भरून आले आणि त्यानी सद्‌गदित होऊन लहान मुलाप्रमाणे आपल्या वडिलाना पुन्हा मिठी मारली, तेव्हा दादासाहेबानी जवळ घेऊन पाठीवर हात ठेवला व त्याचे डोळे पुसले.

जवळ उभ्या असलेल्या हरिभाऊंच्या व काशीताईंच्या डोळ्यातून त्यावेळी अश्रुधारा चालल्या होत्या. गोविंदराव त्याच्याजवळ येऊन म्हणाले, "रावसाहेबानी सांगितल्याप्रमाणंच मला दाखला आला. यापूर्वी दादा इतक्या प्रेमान वागल्याचं किंवा त्याच्या डोळ्यातून अश्रू आल्याचं मी कधीच पाहिल नव्हतं. अगदी प्रायश्चित्त घेण्याच्या वेळेपर्यंत आपण करतो हे बरं नाही असं मला वाटत होतं पण ही दादाची ही वागणूक पाहून आपण केलं हे चागलं केल, असं मला वाटत आहे."

[पृष्ठ ५४ वर चालू]

# समीक्षा — लेखसंग्रह : कथासंग्रह : प्रवासवर्णन

**अष्टग्रहीतील नववा**
लेखक– न. वि. गाडगीळ
पृष्ठें २५ किं. ३–५०
प्रकाशक: कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस, पुणें २.

**घास भरवायला हवा**
लेखक– प्रा. ना. सी. फडके
मेनका– प्रकाशन
मूल्य तीन रुपये

**थंडीचे दिवस**
ले. रमेश मंत्री
(पृष्ठे १३३; किंमत चार रुपये
मॅजेस्टिक प्रकाशन)

श्री. काकासाहेब गाडगीळ यांच्या या संग्रहात बारा लेख संकलित केले आहेत. राजकारणाचे साद-पडसाद अर्थातच उमटणे अपरिहार्य. लेखक पंजाबचा राज्यपाल असताना पंजाब जवळून त्यांनी पाहिला. जीवनमान, राहणीमान, तेथील सौंदर्य, वास्तू, क्षेत्रे आदींचे वर्णन लेखकाने केले आहे. 'प्रवेशद्वारा'त लेखक म्हणतो, 'यातील कोठलाही लेख वाचताना कंटाळा येणार नाही.'

खरे आहे ते!

संग्रहातील पहिला लेख अष्टग्रहांच्या दैवी आपत्तीवर लिहिले असून त्याच लेखाचे 'अष्टग्रहीतील नववा' हे नाव संग्रहाला बहाल केले आहे. अष्टग्रहीच्या काळात कुठल्याही नवीन गोष्टीस प्रारंभ करायचा नाही. पण नेमकी तीच गोष्ट करण्यास भाग पडावे. पण ती करीत असताना अष्टग्रहीचा आपल्यावर काही विपरीत परिणाम तर नाही ना होणार? ही वाटणारी भीती, तिने लेखकालाही लोंबकळत ठेवले होते! हकीकत गमतीदार आहे. आजारी 'गनीम' डॉक्टर आप्तेष्टांचे हाती सापडतो. सर्वजण घेरून त्यास औषधोपचार, सोपस्कार करतात. माणूस अडचणीत, दुःखात असताना त्यास देवाची, संतांची आठवण होते. त्यांनी उच्चारलेल्या वाक्याची आठवण होते. ती तोंडावाटे बाहेर पडतात. अशा वाक्यांची लेखकाने 'गनीम चेपून काढला' या लेखात केलेली पेरणी पोषक ठरते. पत्री-सरकारचा दृष्टान्त केवळ दृष्टान्त वाटतो. लेखक मूळचा पुण्यातला, त्यास पुणेकरांची ओळख नसेल तर नवल? त्यांचा सोशिकपणा, प्रयत्नशीलता, यासारखे उच्चतम गुण 'मर्गारथ पुणेकर' या लेखात स्पष्ट केलेले आहेत. त्याच्याविषयी काढलेले गौरवपर उद्‌गार पाहिले म्हणजे लेखकाविषयी असलेला अभिमान द्विगुणित होतो. 'मला पंजाबी लोक कसे दिसले?' आणि 'शीख दृष्टिकोणातून पानिपत' यांत पानिपतचा संग्राम व शीखांचे राज्य यांचा इतिहास आढळतो, तर अफगाणसारखी छोटी छोटी राज्ये संधि मिळताच डोके कसे वर काढीत याचाही इतिहास येथे आहे. 'पहिली लढाई कुंजपुऱ्यात' हा लेख पेशवे काळातील लढाईचे पुनर्दर्शन घडविणारा आहे. सिद्धटेक हे लेखकाचे आजोळ. अष्टविनायकाच्या तीर्थस्थानामुळे त्यास अधिक महत्त्व आले. तीन तपानंतर लेखक आजोळी आल्यावर त्यास त्या ठिकाणची पटलेली ओळख 'तीन तपांनी सिद्धटेक' यात सांगितली आहे. 'पुरुषाची स्त्री केवळ छाया' ही इराणमधील लोककथा असून ती मनोरंजनात्मक आहे. संकटात सापडलेल्या स्त्रीला सुलेमानने कसे सोडविले याची ही कहाणी आहे. 'अढाई दिनका झोपडा' हे राजस्थानमधील वास्तूचे नाव असून अडीच दिवसांचे मुक्कामात लेखकाने सौंदर्यसृष्टीचे जे अवलोकन केले ते लिहून त्यास त्याने वास्तूचे नाव बहाल केले आहे. त्यासाठी इतिहासाचा आधार घेतला आहे. पूर्वीचे अजमेर, आजचे अजमेर यांतील तुलना पण केली आहे. पुरातन काळातील वास्तू, त्यांचे वैशिष्टच, तेथील तपस्वी, पुजारी यांचे वर्णन लेखकाने विशेषतेने केले आहे. "असहिष्णुता हा इस्लामी धर्माचा प्राण आहे. हा मुसलमानी रियासतीचा संक्षिप्त इतिहास आहे. मंदिरे, मशिदी झाल्या. पण मशिदी पुन्हा मंदिरात विलीन होऊ शकल्या नाहीत." मात्र असल्या असहिष्णू वृत्तीशी चुंबाचुंबी करणाऱ्या पक्षात काकांचे आयुष्य गेले! 'संत शेख चिस्ति' या दर्ग्याचे लेखकाने बहारदार वर्णन केले आहे.

**अरविंद रासने**

## : २ :

'घास भरवायला हवा' हा प्रा. ना. सी. फडके यांचा नवा लघुकथासंग्रह. यातील सातही कथा गेल्या १–२ वर्षांत मेनका, पैंजण, रंभा, सुगंध, किर्लोस्कर आदि मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. अर्थात कथांची जात एकच आहे. प्रणयप्रधान आहे, शृंगारप्रधान, हलकी फुलकी, फारशी गुंतागुंत नसलेली व शेवटी कलाटणी देणारी लघुकथा. मनाला दीर्घकाळ चटका लावून जाणारी एकही कथा या संग्रहात नाही.

ज्या कथेचे शीर्षक या संग्रहाला दिले आहे ती पहिली कथा' 'घास भरवायला हवा'!: काश्मीरच्या प्रवासात शरदची सुमतीशी ओळख होते. त्याचे प्रेमही तिच्यावर बसते. पण ते अव्यक्तच राहते. नायिका सुमती ही विधवा असून तिला शरयू नावाची एक लहान मुलगीही आहे. मध्यंतरी बरीच वर्षे जातात. काही वर्षांनंतर त्यांची पुन्हा मुंबईस गाठ पडते. बिचाऱ्याला प्रेमात यशस्वी व्हायचे असेल तर काय करावयास पाहिजे हे ठाऊक नसते. "स्त्रीला वश करायचं असेल तर मर्यादेनं वागून भागत नाही." हे लक्षात येताच गाडी लग्नाच्या लायनीला लागते.

आता 'डोहाळे' ही गोष्ट! कल्पनाप्रधान आहे. मंदा रेडियो सिलोनवरील व्याख्याने ऐकून पदवीधर व्हायचे ठरविते वगैरे...! 'नीट पेरलं की उगवतं' ही कथा

'घास भरवायला हवा' या जातीचीच. मात्र 'सशय घेईना तो नवरा कसला ?' ही थोडी वेगळी वाटणारी कथा आहे. कथा नायिका शरयू ही नोकरी करणारी स्त्री, मनोहर हा तिचा सालस पती. आपण कसेही वागलो तरी पती आपला काहीच सशय घेत नाही, याची तिच्या मनाला खंत वाटते. व नवरा इतका थंड असता कामा नये अशी क्लृप्ति योजते व ती यशस्वी होते.

'दोन एकटे जीव' ही एक प्रेमकथाच आहे. कावेरीच्या रुक्ष जीवनात, मनोहराच्या आगमनात काही काळ हिरवळ निर्माण होते, पण पुढे तो विवाहित आहे असेही तिला कळते. तो पुणे सोडतो व कावेरीचे एकाकी जीवन सुरू होते. ह्या सग्रहातील एकमेव 'भावस्पर्शी' कथा असा हिचा उल्लेख करावयास हवा.

सग्रहातील शेवटची कथा 'घरगुती मसाला.' रघुनाथचे प्रेम निरागस, साध्याभोळ्या, अशिक्षित अशा काशीवर बसते. फॅशनेबल विमल किंवा गर्भश्रीमंत सुगधेशी तो लग्न करू इच्छित नाही व प्रमाणात काशीवरचे प्रेम वाढते. शेवटी तिच्याशी लग्न करविण्याचे ठरवितो– हाच तो घरगुती मसाला.

प्रा. फडक्याच्या मोहक भाषाशैलीने वाचक रगून जातो हे सांगणे म्हणजे सूर्य पूर्वेला उगवतो हे सागण्यासारखे आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ फारसे आकर्षक नाही.

प्रा. गं. वि. नेर्लेकर

## : ३ :

ऐन उन्हाळ्यात हे पुस्तक वाचले. बरे वाटले. अलिकडे परदेशी जाणाऱ्याची सख्या भरमसाट वाढली आहे.' जाऊन' येणारा तेथील जास्तीत जास्त पाहून आलो म्हणून सांगतो आणि आपले अस्सल म्हणून लिहितो आहे. यामुळे अलिकडे प्रवासवर्णनांना, किंवा 'मी तिकडे काय पाहिले' याची गोडी कमी झाली आहे. ' लडनचे सुखासीन जीवन, चित्रपट, नृत्यगृह, मद्य, बस, आगगाडी, रुचकर अन्न, मोकळी हवा, उबदार खोली, नवीनवी मासिके, लिपस्टिकने रगविलेल्या ओठांवरून जीभ फिरविणाऱ्या कामिनी, वेश्यांच्या वस्तीत मारलेल्या आबटषोकी चकरा...' इत्यादि अनुभवांनी पुस्तक भरलेले आहे. नाही म्हणायला आपले तरुण परदेशी गेले की मायदेशी परत का येत नाहीत याचा गंभीर विचार केला आहे ! सर्व जातीचा मसाला आहे; विशेष मात्र काही नाही; फक्त चार घटका करमणूक !

मधुकर परांजपे

• • •


## अभिप्रायार्थ पोच

### मॅजेस्टिक प्रकाशने

भावार्थ ज्ञानेश्वरी
गो. नी. दाडेकर
किं. ६=५०

रात्र थोडी सोंगं फार
ग. रा. कामत
किं. ६=००

चोर सोडून सन्यासी
हिराकात कलगुटकर
कि. २=००

काळा समुद्र
वामन इगळे
किं. ३=००

आकाश पाळणा
वामन प्रभू
किं. ५=००

थंडीचे दिवस
रमेश मंत्री
किं. ४=००

मंतरलेले बेट
व्यकटेश माडगूळकर
किं. ३=००

आंधळी
शाता ज. शेळके
किं. २=५०

विद्युत-विजेता टेस्ला
श. ना. नवरे
किं. ३=००

चौकोनी कुटुंब
शामराव ओक
किं. ३=००

तुमचे ग्रह, तुमच्या इच्छा-आकांक्षा
दत्तात्रय शं. केळकर
किं. २=५०

तुमचे ग्रह, तुमचा परिवार
दत्तात्रय श. केळकर
किं. २=५०

### नाग-विदर्भ प्रकाशने

मानवतेची मंदिरे
प्रकाशरजन
किं. ३=००

आम्ही हरणार नाही
विजय तेंडुलकर
किं. ३=००

### ज्ञान-राज प्रकाशने

राजस्थान
पं. महादेवशास्त्री जोशी
किं. ३=००

भगीरथाचा वारसा
राम बिवलकर
किं. २=५०

केळफूल
वि. शं. पारगावकर
किं. ३=००

### कुसुममाला कोलारकर

आनंदलहरी
ज. श्री. देशपांडे
किं. ३=५०

### निर्मल साहित्य प्रकाशन

स्वप्नगंधा
सुधीर देव
किं ३=००

### विद्यामंदिर प्रकाशन

गंध-समीर
मालचद्र खाडेकर
किं. ३=५०

नाट्यपरीक्षण

## प्रेक्षकांची पकड घेणारा खानदानी गबाळग्रंथ

# वऱ्हाडी मानूसं ऽ!

रंजन कलामंदिर सादर करीत असलेल्या 'वऱ्हाडी मानूस' या नाटकाचा पहिला अंक संपला आणि प्रेक्षक अक्षरशः भारावून गेले होते. दीड तासाच्या अवधीत पहिल्या अंकात जे काही सादर केले गेले होते त्यामुळे प्रेक्षक खरोखरच दिपून गेले होते. नाटकाचे लेखन कसदार, त्याने निर्माण केलेले प्रश्न चित्राकर्षक, पात्रांचा अभिनय सर्वांगसुंदर, टीमवर्क दृष्ट लागण्यासारखे आणि त्या सर्वांत मर घालीत होता नाटकाचा वास्तव आणि नयनरम्य सेट ! प्रेक्षकांना या नाटकात उणेपणा म्हणून कसा तो आढळेना, आणि म्हणूनच गेल्या काही वर्षांतील एक उत्कृष्ट नाटक असा एकमुखी निर्वाळा देतच प्रेक्षक दुसऱ्या अंकाची वाट पाहू लागले. दुसऱ्या अंकाचा पडदा वर गेला, कथानक झपाट्याने पुढे सरकू लागले. अधिकाधिक गुंतागुंत निर्माण होऊ लागली. पण हे सारे पाहात असताना पहिल्या अंकातील कथानकातील कसदारपणा कमी होत जाऊन प्रत्येक घटना, तिची उकल या गोष्टी ओढून ताणून आणल्या आहेत असेच वाटू लागले. तिसरा अंक संपला तेव्हा प्रेक्षकांना या नाटकाला चांगले म्हणावे की वाईट म्हणावे असाही प्रश्न पडला. नाटकाचे लेखन अतिशय विस्कळीत आणि काहीसे कंटाळवाणे झाले आहे. एरव्ही नाटकाचा प्रायोगिक दर्जा, नेपथ्य, टीमवर्क या बाबतीत कौतुकाचे उद्गार काढण्यात कोणाचेही दुमत होत नव्हते.

**कथानक ! घिप्पाड देह हा आडवा...!!**

अशी ही 'वऱ्हाडी मानूस' आहेत तरी कशी हे पाहणे जितके मनोरंजक तितकेच अगत्याचे ठरते. नागपूरमधील श्रीमंत खमारीकर देशमुख याच्या वंशपरंपरागत वाड्यात नाटकाचे सारे कथानक आकार घेते. वाड्याचे धनी आबासाहेब देशमुख याना दोन मुले. मोठा मुलगा धनंजय उर्फ बाबू आणि धाकटा भास्कर ! बाबू पदवीधर झालेला असला तरी पिढीजात शेतीवाडी बघत असतो तर धाकटा भास्कर एका मारामारीच्या गुन्ह्यावरून तुरुंगात गेलेला असतो. आबासाहेबांना माणसाचे विलक्षण वेड असते त्यामुळेच त्याच्या वहिणीच्या मुलाला–गोपाळला त्यांनी संभाळलेला असतो. आबांच्या आश्रयाखालीच गोपाळ गाण्याचे शिक्षण घेत असतो. आबाच्या दिवाणजीची मुलगी शोभा ही सुद्धा आबाच्याच मदतीने आपले नृत्याचे शिक्षण पुरे करीत असते. एकंदरीत आबा देशमुख म्हणजे माणसाचा प्रेमी, चार चौघाचा सभाळ करणारा, लोकांवर मनापासून माया करणार, जिद्दीने सारे वैभव कायम ठेवणारा, कणखर वृत्तीचा खराखुरा वऱ्हाडी माणूस आहे. त्याची पत्नी पार्वती ही देखील नवऱ्याला साजेशीचा प्रेमळ आणि कर्तबगार, उदंड दौलतीचा सभाळ मोठ्या कसोशीने करीत आहे. पण दुर्दैवाने मुकी आहे. तरीही घरातील कोणत्याही रीतीरिवाजाला चुकत नाही की विसरत नाही.

या पार्श्वभूमीवरच नाटकाची सुरवात होते. बाबू शिक्षणासाठी पुण्याला असताना ज्या अण्णासाहेब आपटयाच्या घरी 'पेइंग गेस्ट' म्हणून राहिलेला असतो त्यांच्याच मुलीवर–नलिनीवर त्याचे प्रेम बसते. अण्णासाहेबांनाही बाबूसारखा जावई पसंत असल्याने आबासाहेबाना विनंती करण्यासाठीच ते खुद्द नलिनीसह नागपूरला येतात. याचवेळी भास्करही पॅरोलवर सुटून घरी येणार असतो. बाबूला भास्कर घरी आलेला नको असतो पण तरीही आबाच्या हट्टावरून भास्कर आणि अण्णासाहेब देशमुखाच्या वाड्यात येतातच. कथानकाला सुरवात होते ती इथेच !

बाबूने नलिनीशी विवाह करण्यात आबाचाच काय पण कोणाचाही विरोध नसतो. रूपाने, गुणाने तिच्यात कोणतीच उणीव नसते. पण ती येताच तिच्यातील एक फार मोठा दोष सर्वांच्या लक्षात येतो. नलिनी काहीशी भ्रमिष्ट झालेली असते. लहान मुलीसारखे एखाद्या बाहुलीशीच खेळण्यात तिला आनंद वाटतो. वयाला न शोभणाऱ्या नलिनीच्या भ्रमिष्टपणामुळे सारेच लोक हादरतात पण बाबूचे तिच्यावरील प्रेम लक्षात घेता कोणालाही आपला विरोध बोलून दाखविणे अशक्य होते. पण नलिनीच्या या वेडाचे कारण बाबूला नकोसा झालेला भास्करच शोधून काढतो. पानशेतच्या पुरामध्ये पाण्याच्या लोंढ्याबरोबर वाहात गेलेल्या एका पाळण्यातील जिवंत बालकाला पाहून नलिनीच्या डोक्यावर परिणाम होतो. तिचे वेड अचानक नाहीसे होते आणि ती देशमुखाची सून म्हणून घरी येते. येथवर नाटकातील एका कथानकाचा शेवट होतो आणि मग आबासाहेब देशमुखांच्या रहस्यपूर्ण वागणुकीचे दुसरे कथानक झपाट्याने चालू लागते. आपला सुरळीत, आनंदात चाललेला संसार सोडून आबासाहेब एकाकी यात्रेला जायचा विचार व्यक्त करतात. धनंजय, भास्कर, नलिनी–सारेजण या विचाराने आश्चर्यचकित तर होतातच पण वडील सोडून जाणार या कल्पनेने व्यथित होतात. अखेर आबा देशमुख आपले रहस्य उलगडून सांगतात.

आबा देशमुख या घराण्यात दत्तक आलेले असतात. देशमुखाचा मुलगा अपघातात निधन पावलेला असतो. त्या अपघाताशी आपला संबंध आहे असे आबाना सारखे वाटत असते. म्हणून केवळ इनामदार घराणे नष्ट होऊ नये याचसाठी, त्या घराण्यासाठी उभी हयात कष्ट करण्याचा निश्चय करतात. घरात दत्तक येतात तेच एका कर्तव्यबुद्धीने ! हीच कर्तव्यबुद्धी त्याच्या लग्नाचे वेळी असते. निधन पावलेल्या देशमुखाच्या मुलाची पूर्वनियोजित वधू त्याची पत्नी होते पण तिच्याकडेही ते एक परस्त्री

म्हणूनच पाहतात. प्रत्यक्ष सासू पार्वतीच्या जिभेला डागत असताना आबासाहेब स्थितप्रज्ञासारखे उभे राहतात. तिचे रक्षण करण्यासाठी पुढे सरसावू शकत नाहीत. अखेरीस वडिलांच्या सांगण्यावरून देशमुखांचा वंश वाढावा म्हणून ते पार्वतीबरोबर संसार करूं लागतात. बाबूचा जन्म होतो आणि मग मात्र आबांच्या वृत्तीत थोडासा बदल होतो. पार्वतीला ते स्वतःची पत्नी मानू लागतात. संसारात खरेखुरे रममाण होऊ लागतात. पार्वती आबांच्या वागणुकीमुळे मात्र व्यथित झालेली असते आणि याचमुळे आबांवरील रागामुळे साऱ्या जन्मभर तिने मुक्याचे व्रत घेतलेले असते. नलिनीवरील आपत्तीची कल्पना येताच केवळ घराण्याची इभ्रत राखावी म्हणून ती आपला निश्चय मोडते. आबा ही सारी कथा मुलांना सांगून आपले कर्तव्य पार पडले, आपण आता यात्रेला जाणार असे जाहीर करतात व त्याप्रमाणे निघूनही जातात. हे असे गुंतागुंतीचे कथानक, न पटणाऱ्या गोष्टी नाटकामध्ये दिसतात.

## तुझ्यामुळे मी झाले आई !

पार्वती नलिनीला बाबूबद्दल सांगते की " बाबू हा आमचा मुलगा नाही तर घराण्याचा आहे ! " आणि म्हणूनच प्रत्यक्ष पोटच्या पोराच्या पत्नीला ती सूनबाई म्हणून हाक मारीत नाही. ही गोष्ट मनाला पटत नाही. पार्वतीचे हे उद्‌गार मातृहृदयाचे उद्‌गार वाटत नाहीत. जगातील कोणती आई आपल्या सख्ख्या मुलाबद्दल असे उद्‌गार काढील ? या असंभाव्य घटनेप्रमाणेच नलिनीचे वेड एकाएकी नाहीसे कसे होते याचा उलगडा झालेला नाही. आण्णासाहेब आपटे महिनान् महिना परक्याच्या घरी ठाण मांडून कसे बसू शकतात ? अशा धक्का देणाऱ्या, न पटणाऱ्या गोष्टी, नाटकाबद्दल प्रेक्षकांचे मन काहीसे कलुषित करतात. कथानकाला दिलेली कंटाळवाणी लांबणही तितकीशी योग्य वाटत नाही. नाटकात कित्येक पात्रे उगीचच लुडबुड करीत असलेली दिसून येतात. गोपाळ आणि शोभा यांचा कथानकाशी काय संबंध ? त्यामुळे एक संबंध नसलेले, अपुरे कथानक मात्र निर्माण झाले आहे. या सर्व गोष्टी मनावर अतिशय ताण पाडतात.

## नेटके संवाद : उत्कृष्ट अभिनय

हे दोष लक्षात घेतले तरी नाटकातील संवादरचना चांगल्या प्रकारची आहे. संवादातून, प्रसंगातून व्यक्तिरेखा प्रभावीपणे उभ्या करण्याची हातोटी वाखणण्यासारखी आहे. एकंदरीत हे नाटक म्हणजे वेगवेगळ्या कथानकांची मोट एकत्र बांधणारे नाटक आहे. या नाटकाच्या लेखनाला सरकारी नाट्यस्पर्धातील लेखनाचे प्रथम पारितोषिक कसे दिले हेच समजत नाही.

या उलट दिग्दर्शन, प्रयोगदर्जा, अभिनय या गोष्टींसाठी देण्यात आलेली पारितोषिके पूर्णपणे योग्य आणि अभिनंदनीय आहेत. त्याच्या शंभरटक्के सत्यतेविषयी संदेह राहत

राजा पाठक



आबा : यांनी नाटकाला हात दिला.

नाही. प्रयोग बसविण्यातील कौशल्य काय वाखाणावे ? पात्रांच्या हलचाली जितक्या रेखीव आणि आकर्षक तितक्याच प्रत्येक पात्राच्या अभिनयात मुसमुसलेल्या जिवंतपणात एक निकोप स्पर्धा दिसत होती. आबा (राजा पाठक) आणि त्यांचा नोकर दाजिबा (गणेश सोळंकी) ह्या दोन कलाकारांचा अभिनय दृष्ट लागण्यासारखा मोहक होता. आबांच्या स्वभावातील ओलावा, फणसासारखे ओबडधोबड पण आतील वात्सल्य अतिशय रसाळ आणि गोड, घरादारावर त्यांचा असलेला दरारा, आदि विविध वैशिष्ट्ये पाठक इतक्या कमालीच्या सहजतेने उभ्या करतात की जणू एखादा खराखुरा वऱ्हाडी माणूसच आपण पाहात तर नाही, असा भास होतो. त्यांची बोलण्याची धाटणी, उभे राहण्याची ऐट अशी काही झोकदार होती की प्रेक्षक बेहद्द खूष होतात. हेच कौतुक सोळंकींच्या वाट्यास येते. त्यांची कामातील सफाई अशीच आगळी आहे. बोलण्याची एक विशिष्ट पद्धतीही मनाला आनंद देते. वृद्ध नोकराचे व्यक्तित्व, त्याची स्वामिनिष्ठा ते बारीकसारीक हालचालीतूनही सहजपणे उभ्या करतात. ह्या गोष्टी केवळ सांगून, वर्णन करून कळणाऱ्या नाहीत तर प्रत्यक्ष पाहून अनुभवाव्या, एवढ्या दर्जाच्या खचित आहेत. दोघाही कलाकारांचा आत्मविश्वास अतिशय दांडगा आहे. अन्य कलाकारांचा अभिनय चांगला होतो. नाटकाच्या परिणामात यशाचे पारडे त्यामुळे जरूर जड होते. नाटकातील स्त्री-पात्रे केवळ तीन ! यातील शोभा निरर्थकच आहे. तरीही शोभा वकील यांनी ते काम मनापासून केले. पार्वतीचे कामातील रुबाब सौ. चंद्रप्रभा दिवेकर चांगल्या तऱ्हेने दाखवितात. त्यांचे भाषण केवळ शेवटल्या अंकातच असले तरी पहिल्या दोन अंकभर त्यांच्या बोलक्या चेहऱ्याने संवादाची उणीवही भासू दिली नाही. नलिनी शर्मा नलिनीच्या भूमिकेतील भ्रमिष्टपणा चांगल्या तऱ्हेने दाखवितात. एकंदरीत ' रंजन कलामंदिरा 'ने या कलावंतांचा संच मात्र सुरेख जमविला आहे. हौशी कलासंस्थांनी त्यांचे अनुकरण करावे इतपत गुण संस्थेत खास आहेत.

## संगीत शोभा !

नाटकातील संगीत व नृत्य यांची भर तितकीशी रुचत नाही. गोपाळ व शोभा यांच्यासाठी संगीत व नृत्य आहे व संगीत नृत्य हवे म्हणून गोपाळ व शोभा आहेत. याचा उलगडा तेव्हाच होतो. त्याची निरर्थकता मनाला तात्काळ जाणवते.

नाटकातील २-४दोष नजरेआड केले तरीही प्रयोगाचा परिणाम बराच काळ मनावर होतो हे प्रांजलपणे कबूल करायलाच पाहिजे. आणि म्हणूनच हौशी कलावंतांची रंगभूमीही काही नेत्रदीपक भव्य करून दाखविते याचा पडताळा मिळतो.

**—सुधीर दामले**

●

# अतिवास्तवाची लाट

चित्रपटरसिकांची नाडी ओळखणे हे असख्य रोगानी पछाडलेल्या रोग्याची नाडी ओळखण्यापेक्षाही खरोखर अवघड आहे. आजवर असंख्य चित्रपट निर्माण झाले, अनेक प्रकारचे चित्रपट निर्माण झाले, उत्तमोत्तम कलावंतांचा अभिनय पहायला प्रेक्षकांना मिळाला. मग आता नव्या चित्रपटांत काय आकर्षण असावे ? चित्रपटाच्या प्रेक्षकाला त्याच्या घराच्या भिंतीतून ओढून बाहेर काढून चित्रपट कसा पहायला लावायचे, हा दिग्दर्शक-निर्मित्यापुढे कायमचा प्रश्न असतो.

यामुळेच चित्रपटसृष्टीत नेहमी नवनव्या लाटा येत असतात. या येणाऱ्या लाटा इतक्या जबरदस्त असतात की त्या प्रेक्षकाला चित्रपटाबद्दल जबरदस्त आकर्षण निर्माण करतात.

दुसऱ्या महायुद्धानंतर इटालीने प्रथम डोके वर काढले. तेथील परिस्थितीबद्दल रोबर्टो रोझोलिनीने 'दि पेसान' 'ओपन सिटी', आणि व्हिक्टोरीओ डिसिका यांच्या 'बायसिकल थीफ' 'शू-शाईन' या चित्रपटांत चागले दर्शन घडले. हे चित्रपट नव्या वातावरणातले होते. काही नव्या कल्पना घेऊन पुढे आले होते. त्यामुळे हे चित्रपट पाहून रसिकवर्ग स्तिमित झाला. या चित्रपटातील वास्तवता पराकोटीला पोहोचलेली होती. असले वास्तवपूर्ण चित्रपट भारतात कधीकाळी तयार होतील की नाही, अशी त्यावेळी आपले टीकाकार टीका करू लागले. पण सत्यजित राय यानी 'पालेर पाचाली', 'अपराजितो' व 'अपूर ससार' हे एकामागोमाग वास्तवपूर्ण चित्रपट काढून टीकाकाराना गप्प बसवले. रॉय यांच्या या चित्रपटांनी जागतिक मान्यता मिळविली.

पण व्हिक्टोरीओ डिसिका, सत्यजित राय यांच्या वास्तवपूर्ण चित्रपटानांही नव-वास्तवतेत मागे सारणारी एक नवी लाट फ्रान्समध्ये निर्माण झाली. हॉलिवूडमध्येही काही प्रमाणात या नव्या लाटेने हातपाय पसरले आहेत. कामुकतेला उघडाउघड वाव देणारे, त्याबाबतीत किंचितही लपवालपवी न करणारे, क्वचित अनैतिकतेला पाठीशी ही घालणारे असे विचार घेऊन ही लाट पुढे सरकते आहे. नव्या लाटेत वास्तवतेतील कुरूपता आणि सौंदर्य याचा सारखाच वाटा आहे.

### द गॉलचा फतवा

फ्रान्समधून पसरणाऱ्या या नव्या लाटेचे फ्रान्सच्या जनतेने मात्र चांगलेच स्वागत केले. खरे म्हणजे फ्रेंच मनुष्य आधीच थोडा बहकलेला मानला जातो. फ्रेंच स्त्री रगेल मानली जाते. त्यांच्या एरव्हीच्या चित्रपटांनीही इतर देशाना भुवया उंचावून विचार करायला लावले होते. ब्रिजीट बॉर्डोटसारख्या सुंदरीची ही मायभूमी. तेथील चित्रपट मुळातच प्रेक्षकांना वेड लावत. आता या नव्या लाटेमुळे फ्रेंच चित्रपटांबद्दल लोकाना आकर्षण वाटते आहे, त्याप्रमाणेच त्या चित्रपटात वेगळेपणाही येत आहे. फ्रान्सचे अध्यक्ष द गॉल हे या परिस्थितीला कारणीभूत ठरले आहेत. द गॉलने फ्रान्सचा राज्यकारभार हाती घेतल्यानंतर थोड्याच दिवसात जाहीर केले की त्याच त्याच प्रकारच्या जुन्या ओगळ पद्धतीच्या चित्रपटाना माझे सरकार सहाय्य करणार नाही. काही नवे असले, आगळे असले, कल्पना हलवून सोडणारे असेल तरच सरकार त्या चित्रपटाला सहाय्य करण्याबाबत विचार करील. अध्यक्ष द गॉलची घोषणा होईपर्यंत फ्रेंच निर्मिते हे हॉलिवूडच्या निर्मात्यासारखेच रूढ आणि हमखास चालतील अशा सरळ चित्रपटांच्या मागे लागलेले असत. अध्यक्ष द गॉलच्या घोषणेनंतर ते प्रेक्षकांना काही नवे, काही आगळे देण्याबद्दल विचार करू लागले. द गॉलची घोषणा ठीक आहे, पण नवे काही पुढे आणले तर प्रेक्षकाना आवडेल की नाही, हा प्रश्न त्याना सतावीत होता.

पण या निर्मात्यांची भीती खोटी ठरली. नव्या नि वेगळ्या अशा चित्रपटाचे फ्रान्सच्या जनतेने जोरदार स्वागत केले. मार्सेल कार्ने याने बालगुन्हेगाराच्या जीवनावर 'दि चीटर्स' हा चित्रपट अत्यंत धाडसी प्रयत्न करून वेगळ्या ढगात सादर केला. १९५८–५९ साली हा अतिशय यशस्वी चित्रपट ठरला.

या चित्रपटाने यश मिळविले तोच १९५९च्या अखेरीस लुई मॉल (वय वर्षे २७) या दिग्दर्शकाने तयार केलेला वास्तवपूर्ण चित्रपट 'दि लव्हर्स' हा प्रेक्षकापुढे आला. नव्या लाटेतल्या या दुसऱ्या चित्रपटाने फ्रान्स अक्षरशः डोक्यावर घेतले. नवे पाहिजे, आगळे पाहिजे, धाडसी पाहिजे, वास्तवता पराकोटीला पोहोचलेली पाहिजे हा जणू नवा मंत्र सापडला.

ज्यांनी पूर्वी चित्रपटसृष्टीत काहीही अनुभव घेतलेला नव्हता, असे अनेक तरुण एकामागून एक पुढे येऊ लागले. दोनतीन वर्षांच्या अवधीत जवळजवळ ३० नवे अननुभवी तरुण या सृष्टीत उतरले आणि त्यांनी सबंध चित्रपटसृष्टी ढवळून काढली.

या तरुणांत ज्यानी अल्पावधीत अतिशय नाव कमावले व अग्रगण्य ठरले त्यापैकी दिग्दर्शक फ्रेंकॉस ट्रुफों, (वय २७), ॲलन रॅसने (वय ३१), क्लॉड केब्रॉल (वय २७), एडॉर्ड मोलीनारो (वय ३०), हे प्रमुख आहेत. ट्रुफॉचा 'दि फोर हड्रेड ब्लोज्', रॅसनेचा 'हिरोशीमा' 'माय लव्ह', केब्रॉलचा 'दि कझिन्स', मॉलीनारोचा 'बॅक टु दि वॉल' हे अत्यंत गाजलेले चित्रपट आहेत. यांच्या चित्रपटांतील प्रणयप्रसंग वेगळ्याच तऱ्हेने रंगविलेले आहेत. फोटोग्राफर्सनी वेगळेच कौशल्य प्रगट केले आहे. हे चित्रपट पाहून एका अमेरिकन लेखकाने लिहिले– It is hard to see the pictures as pictures. They are so real.

फ्रेंच जनतेने या चित्रपटाचे स्वागत केले, तरी त्या चित्रपटाची 'नैतिक पातळी' हि काही टीकाकारांना अस्वस्थ करू लागली. याशिवाय आणखी एक गोष्ट टीकाकाराच्या लक्षात येऊ लागली. ती अशी की वास्तवता म्हणता म्हणता हे चित्रपट कम्युनिझम्चा अप्रत्यक्ष प्रसार करू लागले, उच्चवर्गीयाबद्दल तिरस्कार तेथे दिसू लागला.

या नव्या मंडळीनी सर्व नवाच प्रकार सुरू केला. जुन्या कलावंतांपेक्षा प्रत्येक वेळी नवा कलावत शोधायचा, प्रत्येक वेळी काहीतरी वेगळ्याच धर्तीने कथा माडायची, चित्रपटाच्या आर्थिक बाजूची मुळी चिंताच करायची नाही असा काही प्रकार कडू लागला.

### दिग्दर्शक कामू

या नव्या लाटेनेच 'ब्लॅक ऑर्फिअस' हा चित्रपट जन्माला आला. हा एक उत्कृष्ट चित्रपट मानला जातो आणि त्या चित्रपटाचा

दीर्घकाळ मनावर ठसा उमटून राहील असे टीकाकाराचे म्हणणे आहे. मार्सेल कामू नावाच्या दिग्दर्शकाने हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. ब्राझीलचा प्रसिद्ध कवी नाटककार व्हिनीसीअस डि मोराएस यांनी या चित्रपटाची कथा लिहिली आहे. कामूने चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी रिओ-डी-जानेरोच्या भोवतालच्या निसर्गरम्य पहाडी मुलुखाची निवड केली. या जागेत नीग्रो लोक दारिद्र्यावस्थेत दिवस कंठीत असतात.

दिग्दर्शक कामूने या चित्रपटाला सुरुवात केल्यानंतर काही दिवस कामू ब्राझीलमध्येच राहत होता. त्या काळात त्याच्याजवळील सर्व पैसे संपत आले म्हणून तो समुद्रकिनारी झोपे व दिवसा बाहेर भटकून काम करी. हॉटेलात रात्र काढण्याइतके त्याच्याजवळ पैसे नव्हते. असे असूनही त्याने चित्रपटाचे काम चालूच ठेवले. खिशात पैसे नसल्यामुळे तो ज्या भागात खातपीत असे, हिंडतफिरत असे, त्याचाही त्याला दिग्दर्शनाचे कामी बराच उपयोग झाला. त्याच्याजवळचे पैसे संपल्यानंतर ब्राझिलच्या अध्यक्षांनी सैनिकी दलाकडून त्याला काही उपकरणे देवविली. कामूने फुटबॉल खेळाडू जेनो मेलो याची अभिनयासाठी निवड केली. या नायकासाठी, त्याच गावाची एक अगदी अप्रसिद्ध नर्तकी मार्पेस्सा डॉन हिची नायिका म्हणून निवड झाली.



**' ऑर्फिअस ' मध्ये मेलो व डॉन**

' ब्लॅक ऑर्फिअस ' हा चित्रपट फ्रान्समध्ये दाखविण्यात आला, तेव्हा प्रेक्षक बेहद्द खूष झाले. कान येथील चित्रपटमहोत्सवात त्याला पारितोषिक मिळाले. लगोलग अमेरिकेत ' ऑस्कर ' पारितोषिकहि मिळाले.

या चित्रपटाचे कथानक काहीसे असे आहे; ऑर्फिअस हा रिओमधील ट्रामचा कंडक्टर असतो. युरोडाईस ही खेडुत तरुणी त्याची नातेवाईक. एक दुष्ट वृत्तीचा तिऱ्हाईत मनुष्य तिला ठार मारण्याचा प्रयत्न करतो. त्याच्यापासून निसटावे व ऑर्फिअसला भेटावे म्हणून युरीडाईस खेडे सोडून शहरात येते. तेथे दोघांचे एकमेकांवर प्रेम बसते. पण तेवढ्यात एका सणाचे दिवशी तिचा शत्रू येतो व तिला घेऊन जातो. तिला साक्षात मृत्यूच भेटतो. ऑर्फिअस तिला खूप शोधतो आणि अखेर मरण पत्करून तिला भेटतो. चित्रपटात ठिकठिकाणी ड्रमचे असे काही चमत्कारिक आवाज करण्यात आले आहेत की जणू मृत्यूची प्रत्यक्ष चाहूलच लागते आहे.

टूफॉच्या चित्रपटानेही फ्रान्समध्ये पारितोषिक मिळविले आहे.

नव्या लाटेचेही चित्रपट आता जगभर संचार करीत आहेत. आणि नव्या लाटेचे निर्माते आता आणखी ' वेगळ्या आणि नव्या ' कल्पना राबवीत आहेत. यांपैकी काही चित्रपट जुलैमध्ये इकडे येणार आहेत.

• • •





आपली त्वचा
अधिकाधिक मुलायम होण्यासाठी–

सौंदर्यवर्धक
**अफगाण स्नो**

ई. एस्. पाटणवाला, मुंबई ७७

## क्रीडा विहार



### १ : कु. नीला कुलकर्णी

नुकत्याच दिल्ली येथे पार पडलेल्या राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत 'स्त्री' विभागात पुण्याच्या एका तरुणीने मोठीच खळबळ उडवून दिली. मीना परांडेसारख्या राष्ट्रीय कीर्तीच्या खेळाडूचा पराभव करून व अंत्य सामन्यात दिल्लीच्या प्रबळ सुमित्रा मेहानवर मात करून राष्ट्रीय स्पर्धेचे अजिंक्यपद मिळविण्याचा कौतुकास्पद पराक्रम करणाऱ्या या तरुणीचे नाव आहे कु. नीला कुलकर्णी, कमी उंचीच्या, किरकोळ शरिरयष्टीच्या व अल्लड शाळकरी मुलीप्रमाणे दिसणाऱ्या कु. नीला कुलकर्णीस पाहताच, मीना परांडेसारख्या कसबी खेळाडूचा या तरुणीने पराभव केला या घटनेवर एकदम विश्वास बसत नाही.

दिल्ली येथे झालेल्या सामन्यांविषयी माहिती सांगत असता कु. नीला कुलकर्णी म्हणाल्या, "सदरहू स्पर्धा रेल्वे स्टेडियमवर भरविण्यात आल्या होत्या. सामन्यांची व्यवस्था दिल्लीकरांनी फारच सुरेख केली होती. स्पर्धेस प्रारंभ झाल्यावर माझी पहिली गाठ पडली, १९६१ मध्ये ५ वा क्रमांक मिळविणाऱ्या म्हैसूरच्या सौ. रंगनायन यांच्यावरोबर. या सामन्यात मला विजय मिळविण्यास फारसे जड गेले नाही.

"त्या पाठोपाठ मी उपा प्रधान (दिल्ली) व वीणा दिवाण (मुंबई) यांचा पराभव करून उपांत्य सामन्यांत प्रवेश केला. उपांत्य सामन्यांत मला मीना परांडेबरोबर लढत द्यावयाची होती. मीना परांडे यांनी मला टेबल-टेनिस खेळावयास शिकविल्याने गुरु-शिष्याच्या लढतीकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. मीना परांडेची तयारी दांडगी असल्याने व अनेक मोठ्या सामन्यांच्या अनुभवाची शिदोरी तिच्याजवळ असल्याने मला यश प्राप्त होणे अशक्यप्रायच होते. मीनासमोर खेळावयास उतरले तेव्हा मी काहीशी भांबावून गेले होते. मीनाने पहिला सेट तर अगदी सहज जिंकला, तेव्हा आपला निभाव लागणार नाही असे वाटू लागले. परंतु नंतर मात्र मी जोर करून परांडेवर एक एक सेट घेऊ लागले. व शेवटी १४-२१, २३-२१, १५-२१, २१-१७, २१-१४ या गुणांनी मी विजयी ठरले. माझे हृदय आनंदाने भरून गेले होते. परांडेने माझ्या यशाचे अभिनंदन केले तेव्हा तर मला अत्यानंद झाला. अंत्य सामन्यांत मी दिल्लीच्या सुमित्रा मेहान हिचा २२-२०, २१-१७, १५-२१, २१-१७ गुणांनी पराभव करून अजिंक्यपद जिंकले. मीना परांडेचे कुशल मार्गदर्शन व माझ्या घरातील मंडळींनी दिलेले प्रोत्साहन या गोष्टीमुळे मी हे यश मिळवू शकले."

आपणास टेबल टेनिसची आवड कशी निर्माण झाली हे सांगताना कु. नीला कुलकर्णी म्हणाल्या, "शालेय जीवनात मी खो-खोपटू म्हणून प्रसिद्ध होते. मला या खेळाची मनापासून आवड होती. मी एस्. एस्. सी. च्या वर्गात असताना माझा मीना परांडेशी परिचय झाला व त्यांनी मला टेबल टेनिसची आवड निर्माण केली. पी. वाय. सी. जिमखान्यावर त्या मला खेळावयास घेऊन जात. मला खेळाची विशेष गोडी वाटू लागली. मी नित्य व मेहनतपूर्वक सराव करू लागले.

"टेबल टेनिसचा अभ्यास चालू असताना मी खोखोवरील माझे लक्ष मुळीच उडू दिले नाही. फर्ग्युसन व स. प. महाविद्यालयांत असताना मी खोखो सामन्यांत भाग घेत असे. दोन्ही महाविद्यालयीन संघाचे नेतृत्व करण्याचाही मान मला मिळाला आहे. माझी आंतरविद्यापीठ खोखो सामन्यांत पुणे विद्यापीठातर्फे लागोपाठ तीनदा निवड झाली. १९६३ मध्ये तर मला विद्यापीठाचे कप्तान करण्यात आले होते व या वर्षी आमचा संघ अजिंक्य ठरला होता. महाविद्यालयातील चार वर्षांच्या कालावधीत मी टेबल टेनिस मध्ये दोनदा अजिंक्यपद व दोनदा उप-विजेतेपद मिळविले आहे. आतापर्यंत कलकत्ता व मुंबई येथे झालेल्या महत्त्वाच्या सामन्यांत मी भाग घेतला आहे."

नीला कुलकर्णी या डावखोऱ्या खेळाडू आहेत. खेळताना त्या प्लेसिंगवर जास्त भर देतात. परंतु बचावात्मकता (Defence) हा या खेळातील प्रमुख गुण मात्र अजून त्यांनी आत्मसात केलेला दिसत नाही. भावी काळात हा दोष नाहीसा करण्याचा त्या प्रामुख्याने प्रयत्न करतील अशी आशा आहे.

### २ : मारुती माने 'हिंद-केसरी'

१९६४ सालचा प्रारंभ हा महाराष्ट्राच्या क्रीडा-जीवनांतील सुवर्णकाळ म्हणून संबोधल्यास वावगे ठरणार नाही. विविध क्रीडा-क्षेत्रातील बहुमान मिळविण्याचे पराक्रम महाराष्ट्रीयन वीरांनी गाजविले आहेत. स्टेफी डिसुझा, गणपती आंदळकर यांनी 'अर्जुन' पदक प्राप्त केले, नीला कुलकर्णीने टेबल टेनिस स्पर्धेत राष्ट्रीय अजिंक्यपद मिळविले आणि या सर्व पराक्रमांवर कळस चढविला मारुती मानेने. यंदाच्या 'हिंद-केसरी' पदासाठी झालेल्या कुस्त्यांच्या स्पर्धेत तो विजयी ठरला व कुस्तीतील 'हिंद-केसरी'चा सर्वोच्च मान त्याने मिळविला. १९५९ मध्ये प्रथमच या बहुमानासाठी कुस्त्या भरविण्यात येऊ लागल्या. प्रथम वर्षीच्या स्पर्धेत श्रीपती खंचनाळे यांनी हा मान मिळविला. लगेच पुढील वर्षी म्हणजे १९६० साली हे पद महाराष्ट्राने कायम राखले. गणपत आंदळकरने खडकसिंगचा मुंबई येथे पराभव करून 'हिंद-केसरी' किताब मिळविला. परंतु नंतर चार वर्षांच्या कालावधीत हा बहुमान मिळविणारा एकही मल्ल उदयास आला नाही. परंतु यंदा कर्नाल येथे झालेल्या सामन्यात महाराष्ट्राकडून हिरावून घेतलेला मान मारुती मानेने परत मिळविला.

सांगलीपासून सात मैलांवर असलेल्या कवठे पिरान ही मारुती मानेची जन्मभूमी. सहा फूट उंचीचा, गोरापान, दाढीधारी असलेला हा मल्ल सध्या भलताच जोशात आहे. एकामागून एका प्रबळ वीरांवर तो मात करीत आहे. मुंबई येथे त्याने दिल्लीच्या भीमसिंगचा पराभव केला तर कोल्हापुरात महंमद हनीफ बरोबर सतत ५५ मिनिटे निकराची झुंज देऊन त्याने अपूर्व विजय मिळविला. दिल्ली येथे पार

पडलेल्या १४ व्या राष्ट्रीय कुस्तीस्पर्धेतही ' लाइट हेवी ' वेट गटाचे अजिंक्यपद त्याने मिळविले. १९६२ साली जकार्ता येथे झालेल्या आशियाई क्रीडोत्सवात त्याने भारताला एक सुवर्ण व एक रौप्यपदक मिळवून दिले होते. रशियातही त्याने कुस्तीसाठी दौरा काढला होता. मातीतील भारतीय कुस्तीप्रमाणे ' मॅटिंग ' वरही कुस्ती खेळण्यांत त्याने चांगलेच प्रावीण्य मिळविले आहे. वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी ' हिंद-केसरी ' पदक मिळविणाऱ्या या वीराचे सारे लक्ष ऑक्टोबरमध्ये टोकियो येथे सुरू होणाऱ्या ऑलिंपिक सामन्यांकडे लागून राहिले आहे. त्या दृष्टीने त्याने आपली जोरात तयारी सुरू ठेवली आहे.


## ३ : क्रिकेटचा जनक असा होता

आपल्या विनोदी स्वभावाने अनेक क्रिकेटपटू रसिकांच्या मनात आपले आगळे असे स्थान निर्माण करणारे, इंग्लिश क्रिकेटचे भीष्माचार्य म्हणून गणले जाणारे डॉ. डब्लू. जी. ग्रेस यांच्याबद्दल अनेक विनोद व तसेच त्यांची अनेक स्वभाववैशिष्टचे सांगितली जातात. हेकेखोर व काहीसा चिडखोर स्वभाव, प्रत्येकावर हुकमत गाजविण्याची लालसा, गैरडाव खेळून प्रतिपक्षावर विजय मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न, आदि डॉक्टरसाहेबांचे अनेक विशेष प्रसिद्ध आहेत. सर्वांवर त्यांचा अतिशय दरारा असे. त्यांच्याविरुद्ध ब्र काढण्याची कोणाचीही छाती होत नसे. परंतु एकदा मात्र डॉक्टरसाहेबांना शेरास सव्वाशेर खेळाडू भेटला. एकदा काय झाले– ग्लाडस्टरशायर व एसेक्स या संघांमध्ये सामना चालू होता. दोन-चार धावा असताना डॉक्टरसाहेबांचा झेल उडाला व तो क्षेत्ररक्षकाने अचूक टिपला. परंतु डॉक्टर म्हणाले, " तो झेल नव्हता." (Bump-catch) आपण बाद नसल्याचे त्यांनी पंचांना सांगितले. बिचारा पंच घाबरून गेला व त्याने डॉक्टरांना नाबाद ठरविले. थोडचा वेळाने कोर्टरिडज या गोलंदाजाने या गोष्टीचा सूड उगविला. त्याने एका चेंडूवर डॉक्टराची मधली व डावीकडील यष्टी पार उध्वस्त करून टाकली. डॉक्टर हताश होऊन तंबूत परतू लागले, तेव्हा सदरहू गोलंदाज त्यांना उद्देशून म्हणाला, " हे काय महाराज, आपण निघालात ? परंतु आपली तिसरी यष्टी अजून कोठे पडली आहे ?" गोलंदाजाने काढलेल्या खवचट उद्गारांनी डॉक्टरांच्या अंगाचा तिळपापड उडाला. परंतु करतात काय, शेरास सव्वाशेर प्रतिस्पर्धी प्रथमच त्यांना भेटला होता.

आपल्या संघाचे नेतृत्व करताना डॉक्टर अनेक गैरमार्गाचा अवलंब करून फलंदाजांना बाद करीत असत. खेळाडूचे लक्ष दुसरीकडे वेधून त्याला बाद करण्याची युक्ती त्यांना सापडली होती. एका सामन्यात बराच वेळ खेळत असलेला फलंदाजास ते म्हणाले, " अरे, ते बघ, आकाशात काय सुरेख पक्षी उडत आहे !" त्या बिचाऱ्यास डॉक्टरांचा कावा माहीत नव्हता. त्याने अज्ञानाने चटकन वर पाहिले. प्रखर सूर्यप्रकाशामुळे त्याचे नेत्र दिपून गेले, आणि पुढच्याच चेंडूवर तो बाद झाला. एखादा खेळाडू डॉक्टरांचा उडालेला झेल घेण्याचा प्रयत्न करीत असेल तर ते मोठचाने ओरडत, "अरे सोड तो झेल !" त्यांच्या उद्गारांनी भांबावून जाऊन क्षेत्ररक्षक हमखास झेल सोडीत असे !

पंचांनासुद्धा डॉक्टर चांगलेच चकवीत असत. एकदा एका सामन्यात त्यांचे थोरले बंधू गोलंदाजी करीत होते. त्यांचा एक चेंडू फलंदाजाच्या पायास लागला, तेव्हा बंधूंनी फलंदाजास बाद देण्याची पंचांकडे मागणी केली, परंतु ती फेटाळली गेली. फलंदाजाच्या जवळच क्षेत्ररक्षणास उभे असलेले डॉक्टर पंचास म्हणाले, " महाराज, माझा भाऊ कारण नसतांना नेहमीच फलंदाजांना बाद देण्याविषयी मागणी करतो. आपण तिकडे लक्ष देऊ नका. परंतु मी जेव्हा फलंदाज बाद झाल्याची मागणी करीन, तेव्हा खात्री असू द्या की फलंदाज बाद असलाच पाहिजे." थोडचाच वेळाने डॉक्टरांनी फलंदाज बाद असल्याची मागणी पंचाकडे केली, आणि गंमत अशी की, डॉक्टरांच्या व्यक्तिमत्त्वाने भारावून गेलेल्या पंचाने तावडतोब फलंदाजास बाद दिले.

मैदानावर डॉक्टरांचा स्वभाव काहीसा विक्षिप्त वाटला तरी एरवी ते आदर्श गृहस्थ होते. तरुण क्रिकेटपटूंकडे त्यांचे नेहमी लक्ष असे. उभ्या आयुष्यात त्यांनी कधीही धूम्रपान केले नाही. लांब दाढी, धिप्पाड राक्षसी शरिरयष्टी या दोन प्रमुख वैशिष्टचांमुळे ते क्रिडांगणावर चटकन् नजरेत भरत. डॉक्टरांचे अनेक स्वभावदोष माहीत असूनही इंग्लिश क्रिकेट रसिकांच्या मनांत डॉक्टरांबद्दल नितांत प्रेम व आदरभाव आहे. ' क्रिकेटचे जनक ' म्हणून त्यांना संबोधले जाते. आपल्या क्रिकेटजीवनात त्यांनी एकूण १२६ शतके केली. एकूण ५४,८९६ धावा केल्या. इंग्लिश क्रिकेट मोसमांत १००० धावा करण्याचा मान त्यांनी २८ वेळा मिळविला. डॉक्टरसाहेबांची क्रिकेट आकडेवारी डोळे दिपवणारी अशी आहे यात शंका नाही. **—प्रभाकर गुजराथी**



**"अहो ! वाढदिवसाला तुम्हाला कापड आणायला सांगितले, तुम्ही पापड काय घेऊन आलात !"**

प्रेक्षकांची निशा संपली : आशा परत आली !

राजा परांजपे निर्मित 'श्रीपाद' चित्र

# पाठलाग



भावना – नवा चेहरा

चित्रपट कथा ही कॅमेऱ्याने उलगडावयाची असते, व्याख्यानबाजीने नव्हे, याचे पूर्ण भान ठेवून दिग्दर्शन हाताळणारे जे एकच दिग्दर्शक सध्या मराठी चित्रसृष्टीला लाभले आहेत, ते म्हणजे राजा परांजपे. म्हणूनच राजा परांजपे यांचा चित्रपट म्हटला, की तो प्रेक्षकांना संपूर्ण समाधान देणारा ठरतोच, या अपेक्षेने मराठी प्रेक्षक त्यांच्या चित्रपटाला गर्दी करून सोडतात. 'पाठलाग' हा राजा परांजपे यांचा चित्रपट सध्या पुणे-मुंबईस गर्दी खेचीत आहे त्याचे हे रहस्य आहे.

मात्र हे समाधान पूर्णपणे लाभण्याकरिता परांजपे हे एक त्या चित्राचें दिग्दर्शक हवेत त्याचप्रमाणे ते निर्मातेही असले पाहिजेत. म्हणजेच अनवश्यक नृत्ये, भयानक प्रेमगीते, पहिल्या रात्रीचे प्रसंग असला मालमसाला टाळण्याचे स्वातंत्र्य त्यांना लाभते. 'पाठलाग' या चित्रपटाचे निर्माते म्हणूनही 'राजा परांजपे' यांचेच नाव पडद्यावर आले तेव्हा हा चित्रपट राजा परांजपे यांच्या अत्यंत यशस्वी चित्रपटांतील एक ठरणार असा दिलासा मिळाला.

### कथानकातील रहस्ये

कथा थोडक्यात : अशी. आशा-निशा या दोन जुळ्या बहिणी असतात. निशेचे पाऊल तरुणपणी वाकडे पडते व ती एका दरोडेखोर प्रवृत्तीला जवळ असणाऱ्या तरुणाचा हात धरून निघून जाते. निशेचे पोट भरणे शक्य न झाल्याने निशेचा प्रियकर दरोडेखोर बनून यवतेश्वराच्या डोंगरकपाऱ्यांत लपून दिवस कंठीत असतो. आशाच्या आईने आशाला निशेचा नामोल्लेखही पुढील आयुष्यात करावयाचा नाही अशी शपथ घातलेली असते. ही सर्व कथा चित्रपटांत कॅमेरा दाखवीत नाही. याच्या गुणदोषांची चर्चा पुढे करूच.

आशाचे ( सुमन लाटे ) लग्न बाळासाहेब चितळे ( काशीनाथ घाणेकर ) या उमद्या वकिलाशी होते. लग्नानंतर तीन वर्षांनी बाळासाहेब इंग्लंडला उच्च शिक्षणासाठी जातात. मध्यंतरीच्या काळांत चितळे वकिलांच्या घरावर दरोडा घालण्याची पूर्व तयारी म्हणून निशा त्या घरात आधी येते. बहिणीला ओळख देते. परंतु दुर्दैवाने आजारी पडते. बहिणीची हकिगत गुप्त असल्याने आशा तिला आपल्या खोलीत लपवून डॉक्टर आणण्यासाठी बाहेर पडते. तिच्या मागावर असलेला बंडू नवले (ईश्वर) तिला निशा समजून पळवतो.

इकडे निशा तडकाफडकी निधन पावते. इंग्लंडहून तार आल्यामुळे धावत परत आलेले बाळासाहेब निशेची समाधी बांधतात व नाव देतात 'आशा–स्मृती !' या आशा-स्मृतीपाशी बसून आठवणी उगाळणे किंवा तिचे टेपरेकॉर्ड केलेले गाणे अथवा संभाषण ऐकत बसणे हाच त्यांच्या दुःखी मनाला विरंगुळा असतो.

बंडू नवलेच्या मागावर असलेले पोलिस त्याला फक्त जखमी करतात. परंतु आशा त्यांचे हाती लागते. दरोडेखोरांच्या टोळीतील बाई माणूस म्हणून तिच्यावर खटला उभा रहातो. आशाला आपण आशा आहोत, निशा ही मरण पावली आहे, ही गोष्ट कोर्टात सिद्ध करण्याचे कठीण काम करावे लागते. बंडू नवले कोर्टात वेष पालटून हजर असतोच. आशा ही निशा नाही हे लक्षांत येताच तो देखील प्रगट होऊन आशाला तिच्या कामांत मदत करतो. आशा मेली या समजुतीने कोर्टात समोर उभ्या असलेल्या आरोपीस पत्नी म्हणून नाकारणाऱ्या बाळासाहेबांची आशा त्यांना परत मिळते. बंडू नवले तुरुंगात फाशीच्या दिशेने वाटचाल करूं लागतो.

श्री. जयंत देवकुळे यांच्या 'आशा परत येते' या कथेवर ग. दि. माडगुळकरांनी पटकथा लिहिली आहे. मूळ कथा हाती लागली असती तर पटकथा करताना श्री. माडगुळकर यांनी जे बदल केले आहेत त्याचे गुणदोष सांगता आले असते. ज्या पद्धतीने ही कथा चित्रपटात प्रेक्षकांपुढे उलगडत जाते, त्या पद्धतीत 'भल्या बुद्धीच्या नानां'ना चकविण्या.चे सामर्थ्य आहे ही गोष्टच या चित्रपटाचे प्रमुख यश आहे. आशाच्या डायऱ्या वाचून निशेकडून बाळासाहेबाभोवती मोठा व्यूह रचला जात आहे अशी शंका प्रेक्षकांना येऊ लागते तोच निशेचे रहस्य उलगडू लागते व दिग्दर्शकाने आपणांस चकविले याची पावती तो मनोमन देतो. या दृष्टीने पटकथा ही अत्यंत यशस्वी झाली आहे.

कथा अनेक योगायोगांवर आधारित व फॅंटॅस्टिक आहे ही गोष्ट अर्थातच उघड आहे. बुद्धीला अतर्क्य अशी शापाची कल्पना हा

शाकुंतल नाटकाचा आधार असला तरी शाकुंतल हे रहस्यप्रधान नाटक नाही– तसे ते होऊ शकले असते ! पाठलागाच्या कथेत जुळ्या बहिणींचे पराकोटीचे साम्य ही बाब अशीच काहीशी असंभवनीय आहे. बंडू नवलेचे हृदयपरिवर्तन हे देखिल काहीसे अतर्क्य आहे. परंतु या गोष्टीचा उपयोग कथाकारानें फक्त रहस्यकथेची उंची गाठण्याकरताच केल्यामुळे प्रेक्षकांना बाळासाहेबांचे मृत बायकोसाठी समाधी भोवती अश्रू गाळणे किंवा आशेची हिंदू स्त्रियांच्या पतिविषयक दृष्टिकोनाच्या झालरी लावलेली भाषणे, ही काहीशी हास्यास्पद वाटतात. अर्थात कथाकाराने या गोष्टींना फारसे महत्त्व न दिल्यामुळेच या बोलपटाचा रहस्यपट हा परिणामकारक झाला आहे. कारण मराठी चित्रपटांत आईच्या प्रेमाचा, पातिव्रत्याचा, पहिल्या रात्रीचा, जेवणाचा, व्याख्यानाचा जो अतिरेक चालतो त्याचा प्रेक्षकांना कंटाळा आला आहे. म्हणूनच परांजपे यांच्या या प्रयोगाला प्रेक्षकांनी एकदम टाळी दिली आहे.

## पटकथेतील लहान दोष

पटकथेत काही लहानसहान दोष आहेत. कथेतील पहिला दोष म्हणजे निशेचा आशेकडे उतरवलेला वेषच आशेच्या अंगावर कसा चढतो याचा उलगडा होत नाही. बंडू नवलेची जबरदस्ती म्हणावी तर पोलिसांच्या ताब्यात गेल्यावर हाच पोषाक ही बाई का करते ? हा पोषाक आशेच्या संस्कृतीला विसंगतहि आहे. सुरवातीलाच खटकणारी दुसरी गोष्ट–म्हणजे, आशा समजून निशा मरण पावत असताना डॉक्टरांनी तिच्या घरच्या माणसांना केलेले बावताडन ! कुठलाही डॉक्टर अशी गोष्ट कधीही करणार नाही. आता राजा परांजपे यांनीच खुद्द डॉ. प्रभुण्यांची भूमिका करूनही ही विसंगत गोष्ट त्यांनी चित्रपटात सुरवातीला का करावी ? तिसरा दोष म्हणजे कथेच्या सुरवातीला जो भाग वर सांगितला आहे तो कॅमेऱ्याने दाखविण्याचे का टाळण्यात आले ? बाळासाहेबांच्या पत्नीविषयक आठवणी दाखविण्यात जेवढी फिल्म खर्ची पडली त्याचा काही भाग या कथानकाकरता खर्ची घातला असता तर आशेने केलेल्या व्याख्यानबाजीची छोटीशी लांबपट्टी टळली असती.

## दत्ता गोर्ले यांचे नितळ छायाचित्रण

या चित्रपटांत कॅमेरा महत्त्वाचा आहे ही गोष्ट दिग्दर्शकाने मान्य केल्यावर चित्रपटाचे छायाचित्रकार दत्ता गोर्ले यांचेवर मोठीच जबाबदारी पडलेली आहे. आणि त्यांनी ती अतिशय उत्तम पार पडली आहे. त्यांचे छायालेखन काही डोळ्यांना खुपत नाही. (अपवाद 'आशास्मृती' ही कापडी अक्षरे) सर्व बाह्य चित्रण विलक्षण वेधक आणि नयनमनोहर आहे. चित्रपटकथेला यामुळे एकदम स्थानाची पार्श्वभूमी लाभते. सह्याद्रीची खोरी आणि त्यांतील साहसी वृत्तीची कल्पना या छायाचित्रातून अंतःकरणाला भिडते. सौ. सुमन लाटे यांनी नायिकेची भूमिका प्रथमच केली असल्याने त्यांना चांगला छायाचित्रकार लाभला ही गोष्ट उपकारक ठरली आहे. काशिनाथ घाणेकरांच्या मानाने सौ. लाटे यांची शरीररेखा काहीशी स्थूल असूनहि कॅमेऱ्याने हा दोष जवळजवळ नाहीसा केलेला आहे. यामुळे सर्व प्रेमप्रसंग लोभस झाले आहेत. गोर्ले हे या चित्रपटाच्या यशाचे महत्त्वाचे भागिदार आहेत.

## परांजपे यांचे 'सबकुछ'


राजा परांजपे यांनी दिग्दर्शनात आपले वेगळेपण या चित्रात प्रेक्षकांच्या मनावर पक्के केले आहे. केवळ मॉंटाजीस भरणे म्हणजे उत्तम दिग्दर्शक ही खुळी कल्पना आता मागे पडली आहे. याचा हव्यास राजाभाऊंनी धरलेला नाही. त्यांनी हा रहस्यपट आह याची जाणीव ठेवून आपले कौशल्य पणाग लावले आहे. पोलीस कोठडी, गावचावडी, कोर्टातिले सर्व प्रसंग, हे याच चित्रपटात प्रथम अत्यंत वास्तव उतरले आहेत. आणि याचे सारे श्रेय केवळ परांजपे यांचेच आहे. कोर्टातील भाग कंटाळवाणा होऊ नये म्हणून बघ्यांमधील बहिरा माणूस, हॉटेलातील चर्चा, कोर्टाबाहेरील दोन पाहुणे, वकिलांच्या खोलीतील गप्पा या गोष्टीचा मोठ्या कल्पकतेने उपयोग केला आहे. काशिनाथ घाणेकर यांनी या पूर्वी दोन तीन चित्रपटांतून काम केले आहे. परंतु राजाभाऊंनी त्यांच्यावर या चित्रपटात जी किमया केली आहे त्यामुळे घाणेकर हे एकदम मोठे जाणते सिनेनट वाटू लागतात हे निश्चित. (कारण रंगभूमीवर ते नेहमीच चांगल्या भूमिका करतात.)

## उल्लेखनीय अभिनय

भावना यानी नायिकेचे काम अत्यंत समजूतदारपणे केले आहे. कुसुम देशपांडे यानी रंगवलेली मावशी व राजा नेने यानी केलेली न्यायाधिशाची भूमिका या सरस झाल्या आहेत. कोर्टाच्या प्रसंगाची उंची राजा नेने यानी वाढवली आहे.

या चित्राने राजा परांजपे यांनी अनेक नवीन गोष्टी प्रेक्षकांना दिल्या आहेत. सौ. सुमन लाटे यांचे पहिले पदार्पण गाजवले आहे. काशिनाथ घाणेकरांना पैलू पडले आहेत. रहस्यपट हा त्याच पातळीवर कसा काढावा त्याचा आदर्श दिला आहे. संगीताची मगरमिठी तोडून टाकली आहे. आणि... पुष्कळ केले आहे. सर्व मराठी प्रेक्षकांनी चित्रपट प्रत्यक्ष पाहून त्यांच्या मेहनतीचे चीज करावे. इति अलम् !

—महेश



दत्ता गोर्ले : जाणता कॅमेरा



म्हातारा इतुका न अवघे पाउणशे वयमान

गोपाळराव गोखल्यांच्या बरोबर पुन्हा एकदा रावसाहेबांकडे जाण्याचा प्रसंग आला. तेव्हा 'तुम्ही दुसऱ्याबद्दलच्या चांगुलपणाच्या भावनेनं स्वतः टीकाविषय झालात, परंतु त्यामुळे तुमचा मोठेपणा माझ्या अंतःकरणात कायमचा ठसला. आम्ही मात्र निव्वळ दुबळेपणानं काही गोष्टी करीत आहोत. आम्ही सर्वांनी आमच्या स्वार्थासाठी तुम्हांला पेचात टाकलं.' अशासारखे काही बोलावे असे हरिभाऊंच्या मनात खूप वेळा आले. परंतु रावसाहेबांनी त्यांना बोलण्याची संधीच दिली नाही. उलट फिरतीवर असताना मुद्दाम बारामतीला चोळकर वकिलांकडे जाऊन त्यांना आपण आपटयांच्या घरी मुलगी देण्यास प्रवृत्त केले, याची वाच्यता आपटयांजवळ चुकूनसुद्धा करावयाची नाही, असे त्यांनी मनोमन ठरवून टाकले.

**: १५ :**

'पण लक्षात कोण घेतो' या कादंबरीतील रघुनाथरावाच्या मृत्यूचे प्रकरण 'करमणूक' मध्ये प्रसिद्ध झाले आणि चारी बाजूंनी हरिभाऊंना पत्रे येऊ लागली. "एवढ्या उमद्या माणसाचा असा अचानक अंत का घडवलात !" प्रत्येकजण विचारी.

मित्र मंडळी त्यांना ते प्रकरण बदलावे म्हणून आग्रह करू लागली. 'करमणूक' अंक समोर ठेवून हरिभाऊ विचार करीत, 'रघुनाथरावांना जिवंत करावे का ?' त्यांचे मन उसळून म्हणे, 'नाही, कदापीही नाही. हा रघुनाथराव जिवंत होणे शक्य नाही.'

या हरीच्या मनात नसतानाही त्याला दुसरे लग्न करावे लागले. त्याला शक्य तर पुनर्विवाह करावयाचा होता. कर्ता सुधारक म्हणून नव्या पिढीला आदर्श ठेवायचा होता, परंतु त्याला साधा पुनर्विवाह करणे जमले नाही ! रघुनाथराव त्याच क्षणी संपला. हरीचा एका अल्पवयीन कुमारिकेशी दुसरा विवाह झाला, त्याच दिवशी टिळक-आगरकरांवर ताण करू इच्छिणारा हरी नारायण संपला. आता

# हरी नारायण

[पृष्ठ ४३ वरून चालू]

राहिला हा हरी नारायण केवळ 'करमणुकी'चा संपादक !

उद्याचा महाराष्ट्र रानडे, टिळक, आगरकर यांचेच स्मरण करणार आहे आणि हरी नारायण हे नाव विसरले जाणार आहे. यापुढे या हरी नारायणाच्या हातातील ही लेखणीही काढून घेतली, तर...तर मात्र त्याला जगणे नकोसे होईल.

'पण लक्षात कोण घेतो' कादंबरी नियमितपणे पुढे चालू झाली.

कादंबरीतील यमूच्या केशवपनाचा प्रसंग प्रसिद्ध झाला आणि दुसऱ्याच दिवशी गोपाळराव गोखले त्यांच्याकडे आले.

"हरिभाऊ, रात्रभर तुमचं चालू प्रकरण वाचून डोळयाला डोळा लागला नाही, असा आगरकरांचा मी निरोप घेऊन आलेलो आहे. आपटे, आम्ही लिहिलेल्या शेकडो लेखांनी जे कार्य होणार नाही, ते तुमच्या या एका कादंबरीनं होईल. सनातन्यांची विकृत रूढिप्रियता किती भयंकर असते, हे तुमच्या शंकरमामंजींवरून लक्षात येतं. शंकरमामंजींचा केशवपनप्रसंगीचा दुष्टपणा तुम्ही इतक्या कल्पकतेनं वर्णिलेला आहे की..."

'पण लक्षात कोण घेतो ?' या कादंबरीच्या मोठमोठ्या जाहिराती आता पुण्यातल्या चौकाचौकातून झळकू लागल्या.

कादंबरीची जाहिरात हा प्रकार 'पण लक्षात कोण घेतो ?' मुळे पुण्यात प्रथमच सुरू झाला.

'आगरकरांकडून निरोप आला आणि हरिभाऊंचा आत्मविश्वास दुणावला. हजारो लेखांनी आणि व्याख्यानांनी होणार नाही ते आपली लेखणी करील ! हे फक्त कौतुक की वस्तुस्थिती ? आपण निराळे काय लिहितो ? जे घडते आहे तेच रंगवत आहोत. मग जे घडते आहे ते जाणकारांनाही नकोच आहे ! पण पुष्कळांना हवे आहे. पुष्कळांना......

शंकरमामंजींनी रचलेले भयंकर कारस्थान कसे सुचले त्याचे त्यांना स्मरण झाले.

लग्न झाल्यानंतर काही दिवसांनी त्यांच्या वडिलांनी सुनेला व हरिभाऊंना बेळगावला बोलावले. तेथे असता नानासाहेबांच्या एका मित्राच्या गर्भदानसमारंभानिमित्त त्यांना जावे लागले.

हरिभाऊ संध्याकाळी त्यांच्या मित्राकडे गेले, तेव्हा हे त्यांचे दुसरे लग्न असून पन्नाशी ओलांडलेला हा गृहस्थ एका अल्पवयीन कुमारिकेशी लग्न लावून मोठ्या थाटामाटात गर्भदानाचा सोहळा पार पाडीत असलेला दिसला ! विशेष म्हणजे घरी अल्पवयीन विधवा सून असता तिला अंधाऱ्या कोपऱ्यात बसवून त्याचे हे सर्व विधी चालले होते !

असे बेळगावकर अवघ्या महाराष्ट्रात हजारोंनी आहेत. या सर्व राक्षसी गोष्टींविरुद्ध आवाज उठविण्याचे सामर्थ्य आपल्या लेखणीत आहे. यातले कौतुक किती ? खरे किती ?...

'यशवंतराव खरे' आणि 'मी' या त्यांच्या पुढच्या कादंबऱ्या ज्या वेळी प्रसिद्ध होऊ लागल्या त्या वेळीही त्यातल्या पात्रांसंबंधी हे पात्र हरिभाऊंनी कुणावरून घेतले अशी चर्चा चालली होती. 'यशवंतराव खरे' मधील श्रीधरपंत म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकरच असे प्रत्येकजण छातीठोकपणे सांगे; पण 'यशवंतराव' म्हणजे कोण ?

कोणी म्हणत, यशवंतराव म्हणजे 'केसरी'चे संपादक बळवंतराव टिळक तर शिवरामपंत म्हणजे रावसाहेब रानडे...

हरिभाऊ मनात हसत. हे शिवरामपंत म्हणजे सार्वजनिक सभेचे खजिनदार शिवरामपंत साठे! हरिभाऊंना या सगळ्याच मताची गंमत वाटे. आपल्या कादंबरीतील बहुतेक सर्व पात्रे आजूबाजूच्या घराघरांतून निवडली आहेत हे लक्षात आले तर निदान आजूबाजूच्या घरात तरी काही सुधारणा घडेलच असा एक विचार त्यांना चाटून जाई!

गोखल्यांच्या मित्रत्वामुळे आगरकरांबद्दलचे सर्व गैरसमज दूर होऊन हरिभाऊ दिवसेंदिवस त्यांच्याकडे खेचले गेले आणि दुसऱ्या विवाहाच्या वेळी टिळकांनी जी कठोर टीका केली, त्यामुळे त्यांच्याविरुद्ध अढी मनात राहून सुरुवातीला या यशवंतरावावर टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाची छाया उमटवून थोडीशी त्यांच्या राजकीय विचारप्रणालीची थट्टा करण्याचा विचारही त्यांच्या मनात येऊन गेला. परंतु कादंबरी लिहीत असताना टिळकांच्या व्यक्तिचित्रणावर मुद्दाम कादंबरी नेऊ नका असा रानड्यांनी मित्रत्वाचा सल्ला दिला. 'यशवंतराव' हा टिळकांपेक्षा फार निराळा उतरला.

'मी' कादंबरी प्रसिद्ध होत असता अचानक अण्णासाहेब अतिशय आजारी असल्याची तार आली. हरिभाऊ त्वरेने मुंबईस गेले. अण्णासाहेबांची प्रकृती अतिशय गंभीर होती. अण्णासाहेबांच्या मनातून काहीतरी बोलावयाचे होते परंतु त्यांची वाचाच गेली होती.

हरिभाऊंना जवळ बोलावून ते अस्पष्ट शब्दात मोठ्या कष्टाने एकदा म्हणाले—

'अण्णा किर्लोस्कर'

अण्णासाहेब व अण्णा किर्लोस्कर यांचा घनिष्ट संबंध होता. आपले लिहिलेले नाटक अण्णा अगोदर अण्णासाहेबांना वाचून दाखवीत आणि दोघे निरनिराळ्या दृष्टिकोनातून त्याची चर्चा करीत.

एकदा हरिभाऊंना अण्णासाहेब म्हणाले होते—

"हरी, आनंदाश्रमाची संपूर्ण व्यवस्था लागल्यावर मी संन्यास घेईन; परंतु तसं जमलं नाही तर मरण्यापूर्वी तुझ्या हातून संन्यास घेण्यासाठी तू कुठेही असलास तरी माझ्या उशाशी येईपर्यंत हा जीव रेंगाळत ठेवीन."

अण्णासाहेबांची ही इच्छा हरिभाऊंनी झट्‌कन पुरी केली व त्यानंतर अण्णासाहेबांचे समाधानाने प्राणोत्क्रमण झाले.

अण्णासाहेब गेले! परंतु 'मी' मधील भाऊचा भावानंद झाला! या भावानंदाने आकार घेतला तो मात्र विवेकानंदांच्या दर्शनाने!

आनंदाश्रमामध्ये एकदा बळवंतराव टिळक एका काषायवस्त्रधारी राजबिंड्या तरुणाला संस्कृत पोथ्या पाहण्याच्या निमित्ताने घेऊन आले. आयुष्यभर संन्यस्त राहून देशसेवा करण्याची त्यांची इच्छा असल्याचे बळवंतरावांनी सांगितले.

अतिश्रम व जीवापाड मेहनत केल्याने भावानंदाला अकाल मृत्यू आला, असे चित्रण हरिभाऊंनी केले. हे प्रकरण लिहून झाले आणि हरिभाऊ अस्वस्थ झाले. भावानंदाचे हे भविष्य स्वामी विवेकानंदांच्या नशिबात खरे ठरणार नाही ना!

शिवजयंत्युत्सव, देशासाठी प्राणार्पण आणि राजकीय चळवळी यांचा मक्ता फक्त 'केसरी' वादी जहाल लोकांकडेच आहे आणि रावसाहेब रानडे आणि रामकृष्णपंत भांडारकरांचे अनुयायी म्हणजे इंग्रज सरकारची हांजी हांजी करणारे असे सर्वसाधारण लोकमत होते.

राजकीय चळवळींना उग्र स्वरूप द्यायचे म्हणजे लोकमत काबीज करून घेतले पाहिजे या प्रेरणेने बळवंतराव टिळकांनी हळू हळू एकेक संस्था काबीज करावयास सुरुवात केली. रावसाहेब रानड्यांच्या प्रेरणेने पुण्यातील सार्वजनिक जीवनात महत्त्वाचे कार्य करणारी 'सार्वजनिक सभा' ही आपल्या अंकित व्हावी असा विचार त्यांच्या मनात आला त्यापूर्वीच रावसाहेब रानडे यांची नेमणूक मुंबईच्या हायकोर्टात न्यायाधीश म्हणून झाल्यामुळे तर रानड्यांचे वजन पुण्यात खूपच वाढले. परंतु टिळकांनी मोठ्या धडाडीने सभेचे अनेक सभासद करून घेऊन निवडणुका लढविल्या आणि रानडे पक्षाचा दणदणीत पराभव केला. इतकी वर्षे ज्या संस्थेच्या उभारणीला अमाप मदत केली त्या संस्थेमध्ये सनातनी मंडळींचे वर्चस्व झालेले पाहून रानड्यांना वाईट वाटले. ही गोष्ट टिळकांच्या कानापर्यंत गेली, त्या वेळी रानड्यांना दुखवू नये म्हणून त्यांनी सार्वजनिक सभेमध्ये रानडे पक्षाचे काही पदाधिकारी घेण्याचे ठरवून बोलणी चालविली. रानडे पक्षातर्फे वाटाघाटी करण्याचे काम गोखले व हरिभाऊ यांच्याकडे आले. गोखल्यांनी बहुतेक सर्व अधिकाराच्या जागा आपल्या पक्षाकडे राहाव्या असा शेवटपर्यंत आग्रह धरला. टिळक म्हणाले, "लोकहितवादीपासून तुम्हा सगळ्या सुधारकांच मी ऐकतो आहे. तुम्ही मारे पार्लमेंटच्या आणि लोकशाहीच्या गोष्टी बोलता आणि लोकशाही पद्धतीनं व निवडणुकांच्या मार्गानं जनतेनं नेतेपदाचा कौल द्यावा असं तुम्हांस वाटत नाही. तुमची लायकी ओळखून सरकारनं तुम्हांस मोठमोठ्या जागा द्याव्यात आणि तुम्ही त्या त्यांच्या मेहेरबानीनं अडवाव्या हीच तुमची देशभक्ती."

टिळकांच्या या हल्ल्याने वाटाघाटी फिसकटल्या आणि हरिभाऊ विलक्षण कष्टी झाले. सार्वजनिक सभा सोडून रानडेपंथीयांनी 'डेक्कन सभा' स्थापन केली. तरी तेवढ्याने हरिभाऊंचे समाधान होईना. टिळकांचा तो जाज्वल्य देशभक्तीने भारलेला चेहरा त्यांना रात्रंदिवस विचारू लागला—

'या गलथान समाजाला स्वातंत्र्याचे वेड लागावे, ते वाढावे याकरिता तुझ्या लेखणीने काय केले याचा झाडा मला हवा आहे. तू सुधारक अस, सनातनी अस! स्वतंत्र आहेस का?'

पूर्वजांचे स्मरण करून जनतेला स्वातंत्र्योत्सुक करण्यासाठी टिळकांनी छत्रपती शिवाजीस्मारकाची कल्पना हाती घेतली आणि रायगडावर प्रचंड प्रमाणावर शिवजयंत्युत्सव साजरा करण्याच्या घोषणा सर्वत्र दुमदुमू लागल्या. सगळीकडे उत्साहाचे वातावरण पसरले.

उत्सवासाठी शेकडो स्त्री-पुरुष रायगडावर जाण्यास निघाले. परंतु सार्वजनिक सभेच्या प्रसंगामुळे बहुतेक सर्व सुधारक पुण्यातच राहणार होते.

आदल्या दिवशी हरिभाऊंचे मित्र वासूकाका जोशी यांनी हरिभाऊंना रायगडावर येण्यासाठी फार आग्रह केला. परंतु हरिभाऊंचा निर्णय होईना. त्या दिवशी रात्रभर त्यांना झोप आली नाही.

टिळकांची झेपच अखेर प्रभावी ठरणार आहे का? रायगडावर अवघ्या महाराष्ट्रातून स्वातंत्र्यप्रेमी जनतेचा मेळावा जमणार आणि



नवा ' उश:काल ' सुरू झाला होता.

आपण एखाद्या घुंगुरड्यासारखे तोंड लपवून पुण्यात राहावयाचे ? आपल्याला गेले पाहिजे या विचारावर ते आले. त्यांनी घड्याळात पाहिले–रात्रीचे तीन वाजून गेले होते. म्हणजे रायगडाकडे निघालेली मंडळी आता गडाच्या पायथ्याशी पोचली असतील.

हरिभाऊ आवेगाने उठले. त्यांनी एक खास मोटरगाडी ठरविली आणि कडाक्याच्या उन्हात ते रायगडाजवळ येऊन पोहोचले.

" आता वरती गाडी जाणार नाही काय ?"

' नाही साहेब " ड्रायव्हर म्हणाला, " नुसत्या पायथ्याशी पोचायला तुम्हांला तासभर अजून चढावं लागेल ! "

पैसे चुकते करून हरिभाऊ एकटे गड चढू लागले. आजूबाजूला घनदाट झाडी. उत्सवानिमित्त वर चढण्यासाठी नुकतीच तयार केलेली बारीकशी पाऊलवाट अनेकजणांनी तुडवलेली होती. समोवतालच्या ऐनाची उघडी बोडकी झाडे मोठी विचित्र दिसत होती. रायगडची विळख्याची चढण चढता चढता आपण कुठे चाललो आहोत, हे समजू नये अशी त्यांची विचित्र स्थिती झाली. चढता चढता वळसा घेतला की वर दिसणारा 'रायगड' अचानक दृष्टीआड होई आणि आपण रस्ता तर चुकलो नाही, या कल्पनेने ते हैराण होत.

तासभर गड उरावर घेऊन चढण चढल्यानंतर मध्येच थोडा रस्ता रुंदावल्यासारखा दिसला आणि त्यांनी वरती मान केली. तेव्हा अभेद्य असा काळा कातळ आपले बाहू पसरून आडवा पडल्यासारखा त्यांना भास झाला. ज्याच्या दर्शनाने दुर्बलालाही वीरश्री चढेल ! छत्रपती शिवराजे आपल्या आवडत्या घोड्यावर बसून त्यांच्याकडे एकटक पाहात असल्याचा त्यांना भास झाला.

झपाझप पावले टाकीत ते किल्ल्याच्या बुरुजापर्यंत जवळजवळ धावतच गेले.

गडावरचा समारंभ जवळजवळ संपत चालला होता. बळवंतराव टिळक समारोपाचे भाषण करीत होते.

' इंग्रज लोकांनी ऑलिव्हर क्रॉमवेलचं स्मारक केलं. फ्रेंच लोकांनी नेपोलियन बोनापार्टचं स्मारक केलं. ज्यांच्या प्रयत्नानं हिंदुधर्म व हिंदुस्तान शाबूत राहिला त्या छत्रपती शिवाजीमहाराजांचं स्मारक करण्यासाठी आपण या ठिकाणी एकत्र जमलो आहो. या प्रसंगी त्यांची कर्मभूमी या रायगडाला साक्ष ठेवून आपण शपथ घेऊ की, श्रीछत्रपती शिवरायांचं आपण चिरंतन स्मारक केल्याखेरीज स्वस्थ झोप घेणार नाही. '

छत्रपतींचे चिरंतन स्मारक ! चिरंतन स्मारक ! ! हरिभाऊंच्या मन:कोशावर या एकाच कल्पनेने लाख लाख आघात झाले आणि त्यांनी चमकून वर पाहिले.

नवा ' उष:काल ' सुरू झाला होता !

## : १६ :

' तात्या, तुझ्या पोटीं चिमामावशीच जन्माला आली. आजची दासनवमी. चिमामावशीसारखीच स्वत:च्या बाबतीत निरिच्छ. परंतु मोठी कर्तबगार निघणार दिसतेय ही तुझी पोरगी." नानासाहेब कधी नव्हे इतक्या मोकळेपणाने आपल्या नातीचे कौतुक करीत होते.

" काय हरिभाऊ, आनंदाश्रमात आल्यावरच बायकोकडे पहावयास सवड झाली वाटतं ? गृहस्था, तेरा चौदा वर्षांचा अवघी लोटला तुझं लग्न होऊन, आणि आता निराळं झाल्यावर पोरगी होतेय ! " नाना पानसे नेहमींच्या मिस्किलपणाने थट्टा करू लागले.

वर्षभरापूर्वी चिमामावशी गेली. नानासाहेबांनी तिच्या तेराव्या दिवशीच हरिभाऊंना सांगितले,

" तात्या, मी पेन्शन घेतल्यापासून घरीच बसून पहातोय की इथं एकत्र कुटुंबात राहिल्यामुळं तुझी मोठी कुचंबणा चालली आहे. गेली चार पाच वर्षं तू निराळं राहावंस म्हणून म्हणत होतो, परंतु चिमामावशींच्या दबदब्यामुळं मी जोर केला नाही. मलाही तुझे सुधारकी संपर्क फारसे पसंत नाहीत. तू आनंदाश्रमात बायकोला घेऊन राहिलास तर आता वाईटही दिसणार नाही आणि आपल्या दोघांना ते सोईचं ! "

नानासाहेबांच्या या उद्गारांनी हरिभाऊंना अतिशय वाईट वाटले. कमीत कमी संघर्ष राहावा ही वडिलांची इच्छा पाहून ते आनंदाश्रमात राहायला आले. वेणूताईच्या संसारामुळे आनंदाश्रम गजबजू लागला. हरिभाऊ व त्यांची मित्रमंडळी यांचा काव्यशास्त्रविनोदाचा तो मोठा अड्डाच बनला. सगळ्यांनी खूप गप्पा माराव्या, वेणुताईंच्या हातचा कुठला तरी नवीन पदार्थ पोटभर खावा ! चहाचे आधण तर सदासर्वकाळ चुलीवर असे.

पाळण्याची चाहूल लागली. हरिभाऊंना–वेणुताईंना नवा बंध बांधू लागला. ताई जन्माला आली. त्याच वेळी हरिभाऊंची पुणे म्युनिसिपालिटीवर सरकारनियुक्त सभासद म्हणून नेमणूक झाली. श्रेष्ठ कादंबरीकार म्हणून त्यांची कीर्ती आता सर्वत्र पसरलेली होती

आणि त्यामुळे व्याख्यानांची सारखी निमंत्रणं येऊ लागली. पंचवीस वर्षांपूर्वी पुण्यात कुठलीही महत्त्वाची सभा असली तरी कृष्णशास्त्री चिपळूणकर हे त्याचे अध्यक्ष असायचे असा अलिखित नियम होता. त्यांच्यानंतर न्यायमूर्ती रानडयांनी ती जागा सांभाळली आणि त्यांच्या मृत्यूनंतर हरिभाऊंकडे ते पद चालत आले. प्रागतिक पक्षात ते गोखल्याच्या खांद्याला खांदा लावून बसत तर सरकार-दरबारी कलेक्टरपासून गव्हर्नरपर्यंत प्रत्येकजण त्यांच्याशी वाङमयीन चर्चा करण्यात कृतार्थता मानीत. त्या सर्वांवर कळस म्हणजे ज्या मुंबई विद्यापीठाची साधी पहिल्या वर्षाची परीक्षा ते कित्येक वर्षे पास होऊ शकले नव्हते, त्याच विद्यापीठात त्यांचे महत्त्व मान्य करून एम्. ए. चे परीक्षकत्व बहाल केले आणि भांडारकरांनी आपल्या विद्वत्तेने जी व्याख्यानमाला भूषविली होती, ती विद्यापीठाची व्याख्यानमाला लवकरच त्यांनी घ्यावी म्हणून त्यांच्याकडे विचारणा झाली.

'ताई मोठ्या पायगुणाची ठरली' असे हरिभाऊ वारंवार म्हणत ती जन्माला आल्यानंतर थोडे दिवस सारखी मृत्यूशी झगडत होती. वयाच्या तिसऱ्याच महिन्यात तिच्या माकडहाडास सूज येऊन आतल्या बाजूस गळू झाले आणि डॉक्टरमंडळी तिचे ऑपरेशन करताना हरिभाऊंना अंतःकरण कठोर करून असहायपणे ते पहावे लागले. पहिल्या ऑपरेशनचा काही उपयोग झाला नाही. म्हणून दुसरे आणि तेही झाल्यावर तिसरे ऑपरेशन करण्याचा प्रसंग आला, तेव्हा मात्र हरिभाऊंना राहवले नाही.

"डॉक्टर, खरोखरच ही मुलगी आम्हाला लाभणार आहे की नाही हो ?" डॉक्टर युरोपियन होते. त्यांनी हरिभाऊंच्या खांद्यावर हात ठेवून म्हटले, "आपटे, खरं सांगायचं म्हणजे ही पोरगी यातून वाचेल असं मला नाही वाटत. आणि यदाकदाचित वाचलीच तर आयुष्यभर लुळीपांगळी म्हणून तिला वावरावं लागेल."

आता काही झाले तरी तिला ऑपरेशन टेबलावर आणायचे नाही या निश्चयानेच हरिभाऊंनी तिला घरी आणली. तिच्या ऑपरेशनची जखम बांधताना ती सारखी कळवळून ओरडे. तिच्या चेहऱ्याकडे हरिभाऊंना पाहवत नसे.

"नको ते तुमचं ड्रेसिंग–" हरिभाऊ अस्वस्थ होऊन म्हणत. अखेर तिला दवाखान्यात न पाठवता तो घरीच हळूवार हाताने तिची जखम बांधू लागले. नानासाहेब कसले तरी मलम घेऊन येत. त्यांची इच्छा मोडू नये म्हणून हरिभाऊ ते मलम लावीत.

ताई सुधारू लागली. तिच्यात झपाट्याने सुधारणा झाली. तिचा आजार संपला. तिच्या बाललीला पाहून हरिभाऊंनाही वाटू लागले की आपली पुण्याई खरोखरच मोठी म्हणून अशी गुणाची मुलगी आपल्या पोटी आली.

चौथ्या पाचव्या वर्षी ताईला मोठा समज आला. कुठलीही गोष्ट एकदा तिने पाहिली की तिच्या स्मरणात राहात असे. आपले वडील नेहमी टेबलापाशी बसून कादबरी लिहितात असे तिने ऐकले होते.

हरिभाऊ लिहायला बसले की ती आपणही कागदपेन्सिल घेऊन बसायची आणि म्हणावयाची, "तात्या, मी कादवली लिहिते हां !" चवथ्या वर्षीच तिला लिहिता वाचता येऊ लागले. इसापनीती ती घडाघड वाचू लागली.

"तात्या, तुम्हाला गोष्ट सांगू का ?" ती म्हणे आणि पहिल्या शब्दापासून न चुकता पुस्तकातली गोष्ट ती मोठ्या ऐटीत पाठ म्हणून सांगे.

हरिभाऊ लिहीत बसले की टेबलाखाली बाहुल्यांचा पसारा ती मांडी. हरिभाऊंकडे येणाऱ्या प्रत्येक मित्राने तिला नवीन प्रकारची बाहुली आणून द्यावी आणि तिला विचारल्यावर कोणी कोणती बाहुली कोणत्या वेळी आणून दिली हे देखील ती न चुकता सांगे— "ही पानसेकाकांची ! ही जोशीकाकांची—"

एकदा 'करमणुकी'च्या अंकासाठी मजकूर लिहिण्याची घाई होती. त्यावेळी ताई आपली आवडती बाहुली घेऊन शेजारच्या खोलीत खेळत होती. त्या बाहुलीला तिने आईने शिवलेला छानपैकी झगा घातला होता. आणि ते कौतुक हरिभाऊंना दाखविण्यासाठी ती पळतच त्यांच्या खोलीत आली.

"तात्या, अहो तात्या–" तिने दोन तीन वेळेला हाक मारली परंतु हरिभाऊंनी लक्ष दिले नाही. लेख लिहून संपल्यावर ते तिच्याजवळ गेले आणि तिला त्यांनी उचलून घेतले. परंतु काही केल्या ती त्यांच्याशी बोलायलाच तयार नव्हती.

"बबड्या, मी 'करमणुकी' साठी लेख लिहीत होतो रे ! म्हणून मी तुला ओ दिली नाही."

"तुमची तेवढी सारखी करमणूक···करमणूक. मी आता बोलणार नाही तुमच्याशी...!"

"अरे वा ! तुझी सुद्धा करमणूक आहे वाटतं ? दाखव बघू आम्हांला !"

तिने दाखविलेली ती बाहुली बघून त्यांना तिच्या बोलण्याचे मोठे कौतुक वाटले. त्यांनी अडगळीत टाकलेला कॅमेरा बाहेर टाकला. काही वर्षांपूर्वी त्यांना फोटोग्राफीचा नाद लागला त्यावेळी सबंध आनंदाश्रम म्हणजे त्यांनी फोटो स्टुडिओ बनविला होता. ते सर्व सामान आता बाहेर निघाले.

"ताई, तुझी ती बाहुली जवळ घेऊन अशी बैस हां !" ते म्हणाले. आणि क्षणार्धात त्यांनी फोटो काढला. आठ दिवसांनी चांदीच्या फ्रेममध्ये ताईचा फोटो त्यांच्या लिहावयाच्या खोलीत टेबलावर आला. हरिभाऊंनी त्यावर लिहिले होते—

**कुमारी शांताताई आपटे**

**—आमची 'करमणूक' व तिची 'करमणूक'**

तृप्तीच्या व समाधानाच्या या काळातच हरिभाऊंची अकोला येथे भरणाऱ्या साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली.

अकोल्याला जाण्याचा दिवस जवळ आला आणि ताई एकाएकी आजारी पडली. तशाही परिस्थितीत ताईला अकोल्याला न्यावे अशी हरिभाऊंची इच्छा होती; परंतु डॉक्टरांनी नेऊ नका असे सांगितले संमेलनात हरिभाऊ गुंतले तरी त्यांचे एक मन आनंदाश्रमात ताईभोवती घिरट्या घालीत होते. साहित्यिकांच्या बरोबर जेवताना त्यांना ताईची आठवण यायची.

'ताई जेवण्यासाठी' माझी वाट पाहात असेल. आनंदाश्रमाच्या देवडीवर येऊन ती वाट पाहात बसली असेल.'

हरिभाऊ संमेलनाहून परत आले तेव्हा ताईची प्रकृती ढासळतच चालली होती. दिवाळी आली परंतु ताई चांगली बरी झाली नाही. दिवाळीच्या दिवशी रात्रीच्या वेळी मध्येच झोपेतून ती जागी झाली.

"तात्या, दिवा गेला, आई, दिवा पळाला–" म्हणत ती उठली. वेणूताईंच्या काळजात चर्र झाले.

जानेवारीपासून 'करमणुकी' साठी 'वज्राघात' ही कादंबरी लिहावयाची असे ठरवून हरिभाऊंनी टेबलावर वरती 'श्री' कार, व 'वज्राघात' ही अक्षरे लिहून कागदांचे चतखोर ठेवले. दिवसभर ते कामानिमित्त बाहेर होते. संध्याकाळी घरी आल्यानतर ताईने त्यांना मिठी मारली.

"तात्या, मला सोडून दिवसभर कुठे हो गेला होता? मी तुम्हांला गंमत दाखवणार म्हणून केव्हापासून वाट पाहात्येय!"

"कसली ग गमत?"

तिने टेबलावरचा पहिलाच कागद उचलला : 'वज्राघात' या नावाखाली लिहिले होते–

'रचणार. कुमारी शांता आपटे.'

"ताई, सपूर्ण कादंबरी झाल्यावर ती तुझ्या नावानं प्रसिद्ध करायची वरं का!"

"नाही हं तात्या! तुमची कादबरी आम्हाला नको! मी नवीन लिहिणार!"

"बर बुवा राहिल!"

हरिभाऊंचा चेहरा पाहून एकदम विषय बदलावा म्हणून ती म्हणाली,

"तात्या, माझ्या सगळ्या मैत्रिणींना मी घरी बोलावू का?"

"तू कशाला?– आपण असं करू, मीच बोलावतो सगळ्यांना– तू यादी कर पाहू–!"

हरिभाऊंनी पुण्यातील शेकडो मुली बोलावून आनदाश्रमात 'बालकदिन' साजरा केला. त्या दिवशी ताई आनंदाने नाचली बागडली. परंतु त्या परिश्रमाने दुसऱ्या दिवशी ती पुन्हा आजारी पडली.

फेब्रुवारी उजाडला. ताईच्या चेहऱ्यातला बदल पाहून हरिभाऊंना रडू कोसळले. वेणूताईंना तर तिची शुश्रुषा करताना दिवस पुरत नव्हता मधेच तिला बरे वाटे, मध्येच जास्त होई.

एकोणीस फेब्रुवारी उजाडली. हरिभाऊ सकाळी तिला घेऊन माडीवर बसले होते. तोच तिने डोळे फिरवले. पक्षी पिंजऱ्यातून निसटला होता. हरिभाऊ तिला पोटाशी घट्ट धरून हाका मारू लागले —" ताई! ताई!"

## : १७ :

पाठ अवघडल्यामुळे हरिभाऊ कुशीला वळले आणि हातातील 'पण लक्षात कोण घेतो' ही कादंबरी हातातून निसटून खाली अस्ताव्यस्त होऊन पडली. वेणुताईंनी पुस्तक उचलून त्याच्या हातात दिले. आणि लगेच हरिभाऊंनी त्या प्रकरणात खूण म्हणून कागदाचा कपटा ठेवला आणि त्यांनी एक दीर्घ निश्वास सोडला.

"कसला एवढा विचार चाललाय?" वेणुताईंनी अगावर चादर ओढीत विचारले.

"अग, विरगुळा म्हणून मागचे ते सर्व दिवस आठवतो आहे. तुझ्याशी लग्न झालं तेव्हा तू कुठे अकरा वर्षांची होतीस. मी रस्त्यानं चाललो की काही टारगट माणस 'हं, काय, बायकोशी सागरगोटचा खेळून झाले वाटत?' असा प्रश्न विचारीत. केसरीन आपल्या विवाहाबद्दल लोकमत चागलंच गढूळ करून ठेवलं होतं, त्यामुळे सुरुवातीला चार पाच वर्षं तू घरी काय करतेस, कुठे असतेस याची साधी चौकशी सुद्धा केली नाही."

"आता कशाला त्या दिवसांची आठवण!"

"अग, मी रानडयाकडे कधी गेलो की, रमाबाईसाहेब वारंवार तुझी चौकशी करीत. तुझ्या शिक्षणाचं कसं काय चाललय म्हणून मला विचारीत आणि मी तोंडात मारल्यासारखा मख्ख चेहरा करून उसासे टाकी."

वेणूताईंना तो प्रसग जणू आज घडतो आहे अशा रीतीने डोळ्यांपुढे दिसू लागला. सासरे पेन्शन घेऊन घरी आले होते; आणि महासंतापी होते. वृद्धपणामुळे त्याच्या सतापाला काडीचे निमित्त पुरेसे होई.

आल्याबरोबर त्यानी आपल्याला पाहिले आणि ते म्हणाले,

"चिमामावशी, काय या पोरीची गत झाली आहे ही! लग्नामधे अशी अगाखाद्यान भरलेली दिसत होती आणि आता कशी ही जरत्कारू दिसू लागली!"

"नाना, या पोरीला या घरात काही कमी का आहे? खायला प्यायला कसली ददात नाही. परंतु पोरगी हसत खेळत राहातच नाही बघ. हां, बाकी कामाबिमाला मोठी हुशार आहे!"

खरोखरच वेणूताई त्यावेळी अंतर्यामी अतिशय खिन्न होत्या. लग्न झाले त्या वेळी त्या लहान होत्या म्हणून हरिभाऊंनी लक्ष दिले नाही. आणि पुढे मग आजारपण पाठीशी लागले. हरिभाऊ त्यांच्या औषधपाण्याचे जातीने पाहू लागले. त्यावेळी चिमामावशी म्हणाल्या ते वेणूताईंना आठवले.

"तात्या, मला हे खपायचं नाही. तुझी बायको लाडकी असली तरी हे कुटुंबवत्सल घर आहे. इथं आपल्या बायकोच्या उशाशी चारचौघादेखत बसायला लाज वाटत नाही काय रे? तुझ्या गळ्यात माळा पडाव्या म्हणून तिला शिकविण्याची तुझी अट मी मान्य केली. परतु तसल्या कुठल्याही गमजा मी जिवत असेपर्यंत चालणार नाहीत आणि हट्टान तुला चालवायच्या असतील तर एकतर ह्या घरात तुम्ही तरी रहा नाहीतर मी तरी राहते."

प्रकृती सुधारण्यासाठी दररोज वेणुताईंनी फिरावयास जाणे जरूरीचे आहे असे डॉक्टरनी सागितले, त्या वेळी तर चिमामावशीनी अगदी गहजब केला. त्यावेळीसुद्धा घरी बायको आहे या गोष्टीचे जणू हरिभाऊंना विस्मरणच होऊन गेले होते. न्या. रानड्यांनी एकापेक्षा एक जबाबदारीची कामे हरिभाऊवर सोपविली. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करून त्यानी अद्ययावत आकडेवारी करणे, उपलब्ध मराठी वाङमयाचा परामर्ष घेण्यासाठी मराठी वाङमयाचे वर्गीकरण करणे आणि प्लेगची साथ सुरू झाली तेव्हा तर......

—गावात प्लेग सुरू झाला म्हणून पुणे शहर ओस पडू लागले. लोक गावाबाहेर जाऊन राहू लागले. प्लेगची लागण फारच मोठ्या प्रमाणात होऊ लागली आणि मृताचे नातेवाईकसुद्धा प्रेत उचलण्यास पुढे येईनात. त्यावेळी माधवराव जोशी आणि हरिभाऊंनी किती प्रेते वाहून नेली. दुर्दैवाने जोश्यांना प्लेगने गाठले. स्वत.ची तरुण पत्नी व अल्पवयीन मुले याच्याकडे काकुळतीने पाहात माधवरावांनी

हरिभाऊंच्या मांडीवर प्राण सोडला. हरिभाऊंच्या मनात आले—

' माधराव जिवंत असता तर दोघानी मिळून फार मोठे सामाजिक कार्य केल असतं. परमेश्वराची इच्छा मात्र तशी नव्हती.'

माधवरावांच्या आठवणीने हरिभाऊ सद्‌गदित झाले. 'वेणू, त्यावेळी मी तुझ्यावर फार अन्याय केला. प्लेगच्या त्या साथीत मी जे निर्भयपणानं जे काम केल त्यामुळे सरकारनं मला " कैसर-ई-हिंद ' पदक देऊन गौरव केला तरी मला स्वत ला मात्र त्याची फिकीर वाटत नव्हती. त्या साथीच्या रोगात मी सापडलो तर तुझं काय होईल, याचा विचारही मनात कधी येत नव्हता...याचंच दु.ख आज उफाळत आहे—"

" तिकडे आनंदाश्रमात आपल तुम्ही एकटे भुतासारखे राहात होता. आणि तुमच्या आठवणीत गावाबाहेरच्या झोपडीत आमच्या घशाखाली घास उतरत नव्हता. चिमामावशी तर जेवणाच्या वेळी तुमची आठवण निघाली तर ताट दूर सारून उठत. त्यावेळी एकदा काशीताई तिकडे झोपडीवर आल्या होत्या. त्यावेळी डोळ्यात अश्रू आणून तुम्हाला चार शब्द सागण्याची मी त्याना विनंती केली."

"काशीताई त्यावेळी एकदा आनदाश्रमावर येऊन गेल्या होत्या." हरिभाऊ एवढेच म्हणाले. काशीताईची भेट त्यांना आठवली:

—" हरिभाऊ घरी तुमची बायको डोळ्यात प्राण ठेवून तुमची प्रतीक्षा करते आणि तुम्ही तिकडे फिरकत सुद्धा नाही, हे तुम्हाला शोभतं का ?"

डोळ्यांतील अश्रू पुसण्याच्या निमित्ताने ती आठवणही मनातून पुसून टाकण्याचा त्यानी प्रयत्न केला. ऐन उमेदीच्या काळात माधव जोशी सोडून गेला आणि गोपाळराव गोखले! निदान त्यानी तर मध्येच आपल्याला सोडून जायला नको होते. इकडे प्लेगची साथ सुरू होती, त्यावेळी गोपाळराव साक्ष देण्यासाठी लंडनला गेले होते. प्लेगच्या साथीत गोऱ्या सोजिरानी वानवडीला स्त्रियावर भयकर अत्याचार केल्याची पत्रे आपणच त्याना पाठविली होती आणि त्यावर विसबून राहून लडनमध्ये त्यानी इंग्रजाविरुद्ध आवाज काढला तेव्हा सबध युरोपभर मोठी खळबळ माजली होती.

गोपाळराव परत आले आणि ब्रिटिश सरकारने त्यांना त्यांचा आरोप सिद्ध करण्याचे आव्हान दिले. माधवराव रानडयांकडे आपण सगळे जमलो.

" गोखले, आरोप परत घेऊ नका. आम्ही वाटेल तेवढे पुरावे जमवून देऊ." चर्चा चालू असताना मध्येच टिळकाची चिठ्ठी आली.

" आपटे, तुम्ही ही पत्रातून कळविलेली माहिती कुठून आणि कशी मिळवली ?" न्या. रानडयांनी शातपणे विचारले.

" मी आणि वैजनाथ काशीनाथ राजवाडे याना ही बातमी अप्पाबळवत चौकात लोकांकडून कळली."

" मग ती खरी असल्याबद्दल खात्री करून घेतली काय ?"

" पुण्यात तिचा एवढा बोलवाला झाला तो उगीचच काय ?"

" मग असं करा. तुम्ही आणि राजवाडे तात्काल वानवडीस जा आणि एकदोन दिवसात सगळे पुरावे शोधून काढा."

न्यायमूर्तींनी प्रत्येकाला अशाप्रकारे पुरावे गोळा करण्यास सागितले. वानवडीस जाऊन हरिभाऊ व राजवाडे यानी सध्याकाळपर्यंत जगजग पछाडले पण कोणीही साधे साक्षीला यावयास तयार नव्हते.

—आणि गोखल्यांना त्यामुळे रानडयांच्या सल्ल्यानुसार सरकारची जाहीर माफी मागण्याची नामुष्की पत्करावी लागली.

तरी हरिभाऊना गोखले कधी विसरले नाहीत. पुण्यात असले की हरिभाऊना भेटल्याखेरीज त्याना चैन पडत नसे. त्याच्या गैरहजेरीत नेमस्त पक्षाचे धुरीणत्व हरिभाऊकडे वारवार येत असे. ते म्हणत,

" हरिभाऊ, तुमच्या बगाली भाषेच्या व्यासगाबद्दल लोक फार आदरानं बोलतात, परतु तुमच्या फ्रेंच भाषेचा व्यासग त्याहूनही जबरा आहे हे मला ठाऊक आहे. सर्व नियम शिथिल करून फर्ग्युसनमध्ये तुम्हांला फ्रेंचचे प्रोफेसर नेमाव असं मी सारख म्हणत आलो. परंतु अजून पदव्यांच्या भेडोळयाना महत्त्व देणारी आपली वृत्ती सुटत नाही."

" ते जाऊ द्या हो. पण गोपाळराव, अतिश्रमामुळे तुमच्या प्रकृतीचं खोबरं होत चालल आहे. तुमच्यापेक्षा मी दोन वर्षांनी वडील आहे. तेव्हा तुमच्या प्रकृतीची काळजी मला घेतली पाहिजे."

" हरिभाऊ, काही झाल तरी मी तुमच्यापेक्षा अगोदर जाणार नाही हे मात्र पक्क बरं का!"

आणि अचानक एके दिवशी निरोप आला. गोखले अत्यवस्थ आहेत.

सर्व्हंट्स् ऑफ इडिया सोसायटीमध्ये हरिभाऊ धावत गेले. गोखल्याची स्थिती पाहून हरिभाऊच्या तोडातून शब्द फुटेना.

" आपटे, या .. तुम्ही भेटलात, सर्व काही आल." हरिभाऊनी त्याचा हात हातात घेतला. तो हात तसाच हातात ठेवून गोपाळरावानी विचारले,

" हरिभाऊ, आज तारीख कोणती ?"

" एकोणिस फेब्रुवारी."

" हरिभाऊ, मी एक विचारू का ?"

" गोपाळराव..." हरिभाऊच्याने पुढे बोलवेना.

" तुम्हाला आजपर्यंत कोणाच्या मृत्यून विशेष दु ख झाल हे सागा पाहू ?"

—मृत्यूनं विशेष दुःख ?

" हो."

" माधवराव जोशी—"

" आणि दुसरं कोणी ?"

" आणि ताई!"

ताईच्या आठवणीने हरिभाऊच्या सयमाचा बाध अचानक फुटला. ते एकदम लहान मुलाप्रमाणे रडू लागले.

गोखल्यानी हरिभाऊंचा हात हातात घट्ट धरून क्षीण आवाजात म्हटले—

" हरिभाऊ, मृत्यूची ओळख हळुहळू झालेलीच ठीक असते."

## : १८ :

हरिभाऊ आपटे मुबईस अतिशय आजारी आहेत अशी बातमी काशीताईंना लागली आणि त्या हातातील सगळी कामे टाकून मुबईस गेल्या.

हातापायाना सूज येऊन हरिभाऊ दवाखान्यात पडले होते. वेणुताई

रात्रदिवस उशापायथ्याशी बसून त्यांची शुश्रुषा करीत होत्या आणि मुबईतील प्रख्यात डॉक्टर मंडळीचे त्याच्यावर उपचार चालू होते.

काशीताई आल्याबरोबर हरिभाऊजवळ बसल्या—

" हरिभाऊ, काय ही तुमची अवस्था ? तुम्ही तर प्रकृती उत्तम असल्याबद्दलची पत्र कलकत्ता, इंदूरहून पाठवीत होता. "

" विनाकारण तुम्ही काळजी करीत बसाल म्हणून कळवलं नाही. परंतु प्रकरण इतपत येईल अस मला देखील वाटल नव्हत. "

" हरिभाऊ, ही रेल्वेच्या शेअर्संची कसली भानगड पाठीशी घेऊन फिरत होता तुम्ही..."

" कुठली दुबद्धी सुचली आणि एका कुमुहूर्तावर मिडेला वळी पडलो झाल. लोणावळ्याच्या जोश्यानी बंगालमध्ये बांधायच्या रेल्वे फाटचाचं कॉन्ट्रॅक्ट घेतलं आणि त्या कामासाठी शेअर्स खपवावेत म्हणून ते माझ्याकडे आले. मोठमोठ्या मडळीना तुम्ही चिठ्ठ्या द्या म्हणजे मी वडाघड शेअर्स खपवतो आणि काम पुर झाल्यावर फार मोठी रक्कम मिळवून दाखवतो अस म्हणू लागले. एक महाराष्ट्रीय माणूस कलकत्त्यासारख्या परमुलखात एवढ मोठं काम करायला बसलाय म्हणून मी त्याला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीनं मी चिठ्ठ्या दिल्या. परतु जोश्यानी हलूहळू हे काम अंगावाहेर टाकल आणि प्रतिष्ठेकरता मला मात्र हे शेअर्स खपवीत हिंडावं लागल. "

" मग ? "

" मग काय ? सध्या सळीकडे मदीची लाट आहे. एवढ्या माझ्या ओळखी, परंतु या कामात पैसा गुतवायला प्रत्येकजण नाखूष. या कामी चार पैसे मिळतील असं वाटल होतं. परतु उलट या भेटीगाठी-साठी होणाऱ्या प्रवासापायी पदरचेच पैसे घालवून बसलो झाल ! "

अण्णासाहेवानी गडगज पैसा मिळविला आणि आनदाश्रमाची सोय लावण्यासाठी हजारो रुपये हरिभाऊच्या हवाली केले ही गोष्ट काशी-ताईंना ठाऊक होती. परतु या बाबतीत काशीताईंनाच हरिभाऊनी थोडे दिवसापूर्वी पत्रात लिहिले होते ते त्याना आठवले.

> " अण्णासाहेवानी पैसा खूप मिळविला परतु तो निर-निराळ्या ठिकाणी आपल्या मित्रमडळीना उसना म्हणून दिला. प्रत्यक्ष रोख रक्कम दहा-बारा हजाराच्या आतच होती. त्याच्या मृत्यूनंतर सतत २० वर्षे त्यांनी ठिकठिकाणी उसनी दिलेली रक्कम परत मिळविण्यासाठी मला फारच मनःताप सहन करावा लागला.
>
> पण ताई, अण्णासाहेवाच्या इच्छेनुसार आनदाश्रमात सर्व धार्मिक कार्य निष्ठेन वीस-पचवीस वर्षं केली, साधुसन्याशाची अविरत सेवा केली. गरीब मुलाची राहण्याजेवण्याची व शिक्षणाची मोफत सोय केली. आणि या सर्वापेक्षा आनदाश्रमाने अतिशय मौलिक असे शंमराच्यावर संस्कृत ग्रथ प्रसिद्ध केले आणि हजारो दुर्मिळ पोथ्या मिळविल्या, यातच मला संतोष आहे. माझ्या कादवऱ्या आणि आनदाश्रमांतील महत्त्वाच कार्य यांपैकी उद्याच्या लोकांना कोणत्या गोष्टीचं स्मरण राहील, हे मला निश्चित सांगता येत नाही."

हरिभाऊनी पत्रातून आनदाश्रमाच्या कामातच आपल्याला आनंद आहे असे लिहिले तरी त्याना मनात ' करमणूक ' अखेर पैशाअभावी बंद करावी लागली याचे दुःख मनात कोडलेले आहे हे काशी-ताईंना ठाऊक होते. हरिभाऊंनी येवढ्या कादंबऱ्या ' करमणुकी ' तून लिहिल्या; लोकाना त्या आवडल्या पण त्या देखील ' करमणुकी 'ला तारू शकल्या नाहीत याचा विषाद त्याच्या मनात होता. म्हणूनच काशीताई त्याना म्हणाल्या—

" हरिभाऊ, तुम्ही गेली २५–२७ वर्ष लेखन केलत. परतु त्या मानान तुम्हांला आर्थिक स्वास्थ्य मिळू शकल नाही— "

" ताई, त्याबद्दल मला मुळीच वाईट वाटत नाही. तुम्हाला आठवण असेल–आमची ताई गेली त्यावेळची गोष्ट. त्यावेळी मी ' कर्मयोग ' कादबरी लिहीत होतो. त्यातल्या चंद्रशेखरच्या स्थितीचं वर्णन करताना मी ' धर्म हा एक विकार आहे, तो विचार नाही. तो श्रद्धामूल आहे ' अस लिहिलं होत. परमेश्वर मुळी नाहीच, असला तरी तो निर्दय आहे, निष्ठुर आहे अशी माझी पक्की धारणा होती. लोक हाच परमेश्वर असल्यामुळं त्याच्या कल्याणासाठी आपल्याला जे नीतियुक्त वाटेल तेच करीत राहावं अशा अर्थाचं विवेचन मी त्या कादवरीत केलेल होत, परतु आज माझी अशी ठाम धारणा आहे की, जगात परमेश्वर आहे आणि तो अतिशय न्यायी आणि परम कारुणिक आहे. खरोखर मी किती सामान्य बुद्धीचा माणूस, परतु परमेश्वरानं सबध आयुष्यात किती मोठमोठ्या लोकाशी माझा सबध आणला ! गेल्या तीन-चार वर्षांत महाराष्ट्रातील हिमालयाएवढी जेवढी म्हणून माणसं झाली त्या सगळ्याशी माझा निकटचा संबध आला· तुम्ही, गोविंदराव, अण्णासाहेब, शास्त्रीबुवा, न्या. रानडे, लो. टिळक, ना. गोखले... काशीताई; आमची चिमामावशी सुद्धा फार मोठी स्त्री बर ! खर सागायच म्हणजे माझ्या मनातून एक आत्मचरित्र लिहा-यच फार दिवस आहे त्यामध्ये तुम्ही सगळी येणार आहात. शिवाय अपुऱ्या कादवऱ्याही पुऱ्या करायला हव्यात. निदान ' आजच ' आणि ' कर्मयोग ' तरी लवकर पूर्ण करीन म्हणतो. माझ्या मनात पेशवे-कुळातील एखाद्या कर्त्या पुरुषाच्या जीवनावर कादवरी लिहावी, अस फार फार वाटतं ! "

" कुणावर ? ' पहिल्या बाजीरावा 'वर का ? "

" नाही पहिल्या माधवरावावर. न्यायमूर्ती रानडयानी पेशवे-दप्तरातील काही उतारे प्रसिद्ध केले त्यावेळेपासून हा माधवराव माझ्या मनात बसला आहे. "

" पण तुम्हीतर मागे नारायणरावाच्या जीवनावर कादवरी लिहिणार म्हणत होता ! "

" होय, नारायणरावाच्या जीवनावरच्या त्या कादवरीचा आरा-खडाही मी तयार केला होता. तीही लिहिली पाहिजे. "

" हरिभाऊ, तुम्ही लवकच बरे व्हा अगोदर, म्हणजे सगळ काही सुरळीत होईल ! "

" परमेश्वराची इच्छा असेल तसं होईल. हा माघ महिना ना ? काशीताई, माघ महिना म्हटला की माझ्या अगावर काटा येतो. मला तो मोठा कर्दनकाळ वाटतो. माझी आई, वडील, मधू, गोपाळ-राव गोखले आणि ताई एवढ्या लोकाना या महिन्यान आपल्या उदरात गडप केलं. माधवराव जोशी गेला; परवाच हरिभाऊ लिमये गेल्याची बातमी आली. वास्तविक लिमयाना एवढ्या लवकर जाण्याच काय कारण होत ? दोनच महिन्यापूर्वी मी त्याना गमतीनं म्हणालो होतो, ' लिमये, ही आपली तिरडी आवळायची पद्धती मोठी किळस-

वाणी आहे बुवा. त्यासाठी सुंदर प्रेतवाहक गाडी तयार करावी आणि तीतून प्रेत न्यावीत हे चागल नाही का ?' त्यावेळी ते गमतीन म्हणाले की, 'आपटे तुम्ही काळजी करू नका. त्या गाडीचा उद्घाटनसमारभ मीच करीन ! ' हरिभाऊचे बोलणे नेहमीप्रमाणे जेवढ्यास तेवढे नसून जरा भरकटलेले, असे काशीताईला वाटले. बोलताना ते आज भडाभड बोलून टाकीत होते. जणू त्याना आता फारसे सागायला फार थोडा अवधीच होता. काशीताईंच्या ही गोष्ट लक्षात येताच त्यानी म्हटले–

" *हरिभाऊ, तुम्ही स्वस्थ पडा आता ! मी आता जाते.* "

काशीताई उठून गेल्या. जरा वेळानें डॉक्टर आले. डॉक्टराची तपासणी चालू असतानाच कवी रेंदाळकर काही नवी पुस्तके घेऊन आले.

" एवढी पुस्तक इथं असताना आणखीन नवीन कशाला ? " डॉक्टरानी वातावरग थोडे सैल करण्याकरता रेंदाळकरांकडे पाहत म्हणाले.

" *आता ही सगळी पुस्तक वाचण्याच त्राण काही राहिल नाही* डॉक्टर; निदान त्यांच्याकडे पाहात तरी बसतो ! "

हरिभाऊच्या पायावर शाल ओढून वेणूताई शेजारी खुर्चीवर बसल्या. हरिभाऊ डोळे मिटून पडले होते. त्याना झोप लागत आली असावी या कल्पनेने वेणूताईंनी खिडकीचा पडदा ओढला. हरिभाऊनी डोळे उघडले. खोलीतला काळोख त्याना अस्वस्थ करी ते क्षीण आवाजात म्हणाले,

" राहू दे पडदा तसाच ! झोपलो नाही मी......"

पडदा होता तसाच करून वेणूताई त्याच्या पायाशी बसल्या. हरिभाऊनी पुनः डोळ्याच्या पापण्या मिटल्या. त्यांच्या मनःपटलावर स्मृतीचे चलत्‌चित्र–वेगाने अफाट वेगाने सरकत होते.

'डॉक्टर, लाभणार आहे का हो ही मुलगी आम्हांला ? ' हा हरिभाऊंचा प्रश्न ऐकून त्या युरोपियन डॉक्टराच्या चेहऱ्यावर पसरलेली असहायता हरिभाऊंना आठवली. जे त्या डॉक्टराना जमले नाही ते नानाच्या मलमाने साधले. पुढे तेच डॉक्टर सिव्हिल सर्जन म्हणून भेटले. ताईला पाहताच त्यानी तिच्या पाठीवर थोपटीत म्हटले—Is this your triple operated daughter ? It's wonder...... God is great !......"

परमेश्वराची ती कृपा आणि......

शाता मोठी हुशार होती...गोखले देखील एकदा म्हणाले होते...

'गोखले, टिळक कुठे असतात हो ? ' ताई.

' ताई, ते की नाही ब्रह्मदेशात तुरुंगात आहेत. ' गोखले.

' त्याना का तुरुगात टाकल ? "

' आपणावर इग्रज राज्य करतात ना; त्यानी टाकलं त्याना तुरुंगात.'

' काका तुम्ही हाकलून द्या इग्रजाना ..'

गोखल्यानी कौतुकाने तिला उचलून घेतले. गोखले म्हणाले,–
" हरिभाऊ, ही ताई पुढे कुणी तरी मोठी विदुषी होणार बर का ! "

गोखल्याचे शब्द...नुसते शब्दच राहिले. ती विदुषी झाली नाही... मोठी झाली नाही...! खरच मोठी झाली नाही. लहान राहिली. होती तेवढीच...तेवढीच...

ताई गेली ! ' करमणूक ' तिची कधीच झाली नाही. –तिच्या ताब्यात करमणूक देऊन आपण जाणार होतो...पण तीच गेली. आता ताई नाही... ' करमणूक ' नाही.'

मिटल्या पापण्यामधून अश्रू ठिपकू लागले.

हरिभाऊनी डोळे उघडून वेणूताईकडे पाहिले. वेणूताई जवळ आल्या—

" घाम सुटला का...? "

" हूं..." वेणूताईंनी पदराच्या शेवाने त्याचे कपाळ टिपले. तोंड पुसले. त्यात ते अश्रूही पुसले गेले.

गुगी पुनः सुरू झाली......

टिळक नेमके कसे आहेत हे आपल्याला कधीच कळले नाही का ? टिळक सनातनी होते. सुधारक नव्हते म्हणून आपण त्यच्यापासून मनाने दूर राहिलो. टिळक आपल्याला थोडे फार उमजू लागले ते रायगडावरील शिवस्मारक सोहळ्यापासून का ? मारिता मारिता राज्य घेणारा तो महापुरुष होता ! त्याची झेप मोठी होती. रायगडाची ती चढण चढताना आपण ऐतिहासिक कादन्याच्या विश्वात ओढले गेलो. ज्याच्यासबधी आपल्या मनात काहीशी अढी होती त्यानेच अखेर आपल्या राष्ट्रजागृतीच्या कामाला आशीर्वाद दिला.

सहा वर्षांची खडतर शिक्षा भोगून तो महापुरुष पुण्याला परतला. तेल्या-तांबोळ्याचा हा नेता पुनः परत आला म्हणून सहस्र बाहूनी त्याचे स्वागत झाले. आपण त्याना भेटायला गेलो..... आणि त्याच्या उद्गारानी जी धन्यता लाभली–तीच आयुष्यातली खरी कमाई !

" आपटे, महाराष्ट्रात माझ्या शक्त्यनुसार शिवस्मारक करण्याचे मी आटोकाट प्रयत्न केले परंतु तुमच्या ऐतिहासिक कादंबऱ्यानी प्रत्येक वाचकाच्या मनात शिवतेज जागृत झालं. आम्ही पार्थिव, जड पुतळे उभारून कृतकृत्य होणार होतो, परंतु तुम्ही महाराष्ट्रीयाचे आत्मे जागते ठेवले. महाराष्ट्र तुमचं हे ऋण कधीही विसरणार नाही."

आपल्याला काहीच बोलता येईना ! टिळकांनी प्रेमाने आपला हात दाबला ! तो स्पर्श......तेजाचा स्पर्श, करारी नेतृत्वाचा स्पर्श... हा स्पर्श काही निराळा होता; फार निराळा होता.

आगरकराच्या मृत्यूनंतर 'केसरी'त आलेला मृत्युलेख वाचून पुण्यातील प्रत्येक व्यक्तीच्या डोळ्यातून अश्रू लोटले आणि न्या. रानडयांच्या मृत्यूनतर टिळकानी 'केसरी'त लिहिलेला मृत्युलेख मराठी वाङ्मयात मोठ्या मोलाचा ठरला होता. आगरकर, रानडयाशी अतिशय निकट संबंध येऊनही 'करमणुकी'तील आपले लेख टिळकापुढे फिके पडले. आगरकरानी तर आपल्या मृत्यूनंतर 'सुधारका'चे सपादन आपटयानी करावे, अशी इच्छा व्यक्त केली होती आणि मराठी भाषेवर असामान्य प्रभुत्व असणारा दैवी लेखक अशी रानडयांनी त्याची प्रशसा केली होती; असे असता टिळकाचे लेख सरस वठावेत, याचे कोडे त्या स्पर्शाने उलगडले !

काही झाले तरी आगरकर हे माझे जीवश्चकंठश्च स्नेही होते आणि रानडे ? रानडे तर माझे राजकीय गुरु होते. मी राजकारणात पडलो ते त्यांच्या प्रेरणेनं. अविश्रांत परिश्रम कसे करावेत, टिपण कशी तयार करावीत आणि युक्तिवाद कसे करावेत, हे त्यांच्याकडून शिकलो.'जरी या दोघाशी सतत विरोध आला तरी हा विरोध सार्वजनिक होता. व्यक्तिगत नव्हता. न्या. रानडे नसते तर हा टिळक तुम्हाला आजच्या स्वरूपात दिसला नसता. "



रानडे नसते तर हा टिळक तुम्हांला दिसला नसता...

टिळकांचे हे शब्द हरिभाऊंच्या कानात घुमूं लागले... त्यांचा हात कुणाच्या तरी हातात होता. त्यांनी डोळे उघडले–

डॉक्टर नाडी घेत होते. बाहेर आता चांगला अंधार झाला होता आणि डॉक्टर विचारीत होते...

" झोप लागते ना ?"

## : १९ :

" माझं सगळं लिहून होईपर्यंत आपण वाचायचं नाही वरं का ?"

" वरं बुवा..."

" इश्श, असं चिडवायला लागलात तर मीं मुळीच लिहिणार नाही "–

हरिभाऊंनी कूस बदलली. पलंगाजवळ झोपी गेलेल्या वेणुताईंना गाढ झोप लागली होती. दिवसभर हरिभाऊंचे करताना त्या दमून जात आणि मग मध्येच त्यांना रात्री गाढ झोप लागे...

' मथू, सगळं लिहून होईपर्यंत काही वाचायचं नाही हे खरं. पण तू काही लिहीतच नाहीस ! चिमामावशीवर रागावून, माझ्यावर रागावून काहीही न लिहिताच तू निघून गेलीस ! तुझ्या नाकावर नाहीतरी फारच राग असायचा–'

' मथू !'

हरिभाऊंची हाक ऐकताच वेणूताई दचकून उठल्या. हरिभाऊंजवळ जाऊन त्यांनी त्यांच्या कपाळावर हात ठेवून विचारले–

" स्वप्न पडलं का ? "

कण्हत हरिभाऊंनी डोळे उघडले. खोलीत कोपऱ्यात मिणमिणता दिवा होता; वेणूताईंची भली मोठी सावली त्यांच्या अंगावरून पांघरुणासारखी सरकत भितीवर चढली होती. हरिभाऊंनी त्यांचा पलंगावर टेकलेला हात आपल्या दोन्ही हातांनी धरून ठेवला.

–मथू फार दिवसांनी बोलली आपल्याशी ! आता मथू नाही– वेणूताई आहेत जवळ, याचे त्यांना भान आले. त्यांनी आत गेलेल्या आवाजात विचारले–

" मी ओरडलो का झोपेत ?"

" नाही ! पण मथुताईंना हाक मारलीत. "

हरिभाऊंना वाटले की वेणुताईंजवळ मथूसंबंधी फार बोलणे बरे नाही. पुनः त्यांनी निपचितपणे डोळे मिटले... आणि ते म्हणाले–

" असेल... तू झोप... दिवसभर मग जमिनीला अंग लागत नाही तुझं !"

वेणूताई पुन: आडव्या होणार होत्या तोच बाहेरच्या खोलीतून काशीताई आतली चाहूल लागल्यामुळे उठून आल्या.

" जागे झाले का मधेच...!" काशीताईंनी विचारले.

वेणुताई त्यांना न बोलण्याची खूण करून त्यांच्याबरोबर खोली-बाहेर आल्या.

सकाळीच डॉक्टरांनी हरिभाऊंना जलोदर असल्याचे निदान केल्यामुळे वेणुताई घाबरल्या होत्या. त्यात इतक्या वर्षांनी हरिभाऊंनी मथूताईंना हाक मारावी ही गोष्ट त्यांना काहीशी भीतिदायक वाटली. डोळचाला पदर लावीत त्या काशीताईंना म्हणाल्या–

" काल रात्री ' वज्राघात ' कादंबरी वाचायची म्हणून हट्टच धरून बसले. आमची ताई एकदा कादंबरी लिहीत असताना ह्यांना म्हणाली होती... " तात्या, लवकर लिहा..." ' वज्राघात ' कादंबरी तिनं त्यांच्याकडून पुरी करून घेतली असं वाटतं त्यांना–"

वेणुताई व्हरांड्यात भितीला टेकून बसल्या. मागच्या आठवणी न् हरिभाऊंच्या प्रकृतीबद्दलची चिंता अनावर होऊन त्यांना रडू कोसळले.

" वेणूताई, तुम्ही असा धीर सोडून चालायचं नाही. आम्ही दोघं सकाळी डॉक्टरना विचारून आलो. ऑपरेशन झालं की झटकन् उतार पडेल हरिभाऊंना !"

काशीताईंच्या बोलण्याकडे वेणूताईंचे लक्ष नव्हते. त्या म्हणाल्या–

" स्वप्नांवर, पुनर्जन्मावर, दृष्टांतावर अलीकडे फार विश्वास बसला आहे त्यांचा ! सारखे म्हणतात,... ताई पुन्हा जन्माला येणार आहे ! लेखिका होणार आहे... कादंबऱ्या लिहिणार आहे..."

" डॉक्टर तेच म्हणत होते की काहीतरीच भावना करून घेतली आहे त्यांनी ! हा माघ महिनाच आपल्याला कठीण आहे ! सगळी-जणू ह्याच महिन्यात गेली ... तेवढं त्यांच्या मनातून काढलं पाहिजे."

" शक्य नाही हो ते ! मनानं एकदा घेतलं की घेतलं असा स्वभाव आहे त्यांचा–"

दोघींची हळू आवाजात बाहेर बोलणी चालली होती. आणि आत हरिभाऊही काशीताईंशीच बोलत होते–

" तुम्हांला प्रथम पाहिलं काशीताई आणि वाटलं आपला ऋणानुबंध जडावा ! गोविंदरावांचा फार फार हेवा वाटला मला... असं मी बोलू नये नाही का ? खरं आहे. पण आजपर्यंत कुठे बोललो ! आतातरी हे का बोलावंसं वाटतं सांगू का ? आता सगळं संपत आलं आहे काशीताई. तुम्ही माझं चरित्र लिहिणार आहात असं गोविंदराव म्हणत होते ! माझं चरित्र तुमच्याइतकं दुसऱ्या कुणाजवळ कधी उघडं झालं नाही... लिहा. सगळं खरं लिहा. मी हट्टी होतो, मथूवर अन्याय केला मी... तुम्ही आणि गोविंदरावांनी माझ्यावर फार फार माया केलीत... मीं मात्र तुम्हांला काही दिलं नाही–"

रस्त्यावरून अपरात्री गेलेल्या मोटारीच्या कर्ण्याने हरिभाऊंची तंद्री भंगली. आपण मुंबईत आहोत हे त्यांना जाणवले – आपल्याला

येथे राहून चालणार नाही. आनंदाश्रमात गेले पाहिजे. पुण्याला आपल्या आपल्या घरी !

पलंग करकरला. वेणूताई आत आल्या. त्या जवळ आल्यावर हरिभाऊ म्हणाले–

" मला पुण्याला घेऊन चला ! इथे नको..."

* * *

१८ फेब्रुवारीची रात्र संपली. परंतु पुण्याला जाण्याचा हरिभाऊंचा हट्ट संपला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यानी काशीताईंना, पानशाना आणि भेटायला येणाऱ्या प्रत्येकाला सांगितले की... 'मला पुण्याला घेऊन चला–'

पुण्याच्या स्टेशनवर हरिभाऊंना काळजीपूर्वक उतरविण्यात आले. आनंदाश्रमात तार करून गाडी मागविली होती. परंतु तार मिळाली नसल्याने गाडी आलेली नव्हती. भर दुपारची रणरणत्या उन्हाची वेळ होती. स्टेशनवर एक मेणा आणि काही टांगे उभे होते. गाडी आलेली नाही हे हरिभाऊंना समजले तेव्हा ते पानश्यांना म्हणाले, 'माझ्या लग्नाच्या दिवशी मिरवणुकीला मेणा मिळाला नव्हता ती हौस पुरी व्हायची राहिली आहे. मेणा तर मेणा !"

## : २० :

### ३ मार्च १९१९

हरिभाऊंना घेऊन मेणा आनंदाश्रमाच्या दाराशी आला, तेव्हा दुपारचे बारा वाजायला आले होते. उन्हाने आणि प्रवासाच्या दगदगीने हरिभाऊंना विलक्षण ग्लानी आली होती.

हरिभाऊंच्या लिहिण्याच्या खोलीतच त्यांच्या अंथरुणाची सोय केलेली होती.

हरिभाऊंना गादीवर आणून ठेवल्यानंतर काही काळ त्यांना चुटका लागला.

मधल्या वेळात हळूहळू हरिभाऊंना पुण्याला आणल्याचे वृत्त पसरत गेले व मित्रांची त्याना भेटण्यासाठी गर्दी होणार या अपेक्षेने नानासाहेब पानसे आनंदाश्रमाच्या बाहेरच बसून राहिले. हरिभाऊंना त्रास होईल म्हणून शक्य तो त्यांच्याशी फार वेळ बोलू नका असा सल्ला ते आनंदाश्रमात येणाऱ्या परिचिताना देत होते.

रमावहिनींचे (वेणूताई) पाऊलही आनंदाश्रमात बऱ्याच दिवसांनी पडले होते. थोडीशी स्वच्छता करण्यात त्याचा तासभर गेला असेल तोच हरिभाऊंच्या खोलीतून मोठी उबळ आल्याचा आवाज आला.

पानश्याना बोलावून रमावहिनी आत धावल्या, रक्ताची गुळणी होऊन हरिभाऊ गादीवर डोके टेकून उपडे झालेले होते. रमावहिनींच्या पायातील सारी शक्ती ते दृश्य पाहताच नाहीशी झाली. कसेबसे जवळ जाऊन त्यानी हरिभाऊंना कुशीवर वळवले.

उलटी होऊन जाताच हरिभाऊंच्या पोटातील मळमळ शांत झाली. व ते काहीसे हुशार झाले. त्यानी पानश्यांना सांगितले,

" कपाटात माझी पुस्तकं आहेत. ती खाली काढा. आणि ताईचा फोटो...कुठाय ?"

पानश्यानी त्याना पडल्या पडल्या दिसेल अशा ठिकाणी ताईच्या फोटोची फ्रेम टेबलावर ठेवली आणि कपाटातून त्यांच्या कादंबऱ्या त्यांनी खाली काढून त्यांच्या गादीजवळ ठेवल्या. त्यांची ही विचित्र इच्छा पाहून पानश्यांच्या पोटातही धस्स झाले.

" हरिभाऊ...आणखी काही करायचं आहे का...?" त्यानी जवळ जाऊन विचारले.

रमावहिनी खोलीबाहेर जाईपर्यंत हरिभाऊ काहीच बोलले नाहीत. एकदम ते समोर कोठेतरी पहात राहिले. रमावहिनी बाहेर जाताच त्यांनी खुणेने पानश्यांना जवळ बोलावले. आणि मग क्षीण आवाजात ते म्हणाले,—

" माझ्या पेटीत मी कागद ठेवला आहे...! सगळं लिहिलं आहे... वकिलाना बोलवा...माझी सही घ्या..."

पेटीत त्यांनी मृत्युपत्र लिहून ठेवलेले होते. वेणूताईंच्या निर्वाहाची व्यवस्था त्यानी करून ठेवली होती...

मृत्युपत्राचा दस्तऐवज त्यांच्यापुढे येईपर्यंत दुपारचे चार झाले. कापऱ्या हाताने त्यांनी मृत्युपत्रावर सही केली. सही झाली आणि ते खिन्नपणे हसले...म्हणाले—

" रमाला एवढ्यात दाखवू नका...!"

वकील निघून गेले आणि हरिभाऊंना पुन्हा लहानशी रक्ताची गुळणी झाली.

कुणीतरी तेवढ्यात हरिभाऊंना भेटायला आले. हरिभाऊंनी त्याना ओळखले नसावे. कारण त्यानी त्याच्याकडे फक्त पाहिले. त्या नजरेत ओळख पटल्याची कसलीही खूण नव्हती. त्यांच्या अंथरुणाजवळ पडलेल्या त्यांच्या पुस्तकाचे अस्तित्वही आता त्याना समजत नसावे. कारण आलेल्या गृहस्थानी जवळ बसून त्यातले एक वेडेवाकडे झालेले पुस्तक उचलून पुन्हा: टेबलावर ठेवले ते देखील त्यांना समजले नाही.

पुढचा एक तास माणसे भेटावयास येत होती. हरिभाऊ नजर गेलेल्या डोळ्यांनी त्यांच्याकडे पहात होते. सगळ्या ओळखी हळूहळू विस्मृतीत घरंगळत होत्या. त्यांच्या डोळ्याच्या कडाही आता पाणावल्यासारख्या वाटत होत्या. रमावहिनींना आता तिथे बसणे शक्य नव्हते. त्यांच्या डोळ्याना धार लागली होती व काहीशा भकास चेहऱ्याने त्या त्यांच्या दृष्टीआड पायाशी बसून होत्या. सध्याकाळच्या सावल्या आता आनंदाश्रमावर पसरल्या होत्या. डॉक्टरांना बोलावणे गेले होते, हरिभाऊंचा आत्मा आता डॉक्टरांची वाट पहात थांबणार नव्हता. त्यांच्या प्रयाणाची वेळ आता होत आली होती—


# पांढरे डाग

पांढऱ्या कोडाचे अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसे व हजारो अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवू. नकली वैद्यांपासून सावध राहावे.

**वैद्य बी. आर. बोरकर, आयुर्वेद-भवन**
**मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)**




**मरणाचा सोहळा त्यांनी स्वतः पाहिला होता.**

हरिभाऊंची मान आता उचलल्यासारखी झाली. रमावहिनी दचकून पुढे झाल्या. एक लहानसा आचका घेऊन हरिभाऊंच्या ओठातून लाल गुळणीचे ओघळ बाहेर आले आणि त्यांची मान डाव्या अंगावर वळली. मान सावरण्याकरता पुढे केलेले रमावहिनींचे हात तसेच रिते राहिले... खोलीत जमलेली त्यांची स्नेही मंडळी डॉक्टर आले का हे पाहण्यासाठी बाहेर धावत गेली. तोच रमावहिनींच्या हंबरड्याने खोलीतील शांततेचा भंग झाला. हरिभाऊ गेले!! एका थोर कादंबरीकाराने जगाचा निरोप घेतला होता!

हरिभाऊ गेले ही बातमी रात्रीपर्यंत पुण्यामर पसरली.

दुसऱ्या दिवशी सकाळी वर्तमानपत्रे विकणारी पोरे ओरडत होती—

**कादंबरीकार हरी नारायण आपटे यांचे निधन**

या जाड मथळयाखाली पुढील मजकूर होता—

पुणे, दिनांक ४ मार्च १९१९—"महाराष्ट्राचे कादंबरीकार, समाजसेवक, प्रसिद्ध प्रागतिक पुढारी व आनंदाश्रमाचे संचालक हरी नारायण आपटे यांचे काल संध्याकाळी ६ वाजण्याच्या सुमारास आनंदाश्रमात प्राणोत्क्रमण झाले. गेला महिनाभर ते जलोदराच्या विकाराने आजारी होते आणि कालच त्यांची प्रकृती ठीक नसताना त्यांना त्यांच्या इच्छेनुसार पुण्याला आणण्यात आले होते. आनंदाश्रमात आल्यानंतर लागोपाठ त्यांना रक्ताच्या तीन उलटया झाल्या. मृत्युपूर्वी काही तासच त्यांनी आपल्या इस्टेटीचे मृत्युपत्र करून पत्नीच्या निर्वाहाची सारी व्यवस्था करून डोळे मिटले.

पुण्याला आल्यानंतर अवघ्या सहा तासांच्या आतच त्यांचे निधन झाले."

रमावहिनींना भेटण्यासाठी काशीताई पुण्याला आल्या होत्या. रमावहिनींकडून त्यांनी हरिभाऊंच्या अखेरच्या क्षणाची हकीगत ऐकली. रेंदाळकरही त्याच वेळी आले होते. रेंदाळकर रमाबाईंपाशी बसलेले असताना ज्या खोलीतून हरिभाऊंचा आत्मा निघून गेला, त्या खोलीत काशीताईंनी पाऊल टाकले.

निधनापूर्वी अंथरुणावर पसरून घेतलेली त्यांची पुस्तके कुणीतरी टेबलावर ठेवून दिली होती. त्यातल्या एका पुस्तकातून खुणेचा पांढरा कागद बाहेर लोंबत होता. औत्सुक्याने काशीताईंनी ते पुस्तक उघडले...

"पण लक्षात कोण घेतो?" या कादंबरीत हरिभाऊंनी खूण घालून ठेवलेली होती. खूण ठेवलेल्या पानावर काशीताईंची नजर फिरू लागली—

'मला अतिशय फिरल्यासारखं होतं...असे काही शब्द उच्चारलेले माझ्या कानी पडले. आणखी एकदम ओकल्यासारखे केले, तो ओकारी तांबडी लाल!—आणखी ओकण्यासाठी उठून बसायचे होते. ते एकदम खाली पडायचे! ते पाहण्याबरोबर माझ्या सर्वांगाचा थरकाप उडाला. आणि हातपाय लटालटा कापायला लागले, आणि इतक्यात काही कण्हत उच्चारलेले शब्द माझ्या कानी पडले—


'काय हे वेडचासारखं!' पण कसचं काय आणि कसचं काय? माझ्या तोंडचं पाणी पळून काळीज चर्र झालं होतं—

मी जवळ जाऊन, 'हे आज असं काय होत आहे!' असा रडत रडत प्रश्न केला. त्याबरोबर अतिशय खोल आवाजाने, 'काही नाही, तू अशी रडू नको' असं म्हटलं. परंतु मला कुठलं रहावयाला?

परंतु लगेच तिकडून अंगाची आग झाल्यासारखी खूण करून वारा घालण्यास सांगितलं. मी लागलीच पंखा घेऊन वारा घालू लागले. मनातल्या मनात हजारो देवांना नवस करीत होते. जोगेश्वरीला, तुळजापूरच्या भवानीला, कोल्हापूरच्या अंबाबाईला, एका देवीला म्हणून काही नवस केल्याखेरीज ठेवलं असेल असं नाही, परंतु आता सारं चित्त तिकडे होतं. मघांची ती दुसरी गुळणी आली त्याला बराच वेळ झाला. आता गुळणी येत नाही असं वाटलं. आणि मी मोठ्या आशेनं ज्याच्यात्याच्याकडे पाहून, 'आता नाही ना हो यायची गुळणी? आता लागेल ना हो झोप?'

काशीताईंना वाटले, रमावहिनीच बोलत आहे. रघुनाथरावाच्या कादंबरीतील मृत्यूनंतर हरिभाऊंनी, "या उमद्या पुरुषाचा अंत का करावा?" असा प्रश्न अनेकांना पडला होता. त्याचे उत्तर हरिभाऊंनी कधीच दिले नव्हते. काशीताईंच्या लक्षात आले की रघुनाथरावाच्या या मृत्यूचीच आठवण हरिभाऊंना मरणापूर्वी व्हावी हा योगायोग नाही. मराठी साहित्यात आपले मृत्युचित्रही हरिभाऊंनी अजरामर करून ठेवले आहे. आपल्या मरणाचा सोहळा त्यांनी स्वतः पाहिला होता--!

**[ समाप्त ]**



# "हाले चैतन्याचे चाक"

—सर्व संकटे, अडथळे दूर सारून
लोकशाही समाजवादाच्या
दिशेनें प्रगतीची वाटचाल झाली पाहिजे.
आज आपण जो मार्ग चोखाळतो आहोत
त्यावरील आपल्या निष्ठेचा पुनरुच्चार करु या.
विषमता व अन्याय ह्यांना मूठमाती दिली पाहिजे.
वैयक्तिक स्वातंत्र्य, निष्ठा, प्रामाणिकपणा
आणि कार्यक्षमता हाच जेथें मानदंड
मानण्यात येईल अशा समाजाची
आपणाला भारतात उभारणी
करावयाची आहे त्याची आठवण राहूं द्या.

## .. ध्येयाच्या दिशेने आगेकूच करू या

**प्रसिद्धि संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई**

## [ क्रांतीचे स्तोत्रकार कुसुमाग्रज ]

[ पृष्ठ १६ वरून ]

समानतेचे युग प्रत्यक्षात आणण्याचे कार्य असामान्य लोक करतील अशी त्यांची श्रद्धा दिसते. समानता यालाच दुसरा शब्द सामान्यत्व असा आहे–ज्या सामान्याची कुसुमाग्रजाना तिडीक आहे–ज्याची अवहलेना करण्याची एकही संधी ते सोडीत नाहीत. त्यांच्या भूमिकेची तार्किक परिणती पुढीलप्रमाणे— "सर्व माणसे समान आहेत हे सत्य आहे. सर्व माणसांनी एकमेकांना समान मानावे व त्याप्रमाणे वागवावे हे पाहण्यासाठी काही असामान्य माणसाची आवश्यकता आहे. समानता प्रस्थापित करण्याचे कार्य ही असामान्य माणसे करणार." या भूमिकेतून खरी समानता येणे अशक्य आहे. ह्यासाठी जास्ती विवेचनाची जरूर आहे असे वाटत नाही.

कुसुमाग्रजाचे असामान्यत्वाचे प्रेमही मोठे चमत्कारिक वाटते. विशेषत: असामान्यत्व म्हणजे काय यासबधी त्यांचा काही गोंधळ असावा असे मानण्यास जागा आहे. कोलंबसाचे गर्वगीत या कवितेत पुढील ओळी आहेत–

मार्ग आमुचा रोघु न शकती<br>
ना धन ना दारा,<br>
घराची वा वितभर कारा !<br>
मानवतेचे निशाण मिरवू<br>
महासागरांत,<br>
जिंकुनी खंड खड सारा !

धनाची, दारेची, व घराची अशी यथेच्छ अवहेलना केल्यावर ज्या मानवतेचे निशाण कुसुमाग्रजाचा कोलंबस मिरवू इच्छितो ती मानवता म्हणजे काय असा प्रश्न कोणासही पडेल. मानवतेचे निशाण म्हणजे घराचे *निशाण, धनाचे निशाण, दारेचे निशाण,* पृथ्वीच्या पाठीवरील कोणाही मानवाचे निशाण, हे कुसुमाग्रज विसरतात. आणि हा कोणी मानव सामान्य असतो हेही विसरतात. मोठ्या अस्तित्वासाठी लहान अस्तित्वाला खेदपूर्वक बळी देणे निराळे व अस्तित्वाची सरसकट अवहेलना करणे निराळे. सर्वांनी घर, धन, दारा याची अशी वासलात लावली तर ज्या मानवतेचे निशाण मिरवावयाचे ती शिल्लक राहणार नाही.

### सामान्यांसाठीच असामान्य

ज्या असामान्यत्वाचा कुसुमाग्रजाना एवढा ध्यास आहे त्याच्या स्वरूपाची थोडी चिकित्सा करावयास हरकत नाही. 'टिळकाच्या पुतळ्याजवळ' या कवितेत असामान्य नेत्याचे जीवन हेच खरे जीवन–बाकीच्यांचे जीवन म्हणजे मरणाची माला असे कुसुमाग्रज म्हणतात. सुखदु:खाचे क्षुद्र कण हाती घेऊन सामान्य जन जीवनमार्गावर धावतात, आणि धुळीत अखेरची विश्रांती घेतात. हे जीवित नसून जीविताभास आहे. सामान्याचे जीवन निरर्थक असून असामान्याचे जीवनच खरे जीवन असे आग्रहाने मांडणाऱ्या कुसुमाग्रजाना असे जर विचारले, की असामान्याच्या जीवनास अर्थ कशामुळे प्राप्त झाला, ते असामान्य कशामुळे ठरले, तर त्याचे उत्तर असे की त्यानी सामान्यांसाठी जीवित वेचले. जर सामान्यत्व हे कवडीमोल आहे, सामान्य जीवनात काही अर्थ नाही तर ते टिकविण्याचा अट्टाहास कशासाठी ? आणि त्यासाठी झटणाऱ्या लोकानी हे निरर्थक जीवन कायम राहावे म्हणून प्रयत्न केले यासाठी त्याचा गौरव तरी कशासाठी ? सामान्य जीवनात काही अर्थ नाही पण ते टिकविण्याच्या प्रयत्नात असल्याच्या जीवनात मात्र अर्थ आहे ही भूमिका मोठी विसंगत वाटते.

सामान्यत्वाचे अस्तित्व सतत टिकणे ह्राच जीवनाचा सर्वात मोठा हेतू आहे. यापलीकडे जीवनात आणखी काही हेतू संभवत नाही. अस्तित्वासाठी अस्तित्व आणि अस्तित्व अनुकूल होण्यासाठी इतर सर्व मूल्ये ही भूमिका वास्तववादी असली तरी कमालीची रुक्ष व त्रासदायक असल्याने साहित्यास ती मानवत नाही. किंबहुना सर्वच तत्त्वज्ञानास ती मानवत नाही. म्हणून तत्त्वज्ञानाचा असा सनातन प्रयत्न चालू असतो की जीवनास निव्वळ अस्तित्वापेक्षा काही निराळा-आकर्षक हेतू शोधावा. हा जेवढा व्यापक, प्रभावी आणि आकर्षक तेवढा तत्त्वज्ञानाचा प्रभाव वाढतो. परतु या सर्व प्रयत्नासही अस्तित्वाचा चागलेपणा गृहीत धरावा लागतो. कुसुमाग्रज जेव्हा सामान्य जीवनात काही अर्थ नाही असे म्हणतात तेव्हा अस्तिवाचे चागलेपण ते नकळत अमान्य करतात. केवळ अस्तित्वापेक्षा निराळा अर्थ शोधू लागतात हा अर्थ त्यांना सापडतो; पण त्यासाठी त्याना अस्तित्वाचे चांगलेपणच गृहीत धरावे लागते. ज्यामुळे असामान्य लोक असामान्य ठरतात ते सामान्यत्व (म्हणजेच अस्तित्व) सार्वभौम मूल्य आहे– सर्व मूल्यापेक्षा श्रेष्ठ व सर्व मूल्यांच्या पलिकडचे आहे. त्याला पोषक वा अनुकूल अशा इतर गोष्टीपैकी असामान्यत्व हे एक आहे.

सर्व माणसानी सुखाने जगावे म्हणून काही माणसानी बलिदान केले वा रूढार्थाने स्वत:चे जीवन समाजास वाहून टाकले म्हणजे त्यास कुसुमाग्रजाच्या मते असामान्य ही सज्ञा प्राप्त होते. परतु या माणसाना जेव्हा मोठे म्हणण्यात येते, तेव्हा त्यानी ज्यासाठी त्याग केला ते मूल्य त्याच्या त्यागापेक्षाही मोठे असते. ते मूल्य ज्याच्यामुळे टिकते त्याना हिणविण्याचे काही कारण दिसत नाही

**काही माणसांनी संसार उधळणे हे जितके आवश्यक व अपरिहार्य आहे तितकेच हेही आवश्यक व अपरिहार्य आहे की इतर सर्वांनी आपापले संसार व्यवस्थित करावयास पाहिजेत. यातील एकास अर्थ आहे आणि दुसऱ्यास नाही असे म्हणणे म्हणजे जीवनाचा धिक्कार करण्यासारखे आहे.**

रूढार्थाने असामान्य अशा जीवनास असामान्यत्व प्राप्त करून देण्याचे कार्य सामान्यत्व तर करतेच, शिवाय या सामान्यत्वाकरवी अस्तित्वाचे सातत्य टिकविण्यात स्वत:चाही वाटा उचलते. म्हणजे असे की प्रत्येक मनुष्य आपापल्या व्यक्तित्वातील 'सामाजिक' भाग एखाद्या मनुष्याच्या हवाली करतो. तो मनुष्य किंवा नेता मोठमोठी कार्ये पार पाडतो ती सामान्य माणसाने त्याला दिलेल्या या दानामुळे त्या दृष्टीने असामान्य नेते हे सर्वसामान्य जनतेच्या ठायी असलेल्या कर्तृत्वाचे प्रतीक आहेत असेच म्हणावयास पाहिजे आतापर्यंत जगातील सर्व बदल व क्रात्या केल्या त्या या अनामिक जननेने. अस्तित्वास एकादे मूल्य जेव्हा अडथळा आणू लागते तेव्हा क्रांती होते व क्रातीतील असामान्य नेत्याचे काम जनतेच्या हातातील हत्याराप्रमाणे असते. ते नेतृत्व निर्माण होते ते जनतेच्या इच्छेतून आणि टिकते तेहि जनतेच्या इच्छेवरच. सर्व स्तरावरील असामान्यत्वाच्या अस्तित्वाची सगती ही अशी आहे. सामान्यत्व हेच असामान्यत्वास जन्म देते आणि सामान्यत्वाचे अस्तित्व हाच असामान्याचा जीवित हेतू असतो.

'समिधाच सख्या या, त्यांत कसा ओलावा,

कोठून फुलांपरि वा मकरन्द मिळावा ?

जात्याच रुक्ष या, एकच त्या आकांक्षा,

तव आंतर अग्नी क्षणभर तरि फुलवावा !'

याबाबत एवढे प्रदीर्घ विवेचन करण्याचे कारण असे की ही भूमिका कुसुमाग्रजाप्रमाणेच इतरही अनेक विचारवंताच्या लिखाणात आढळते. सामान्य जीवनात काही अर्थ नाही म्हणून त्याचा धिक्कार करावयाचा आणि त्यामुळे ज्यास आकार येतो, अस्तित्व प्राप्त होते त्या असामान्य जीवनाचा सार्थ जीवन म्हणून घोष करावयाचा हे सूत्र सार्वत्रिक दिसते. मर्ढेकर जेव्हा 'मी एक मुंगी' किंवा 'सर्वे जतु रुटिनः' असे लिहितात तेव्हा त्यांची जीवनाचा धिक्कार करणारे अशी संभावना होते आणि सामान्य जीवन हे जीवन नसून मरणाची माला आहे, किंवा 'कोटयवधी जगतात जीवाणु । जगती आणि मरती । जशी गवताची पाती' असे कुसुमाग्रज म्हणतात तेव्हा त्याना मानवतेची पूजा बांधणारे कवी म्हणून संबोधण्यात येते. ही विसंगती मोठी मनोरंजक आहे.

### कशाची तरी प्रतीक्षा !

पुनरुत्थानाचा सिद्धांत आणि केवळ अस्तित्वास जीवित हेतू म्हणून मान्यता न देण्याची भूमिका यामुळे कुसुमाग्रजाची कविता प्रतीक्षावादी झाली आहे. केवळ कशाची तरी तिला प्रतीक्षा आहे. सध्यापेक्षा काही निराळे जीवनात येईल ही प्रतीक्षा त्याच्या सर्व काव्यात दिसते. हे निराळे काय येणार याबाबत वर थोडे विवेचन केलेच आहे. वर कुसुमाग्रजाच्या विचाराचे जे विवेचन आले आहे त्याबद्दल थोडे स्पष्टीकरण आवश्यक आहे. त्याची कविता मूलत. सामाजिक जाणिवेतून निर्माण झाली आहे. त्यामुळे तिच्यात वैचारिकता हा प्रधान भाग आहे. त्यासाठी त्याच्या विचाराचा एवढा परामर्श घेतला. दुसरे असे की ही त्याची वैचारिक भूमिका त्याच्या काव्याच्या सर्वसामान्य स्वरूपातून जशी प्रत्ययास आली तशी घेतली आहे. त्यांच्या काही थोड्या कवितांतून याहून निराळी भूमिका असणे शक्य आहे. तिसरे असे की काव्यात प्रकट झालेली त्याची वैचारिक भूमिकाच येथे लक्षात घेतलेली आहे. असेही असणे शक्य आहे की त्याची वैचारिक भूमिका काव्यात पूर्णपणे प्रगट झाली नसेल आणि ती अद्यापि प्रगतावस्थेत असेल. त्यामुळे वैचारिक पातळीवरून त्याच्या काव्याचे जे विवेचन यात आले आहे तेही अगदी न बदलू शकणारे व केवल आहे असे समजण्याचे कारण नाही.

### 'समता'–एक तार्किक चैन

सरतेशेवटी कुसुमाग्रजाच्या कवितेचा स्थायीभाव अशी जी 'समता' तिच्याबद्दल थोडे विवेचन. समता हे सामान्यत्त्व आणि चाकोरी याप्रमाणेच एक तार्किक प्रमेय आहे. तिला केवळ तार्किकतेच्या संदर्भातच अस्तित्व आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर समता हा तर्काभास आहे. एकापेक्षा आधिक व्यक्तित्वे (ॲंटीटीज) अस्तित्वात असली की तर्काच्या आधारे त्याच्यामध्ये समता (व सामान्यत्व) निर्माण होते. त्याचप्रमाणे एकापेक्षा अधिक घटना अस्तित्वत आल्या की त्यांच्यात चाकोरी निर्माण होते. समता व चाकोरी या तार्किक गोष्टी आहेत. समतेचे एवढे आकर्षण असूनही, समतेशिवाय सर्व व्यर्थ असे वाटत असूनही समतेशिवाय जगाचे सुरळीत कसे चालू आहे, याची संगती आता लागेल असे वाटते. तार्किकता ही जीवनास अस्तित्वास काही मर्यादेपर्यंत आवश्यक असली तरी ती जीवनाची मूलभूत प्रेरणा नाही. ती पुरी झाली नाही– तार्किकतेतून निर्माण होणाऱ्या काही विसंगती–समतेच्या वा विषमतेच्या– दूर झाल्या नाहीत तरी, माणसाचे फारसे अडत नाही. कारण त्याचे अस्तित्वच तार्किकतेवर अवलबून असते आणि माणूस काही मर्यादेपर्यंतच तार्किकतेच्या आधाराने चालतो. ज्यावेळेस त्यास तार्किकता अडचणीची वाटू लागते तेव्हा तो ती सहजप्रेरणेने दूर करतो. समता तर्काला अत्यावश्यक वाटते पण अस्तित्वाला तिची पत्रास नाही. ती अस्तित्वास मूलभूत अशी गोष्ट नाही. थोडक्यात म्हणजे समता ही तार्किक चैन (लक्झरी ऑफ रीझन) आहे. तुमची तर्कशक्ती जितकी तीव्र तितकी तुमची समतेची गरज जास्त. तुमची तर्कशक्ती जितकी व्यापक तेवढी तुम्हाला सामान्यत्वाची व चाकोरीची उबग जास्त. तर्कशक्ती परिणत असण्यावरच ही दुःखे वा आकर्षणे अवलबून आहेत. यापुढे या कल्पनेचे आणखी विवेचन करावयाचे म्हणजे साहित्याच्या क्षेत्रातून निव्वळ तर्काच्या क्षेत्रात जावे लागेल. असो.

कुसुमाग्रजांच्या वैचारिक भूमिकेतील वरील काही विसंगतीच्यामुळे त्यांच्या काव्याच्या उत्कटतेवर व परिणामकारकतेवर काही परिणाम होत नाही, हे त्याच्या काव्याचे सामर्थ्य. त्याच्या काव्यातील उत्कटता एवढी जबर, की असली विसंगतीसुद्धा ते पेलून जाते आणि रसिकाला परिचित विचारभावनांचे नव्या उत्कटतेने दर्शन घडविते. त्यांच्या काव्यातील विचार परिचित आहेत हे त्यांच्या यशाचे एक कारण आहे हे खरे आहे. त्याचबरोबर हेही खरे आहे की या साध्यासोप्या सहज विचाराना त्यानी उत्कटतेतून येणारा अधिक खरेपणा दिला आणि मानव जातीशी त्याचे नाते कायमचे जोडून टाकले. ● ● ●


आगगाडींतून प्रवास
करीत असतांना
काळजी
घ्या!
पेटती सिगरेट
फेकण्यापूर्वी ती
विझवा किंवा
राखदाणी
(ॲश् ट्रे) वापरा.
डब्यांत स्टोव्ह
पेटवूं नका
ज्वालाग्राही पदार्थ
डब्यांतून नेऊं नका
PETRO
ACID
आगगाडींत असतांना
सुरक्षितते
साठीं
आगप्रतिबन्धक
नियमांचें
पालन करा.
जीवन व वस्तू याचा नाश करणारी
भयानक आग लागण्यास निष्काळजी-
पणा कारणीभूत होणे शक्य असतें.
प्रवासांतील सुरक्षिततेच्या हेतुने मध्य रेल्वे द्वारा प्रकाशित

MANOOS MAGAZINE May 1964 : ONE RUPEE R. N. B 9304

कुसुमाग्रज, गोविंद, स्वा. सावरकर—क्रांतीचे स्तोत्रकार गोदावरीच्या परिसरातच निर्माण व्हावेत असा काही संकेत दिसतो. स्वा. सावरकर या महिन्यात ८२ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्यानिमित्त त्यांनीच गायलेले हे अमर 'सिंधूस्तोत्र'—

# हे सुरसरिते सिंधू !

## इतर कोणीहि जरी एक वेळ तुला विसरले तरी

## हा आमचा एकटा महाराष्ट्र........

आम्हाला प्रत्यही ज्याचे नामस्मरण धार्मिक कर्तव्य म्हणून करावे लागते ती आमची सारी पुण्यक्षेत्रे, ती 'अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका, पुरी द्वारावती' ते जगन्नाथपुरीपर्यंत, मदुरेच्या मीनाक्षीपासून तो कामरूपातील कामाक्षीपर्यंत, आमची पुण्यक्षेत्रे आज स्वतंत्र, मुक्त, शुद्ध झाली आहेत. ह्या आमच्या पुण्यक्षेत्राप्रमाणेच प्रत्यही आम्हास आमच्या राष्ट्रैक्याचे स्मरण करून देणारा आणि आमच्या पुण्यतीर्थांना आवाहन करणारा जो मंत्र प्रत्येकाला स्नानाचे वेळी म्हणावा लागतो त्या " गंगेच यमुनेचैव गोदावरि सरस्वति । नर्मदे सिंधु कावेरी जलेस्मिन् सन्निधिं कुरू ।। ह्या मंत्रातील ती गंगा, ती यमुना, ती गोदावरी, ती सरस्वती, ती नर्मदा, ती कावेरी ही आमची पुण्यतीर्थेहि, ह्या आमच्या राष्ट्रीय पुण्यसरिताहि, ह्या भारतीय महाराज्यात आज विमुक्त आणि विशुद्ध होऊन सामावलेल्या आहेत—

पण ह्या पुण्यसरितांत सिंधु का दिसत नाही ?

### सिंधु कुठे आहे ?

हाय ! हाय ! ह्या पुण्यसरितांतील पुण्यतम सरिता जी सिंधु ती मात्र अद्याप ह्या महाराज्यात सामावलेली नाही ! सिंधु आम्हाला अजूनहि अंतरलेली आहे.

काय म्हणता ? आता सिंधूस विसरा ? तिचे नाव त्या मंत्रातून गाळून टाका आणि तो तुमचा स्नानाचा मंत्र आता यापुढे अर्धाच म्हणत जा ? नाहीतर अमके तमके सोमे गोमे आमच्यावर रागावतील, आमचा द्वेष करू लागतील ! म्हणून सिंधूचा संबंध सोडून द्या ?

छे ! छे !! सारे जग जरी आमचा द्वेष करू लागले किंवा साऱ्या जगाचा जरी आम्हास द्वेष करावा लागला तरी सिंधूचा संबंध आम्ही सोडणार नाही, तोडणार नाही. सिंधूस आम्ही विसरू ? सिंधुवाचून हिंदू ! ! अर्थावाचून शब्द ! प्राणावाचून कुडी ! अशक्य ! अशक्य ! जोवर एकतरी हिंदू जिवंत आहे तोवर तो सिंधूस विसरणे शक्य नाही !

### सिंधु सूक्त !

जिच्या काठावर आमच्या प्राचीनतम वेदर्षींनी ऋचांची पहिली सामगायने गायिली, जिच्या पुण्यसलिलाही आपल्या संध्यावंदनातील अर्घ्ये दिली आणि जिला अत्यादराने वेदांतील देवतांमध्ये स्थान देऊन तिच्यावर सुंदरांतील सुंदर सूक्ते रचली त्या तुला, हे अंबितमे, नदीतमे, देवितमे, सिंधू, आम्ही कधीहि विसरणार नाही. तुझ्या परिसरामध्ये आमच्या प्राचीनतम राजर्षींनी नि ब्रह्मर्षींनी केलेल्या यज्ञाच्या प्रदीप्त हुताशनात जेव्हा हवी समर्पिले, तेव्हा अंतराळात उंच उंच दरवळत गलेल्या त्यांच्या सुगंधानी लालायीत होऊन इंद्र, वरुण, मरुतादिक देव त्यांचे त्यांचे हविर्भाग स्वीकारण्यास तुझ्या तीरी येत आणि सोमरसासमवेतच तुझे सुमधुर सलिल पिऊन प्रसन्न होत ! त्या तुला हे सुरसरिते सिंधू, आम्ही कधीहि विसरणार नाही.

### महाराष्ट्रास सिंधुजलाची तहान

त्यातहि ह्या आमच्या महाराष्ट्रास तरी पूर्वीपासूनच तुझी अवीट ओढ लागलेली आहे. पूर्वी एकदा जेव्हा तू आम्हास अशीच अंतरली होतीस तेव्हाहि पारतंत्र्याच्या बंदिवासातून तुला मुक्त करण्यासाठी ह्या महाराष्ट्राचे चतुरंग सैन्य उत्तरदिशेवर चढून गेले. कारण दक्षिण दिग्विजय साधला पण उत्तर दिग्विजय उरला असे हळहळत आमचा शिवाजीराजा मरण पावला होता. त्याची ती अपुरी इच्छा पुरी करण्यासाठी नर्मदा ओलांडून बाजीरावाने चंबळ गाठली. पण नुसते चंबळचे पाणी पिऊन काही आमच्या विजयिष्णु घोड्याची तहान भागली नाही ! म्हणून 'त्या मोगल बादशहाची दाढीच जाळून टाकतो,' असे गर्जत बाजीराव दिल्लीवर चालून गेला. आमचे जयिष्णु घोडे यमुनेचे पाणी प्यायले, गंगेचे पाणी प्यायले. पण त्याची विजयतृष्णा भागेना म्हणून ते पुढे घुसले. त्यांनी शतद्रू (सतलज) ओलांडली, वितस्ता (जेहलम) ओलांडली आणि म्लेच्छांना पादाक्रांत करीत त्यांनी जेव्हा अटकेवर भगवा जरिपटका उभारला आणि तुझे तीर गाठून, तुझे ते पवित्र सलिल आकंठ प्राशिले तेव्हाच काय ती त्याची विजयतृष्णा क्षणभर भागली ! त्या तुला इतर कोणीहि जरी एकवेळ विसरले तरी हे स्रोत स्विनि सिंधु, हा आमचा एकटा महाराष्ट्र उठून तुला पुन्हा विमुक्त केल्याशिवाय राहाणार नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे मासिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रायव्हेट लि., ३८३ नारायण पेठ, पुणे येथे छापून ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. संपादक श्री. ग. माजगावकर